

जपानी नृत्य

तोकोनोमा

प्रभाकर पाध्ये यांचीं पुस्तकें

आजकालच्या महाराष्ट्र (सहकार्यानें)
प्रकाशांतील व्यक्ति
पाकिस्तान कीं पन्नास टक्के ?
कलेचीं क्षितिजें
व्याधाची चांदणी
कृष्णकमळीची वेल
अर्धवर्तुळें
तीन तपस्वी
समाजवादाचा पुनर्जन्म
नवें जग : नवीं क्षितिजें
अगस्तीच्या अंगणांत
उडता गालिचा
तोकोनोमा
युगोस्लाविया (इंग्रजी)

आगामी

हिरवीं उनें (प्रवासलेख)
मैत्रीण (कादंबरिका)



जपानी घरांच्या खोल्यांत,
विशेषतः आगतस्वागताच्या
खोलींत, कोनाकडे भिंतीला,
एखाद्या लांबरुंद कोनाड्या-
सारखा भासणारा, एक भाग
असतो. त्यांत खालीं एका
चौरंगावर अगर पाटावर
एक पुष्पपात्र असतें. पुष्प-
पात्राच्या मागें, भिंतीला, त्या
त्या ऋतूला योग्य असें एखादें
निसर्गचित्र अगर चित्ररूप
काव्यचरण रंगविलेला असतो.
या भागाला तोकोनोमा म्हणतात.

तो को नो मा



लेखक

प्रभाकर पाध्ये

सजावट

सौ. पद्मा सहस्रबुद्धे



प्रथम मुद्रण :
ऑगस्ट १९६१
श्रावण १८८३

मुद्रक :
वा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार
मुंबई २

प्रकाशक :
ग. रा. भटकळ
पॉप्युलर बुक डेपो
लॅमिंग्टन रोड
मुंबई ७



प्रिय पाध्ये,

जपानहून तुम्ही परत आलांत आणि दुसऱ्याच दिवशीं आपण भेटलों. अर्थातच तुम्ही जपानबद्दल खूप खूप बोलत होतां. हा अनुभव आम्हांला तुमच्याबद्दल नवा नव्हता. दर वेळीं तुम्ही प्रवासाहून परत आलांत कीं असेच बोलत बसतां. परंतु ह्या वेळची तुमची धुंदी वेगळी होती. एखाद्या देशाच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनाचें विश्लेषण आणि रसग्रहण करणारे तुम्ही ह्या वेळीं एका वेगळ्याच बेहोषपणानें बोलत होतां.

तुम्हाला जपाननें झपाटलें होतें खरें; परंतु पुस्तकांतील वेगवेगळे लेख तुम्ही तीन वर्षें लिहीत होतां, तेव्हां म्हटलें कीं ही धुंदी उतरली असेल. परंतु पुस्तक छापण्याच्या दृष्टीनें मी तुमचे लेख एकत्र वाचायला लागलों आणि लक्षांत आलें कीं हें नुसतें प्रवासवर्णन नव्हे. तुम्ही ' न वें ज ग – न वीं क्षि ति जें ' ह्या पुस्तकांत कालानुरोधानें प्रवासाचें – प्रवासांतील घटनांचें, व्यक्तींचें आणि वस्तूंचें – वर्णन केलें होतें. ह्या पुस्तकांत तुम्ही तें कालाचें बंधन झुगारून दिलें आहे. कदाचित् यांतील कांहीं घटना कल्पितहि असतील. परंतु ज्या धुंदीनें तुम्ही त्या पहिल्या दिवशीं बोलत होतां त्याच धुंदीचा प्रत्यय हे लेख वाचतांना आला आणि जें दिसलें त्यापेक्षां जें वाटलें तें सांगण्याचा तुमचा प्रयत्न अत्यंत रमणीय वाटला. तुमचें हें पुस्तक म्हणजे जपानी सौंदर्याचें गुणगान. म्हणूनच ' तो को नो मा ' हें नांव मला सर्वथा योग्य वाटतें.

आपला,

रामदास भटकळ

थोडा खुलासा

या पुस्तकांत कांहीं मित्रांचा आणि मैत्रिणींचा उल्लेख आहे. या उल्लेखांतला प्रत्येक शब्द आणि अभिप्राय परमार्थानें घेतला जाणार नाहीं अशी आशा आहे. लेखनाच्या प्रक्रियेंत मूळचे उद्गार आणि मूळची स्वभावरेखा यांचें संक्रमण झालेलें असणारच.

उदाहरणार्थ, माझे मित्र प्रोफेसर हर्बर्ट पासीन. मी प्रथम जपानला त्यांच्या बरोबर गेलों. त्यानंतर जपानमधल्या माझ्या प्रत्येक मुक्कामांत ते तेथें होते. त्यांच्या स्नेहाचे आणि सहवासाचे अनेक पडसाद या पुस्तकांत उमटलेले आहेत. पण त्यांच्यावर विस्मरणाचे आणि काल्पनिकतेचे किती संस्कार झाले असतील कोण जाणे !

या पुस्तकाचें कोडकौतुक करण्यांत पॉप्युलर प्रकाशनाचे सदानंदराव आणि रामदास भटकळ यांनीं श्रम आणि खर्च यांची क्षिति बाळगली नाहीं यांबद्दल त्यांचे पुरेसे आभार कसे मानणार ?

२०–८–१९६१ *प्रभाकर पाध्ये*

अनुक्रम

कांहीं जपानी शब्द

आनोने : इकडे पाहा, हें पाहा, यांसारखा दुसऱ्याचें लक्ष वेधून घेण्यासाठीं वापरलेला शब्दप्रयोग.

आरिगातो : आभार मानण्यासाठीं केलेला शब्दप्रयोग.

आसो : असें का, आच्छा, अशा उद्गाराचा शब्दप्रयोग.

ओबी : किमोनोवर बांधण्याचा कमरपट्टा. याची सुंदर घडी पाठीवर येते.

कोटो : एक जपानी तंतुवाद्य.

गेटा : खडावेसारखी लाकडी तळव्याची चप्पल.

चाया : गेशांना भेटण्याचें चहाचें उपाहारगृह.

झोरी : बायकांची उंच टांच-तळव्याची चप्पल.

टाबी : आंगठ्यासाठीं निराळा भाग पाडलेला पायमोजा.

टेम्पुरा : भज्यासारखा तळलेला मासा.

दोझो : कृपा करून – विनविण्यासाठीं वापरलेला शब्दप्रयोग.

बॉन्साय : मुद्दाम खुजटविलेल्या झाडाची कुंडी.

फुसुमा : जपानी घराच्या खोल्यांमधली सरकविण्याची भिंत.

ममासान : दारूपानाच्या दुकानाची मालकीण किंवा संचालिका.

रम्मा : सरकणारी भिंत आणि तुळई यांच्या दरम्यानचा भाग.


शोगन : जपानी पेशवा.

साके : तांदळाची दारू – जपानचें राष्ट्रीय पेय.

सामीसेन : एक जपानी तंतुवाद्य.

सामुराई : जपानचा क्षत्रियवर्ग.

सायोनारा : निरोप देण्यासाठीं वापरावयाचा शब्दप्रयोग.





‘कारुता’ नववर्षानिमित्त खेळण्यांत येणारा
काव्यवचनांच्या पत्त्यांचा खेळ



जपानी ग्रामकन्या



अ ता मी

अतामी हें मधुचंद्राचें अभिजात ठिकाण आहे. निसर्गानेंच अतामीची तशी योजना केलेली आहे. आपल्याकडून तिला कांहीं कमी पडूं नये अशी त्यानें शक्य तितकी काळजी घेतली आहे. जपानचा रिव्हिएरा म्हणून प्रसिद्ध असलेल्या भागांतील एका नितांतसुंदर खोऱ्यांत अतामी वसलेली आहे. तीन बाजूंना तीन तऱ्हांनीं पसरलेल्या डोंगरांनीं तिला कुशींत घेऊन कुरवाळली आहे, आणि चौथ्या बाजूला समुद्र तिच्या पायाशीं येऊन चूर झाला आहे. या डोंगरावरील वनश्रीकडे टक लावून अतामी पाहते तेव्हां तिचे डोळे हिरव्या स्वप्नांनीं मुग्ध होतात आणि ती समुद्राच्या निळ्या विस्तारावर दृष्टि फेकते तेव्हां तिची नजर विस्फारते. एकीकडे डोंगरावरील आकाशरेषेबरोबर ती आंदोलित होते तर दुसरीकडे क्षितिजावरील जहाजांबरोबर ती स्थिरावते. समुद्र आणि डोंगर यांच्या-बरोबर नजरबंदीचे असे खेळ खेळत असतांनाच मधल्या ओढ्यांच्या

ती आपला व्यवहार मांडते आणि मग या व्यवहारानें थकलेलें शरीर उष्ण झऱ्यांच्या हौदांत आरामानें झोकून देते. उन्हाळी झरे हें अतामीचें वैभव आहे. बारा महिने तेरा काळ या वैभवाच्या विलासांत ती दंग असते – त्याच्या दरवळलेल्या उन्मादक गंधांत मस्त असते.

अतामी हें एकट्यानें भेट देण्याचें ठिकाण नाहीं. जोडप्यानें भेट देण्याचें ठिकाण आहे. या जोडप्याच्या बंधनाची गांठ स्वर्गांत बांधलेली असली पाहिजे अगर सालंकृत कन्यादानाचीं चिन्हें धारण करून त्यानें आपल्या परिसरांत पाऊल टाकलें पाहिजे अशी अतामीची मुळीच अट नाहीं. एक पुरुष आणि एक स्त्री एवढी निसर्गनियमाची किमान अट त्यानें पाळली कीं पुरे – अधिक चांभारचौकशा करण्याची गरज नाहीं. हा पुरुष आणि ही स्त्री परस्परांवर अनुरक्त असलीं कीं ती खूष – आणि शनिवार-रविवारची सुट्टी घालविण्यासाठीं आलेल्या जोडप्यांच्या पहिल्या नजरेंतच हें अनुरक्तीचें पाणी खेळत असलेलें दिसतें, असा तिचा अनुभव असतो. म्हणून आगगाडीच्या स्टेशनांत हीं जोडपीं उतरल्याबरोबरच ' मधुचंद्राच्या यात्रेकरूंचें स्वागत असो ' अशी घोषणा ती करते. या घोषणांचा आवाज हा अतामीचा खास आवाज आहे, आणि जपानी गेटांचा ' खटक्–खटक् ' ' खटक् – खटक् ' आवाज अगर रात्रीचा आगीच्या बंबवाल्यांचा ' टाप्–टाप् ' ' टाप्–टाप् ' हा आवाज, या अभिजात आवाजांइतकाच या घोषणेच्या आवाजाचा तिला अभिमान आहे. या आवाजांत तिचें सारें अगत्य, सारा उत्साह भरलेला आहे. अतामींत येणारे मधुचंद्राचे यात्रेकरू या आवाजावर आंदोलित होऊनच येतात – कारण ते जमिनीवरून चालत नाहींत, हवेंतून चालतात !

अतामी पांच दिवस आळसावते, पण या दोन दिवसांत तिच्या अंगामध्यें वारें शिरतें ! शुक्रवारपासूनच तिची झोंप उडूं लागते, पण शनिवारीं ती चांगली नाचूं लागलेली असते. या दोन दिवसांत ती किमोनोवरील नक्षीच्या नजरेनें पाहते, उन्हाळी झऱ्याबरोबर खेळते, साकेच्या पेल्याबरोबर झुकते, सामीसेनच्या स्वराबरोबर गाते, पंख्याच्या प्रतीकात्मक पवित्र्याबरोबर पदक्षेप करते – एकंदरींत यौवनाच्या उन्मादानें बेहोष होते. अतामीच्या आठवड्यांतले हे दोन दिवस म्हणजे स्वतःला झोकून देण्याचे दिवस होत !

अतामीचा संसार म्हणजे अतामीच्या हॉटेलांचा संसार. पांच दिवस यथास्थित ताणून देऊन सहाव्या दिवशीं तीं तुमच्या स्वागतासाठीं सज्ज होतात.

त्यासाठीं आपल्या साऱ्या चैतन्याला जाग आणतात. त्यांचा माणूस स्टेशनवरच तुमचें स्वागत करतो. तेथून तो तुम्हांला हॉटेलमध्यें घेऊन जातो. हॉटेलच्या दर्शनानेंच तुम्ही खूष होऊन जातां. जपानी कलात्मकतेचें प्रमाणशीर सिंचन त्याच्या प्रवेशद्वारावर झालेलें असतें, आणि त्याच्या नांवांत जपानी काव्य ओतलेलें असतें. येथें समुद्राचा खारा वारा तुमचें अंग फुलवील अगर अलुबुखारच्या फुलांचा सुगंध तुमचें अंतःकरण उमलवील अशी या नांवांत ग्वाही असते. हॉटेलांत आल्याबरोबर तेथील गोड परिचारिका तुमचें स्वागत करते – म्हणजे तोंडभर हास्य फुलविते, नेत्रांच्या मासोळ्या नाचविते, कमरेंत लवून नमस्कार करते आणि लगेच तुमच्या बुटांचे बंद सोडूं लागते. मग पायांत घालण्यासाठीं सपाता पुढें करते आणि तुम्हांला तुमच्या खोलींत घेऊन जाते. खोलीच्या नुसत्या दर्शनानें तुमचें भान हरपतें. दरवाजासमोरच स्टँडचा पडदा असतो, त्याच्यावरचें किरमिजी रंगांतलें बगळ्याचें जपानी चित्र पाहून तुमची नजर स्तब्ध होते – पण क्षणभरच; कारण इतर अनेक गोष्टी तिला आपल्याकडे खेचीत असतात. तोकोनोमांत टांगलेल्या चित्रांतले फोडलेल्या डाळिंबाचे दाणे आणि सतरा छेदांच्या छोट्या काव्याचीं जपानी चित्राक्षरें यांची संगति तुमची नजर क्षणभर अगदीं बांधून टाकते. तोकोनोमांतल्या फुलदाणींत आज सूर्यफुलांची योजना आहे (जपानी चिडाच्या अगर मोरपंखाच्या डहाळीची नाहीं) ही बहुधा परकीय पाहुण्यांच्या आवडीची खास कदर. वर छताच्या प्रत्येक खणांत चित्रकलेचे खास नमुने आहेत. एकांत कावळ्याची योजना आढळते – आणि जन्मांत प्रथमच कावळा सुंदर वाटतो! पण या साऱ्या चित्रचातुरीपेक्षां तोकोनोमाचा लाकडी खांबच तुमचें लक्ष खेचून घेतो. जंगलांतल्या झाडाचा हा सलग अवयव तसाच, त्याच्या साऱ्या नैसर्गिक वळणांसह, येथें आणून बसविलेला असतो. त्याच्यावरची साल काढून टाकण्यापलीकडे शस्त्राचे अधिक कांहीं संस्कार त्याच्यावर झालेले नसतात. पण त्याच्या दाणेदार रेषांच्या अंगांवर पॉलिशचे हात असे कांहीं फिरलेले असतात कीं त्याच्या तकतकित दर्शनानें तुम्हांला वेड लागतें आणि त्याला जाऊन आलिंगन देण्याचा तुम्हांला मोह होतो. पण ती मुलगी तेथें असल्यामुळें तुम्ही तसें कांहीं करीत नाहीं, फक्त एकवार त्याच्यावर हळूवार हात फिरवितां आणि मग नजर इकडेतिकडे फिरते. तुम्ही चकित होतां. खोलींत फर्निचर कांहींच नसतें. एका कोपऱ्यांत फक्त एक कपडे ठेवण्याचा स्टँड आणि भिंतीसरशीं एक बैठा आरसा. पण त्या खोलीचें

रिकामें रूपच तुमच्यावर अंमल गाजवूं लागलेलें असतें. कारण तुमच्या पायांना रेशमाचा स्पर्श करणारी आणि डोळ्यांत तकतकितपणा ओतणारी जमिनीवरची तातामी (चटई) तुम्हांला ओढ लावीत असते. इतक्यांत ती मुलगी सज्जांतल्या सरकत्या खिडक्यांचे पडदे सरकावते आणि तुमचें लक्ष सज्जांतल्या सोफाखुर्च्यांकडे आणि खिडक्यांतून दिसणाऱ्या समुद्राच्या विस्ताराकडे जातें आणि तुम्ही नकळतच जाऊन सोफ्यावर अंग झोकून देतां आणि टक लावून बाहेर पाहूं लागतां. पण ती मुलगी तुमच्या भोंवतीं घोटाळत असते. तिला तुमचे कपडे उतरवायचे असतात. तुमच्या तें ध्यानांत येतें आणि तुम्ही (संवयीप्रमाणें) स्वतःच कपडे उतरवूं लागतां, पण ती मुलगी हळूच येते आणि फुलपांखराच्या हातांनीं तुमचे कपडे उतरवूं लागते. तुम्हांला प्रथम कसेंसेंच वाटतें, पण तिच्या समर्पित सेवेची मोहिनी अनिवार ठरते. तुम्ही स्वतःला तिच्या ताब्यांत देतां आणि ती तुमचे कपडे निर्वेध उतरूं लागते. शेवटीं तुमच्या अंगावर इतके कमी कपडे राहतात कीं तुम्ही गडबडतां, गोंधळतां. पण कांहीं बोलत नाहीं, कांहीं करीत नाहीं – करूं शकत नाहीं. ती तुमच्या कपड्यांच्या हलक्या हातांनीं घड्या करते, फुलासारख्या घड्या करते आणि कोपऱ्यांत नेऊन ठेवते. मग युकाता (घरांत घालावयाचा किमोनो) आणून तुमच्या अंगांत चढविते. आतां तुम्हांला इतकें मोकळें मोकळें वाटतें कीं तुम्ही सारें अंग चटईवर पसरून देतां, चटईच्या अंगभर स्पर्शानें सुखावून जातां आणि ती मुलगी आपलें वेड लावणारें हास्य तुमच्या लोळण्यांत मिसळून निघून जाते. जाते पण जरा वेळानें परत येते. आतां तिच्या हातांत टॉवेल असतो. स्नानगृहांत पाणी तयार आहे म्हणून ती सांगते नि तुम्ही स्नानाला जातां. स्नानगृहाच्या बाहेरच कपडे काढून ठेवण्याची व्यवस्था आहे, तेथें विवस्त्र होऊन स्नानगृहांत शिरायचें ! मग तुमच्या ध्यानांत येतें कीं त्या स्नानगृहाच्या दरवाजाला कडी नाहीं, आणि तुमचा पाय अडखळतो. पण उन्हाळी झऱ्याच्या पाण्यांत शिरायला तुम्ही अधीर झालेले असतां, तेव्हां इतक्यांत कोणी न येवो अशी प्रार्थना करून तुम्ही आंत शिरतां. आंतला देखावा पाहून तुमचे डोळे चकित होतात. सारें स्नानगृह कसें चकचकित आरस्पानी असतें ! एका कोपऱ्यांत नळ असतो, तेथें प्रथम आंघोळ करून मग गरम झऱ्याच्या हौदांत शिरायचें. हौदांतलें पाणी गरम आहे, फार गरम आहे; त्याच्यावर वाफा उठत आहेत. आंत झरे आहेत, झऱ्यांच्या उपळीमुळें आंतून लहान-

लहान बुडबुडे उठत आहेत, आणि त्यांच्यामुळें पाण्याचा उष्णपणा मनावर चांगला ठसत आहे. पण वरून थंड पाणी सोडण्याची व्यवस्था आहे. तुम्ही थंड पाण्याचा नळ सोडतां – उन्हाळी पाण्याच्या नाजुक बुडबुड्यांचा अवमान न होईल इतक्या बेतानें सोडतां – आणि हौदांत शिरतां. शिरल्याबरोबर गरम पाणी चारी बाजूंनीं तुमच्या अंगावर चाल करून येतें. हळुहळू पाण्याची उष्णता तुमच्या रोमारोमांत शिरते. तुमच्या धमन्यांतलें रक्त चेततें. रक्ताचें अभिसरण वाढतें. त्यांत गति शिरते. सळसळ शिरते – मग लगेच तुमच्या नसान् नसा मोकळ्या होताहेत असें वाटूं लागतें. त्वचेचा कणन् कण फुलून येत आहे असें भासतें. तुमच्या शरीरांत आराम शिरतो. मन मुक्त होतें. पाण्याच्या थेंबांचा सुखद संचार सर्वांगाला जाणवूं लागतो. आतां तुम्ही त्याच्याशीं खेळूं लागतां. पायाच्या अंगठ्यानें एक झरा बुजविण्याचा प्रयत्न करतां – आणि तरी झरा उफाळून येतो. त्याची गंमत चाखत राहतां. नंतर हौदांत माशाप्रमाणें मुरडत, कलंडत, अंग दुमडून मासा होण्याचा प्रयत्न करतां ! हा खेळ चालूं असतांच तुमच्या ध्यानांत येतें कीं ह्या हौदाची लांबी-रुंदी फक्त दोन व्यक्तींपुरतीच आहे. सहस्नान हें जपानी मधुचंद्राचें एक महत्त्वाचें अंग आहे.

तुम्हीं स्नान करून परत येतां तों जेवण तयार असतें. परिचारिका एक छोटेसें चौरंगासारखें टेबल आणून ठेवते, त्याच्याभोंवतीं गिरद्या मांडते आणि टेबलावर जेवणाचे पेले आणून ठेवते. जपानी जेवण तुम्हांला आवडो न आवडो, त्याच्या नुसत्या दर्शनानें तुमचें पोट भरतें – निदान दृष्टि निवते. कारण जपानी जेवण जितकें स्वादिष्ट असतें त्याहून अधिक रंगदार असतें. लाल, शेंदरी, केशरी रंगांचे पदार्थ जिभेपेक्षां डोळ्यांनाच अधिक भुरळ घालतात. जपानी कारागिरांची शेकडों वर्षें कमावलेली कलादृष्टि त्यांत ओतलेली असते. या दृष्टीचे सारे रंगदार संस्कार त्यांच्यावर झालेले असतात. एकेक बशी आणि एकेक पेला म्हणजे कलेचा कोमल नमुना असतो. वैशिष्ट्यपूर्ण नमुना, कारण प्रत्येक हॉटेल स्वतःसाठीं खास वैशिष्ट्याच्या पेले-बशा तयार करवून घेत असतें. म्हणून हॉटेलचें अन्न जितकें रंगदार तितकेंच त्याच्या पेलेबशाहि रंगदार – आणि रंगदार अन्न आणि रंगदार बशा यांची रंगीत स्पर्धा तुम्ही क्षणभर नुसती पाहतच राहतां !

जेवण झाल्यावर अर्थात् तुम्ही बाहेर भटकायला जातां. परत येतां तों जेवणाचें टेबल दृष्टिआड झालेलें असतें आणि त्या ठिकाणीं मखमली आवरणाचें रंगदार अंथरूण घालून ठेवलेलें असतें. अंथरूण ऐसपैस असतें आणि त्याच्यावर दोन पांघरुणें असतात.

* * *

अतामीच्या शोभेचा आस्वाद जोडप्यानें घेतला पाहिजे. अतामीच्या सुशोभित रस्त्यांत जोडप्यानें हिंडलें पाहिजे. जोडप्यानें म्हणजे नुसतें हातांत हात अडकवून नव्हे. जोडप्यानें याचा अर्थ एकाच्या अंगांतल्या चैतन्याच्या प्रवाहानें दुसऱ्याच्या अंगांतला कणन् कण सळसळला पाहिजे; एकाच्या अंतरंगांतलीं स्वप्नें दुसऱ्याच्या अंतरंगांत उमललीं पाहिजेत; आणि एकाच्या डोळ्यांतलें पाणी दुसऱ्याच्या डोळ्यांत लकाकलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे दोघांच्याहि शरीरांत जीवनशक्तीचा एकच प्रवाह वाहायला हवा. या जीवनशक्तीच्या प्रवाहाबरोबर तुम्हीं अतामींत हिंडा – वाटेल, तुमचें अनेक दिवसांचें हरपलेलें श्रेय आज सांपडेल. आणि मग परस्परसहवासाच्या उन्मादानें तुमच्या अंतःकरणाचे कोपरेन् कोपरे धुंद होतील – आणि वर्तमानाच्या एक क्षणांत युगन् युग एकवटेल! अतामीचें वातावरणच तसें आहे.

हा रस्ता पाहा! रस्त्याच्या कांठच्या या दीपमाळा पाहा. येथें दिव्याच्या खांबावर एकुलता एक दिवा असहायपणें जळत नाहीं. येथें खांबाखांबाला दिव्यांचें तोरणच आहे. अगदीं सप्तरंगी तोरण! आणि ही दुकानापुढची कागदी कंदिलांची रांग पाहा. एकेक कंदील म्हणजे रंगीत प्रकाशाचा ठेवाच! एकेका कंदिलांत एकेक कविताच तेवत आहे. एकेका कंदिलावरची आकृति म्हणजे अचानक जाग आलेली कलाकृतिच! या दिव्यांच्या तोरणांनीं आणि कंदिलांनीं अतामीच्या रस्त्यांवर प्रकाशाचा उत्सव मांडला आहे! या उत्सवांत जोडप्यानें हिंडा – तुमच्या अंतरंगांतली अनुरक्ति विजेच्या दिव्यांतील केसरासारखी प्रज्वळेल.

कोणत्याहि दुकानांत शिरा. तुम्हां दोघांना पाहतांक्षणींच तेथल्या मुलीच्या डोळ्यांत खुणेचें पाणी लकाकेल आणि तुम्हांला हव्या असलेल्या वस्तूला एकदम एक खास अर्थ प्राप्त होईल. तुम्ही साधी जिनतानची गोळी – मागा तिच्या

दृष्टीनें ही गोळी एका गोड सुगंधित मीलनाची प्रेरक शक्ति ठरेल. तुम्ही सिग्रेटचें पाकीट मागा – तुमच्या मुखांतून निघालेल्या धुराच्या वलयाबरोबर तुमच्या प्रियेची नजर कशी वेलांट्या घेईल तें तिच्या नजरेला दिसूं लागेल. तुम्ही एखादें नियतकालिक घ्या – तुम्ही सिग्रेट पीत बिछान्यावर पडलेले आहांत, तुमच्या शेजारीं, तुमची प्रिया आहे आणि ती तें बदामी डोळ्यांनीं वाचीत आहे असें चित्र तिनें केव्हांच रंगविलेलें असेल. अतामीचीं दुकानें झालीं तरी पैशाचाच व्यवहार करतात, पण त्या व्यवहारांत प्रणयाच्या व्याकरणाच्या अनेक कारिका आहेत.

चालतां चालतां तुम्ही पाचिंकोच्या दुकानांत शिरतां ! पाचिंकोच्या यंत्रांत कथलाच्या गोळ्या उडवून नशिबाची परीक्षा पाहण्याचा हा खेळ तुम्हां दोघांनाहि फार आवडतो. थोडा वेळ तुम्ही या यंत्राची कळ आळीपाळीनें दाबून एकमेकांच्या नशिबाची एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करतां. पण लवकरच तुम्हांला त्याचा कंटाळा येतो. मग तुम्ही दुसऱ्या अशाच एका जुगारी खेळाच्या दुकानांत शिरतां आणि तेथली बुचाची बंदूक घेऊन तेथें वर्तुलाकार फिरणाऱ्या स्टॅण्डवरची वस्तु स्थानभ्रष्ट करून ती जिंकण्याचा खेळ खेळतां. पण ही सोपी वाटणारी गंमत बरीच कठीण असते. लाकडाचीं बुचे सोन्याच्या भावानें विकत घेण्याचा हा बुडित खेळ लवकरच तुम्हांला कंटाळा आणतो, कारण जुगारी करमणुकींत आज तुमचे मन रमत नाहीं. तुम्ही स्वतःच एका जबरदस्त जुगारांत अडकलेले असतां ना ! या नाजुक जुगाराचे धागे अंतरंगांत गुंतत-गुरफटत असतात त्याचीच तुम्हांला अधिक गंमत वाटते. तुमचें अवघें अंतरंग रांधून टाकणारी ही गंमत बाजारी जुगारांत बुडवून टाकण्याची ही कल्पना तुम्हांला सहन होत नाहीं, नि पाचिंको-विचिंकोच्या भानगडीपासून तुम्ही दूर जातां.

– आणि तुम्हांला आढळून येते कीं, तुम्ही आतां अतामीच्या एका विलग, विश्रब्ध विभागांत आलां आहांत – आणि या येथें हारीनें उभ्या असलेल्या गल्लयांपैकीं एकींत तुम्ही उभे आहांत ! या गल्लया म्हणजे आसावलेल्या अंतःकरणाचीं विश्रांतिस्थानें ! अगदीं शांततुष्ट स्थानें! येथें गडबड नाहीं, गर्दी नाहीं, झगझगाट नाहीं. येथला उजेड अंधुक आहे, वातावरण निभ्रांत आहे आणि दर्शन आश्वासक आहे. येथें तुम्ही एकमेकांना अगदीं बिलगून चालतां. आतां एकाच्या शरीरांतील सळसळीची गति दुसऱ्याच्या सळसळींत मिळून गेली

आहे, आणि एकाच्या भावनांचें स्पंदन दुसऱ्याच्या स्पंदनांत विलीन झालें आहे. आतां तुम्ही एका पावलानें चालतां, एका नजरेनें पाहतां. चालतां चालतां एका पेयगृहापुढें तुमचें पाऊल थबकतें. पेयगृहाच्या आवारांतल्या अझेलिआच्या झुडपानें तुमची दृष्टि वेधते. इवलाले पक्षी होऊन त्याच्या गूढ विस्तारांत गडप व्हावें असें तुम्हांला वाटतें. तुम्ही एकदम अंतर्मुख बनतां व क्षणभरानें एकमेकांकडे मुग्ध दृष्टीनें पाहतां—मग तुमची तुम्हांलाच गंमत वाटते आणि थोडें मजेदार हसून तुम्ही पुढें जातां. जरा वेळानें तुम्ही एका कॉफीगृहांत शिरतां. तेथें टेबलावर टेलिफोन असतो. तो पाहून तुमच्या डोक्यांत एक मिस्किल कल्पना येते नि तुम्ही वेगवेगळया टेबलापाशीं बसून एकमेकांच्या कानांत करावयाच्या गोष्टी टेलिफोनमधून करूं लागतां, पण तें अर्थात् जमत नाहीं आणि ही बालिश गंमत तुम्ही आटोपतां आणि बाहेर येतां. जरा वेळानें एका पेयगृहांची किमोनो-कन्या तुमच्याकडे अपेक्षेनें पाहते, पण लगेच तुमच्या नजरेवर तरळणारीं स्वप्नें ओळखते आणि तुम्हांला बीअर-पानासाठीं निमंत्रण करण्याऐवजीं नुसतें चोरटे हसते. तुम्ही पुढें जातां नि समुद्राच्या धक्कयापाशीं थांबतां. धक्कयावर आदळणाऱ्या लाटांच्या तुषारांनीं तुमचें शरीर शहारतें. तुम्ही एकमेकांना अधिकच बिलगतां. पण सागराच्या दर्शनानें हललेलें तुमचें मन एकदम तुमच्या वेगवेगळया घरीं जातें. आतां या क्षणीं आपण असे एकमेकांपासून दूर जावें याचा तुम्हांला धक्काच बसतो आणि तुम्ही एकदम भानावर येऊन म्हणतां, ' चला— '

तुम्ही पुनः त्या गजबजलेल्या रस्त्यावर येतां, पण लगेच रस्त्यापलीकडे होतां. आतां तुम्ही ओढ्याकांठच्या वाटेवर आहांत. तेथें एक झाड असतें. झाडाखालीं काळोख असतो. काळोखांत एक अलिप्तता असते. त्या अलिप्ततेची आतां तुम्हांला ओढ असते. त्या ओढीनें तुम्ही झाडाखालीं जातां. तेथून खालच्या गजबजलेल्या रस्त्यावरचें उधाण तुम्हांला दिसत असतें. त्याचे रंग तुमच्या आतां ओळखीचे झालेले आहेत. तेथल्या पावलांची लय तुम्हांला आतां माहीत झालेली आहे. तेथल्या नजरेचे खेळ तुमच्या आतां परिचयाचे आहेत. येथून दुरून ते पाहण्यांत आतां एक निराळीच गंमत आहे. त्यांत असून नसल्याची गंमत! तिचा आस्वाद घेत तुम्ही उभे राहतां. तो आस्वाद घेतां घेतांच तुमच्या परस्पर आकर्षणाला अंतर्यामीच्या ओळखीचें स्वरूप येत आहेसें तुम्हांला

वाटतें नि तुम्ही म्हणतां, 'चला जाऊं या आतां परत.' पण परत यायचें म्हणजे पुनः त्या भर रस्त्यावर यायचें. पण या रस्त्याकडे थोडें तिऱ्हाईतपणानें पाहण्यास तुम्ही आतां शिकलां आहांत. आतां त्याच्या निर्भर उत्सवानें तुम्ही वाहून जात नाहीं. पोहतां पोहतां लाटेशीं खेळावें, लाटेवर डुलावें तसें खेळत–डुलत तुम्ही चालतां. क्षणांत तुम्ही त्या उन्मनस्क जीवनाच्या प्रवाहाशीं एकरूप होतां तर क्षणांत तुम्ही तुमचें स्वतंत्र विश्व निर्माण करतां. हे तुमचें विश्व म्हणजे अतामीच्या रस्त्यांतल्या आनंदोत्सवाचा एक तुकडाच – कधीं तो अलग होतो तर कधीं तो इतर तुकड्यांशीं मिळून जातो. असा हा मीलनाचा आणि अलगपणाचा गोड लपंडाव खेळत तुम्ही हॉटेलांत परत येतां.

खोलींत येतां पण दिवा लावीत नाहीं. सरळ जातां आणि सज्जांतल्या सोफ्यावर जाऊन पडतां. तिकडून समुद्राचा ओला खारा वारा येतो, त्यानें तुमचें शरीर शहारतें आणि तुम्ही एकमेकांना अधिकच बिलगतां. बिलगतां नि शांत पडून राहतां. आतां तुमची नजर खोलीभर फिरते. खोलींतल्या किरमिजी काळोखांत मधांचीं दृश्यें आतां एक नवेंच सौंदर्य धारण करून आहेत. दारासमोरच्या पडद्यावरचा किरमिजी बगळा आतां या काळोखांत पार लोपून गेला आहे, पण त्याची स्मृति मात्र नजरेसमोर नाचत आहे. तोकोनोमांतलीं तीं दोन सूर्यफुलें आतां एकमेकांत मिळून गेलीं आहेत. तोकोनोमाच्या त्या रांगड्या खांबावरच्या रेषा आतां दिसत नाहींत, पण त्याच्या वक्र वळणाला आतां काव्याची लहर प्राप्त झाली आहे. खोलींतलें सारें वातावरण आतां असें लहरलें आहे. वस्तू-वस्तूंतले भेद आतां निमाले आहेत. या साऱ्यांची एक सलग आकृति जाणवूं लागली आहे. दिवसाच्या उजेडांत प्रत्येक वस्तूच्या स्वतंत्र सौंदर्यामुळें जी एकता लोपली होती ती आतां आकारली आहे. या एकतेंत विरून जाण्याचे विचार आतां जोरावतात – आणि लक्ष अंथरुणाकडे जातें. अंथरुणाची ऊब अंतःकरणांत शिरूं लागते. इतक्यांत समुद्राचा गार वारा येतो. अंग शहारतें. जडावलेली दृष्टि पुनः एकदां टवटवते आणि बाहेर जाते. बाहेर आतां निराळेंच दृश्य असतें : चमचमणाऱ्या हिऱ्यामाणकांचें दृश्य. अतामी शहराचें मघांचें झगमगलेलें रूप आतां या हिऱ्यामाणकांच्या विखुरलेल्या विस्तारांत येऊन बसलें आहे. लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या हिऱ्यामाणकांच्या चमचमीनें हें रूप आतां रंगलें आहे. एखादें

माणिक मध्येंच प्रकाशतें, मध्येंच मंदावतें. मध्येंच एखाद्या गहिऱ्या रंगाची रेखा इकडून तिकडे आकृति कोरीत जाते – आणि गप्प होते. पलीकडे डोंगरावर एकच एक लाल तारा एकटाच प्रकाशत असतो – आपल्या उच्च स्थानाच्या दिमाखानें प्रकाशत असतो. मघांशीं अतामींत जीवनोत्सव उसळला होता ना, त्याचींच आकाशांत उडालेलीं हीं प्रकाशपुष्पें ! तुमची नजर त्यांच्यावर खिळते, क्षणभर ती अगदीं निर्बोध बनते, पण मग लगेच तिला एक चाळा लागतो. यांपैकीं कोणत्या पुष्पाचा अतामीच्या कोणत्या भागाशीं संबंध असतो तें ती शोधूं लागते. इतक्यांत पावसाची सर येते. एक झिरझिरित पडदा पसरतो. त्याच्या आड कांहीं माणकें मालवतात, कांहीं अंधुक बनतात, आणि जीं अद्याप प्रकाशतात तीं अधांतरीं लोंबतात. त्यांचा अतामीशीं असलेला संबंध तुटतो – आणि या तुटातुटीच्या जाणिवेनेंच अतामीच्या त्या जीवनोत्सवाची आठवण अंगावर पसरते. पसरते पण पकडत नाहीं – कारण त्यांतलें अलिप्त, विश्रब्ध विश्व तुम्ही अनुभवलेलें असतें. त्याची मोहिनी वाढलेली असते. लवकरच त्याच्यांत तुम्ही विलीन होतां. तुमचीं व्यक्तित्वें एकमेकांत विरघळतात – आणि अनुभूतीची, मीलनाची जीवनज्योत त्यांत तेवत राहते !

* * *

अतामी मीं अशी जोडप्यानें पाहिली नाहीं. अतामीचा अस्सल अनुभव मला नाहीं. आम्हीं अतामीला दोघे जण आलों होतों, पण जोडप्यानें आलों नव्हतों. जपानमधलें एक स्वैर सुखाचे स्थळ दाखविण्यासाठी म्हणून पासीननें मला आणलें होतें. म्हणून अतामींत आम्ही आंखडलेल्या वृत्तीनें हिंडलों. बुद्धि आणि वृत्ति ताब्यांत ठेवून हिंडलों. अर्थात्, अतामी आम्हांला निराळी दिसली. अतामीचा दीपोत्सव आम्हीं पाहिला, पण त्यानें आमचीं मनें धुंद झालीं नाहींत. आम्ही दुकानांत शिरलों, पण तेथल्या मुलीच्या नजरेंत ती ओळख आम्हांला दिसली नाहीं. त्या अंधुक उजेडाच्या गल्ल्यांत आम्ही शिरलों, पण कबुतरें बनून तेथल्या एखाद्या वळचणींत शिरावें असें आम्हांला वाटलें नाहीं. त्या ओढ्याकांठच्या झाडाखालींहि गेलों, पण तेथें तें विश्रब्ध विश्व गवसलें नाहीं. उलट आम्हांला निराळींच दृश्यें दिसलीं. अमेरिकन नाविकांचा एक ताफा आम्हीं पाहिला, पण त्याच्या हालचालींतला आवेग फासेपारध्याच्या आवेगासारखा वाटला. एका हॉटेलच्या प्रवेशद्वारांतून युकाता परिधान

केलेल्या पुरुषांचा एक थवा गेटाला खडखडावीत बाहेर पडतांना पाहिला–यांतला एकहि जोडप्यानें आलेला नव्हता, पण अतामीची रंगत लुटण्याची ईर्षा प्रत्येकाच्या नजरेंत दिसत होती. आतां हे भाड्यानें मिळणाऱ्या मैत्रिणी शोधणार, त्यांच्या संगतींत शरीराची आणि पैशाची शक्ति धुऊन काढणार आणि सोमवारीं सकाळीं रिकाम्या खिशानें आणि दमलेल्या देहानें टोकिओचा उद्योग ओढण्यासाठीं निघून जाणार! आणि मग आम्हांला अशाच एका हॉटेलांतून निघणारा मुलींचा ताफा दिसला! तरुण मुलींचा ताफा. टोकिओंतलीं दुकानें आणि ऑफिसें हास्यानें फुलवून टाकणाऱ्या मुलींचा ताफा! युद्धोत्तर जपानांत मुक्त झालेल्या या मुली! नव्या स्वातंत्र्याचा साक्षात्कार घडविणाऱ्या या मुली! या येथें कशाला आल्या? त्या नुसताच हवापालट करणार! काळ, काम आणि वेग यांचा अपव्यय – केवळ अपव्यय!

अतामीच्या अंतरंगांत डोकावून पाहण्याची इच्छा आम्हांला होत होतीच, पण त्यांत गुरफटून जाण्याची आमची तयारी नव्हती. अनुभवाची ओढ होती, पण अनुभवाच्या डोहांत बुडी मारण्याची हिंमत नव्हती. तळ्याच्याच कांठा-कांठानें हिंडावें, हळूच पाण्यांत पाय बुडवावा आणि लगेच तो काढून घ्यावा, तसें आमचें चाललें होतें. आम्ही एका पेयगृहांत गेलों. पेयगृहाच्या मालकिणीनेंच (ममांसाननेंच) आमचें स्वागत केलें. ती आमच्या टेबलाशीं येऊन बसली, गप्पा मारूं लागली, चेष्टाविनोद करूं लागली. तिनें तिशी ओलांडली होती, पण विशीचें पाणी झळाळत होतें. आम्ही उठलों, बिलें देऊं लागलों तेव्हां 'नको नको' म्हणूं लागली. प्रथमच भेटलेल्या भारतीयांकडून बिल घेऊं काय, असें विचारूं लागली. अखेर तिनें बिल घेतलेंच, पण पुनः येऊन तिचे पाहुणे म्हणून प्यालें पाहिजे असें बजावलें. पण आम्हीच उलट तिला दुसऱ्या दिवशीं दुपारीं चहापानाचें निमंत्रण दिलें. ती आली, तास – दीड तास बसली, गप्पा झाल्या, फराळ झाला – नि एकदम फोन आला म्हणून निघून गेली! आम्हांला दिलेलें बिअर-पानाचें निमंत्रण कोठच्या कोठें उडून गेलें!

संध्याकाळीं आम्ही समुद्रकांठानें फिरत होतों. समोर एक कुटुंब चाललें होतें. बाप, आई, सात-आठ वर्षांचा मुलगा आणि सतरा-अठरा वर्षांची मुलगी. आम्ही बोलत होतों, रमत होतों, स्वतःशींच चुस्त होतों. इतक्यांत पासीन म्हणाला, 'समोर पाहा.' पाहिलें तों ती मुलगी मागें वळवळून आमच्याकडे पाहत होती.

एकदां तिची माझी नजरानजर झाली तेव्हां हळूच हसली – अगदीं ओळख असल्या-सारखी हसली. मी गोंधळलों, गडबडलों, आणि आमचा रस्ता बदलला म्हणून बचावलों! पण अतामीचें जग एवढेंसें. आम्ही एका दुकानांत उभे होतों तों तें कुटुंब तेथें आलें. तिनें पुनः पाहिलें, ती पुनः हसली. मी म्हटलें, 'हलो'. ती म्हणाली, 'हलो'. मीं विचारलें, 'तुला इंग्रजी येते?' ती म्हणाली, 'होय, आम्हांला शाळेंत इंग्रजी शिकवितात.' मग तिनें विचारलें, 'आपण भारतीय आहांत?' मीं म्हटलें, 'हो'. ती म्हणाली, 'मी रवीन्द्रनाथ टागोर वाचला आहे.' मीं म्हटलें, 'अस्सं! छान!' ती म्हणाली, 'तुम्ही आमच्या घरीं याल?' मीं म्हटलें, 'तुझं घर मला कसें सांपडणार? – तूंच येऊन आम्हांला घेऊन जा.' पण ती कांहीं आली नाहीं : तिनें पत्ता सांगितला होता, तो आम्ही लक्षांत ठेवला नाहीं.

नंतर आम्ही त्या ओढ्याच्या कांठानें हिंडत होतों. एक छोटें, दोन–अडीच वर्षांचें, मूल रडत होतें. त्याची आई त्याला उगी करण्याचा प्रयत्न करीत होती. पण त्याचें भोकांड कांहीं मिटेना. माझ्या मनांत एकदम एक कल्पना तरळली. मी खिशांतून जिनतानची बाटली काढली. त्यांतली एक गोळी घेतली. त्या मुलाच्या उघड्या तोंडांत टाकली. ते मूल एकदम थबकलें. त्याचें रडें एकदम थांबलें. क्षणभर त्याचा चेहरा चमत्कारिक झाला. डोळ्यांतून अश्रू वाहतच होते, पण तोंडून हसूं फुटतेंसें वाटलें. त्याची आई माझ्याकडे समाधानानें, कृतज्ञतेनें पाहूं लागली. मी तिच्या डोळ्यांतले भाव न्याहाळूं लागलों. पण ती कांहीं बोलूं शकत नव्हती. मीहि कांहीं बोलूं शकत नव्हतों. क्षणभर आम्ही एक-मेकांकडे नुसते पाहतच राहिलों. (अतामीच्या जीवनाची झुळुक अंगावरून जात आहेसें वाटलें!) पण पासीन तिच्याशीं बोलला आणि ती आपल्या करकरीत खोबऱ्यासारख्या आवाजांत हसली. तिचें मूल मजकडे पाहत राहिलें – आणि मी त्याच्या तोंडांत जिनतानच्या दोन गोळ्या टाकल्या. त्याबरोबर ते हसलें, खुदकन हसलें. इतक्यांत आणखी तीनचार मुलें तिथें गोळा झालीं. माझ्या भोवतीं मुलांचा एक गराडाच पडला. मीं जिनतानची बाटली काढली, उघडी केली आणि एकेकाच्या तोंडांत गोळ्या टाकत सुटलों! त्याबरोबर तीं मुलें हसूं लागलीं, नाचूं लागलीं, उड्डूं लागलीं. पलीकडे अतामीच्या त्या रस्त्यांत सुखास्वादाचा भर आला होता, आणि इकडे मी वात्सल्यरसांत डुंबून गेलों होतों. माझी मलाच

गंमत वाटली. अतामीला आलों – आणि अतामीच्या प्रवाहांत एक वेगळाच हात मारूं लागलों !

जरा वेळानें आम्ही पुस्तकाच्या दुकानांत शिरलो. तेथे एक वृद्ध प्रोफेसर भेटला. पासीन त्याच्याशीं जपानीमध्ये बोलूं लागला आणि मी फक्त त्याच्या कपाळावरच्या सुरकुत्यांकडे आणि चष्म्याच्या जाड भिंगांपलीकडे चमकणाऱ्या डोळ्यांकडे पाहत राहिलों. पासीनने सांगितलें कीं, प्रोफेसरमजकूर अतामीच्या स्वैराचारी जीवनाचा अभ्यास करीत आहेत ; अतामीच्या बेताल जीवनानें त्यांच्या जिवाचा संताप झालेला आहे ; आणि त्याची त्यांना लाज आलेली आहे. अतामीच्या चैनीवर त्यांचा आक्षेप नाहीं. कोणत्याच जपान्याचा नाही. अतामीची चैन फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. पण अतामीच्या चैनीला आज जे भरड स्वरूप आले आहे, बाजारी स्वरूप आले त्याने ते बेजार झाले आहेत. अतामीच्या स्वैराचारांत पूर्वी जपानी संस्कृतीचा मोठा सुंदर आविष्कार होता, आतां फक्त अमेरिकन सोजिरांनी आणि नाविकांनी आणलेला पाचकळपणा आहे. अतामीचीं हॉटेले म्हणजे अतिथिगृहे होतीं, आतां तीं नफेबाजीचीं आगरे बनली आहेत आणि टोकियोचे अनेक तरुण त्यांच्या कर्जात खितपत आहेत. अतामीच्या स्वैराचारांत पूर्वी नृत्यसंगीताला महत्त्वाचे स्थान होते, आतां तो नुसता विषयोपभोग बनला आहे. गेशांच्या हातांतल्या पंख्याच्या विभ्रमांवर पूर्वी प्रणयाचे काव्य लहरत असे, आतां त्यांच्यावर नुसता पैसा नाचतो आहे एकेकाळीं नम्रता नुसती स्नानगृहांत होती, आणि तेथें ती विनम्रतेने शोभत होती, आतां ती निर्लज्जपणे चवाठ्यावर येत असते. (वेश्यांच्या वस्तींत जा – अमेरिकन सोजिरांचा अनुनय करीत ती रस्त्यांवर आलेली आढळेल.) तो युकाता घालून हिंडणाऱ्या पोरींचा ताफा पाहा ! पूर्वी या पोरी अशा इकडे आल्या असत्या तर त्यांच्या आईबापांनी तिकडे आत्महत्या केली असती. खरोखर अतामीची आज विलक्षण विटंबना सुरू आहे. निसर्गानें अतामीला सौंदर्याचे वरदान दिलेले आहे, ते त्याची अशी विटंबना करण्यासाठीं काय !

प्रोफेसर-मजकुरांच्या आवाजांत आवेग आला होता. युद्धोत्तर कालांत जपानमध्यें जो बदल झाला होता तो त्यांना सहन होत नव्हता – पण त्यांच्या संतापांत सत्य होतें, तथ्य होते !

आम्ही हॉटेलवर परत आलों तेव्हां प्रोफेसर-मजकुरांच्या मनोव्यथेचा अंमल आमच्यावर अद्याप होता. मीं खिडकींतून बाहेर नजर टाकली, अतामीच्या अंतराळांत ह्रियामाणकांची माया पसरलेली होतीच, पण काल तिनें माझ्या नजरेसमोर सौंदर्याचीं इंद्रफुलें फुलविलीं होतीं तशीं ती आतां फुलवूं शकत नव्हती–

सकाळीं उठलों, बाहेर नजर टाकली नि चकित झालों. अतामीचा आतां पार कायापालट झाला होता. कालचें तें यक्षनगरीचें रूप कोठच्या कोठें उडालें होतें. चैतन्याचीं तीं इंद्रफुलें कोमेजलीं होतीं. अतामी आतां आळशी, फिकट रूक्ष दिसत होती. विटके रंग आणि सुतकी कळा यांचाच पसारा पसरला होता. रस्ते ओके, उघडे, वाळींत टाकल्यासारखे होते. दुकानांवरच्या निऑन-लाइटचे सांगाडे आतां विकट दिसत होते. आणि रुटुकुटु घरांचीं करपट छपरें आतां डोळ्यांना खुपत होतीं. समोरच्या डोंगरावरची कसल्याशा धर्मपंथाची अवाढव्य इमारत एखाद्या तुरुंगासारखी भासत होती. मला आंत अगदीं उदास उदास वाटलें. इतक्यांत समुद्रावर सूर मारीत निघालेल्या एका मोटार लॉंचची कर्कश किंचाळी कानांत शिरली आणि आंतले धागे तटातट तोडीत कोठें तरी निघून गेली.

तास-दीडतासांनी आम्ही परत यायला निघालों. आमच्याप्रमाणें अनेक निघाले. रस्त्यांत मोटारींची गर्दी माजली, आणि तिच्यांत आमची मोटार अडकली. – अतामीच्या वाटेंत भररस्त्यावर एक चिडाचें झाड चमत्कारिक पसरलें आहे, तेथेंच अडलों. तें झाड म्हणजे एक रूप होतें – खरें म्हणजे विद्रूप! बुंधा वठलेला, खोड निब्रट आणि विस्तार सुकटलेला. बुंध्याचें खोड म्हणजे एखाद्या 'मॉडर्निस्ट' शिल्पकाराच्या प्रतिभेचा संतत उद्रेक! आणि त्याचा विस्तार अतामीकडे बघून जणूं विकट हास्य करीत होता. तरी अतामीच्या लोकांना त्या झाडाचें कोण कौतुक! त्यांनी त्याला एक सुंदर पार बांधला होता. त्याच्यावर एक स्मृतिशिला उभारली होती. होती आपली शिळी, शेवाळलेली. पण स्मृतिशिला! जपानमध्यें वाङ्मयसेवकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा शिला उभारतात हें मला माहीत होतें. हैकू काव्याचा प्रणेता मात्सुओ बाशो याच्या एकट्याच्या नांवानें अशा दोन हजार शिला आहेत. अशा शिला उभारण्यासाठीं एखाद्या सौंदर्यस्थळाची निवड करतात हेंहि मला माहीत होतें. अतामी सुंदर खरीच,

पण चिडाचें हें ध्यान म्हणजे काय सौंदर्यस्थळ ? मला कांहीं समजेना ! मीं पासीनला विचारलें, " ही कोणत्या वाङ्मयसेवकाची स्मृति ?"

" वाङ्मयसेवकाची नाहीं, वाङ्मयाला स्फूर्ति देणाऱ्या एका घटनेची, " पासीन उत्तरला.

" घटनेची ? "

" ती एक मोठी कथा आहे, सत्यकथा ! अलीकडच्या काळांतलीच. पन्नाससाठ वर्षांपूर्वीची. या अतामी गांवांत ओमिया नांवाची एक सुंदर मुलगी होती. उच्च कुळांत जन्मलेली. तिचें हारामा कानिची गांवाच्या एका मुलावर प्रेम बसलें. मुलगा अतिशय सालस सुस्वभावी, पण अत्यंत दरिद्री. स्वतःचें शिक्षण पुरें करण्याइतकाहि पैसा त्याजपाशीं नव्हता. त्याच्याशीं लग्न करण्याची आशा धरणें म्हणजे मृगजळांत मधुचंद्राची मौज लुटण्याची आशा धरण्यासारखें होतें. इतक्यांत ओमियाला एका श्रीमंत कुटुंबांतून मागणी आली. आपल्या श्रीमंतीचा आपल्या प्रियकराच्या शिक्षणासाठीं उपयोग करतां येईल या कल्पनेनें तिनें या मागणीस होकार दिला आणि कानिचीला हें कळविण्यासाठीं या झाडाखालीं तिनें त्याची भेट घेतली. कानिचीनें तें ऐकलें आणि रागानें तो वेडापिसा झाला. श्रीमंतीच्या लोभानें तिनें आपल्या प्रेमाचा हा विश्वासघात केला, असे नाहीं नाहीं ते आरोप त्यानें केले. त्यांचें भयंकर भांडण झालें आणि त्यांनी एकमेकांचा कायमचा निरोप घेतला. कानिचीच्या अंतःकरणांत आतां पैशाविषयीं द्वेषाचा डोंब निर्माण झाला. पैशावर, संपत्तीवर सूड घेण्याचा निश्चय त्यानें केला. त्याची सूडाची कल्पना मोठी अजब होती. तो पैशाच्या मागें लागला, सावकार झाला, आणि कुळांना त्यानें छळछळ छळलें."

" जपानमध्यें या घटनेवर अनेक कथा, कादंबऱ्या, कविता झाल्या आहेत," पासीन पुढें सांगूं लागला, " एका कादंबरीचें नांव 'प्रेमाचा सैतान' असें आहे. "

प्रेमाचा सैतान !

आज अतामीची आठवण झाली कीं मला तें अतामीच्या वाहतुकीला वाकुल्या दाखविणारें चिडाचें झाड आठवतें आणि त्याच्या पारावरच्या मृतिशिलेवर 'प्रेमाचा सैतान' हीं अक्षरें दिसूं लागतात !

चिडाचा वृक्ष



अतामींत शिरतानाच एक पाइनवृक्ष (चीड) तुम्हांला वाटेत मधोमध अडवितो.

जपानी चीड सरळ उभा वाढत नाही. बाभळीच्या झाडासारखा तो वेडा-वाकडा वाढतो आणि म्हणूनच त्याला 'ट्विस्टेड पाईन' म्हणतात. हा वृक्ष चांगला अस्ताव्यस्त वाढला होता. त्याच्या फांद्या रस्त्यावर आडव्यातिडव्या पसरल्या होत्या आणि त्यांचा रहदारीला भरपूर अडथळाहि होत होता.

अतामींत येणारा रस्ता एका टेकडीवरून उतरतो. तो निरुंदच आहे, आणि मोटर कदाचित् डावीकडे झुकली तर तिला एकदम समुद्रमोक्ष मिळण्यास कसलीच अडचण पडणार नाही. म्हणून 'अतामीत उतरतांना डोंगराच्या कुशीत वसलेल्या त्या शहराच्या नक्षीदार सौंदर्याने मन हरखून जाण्याऐवजी

संभवनीय समुद्रमोक्षाच्या विचारानें तें थरकतेंच. त्यांतून मुक्त होऊन मन स्थिरस्थावर होण्यापूर्वीच हा जंगली अडथळा समोर येतो. त्याला वळसा घालतांना आमच्या टॅक्सीला चांगलाच गचका बसला.

मी पासीनला म्हटलें, "हे लोक हा वृक्ष तोडून कां टाकीत नाहींत?"

"नो नो नो!" जपानी जीवनाविषयीचें आपलें सारें प्रेम आपल्या आर्त स्वरांत ओतीत माझा अमेरिकन मित्र उत्तरला, "तुला माहीत नाहीं या वृक्षाचं माहात्म्य. जपानी वाङ्मयांत उजळलेल्या एका प्रेमकथेचा प्रारंभ या झाडा-खालीं झालेला आहे. जपानी लोकांचं हें मोठं अभिमानाचें ठिकाण बनून राहिलं आहे. हे झाड तोडण्याची नुसती भाषा देखील हे लोक ऐकून घेणार नाहींत."

संध्याकाळीं आम्ही फिरायला निघालों. अतामी शहरांतून हिंडणें म्हणजे जत्रेंतून हिंडण्यासारखेंच आहे. शनिवारीं–रविवारीं अतामीला प्रणयपंढरीच्या जत्रेचेंच स्वरूप येतें. जपानी हॉटेलांनीं दिलेले रंगीबेरंगी किमोने घालून अतामीला आठवड्याची सुटी घालविण्यासाठीं आलेले मित्र आणि मैत्रिणी रस्त्यावर फिरूं लागल्या म्हणजे तें शहर फुलपांखरांनीं फुलून गेल्यासारखें वाटतें.

प्रणयाच्या आंदोलनावर हेलावत जाण्याचा आनंद सोडा, पण नुसता नेहमींचा फेरफेरटका करण्यासाठींहि अतामीसारखें दुसरें ठिकाण कुठें असेल असें वाटत नाहीं. अर्धचंद्राकृति टेकड्यांच्या वळशांत वसलेल्या या निसर्गसुंदर शहरावर कलात्मक साज चढविण्याची दक्षता जपान्यांनीं घेतलेली आहे. म्हणून अतामींत हिंडतांना आपण एखाद्या कविकल्पनेंतील उद्याननगरींत तर अवतीर्ण झालों नाहीं ना असें वाटत असतें.

हिंडतां हिंडतां आम्ही त्या चिडाच्या झाडापाशीं आलों. आपली प्रेमकथा उजवण्यासाठीं त्या प्रेमिकांनीं या विक्षिप्त झाडांत इतकें काय पाहिलें नकळे, पण याचा अधिक विचार करायला पासीननें मला अवसरच दिला नाहीं. तो समुद्राकडे जाण्यासाठीं उजवीकडे वळला आणि आम्ही एका कांहींशा विश्रब्ध वस्तींत शिरलों. येथल्या रस्त्याच्या कडेनें सौम्य प्रकाशाचे कलासुंदर दिवे उजळत होते. दिव्यांच्या शेड्स् दिवाणखान्यांतील शेड्स्सारख्या कलात्मक होत्या. येथल्या दुकानदारांनीं दीपोत्सवाच्या झगझगाटानें गिऱ्हाइकांचे डोळे दिपविण्याची धडपड केलेली नव्हती. उलट त्यांच्या अंतःकरणांत शिरून त्यांना अंतस्थ ओढ लावण्याची त्यांची खटपट होती. म्हणून प्रवेशद्वारांत

दिव्यांची आरास नव्हती तर हिरव्या फुलझाडांची पखरण होती. सताड उघड्या दरवाजांची हांक नव्हती तर किलकिल्या दारांची सांकेतिक सूचना होती.

हीं दुकानें म्हणजे उपाहारगृहें, पेयगृहें आणि क्वचित् क्रीडागृहें. या गृहांचें सौम्य सुगंधित सौंदर्य पाहत एका रस्त्यावरून मी आणि पासीन हिंडत होतों, इतक्यांत एका छोट्याशा पेयगृहासमोर एक जपानी तरुणी रंगदार किमोनो घालून उभी असलेली दिसली. आम्ही तेथून जाऊं लागलों तेव्हां ती जपानी भाषेंत कांही तरी म्हणाली.

" काय म्हणते आहे ती ? " मीं पासीनला विचारलें.

" बिअर हवी का असं विचारते आहे, " पासीन उत्तरला.

" नको बुवा बिअर वगैरे " असें मीं म्हटलें आणि आम्ही पुढें निघालों.

पण त्या स्त्रीचा विचार मनांतून जाईना. तिच्या दर्शनांत कांहीं एक विलक्षण आकर्षण होतें. ज्याचें वर्णन केवळ जपानी असें मी करीन असें तें होतें. मी एकदम थांबलों आणि पासीनला म्हटलें,

" मला वाटतें थोडी घेऊं या बिअर. "

आणि आम्ही परत फिरलों.

त्या दुकानापाशीं आल्याबरोबर त्या बाईनें हसून आमचें स्वागत केलें आणि एका हातानें स्प्रिंगचा दरवाजा लोटून आम्हांला आंत चला म्हटलें.

हसल्याबरोबर तिचा सोनेरी दांत चमकला. तिच्या रेखीव, शुभ्र, सुबक दंतपक्तींत एवढाच एक दोष आढळला. पण जपानी लोक तें सौंदर्याचेंच एक लक्षण मानतात. जपानमधलें बरेचसें सोनें स्त्रीच्या तोंडांत जाऊन बसलें आहे !

गुलाबी रंगाचा किमोनो तिनें घातला होता. त्याच्यावर जांभळ्या द्राक्षवेलींची नक्षी होती. तिची ओबी गुलाबी होती आणि पांढऱ्या स्वच्छ टाबीवरच्या तिच्या झोरीचे पट्टे जांभळेच होते.

वेधक रंगसंगतीच्या पोषाखांतली तिची मूर्ति खरोखर सुबक दिसत होती. जपानी स्त्रियांचे गाल गोबरे असतात आणि पाय-पावलें बोजड असतात ; पण ही मात्र याला अपवाद होती. तिची लहानशी शरीरयष्टि कांहीशी किरकोळ होती आणि चेहरा हाडकुळा चौकोनी पण विलक्षण आकर्षक होता. तिची मान



निळसर
डोळ्यांची
तरल
हालचाल

जरा उंच होती, पण किमोनोच्या कॉलरनें ती कांहीशी झांकली होती आणि खालीं रुळणाऱ्या तिच्या कुरळ्या केसांमुळें तिला खरोखर एक सौंदर्यच प्राप्त झालें होतें. जपानी स्त्रियांचे आकुंचित बदामी डोळे गोबऱ्या गालांमुळें आवळले जातात. पण हिच्या डोळ्यांना हा त्रास होण्याचें कारण नव्हतें. तिच्या डोळ्यांच्या निळसर बाहुल्या मोठी तरल हालचाल करीत. या हालचालीं-बरोबर फडफडणाऱ्या तिच्या पापण्यांची फडफड पाहण्यांत, आपण एका स्त्रीच्या चेहऱ्याकडे टक लावून बघत आहोंत याचा विसर पडे. अशी जाणीव झाली की माझी नजर चोरटी बने आणि ती अभावतःच खाली वळे—आणि मग तिचीं पावलें देखील तिच्या चेहऱ्याप्रमाणेंच सुंदर आहेत हें ध्यानांत येऊन आनंद वाटे.

आम्हांला टेबलापाशीं बसवून तिनें आमची किंचितशी चौकशी केली आणि बिअरची बाटली आणण्यासाठी ती उठली. तो बार अगदीं छोटा होता. एक लहानसें वाटोळें टेबल, भोंवतालच्या तीन खुर्च्या आणि कौंटरपासचीं दोन उंच स्टुलें तेथें कशींबशीं मावलीं होतीं. पण तेवढ्याहि जागेंत खुजट चिडाची एक कुंडी ठेवण्याची दक्षता तिनें बाळगली होतीच. माझें लक्ष समोर भिंतीकडे गेलें. भिंतीवर अभिजात जपानी पद्धतीनें काढलेलें अभिसारिकेचें एक रेखाचित्र होतें. माझी नजर जरा बाजूला वळली आणि त्या बारच्या एका वैशिष्ट्याची जाणीव झाली. बाजूला एक अगदीं छोटेखानी जिना वर जात होता.

तिनें बिअरची बाटली आणली आणि दोन ग्लास भरले. आम्हीं तिला आणखी एक ग्लास आणण्यास सांगितलें. ती हसली, गेली आणि एक ग्लास व खाऱ्या दाण्यांनीं भरलेली एक बशी घेऊन आली. मीं खुर्चीकडे बोट दाखविलें आणि ती बसली.

तिच्याशीं बोलणें मला मुष्किल होतें. तिला इंग्रजीचा गंध नव्हता आणि माझें जपानीचें ज्ञान, ज्याचा नीटसा अर्थ मला माहीत नव्हता अशा एका शब्दापुरतें मर्यादित होतें. पण ती माझ्याशीं बोलण्यास उत्सुक दिसली, आणि सुदैवानें दुभाष्याचें काम करण्यास पासीन हजर होता. एका जपानी स्त्रीशीं बोलण्याची अशी कां होईना पण संधि मिळाली म्हणून मी खुलून निघालों.

"आपल्या घरीं एक भारतीय पाहुणा आला म्हणून तिला धन्य वाटत आहे," पासीन म्हणाला.



'कोटो' वादन



जपानी भोजन

"घरीं ?" मी विचारलें आणि पासीननें भाषांतर केलें.

"होय–हें घरच आहे माझं" ती उत्तरली आणि जिन्याकडे पाहत म्हणाली, "मी येथें वर राहतें."

"मग रोज तुमच्याकडे खूप पाहुणे येत असतील ?"

"होय–खूप ! माझ्याकडे जपानी व अमेरिकन खूप येतात, खूप पितात आणि तेंच तेंच खूप बोलतात. पण भारतीय पाहुणा असा आज प्रथमच आला आहे."

"मग कसा वाटला हा पाहुणा ?" दुभाष्यामार्फत बोलतांना आपण अधिक मोकळे बनतों.

"वा ! फार छान–वाघासारखा." ती बोलली आणि एकदम हसली. म्हणाली, "तुमच्या देशांत खूप वाघ असतात ना ?"

"होय, पण जंगलांत. ते असे जपानला येऊन बिअर पीत नाहींत."

पण तिच्याशीं एका शब्दांतून दुसरा शब्द, जादूगार रुमालांतून रुमाल काढतो त्याप्रमाणे काढून संभाषण वाढविणें दुभाष्यामार्फत कठीण होतें. माझी अगतिकता झांकण्यासाठी मी आणखी एक बाटली मागविली आणि ती दोन घेऊन आली.

नंतर मी तिला रोज किती गिऱ्हाइकें येतात, किती वेळ बसतात, त्यांतलीं कांही चाळे करतात किंवा काय असले प्रश्न विचारले. त्यावर ती म्हणाली,

"होय, एक बाईमाणूस हा बार चालविते म्हणून या दारूच्या बाटल्यामागें दुसराच कांही धंदा असेल या कल्पनेनं कांही लोक भारले जातात. मग ते उठतच नाहीत. सारखे पितात, झिंगतात, मला पिण्याचा आग्रह करतात. अशा वेळीं त्यांना बाहेर काढणं मोठं मुष्किलीचं ठरतं." मीं भरलेला ग्लास तोंडाला लावीत ती पुढें म्हणाली, "एकदां एका अमेरिकन नाविकानं सकाळीं चार वाजेपर्यंत घोळ घातला."

"तुम्ही रोज केव्हां बंद करतां ?"

"सुमारें दोन वाजतां–रोज नाहीं, शनिवार–रविवारीं. आमच्या या अतामींत शनि-रविवारींच साऱ्या गोष्टींना भर येतो, इतर दिवशीं अगदीं ओहोटी. मग अगदीं आळस येतो."

" गांवांत कोणी मित्र-मैत्रिणी नाहींत का ? "

" मित्र – ? " तिचा आवाज जरा जड वाटला. " आमच्या अतार्मीत सारे मित्र आणि मैत्रिणी कामापुरत्या. कुटाळक्या करण्यास त्यांचा फार उपयोग होईल. या अतार्मीत खरी मैत्री सुरू केली की माणूस गोत्यांत येतं – कारण मैत्री, प्रेम, सारं कांही स्वार्थासाठींच."

माझ्या मनांत विचार आला, ही जी आतां आमच्याशीं मैत्री करीत आहे ती आमच्या खर्चानें बिअर पिण्यासाठीं तर नव्हे ना ?

पण तिची नजर एकदम तरारली आणि तो विचार लगेच मावळला. माझ्या मनांतला विचार तिथल्या तिथेंच निपटून काढण्यासाठीं कीं काय, मीं घाईनें म्हटलें,

" पण आपली मैत्री अशी नाहीं हं. "

" छे छे – " ती उत्तरली, " म्हणून तर मी तुमच्याबरोबर अशी पीत बसलें आहे. "

" मग तुम्ही ही मैत्री दृढ केली पाहिजे," मी म्हणालों, " उद्यां दुपारीं तुम्ही आमच्याकडे चहा प्यायला नि गप्पा मारायला आलं पाहिजे. "

" येईन कीं, " ती क्षणाचाहि विचार न करतां म्हणाली.

पासीननें तिला आमचा पत्ता सांगितला आणि आम्ही जायला निघालों. तेव्हां ती म्हणाली,

" एक विचारूं का ? "

" हो हो "

" तुमचं नांव काय ? "

" पाध्ये."

" नांव की आडनांव ? "

" आडनांव."

" अन् तुमचं नांव ? "

" प्रभाकर – आणि तुमचं ? "

"माझं – उमेको" असें ती म्हणाली आणि संकोचली.

मीं विचारलें, "कां ?"

"इतकं सुंदर तरल नांव मला शोभत नाहीं."

"माझंहि नांव मला शोभत नाही – पण मी तुम्हांला आमच्या भारतीय पद्धतीनं उमा म्हणेन."

आणि आम्ही बाहेर पडलो.

* * *

आमचें हॉटेल गांवाच्या एका टोंकाला टेकडीवर होतें. त्या हॉटेलांतून सारें अतामी गांव एका दृष्टिक्षेपांत दिसे. सकाळीं उठून मी हॉटेलचा कागदी दरवाजा बाजूला सरकविला आणि माझी नजर एकदम सबंध गांवावर फिरली आणि फिरतां फिरतां उमेकोचें घर शोधूं लागली. अंदाजानें एक घर तिचेंच असेल असें ठरविलें. घर झोंपेंत गुंग दिसलें.- रविवारीं सकाळीं आठ वाजतां सारें अतामी शहरच झोंपेच्या गुंगींत संथ जड दिसतें. घरें, दुकानें बंद होतीं आणि रस्ते रिकामे होते. समुद्राच्या लाटा धक्क्यावर जाऊन फुटत होत्या, पण त्यांचा आवाज दुरून ऐकूं येत नसल्यामुळें त्यांच्या हालचालींत एक निर्जीव गुंगीच प्रतीत होत होती. दूर टेकडीवर दमट धुकें आळसाचे आळोखे देत होतें. पूर्वेकडील आकाशांत सोनेरी कडांचे फिकट काळे ढग जमा झाले होते आणि सूर्यप्रकाश मंद मळभी भासत होता. माझ्या अर्धजागृत दृष्टीला अतामी सुस्त, निद्रिस्त वाटली. वाटलें, उमेको आतां साखरगुंगींत मग्न असेल – स्वप्नें पाहत असेल. पण लगेच तिची कालची नजर मला आठवली आणि वाटलें, या मोकळ्या आनंदी स्त्रीच्या जीवनांत कांही तरी रहस्य आहे. जीवन जाळणारें रहस्य आहे. ह्या विचारानें तिच्याबद्दल एक नवाच जिव्हाळा मला वाटूं लागला. ती आवडूं लागली. तिची ओळख झाली हा योगायोग अर्थपूर्ण वाटूं लागला. तिच्या भेटीबद्दल औत्सुक्य वाटूं लागलें – आणि या औत्सुक्यापोटींच शंका निर्माण झाली कीं, आज दुपारीं ही येईल याची खात्री काय ?

पण बरोबर तीन वाजतां ती आली. तिच्याबरोबर दुकानांत कौंटरमागें पाहिलेल्या दोन मुलींतली एक होती. आम्हीं त्यांचें स्वागत केलें. चहा मागविला. फराळाचे जिन्नस मागविले. ती अगदी खुशींत दिसली. खुशीवर तिची विशेष

भक्ति दिसली. तिनें ती पुनःपुन्हां मागवून खाल्ली. आपला हा मोकळेपणा जरा चमत्कारिक भासतो असें तिचें तिलाच वाटल्यामुळें की काय, ती म्हणाली,

" आज मला खूप खूप आनंद झाला आहे. कारण मी आज परकीय मित्रांत आहें. परकीयांत मिसळून असं गप्पा मारायला मला फार आवडतं. शिवाय येथें एक भारतीय वाघ आहे. " असें म्हणून ती खट्याळपणें हसली.

" पण तुमच्या दुकानांत परकीय लोक नेहमींच येतात ? "

" होय, पण त्यांची गोष्ट निराळी, आणि दुकानांत मी अशी मोकळी नसतें. "

तिचा आवाज मला पुनः आर्त भासला. खास तिच्या जीवनांत कसलें तरी नाजुक रहस्य आहे, आपण तें शोधलेंच पाहिजे असा निश्चय केला आणि म्हटलें,

" आम्हां भारतीय लोकांना हस्तसामुद्रिक चांगलं कळतं हें माहीत आहे का तुम्हांला ? "

त्या बरोबर तिचे निळे डोळे प्रकाशले. ती आतुरतेनें म्हणाली.

" वा ! वा ! तुम्ही हात पाहतां ! किती छान ! माझा हात पाहाल ? पाहाना माझा हात – " असें म्हणून तिने आपला हात उघडला आणि माझ्यासमोर धरला.

तिचा हातसुद्धा नाजूक आणि गोंडस होता. हा व्यक्तित्वपूर्ण स्त्रीचा हात आहे हें तो पाहतांक्षणींच कोणाच्याहि ध्यानांत आलें असतें. पण विशेष म्हणजे तो हात विलक्षण ओढ लावणारा होता. मी एकदम त्याच्या तळव्यावरून माझ्या हाताचा तळवा फिरविला. त्या तळव्याचा रेशमी स्पर्श माझ्या मनाला स्पर्श करतो तोंच ती खुदकन् हसली. मागें घेतलेल्या हाताचीं बोटें तिनें आतां चांगलीं ताणलीं, एकत्र जुळविलीं आणि हात पुनः माझ्यापुढें धरला.

मी म्हटलें, " या हाताची मालकीण फार मोठी कर्तबगार स्त्री आहे. "

" कर्तबगार ! होय, आहेंच मी कर्तबगार, " ती खट्याळ आवाजांत म्हणाली. " त्या शिवाय का उत्तरेकडील होकायडोच्या एका खेड्यांतील दरिद्री शेतकऱ्याच्या कुटुंबांत जन्मलेली ही मुलगी आज दक्षिणेंत स्वतःच्या मालकीचा बार चालवीत असेल ? कर्तबगार आहेच मी – पण तें मला माहीत आहे. मला माहीत नसलेलं कांहीं सांगा. "

पण मी काय सांगणार? हस्तसामुद्रिक मला थोडेंच समजत होतें? भाग्यरेषा-धनरेषा-विवाहरेषा असल्या, सर्वांच्या परिचयाच्या गोष्टी ठोकताळ्यानें माहीत होत्या. पण आपलें अज्ञान दाखविण्याची ती वेळ नव्हती. मीं म्हटलें,

"हें शनीचं वलय पाहिलंत. त्याला दोन-तीन ठिकाणीं छेद गेले आहेत. तुमच्या आयुष्यांत आजवर दोन अरिष्टांतून तुम्ही गेलां आहांत."

तिची नजर एकदम लकाकली. आपल्याला एक अचूक सांगणारा सामुद्रिक भेटला या आनंदानें फुलली. म्हणाली,

"बरोबर, अगदीं बरोबर." तिच्या आवाजांत विश्वास होता आणि अपेक्षाहि होती. "एकदां मी घर सोडून आलें तेव्हां आणि एकदां माझा धंदा बुडाला तेव्हां."

ही आतां माझ्या ज्ञानाचा पडताळाच घेऊं लागली कीं! आतां सावध. मी विषयांतर करण्यासाठीं म्हणालों,

"धंदा केव्हां बुडाला? युद्धकालांत?"

"इतकी म्हातारी समजतां कीं काय मला? युद्धकालांत मी माझ्या खेड्यांत होतें. पण तिसरं अरिष्ट म्हणतां तें कोणतं?"

"छे छे! तें धंद्यावर नव्हे. ही पाहा, हें वलय छेदलें आहे तेथूनच धनरेषा स्वच्छ गेली आहे. तेव्हां पैशाची धास्ती नाहीं. पण "

"पण काय?–"

पण काय तें मला कोठें माहीत होतें? मात्र आतां माघार घेणें शक्य नव्हतें. गंभीर आवाजांत मीं म्हटलें,

"तुमची अंतःकरण-रेषा जीवन-रेषेला भेदून जाते, म्हणून थोडी काळजी वाटते. तुम्ही म्हणतां तुमचा धंदा छान चालला आहे. पण कालपासून पाहतों आहें, तुमच्या हृदयांत कसली तरी सूक्ष्म काळजी घर करून आहे. मला वाटतें, तुमचा अंतःकरणाचा धागा कोणी तरी निर्दयपणं कुरतडत आहे." असें म्हणून मी खोडसाळपणें हसलों.

पण ती गंभीर झाली. तिच्या डोळ्यांत पाणी तरारलें. क्षुब्ध आवाजांत म्हणाली,

लगेच गेली. जातांना ती आम्हां दोघांना सात वाजतां तिचे खास पाहुणे म्हणून पेयपानाला निमंत्रण देऊन गेली.

बरोबर सात वाजतां आम्ही तिच्या बारकडे गेलों आणि चकित झालों ! बार चक्क बंद होता. रविवारीं सायंकाळीं बार बंद !


आंत एखादा दिवा उजळत असावा. बाहेर एक मोटार-सायकल उभी होती. आम्ही दोघांनीहि त्या सायकलकडे पाहिलें आणि आमच्या अर्थपूर्ण नजरा एकमेकींना भिडल्या !

आतां तेथून जाणें भागच होतें. आम्ही समोर समुद्रकांठीं धक्क्यावर गेलों आणि भरतीच्या लाटा फुटत होत्या त्यांच्याकडे विमनस्क दृष्टीनें पाहत उभें राहिलों.

समोर समुद्रावर मच्छिमारी जहाजें शिडें पसरून उभीं होतीं आणि सायंकाळच्या छायांनीं तीं काळवंडलीं होतीं. समुद्रसफरीस गेलेल्या लॉंचेस कर्कश आवाज करून परत येत होत्या आणि आमच्या आजूबाजूला जमलेल्या थव्यांचें हसणें-खिदळणें त्यांच्या आवाजांत चमत्कारिक रीतीनें मिसळत होतें. इतक्यांत समुद्राच्या पाण्यावर बसलेल्या पक्ष्यांचा एक थवा आरडाओरडा करीत उठला आणि टेकडीच्या दिशेनें जाऊं लागला. आम्ही त्याच्याकडे नुसते पाहत राहिलों.

तोंच मागून कोणी तरी जपानीमध्यें हांक मारल्यासारखें वाटलें. पासीननें चमकून पाहिलें. दुपारीं उमेकोबरोबर आलेली ती मुलगी होती. तिनें पासीनला कांही तरी भराभर सांगितलें आणि ती निघून गेली.


त्याचें असें झालें होतें कीं उमेको आमच्याकडे आली होती त्या दरम्यान तिचा तो प्रियकर तिच्या घरीं आला. त्याची मॅच रद्द झाली होती. ही घरीं नाहीं असें म्हटल्याबरोबर तो विलक्षण खवळला. त्यानें नुसता थयथयाट केला. कोणा तरी जाराकडे ती गेली अशा संशयानें वेडापिसा झाला. तेव्हां त्या दुसऱ्या मुलीनें उमेकोला आमच्या हॉटेलमध्ये फोन केला. म्हणून ती घाईघाईनें माझा निरोप न घेतांच परत गेली. पण आम्ही सात वाजतां येऊं याची तिला जाणीव होती. तिनें या मुलीला आमची वाट पाहत बसवून ठेवलें होतें. पण आमची तिची थोडी चुकामूक झाली. बारमध्यें चला असें सांगायला ती मुलगी आली होती.



चहापानविधि



'हिना—मात्सुरी'
३ मार्च रोजीं
येणाऱ्या मुलींच्या
सणाची आरास



सांजुसान्गेंडो
मंदिरांतली धनुर्विद्या

आओई् सणांतली रथयात्रा



आम्ही पुन्हा बारकडे गेलों. त्या मुलीनें बारचा दरवाजा थोडासा उघडून ठेवला होता. आम्ही आंत गेलों. मुलीनें दरवाजा लोटून घेतला आणि नंतर एक बिअरची बाटली आणि दोन ग्लास आमच्या समोर ठेवले. तुम्ही घ्यायला लागा, जरा वेळानें ती येईल, असें ती म्हणाली.

त्या छोट्याशा बारमध्यें कुंदपणा होताच, पण आतां एक प्रकारचा चमत्कारिक जडपणा त्यांत भरल्यासारखा वाटला. आम्हांला काय बोलावें तेंच समजत नव्हतें. जपानी बिअरच्या गुणधर्मांवर कांहीं तरी हलक्या चोरट्या आवाजांत आम्ही बोलूं लागलों.

जरा वेळानें त्या छोट्या जिन्यावरून धाडधाड पावलें टाकीत एक तरुण उतरला. उतरतांना एक तीव्र क्रुद्ध नजर त्यानें आमच्याकडे फेंकली. जणूं आम्हीच त्याच्या संतापाला जबाबदार होतों.

उमेको काल भारतांतल्या बौद्धांची चौकशी करीत होती. पण बिचारी स्वतःच एका वाघाच्या तावडींत सांपडली होती.

त्याच्या त्या क्रुद्ध अवतारांतहि हा तरुण अतिशय देखणा आहे अशी मला जाणीव झाली.

बारचा दरवाजा त्यानें खसक्यानें उघडून आपटला आणि मोटारसायकल आदळआपटीनेंच सुरू केली.

आतां उमेको येईल म्हणून आम्ही वाट पाहत बसलों. पण ती येण्याचें लक्षण दिसेना. तेव्हां आम्ही उठलों. पण ती आतां येईल असें म्हणून त्या मुलीनें आम्हांस थांबण्यास सांगितलें. अखेरीस ती आली.

कालपासून मी तिला पाहात होतों. वेगवेगळ्या मनःस्थितींत पाहत होतों. पण तिचा आतांचा अवतार कांहीं निराळा होता. कालची आनंदी उत्सुक उमेको आतां नव्हती. एक अगदीं विकल, विफल, विमनस्क माणूस आमच्यापुढें आलें होतें.

तिचा चेहरा विस्कटला होता, काळवंडला होता. डोळे लाल झाले होते. जड झाले होते. ती रडत होती हें स्पष्ट होतें. आमच्याकडे पाहून तिनें हसण्याचा प्रयत्न केला तेव्हां तिची मुद्रा अगदीं केविलवाणी झाली.

मला एकदम तिची दया आली.

आम्ही तिचें हसून स्वागत केलें. तिच्यासाठीं एक ग्लास भरला. पण तिनें खुणेनें नको म्हणून म्हटलें. तिला मोकळें वाटावें म्हणून कसल्या तरी निराळ्याच विषयांकडे वळलों. जपानी बिअरबद्दल कांही अनावश्यक प्रश्न विचारले. अतामीच्या डोंगरावर सिमेंटची एक प्रचंड इमारत होती तिच्याबद्दल चौकशी केली. पण कशाचा कांहीं उपयोग होईना. ती एखादा शब्द बोले आणि गप्प बसे. एकदम धीर करुन कांहीं तरी बोले, पण तें मलूल ठरे.

अखेरीला तिला काय वाटलें न कळे, तिनें बिअरचें तें भरलेलें ग्लास तोंडाला लावलें आणि घटाघटा संपविलें. दुसरें भरलें आणि तेंही घटाघटा संपविलें.

आणि मग तिनें सिग्रेट घेतली आणि पेटविली.

मग ती आमच्याकडे पाहून हसली.


पण कसलें हसणें तें !

तिचा तो जोर एकदम जिरला. ती तशीच विसविशीतपणें बसून राहिली. जरा वेळाने उठली नि म्हणाली, " जातें मी."

आम्हीहि तसेच उठलों. पासीननें खिशांतून पैशाचें पाकीट काढलें आणि बिअरचे पैसे देऊं केले.

तिनेंहि ते घेतले—आम्हीं तिचे पाहुणे होतों, गिऱ्हाइकें नव्हतों हें ती विसरलीच.

घरीं परततांना आम्हाला वाटेंत तो चिडाचा वृक्ष लागला—आणि त्याचें तें वेडेंवाकडें विचित्र रूप पूर्वी कधीं नव्हतें इतकें खटकलें !



गिं झा

फर्नाण्डं गिगों नांवाच्या स्विस लेखकानें गिंझांत जगांतल्या अनेक आकर्षण स्थळांचें नवनीत शोधलें आहे. त्याच्या मतें, गिंझा हें थोडेंसें अमेरिका आहे, कारण येथें सिमेंट-कॉंक्रीटच्या उंच उंच हवेल्या आहेत आणि त्यांतल्या दुकानांत शू-लेसपासून एक्स-रे मशीनपर्यंत हवी ती वस्तु मिळूं शकते. तें थोडेंसें ब्रॉडवे आहे, कारण तेथें अभिजात नाट्यप्रयोगापासून बेलज्ज नग्नदर्शना-पर्यंत सर्व प्रकारच्या करमणुकींची सोय आहे आणि निऑन लाइट्सचे नजर बांधणारे चमत्कार आहेत. तें थोडेंसें पॅरिस आहे, कारण येथील रस्त्याच्या कांठीं झाडांच्या नयनरम्य रांगा आहेत आणि कॉफीगृहांवर "कॉक द ऑर" असल्या

फ्रेंच पाट्या आहेत. तें थोडेंसें लंडन आहे, कारण पैसेवाल्यांची इभ्रत सांभाळणारीं निवडक संकेत-स्थळें येथें आहेत. तें थोडेंसें जिनीवा आहे, कारण येथील दुकानांच्या प्रदर्शन-भागांत घड्याळांची आरास असते. तें थोडेंसें स्टुटगार्ट आहे, कारण येथें क्यामेऱ्यांच्या दुकानांची एक खास मिजास आहे. तें थोडेंसें व्हेनिस आहे, कारण सुमिदा नदीचे कालवे येऊन त्याला भिडतात. आणि तें थोडेंसें इस्तंबूल देखील आहे, कारण येथील न्हाणीघरांत टर्किश बाथची मौज चाखतां येते !

गिंझांतील 'शो बोट' अणि शेजारच्या कालव्यांतील घाण आणि गर्दी पाहिली कीं गिगोनें शोधलेलें हें साम्य म्हणजे लेखनशैलीची एक स्वच्छंद लहर आहे हें लगेच ध्यानांत येतें. आजकालच्या कोणत्याहि दोन शहरांमध्यें तसें साम्य असतेंच, पण त्या साम्यांतहि प्रत्येकाच्या वैशिष्ट्याची चमक असते. तसेंच गिंझाचें अहे. इथल्या कांहीं कॉफीगृहांवर फ्रेंच अगर इटालिअन पाट्या असतील, पण येथल्या कॉफीच्या कपाभोंवतीं जें वातावरण दरवळतें तें फ्रेंच अगर इटालियन कॉफीगृहांत खास दरवळत नाहीं. इथल्या निऑन लाइट्सारखे नेत्रदीपक निऑन लाइट्स न्यू यॉर्कमध्यें असतील, पण यांच्या शोभेंत जी एक झळक आहे ती खास जपानीच ! येथल्या इमारतीसारख्या इमारती प्रत्येक पाश्चात्य शहरांत आहेत, पण सारी इमारत जमिनीवर उठवून मग ती चार मजले जमिनींत गाडण्याचा प्रयोग होत असतांना लोकांनीं तिच्या इंच इंच भूमिप्रवेशाचें जें कौतुक केलें त्याला इतरत्र तोड सांपडणार नाहीं. येथल्या 'स्ट्रिप्टीज'(नग्नदर्शना)सारखीं बेलज्ज दर्शनें अमेरिकेंत खूप असतील, पण नग्न देहापेक्षां सोबतच्या प्रयोगांतील फार्सीवर जपानी प्रेक्षकांचे डोळे जसे खिळतात तसे अमेरिकन प्रेक्षकांचे खास खिळत नसतील. आणि येथल्या स्नानगृहांत जो नैसर्गिक निःसंकोच आढळतो त्याचा शतांशहि त्या खिश्चन आणि इस्लामी नीतिमत्तेनें ग्रासलेल्या इस्तंबूलमध्यें आढळत नसेल. म्हणून गिंझाचें आकर्षण कांहीं वेगळेंच आहे, कारण जपान वेगळें आहे !

पाश्चात्य माणूसहि दारू पितो आणि जपानीहि पितो. पण दोघांच्या पिण्यांत एक फरक आहे—तोच गिंझा आणि ब्रॉडवे अगर गिंझा आणि प्लास पिगालमध्यें आहे. पाश्चात्य मनुष्य दारू पितो ती सहज गंमत म्हणून. दारूपानानें वृत्तींत एक प्रकारची तरलता येते ती अनुभवण्यासाठीं. थोडेंसें हवेंत चालण्या-

साठीं. आपल्या वृत्तींना थोडें पाणी देण्यासाठीं, थोडी धार आणण्यासाठीं. पण जपानी माणूस पितो याचें कारण निराळें आहे. त्याचें जीवन जखडलेलें असतें. कर्तव्याच्या कांचांनीं करकचलेलें असतें. फांसेपारध्याचें जाळेंच तें—त्याला घट्ट पकडून ठेवतें. राजा, राष्ट्र, पिता, मालक, पूर्वज यांच्याविषयींच्या नानाविध निर्बंधांनीं त्याचें सारें आयुष्य आवळलेलें असतें. ऋण, दान, श्रेय इत्यादींच्या हजारों जाचक कल्पनांनीं तें पुरें वेढलेलें असतें. लौकिक व्यवहारांत त्याची त्यांतून सुटकाच नसते. दारू पिऊन दोन घटका स्वतःला विसरणें एवढेंच तो करूं शकतो. बारयोषितेच्या विश्वांत दोन तास दडी मारणें एवढाच त्याजपाशीं उपाय असतो. जीवनाचें जोखड असें फेंकून देण्याचा हा मार्ग जपानी समाजानें अगदीं शहाजोगपणें स्वीकारलेला आहे. घरच्या माणसांनींहि तो मानलेला आहे. म्हणून रात्रीं नवरा गेशांकडे निघाला म्हणजे धर्मपत्नी त्याला कपडे चढविण्यास मदत करते, आणि नवरा अगदीं भर चवाट्यावर दारू पिऊन फेस पडला तरी त्याला सावरून-संभाळून घरीं आणते. दारू आणि स्त्री या पापाच्या राशी असें जपानी मुळीं समजतच नाहींत – म्हणून मदिरा आणि मदिराक्षी यांच्या मंदिरांचा मार्ग चालतांना पापाच्या कल्पनांचा दबा धरून बसलेला राक्षस जपान्यांना भेडसावीत नाहीं.

म्हणूनच संध्याकाळीं उन्हें परतलीं, ऑफिसें सुटलीं, दिवसाचा प्रकाश सायंकाळच्या प्रकाशांत परावर्तित होऊं लागला, आकाशांत चांदण्या आणि खालीं निऑन लाइट्स चमचम करूं लागले कीं शेंकडों-हजारों माणसांचीं पावलें गिंझाकडे वळूं लागतात. लोटच्या लोट येतात. त्यांच्या पावलांत एक प्रकारची निःसंकोच साहजिकता असते. त्यांच्या वृत्तींत एक प्रकारचा निरागस मोकळेपणा असतो. त्यांच्या हावभावांत एक प्रकारची मुक्ति असते. त्यांची गिंझाकडची धाव म्हणजे जीवनाच्या अरुंद रस्त्यावरून मोकळ्या मैदानांत मारलेली उडीच–आनंदाचें वारें प्यालेली उडी!

हेंच गिंझाचें खरें आकर्षण आहे. हीच गिंझाच्या वातावरणाची खरी मादकता आहे. हाच गिंझांतल्या खुशालचेंडूपणाचा खरा जोश आहे. येथल्या कॉफीच्या कपांत, बीअरच्या बाटलींत, निऑनच्या रंगांत, गाण्याच्या सुरांत, बँडच्या ठेक्यांत आणि नृत्याच्या पावलांत हाच जोश आहे — याचेंच पाणी लकाकत आहे. ब्रॉडवे, पॅरिस, इस्तंबूलच्या चैनींत हें पाणी नाहीं!

हें पाणी चाखण्याची तुमची-आमची हिंमत नाहीं. गिंझाची कीर्ति आपण ऐकलेली असते. म्हणून टोकियोंतल्या पहिल्याच संध्याकाळीं आपलीं पावलें तिकडे वळतात. पण त्यांत जपान्यांचें साहजिक वळण नसतें. कसल्या तरी निषिद्ध साहसाच्या शोधांत आपण असतों. त्या साहसाच्या सीमारेषेवर आपण घुटमळत असतों. आपल्या हातून कांहीं तरी विलक्षण घडणार, घडावें अशी चोरटी आशा किंवा गोड भीति आपल्या अंतःकरणांत असते. कसल्या तरी अजब अपेक्षेनें, आणि त्या अपेक्षेनें तरळलेल्या वृत्तीनें, आपण गिंझांत चालतों, बोलतों, वागतों — आणि अर्थात् गिंझा निराळा दिसतो. वाटतें, जीवन जीवन म्हणतात तें येथें आहे. पण या जीवनावरचा उफाळलेला फेस चाखण्याची आपली हिंमत नसते. आपण भटकभटक भटकतों आणि या जीवनाचा शिंतोडाहि अंगावर उडवून न घेतां परत येतों. असें दोन चार दिवस झालें म्हणजे चळलेली वृत्ति जरा ताळ्यावर येते. मन थोडें तटस्थ होतें. आजुबाजूच्या दृश्यांचा अर्थ कळूं लागतो—खरें म्हणजे त्यांतली मजा कळूं लागते.

एकीकडून एक मैत्रिणींचा घोळका येतो, दुसरीकडून मित्रांचा घोळका येतो, आणि मग मैत्रिणींत हास्य खिदळतें आणि मित्रांत चळवळ माजते. या दोन घोळक्यांचा मुकाबला होतो कीं काय, एखादी मैत्रीण आणि एखादा मित्र हळूच सटकतात आणि एक नवीन जोडी निर्माण करतात कीं काय, हें आपल्याला समजत नाहीं. पण त्याची आतां गरज नसते. त्या हास्याची खळखळलेली बांगडी तेवढीच मनावर ठसते. समोरून एक तरुणी येते. तिचे डोळे दारू प्याल्यासारखे वाटतात, ती दारू तुम्हांला चढूं लागते, इतक्यांत ती दृष्टिआड होते. मग एक जोडपें दिसतें — पुरुष पाटलोणींत आणि स्त्री किमोनोंत. एका दुकानाच्या प्रदर्शन-भागाचें तीं निरीक्षण करतात. आपण त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळतों आणि जपानी फॅशन्सबद्दल अंदाज बांधूं लागतों. इतक्यांत बाजूच्या गल्लीतून एक झिंगलेला माणूस अवचित उपटतो—पण त्याच्याकडे कोणीच लक्ष देत नाहीं. आपणहि देत नाहीं. एक खेळणींवाला प्रकाशानें क्षणांत फुलणारे, क्षणांत विझणारे चेंडू विकीत असतो ते पाहत आपण आपले उभे राहतों. तोंच एक दहा-बारा वर्षांची मुलगी फुलांचा गुच्छ तुमच्या पुढें धरून उभी राहते. 'विकत घ्या' म्हणून विनविते. मुलगीहि सुंदर आणि फुलेंहि सुंदर ! पण फुलें आपल्या काय कामाचीं ? पण मुलीच्या नजरेंत अशी कांहीं ओढ असते आणि

वाणीनें ती असें कांहीं बोलत असते कीं क्षणाचाहि विचार न करतां तुम्ही तीं फुलें विकत घेतां आणि लगेच तीं तिलाच देऊन चालूं लागतां. पण तिला कळत नाहीं—ती तुमच्या मागून कांहीं तरी बोलत चालूं लागते – तुम्ही मागें वळून बघतां—ती तुम्हांला फुलें देण्यासाठीं धडपडत असते – मग तुम्ही एकवार हसतां, करुणेनें हसतां आणि तिला टाळण्यासाठीं आडव्या गल्लींत शिरतां. तों कोपऱ्यावर कागदाच्या कंदिलांत मेणबत्ती लावून बसलेला एक ज्योतिषी एका मध्यमवयस्क बाईचें भविष्य वर्तवीत असलेला दिसतो. राखी किमोनोंतील त्या स्त्रीच्या चेहऱ्यावरची गंभीर उत्सुकता आणि मळकट पांढऱ्या पोशाखांतल्या त्या ज्योतिष्याच्या चेहऱ्यावरचा संपूर्ण निर्विकार भाव, यांतल्या आर्त विरोधामुळें त्या कुडबुड्या दृश्याची चेष्टा करण्याच्या पलीकडे तुम्ही जातां. पण एक विचार मात्र मनांत घोळतो—सगळीकडे इतका उजेडाचा उफाडा असतांना हा ज्योतिषी त्यांतल्या त्यांत काळोखी कोपरा शोधून वर मेणबत्तीच्या उजेडालाहि कागदाचें आवरण कां घालतो ? तुमचें भविष्य असें अंधारांत लपलेलें आहे असें त्याला सुचवावायचें आहे काय ? जिप्सी ज्योतिष्यांच्या स्फटिक गोलाप्रमाणेंच या कागदी कंदिलाचा उपयोग होत असेल काय ?

पण याचा अधिक विचार करायला तुम्हांला फुरसत नसते. तुमच्या रस्त्यावर पुढें उजेडाचा झगझगाट आणि गर्दीची झिम्मड असते. त्यांतच मोटरींनीं एकमेकांना अडवून कर्ण्यांचें शीतयुद्ध सुरू केलेलें असतें. पण या माणसांच्या आणि मोटरींच्या गर्दीपेक्षां त्या प्रकाशाच्या आराशीनेंच तुमचें लक्ष वेधून घेतलेलें असतें. त्या रस्त्यावर फ्लोरोसंट ट्यूब्सच्या कमानींच्या रांगांमागें रांगा असतात. दररोज रात्रीं प्रकाशाच्या गोलांनीं आणि कंदिलांनीं रस्ते दिवाळींतल्या प्रमाणें शृंगारायची जपानी शहरांची पद्धति मीं पाहिलेली होती, पण येथें निऑन-लाइट्सचा इतका कडाका उडालेला असतांना ही दीपोत्सवाची प्रांतिक स्वायत्तता कां हें ध्यानांत येईना. पण हें कारण फारसें खोल नसावें. ही नुसती प्रकाशाची चढाओढ असावी. गिंझांत रात्रीं सुरू असलेली प्रकाशाची, मुख्यतः निऑन-लाइट्सची, स्पर्धा गिंझाच्या अंगांत एखादें भूत संचारावें तशी चालते. अनेक प्रकारचे दिवे या शर्यतींत शिरत असतात—उडणारे दिवे, डोळे मिचकावणारे दिवे, प्रकाशरेषांचीं अनेक कोडीं घालणारे व लगेच उलगडून दाखविणारे दिवे, नक्षीदार भरतकामाचे अनेक नमुने दर्शविणारे दिवे,

कशाला तरी गवसणी घालायला निघालेले दिवे, इंद्रधनुष्यांतील रंगांनीं एकमेकांना उखाणे घालण्याचा खेळ खेळणारे दिवे—आणि अर्थात् जेथें जागा मिळेल तेथें दीपमाळेची आरास करणारे अस्सल जपानी कंदिल–यांचा आततायी उल्लास सुरू असतो. ती समोरची नाइट क्लबची इमारत पाहा. तिच्या शिखरावर पृथ्वीभोवतीं फिरणाऱ्या ग्रहताऱ्यांचें प्रात्यक्षिकच सुरू आहे! ती ईडन-बाग पाहा, त्या बागेंतलें सफरचंद अदाम-ईव्हच्या हातांत पडण्यापूर्वीच त्याच्यावर आपल्या शरसंधानाचा प्रयोग करण्याचा प्रयत्न बालमदन करीत आहे! त्या क्लबच्या शिखरावर एक गेशा--वस्त्रालंकारांचें सारें सौंदर्य ल्यालेली गेशा–आपल्या हास्याचीं मोत्यें सर्वत्र विखरीत आहे!

* * *

डोक्यांतला हा प्रकाशाचा गोंधळ थोडा दूर करण्यासाठीं तुम्ही आणखी एकवार रस्ता बदलतां, थोडेंसें चालतां, तोंच ध्यानांत येतें कीं तुम्ही पुन्हा पूर्वीच्याच हमरस्त्यावर आलां आहांत. गिंझांत असें हें नेहमींच होतें. गिंझाचा भूगोल बिनचूक जाणणारा–म्हणजे सायंकाळच्या त्या मनःस्थितींत जाणणारा–कोणी हरीचा लाल असेल असें मला वाटत नाहीं. हमरस्त्याआडचा गिंझा म्हणजे चक्रव्यूहाचा एकेक तुकडा आहे. जीवनाच्या 'लढाई'साठीं निघालेले अनेक अभिमन्यू त्यांत रोज अडकतात आणि गायब होतात! हमरस्त्यावर अर्थात् गर्दीचें उधाण असतें, पण मागच्या गल्ल्यांत जो थोडासा अनुभव आलेला असतो त्यानें मनावर पक्कें बिंबलेलें असतें कीं जीवनाच्या कांहीं वक्र वळणांची मजा चाखायची असेल तर या गल्ल्यांत चला. म्हणून आपण लगेच हमरस्ता सोडतों आणि एका गल्लींत घुसतों, आणि काय आश्चर्य–या गल्लींतला उजेड अगदीं मंद! गर्दीहि फार नसते. जी असते ती बहुतेक सारी पुरुषांची. स्त्री एखादीच. पण दोनहि बाजूंना हारीनें उभ्या असलेल्या बार्सपैकीं कांहींच्या समोर स्त्रिया (एकट्या--दुकट्या) उभ्या असतात. रंगदार किमोनोंत सजलेल्या आणि बाहुलीप्रमाणें रंगलेल्या स्त्रिया! तुम्ही जाऊं लागलां म्हणजे त्यांतली एखादी तुमच्याकडे पाहते, हळूच हसते आणि अगदीं हलक्या आवाजांत म्हणते, 'दोझो' ...तुम्ही थांबलांत तर ती कमरेंत लवते व पुनः म्हणते, 'दोझो.' मग अर्थात् तिच्या निमंत्रणाला नकार देण्याची तुमची हिंमत नसते आणि फारसा धोकाहि नसतो.

निमंत्रण साधें मद्यपानाचें असतें. मद्य म्हणजे साके. जपानचें राष्ट्रीय पेय. तें एकदां चाखायला हवेंच. आपण संमति देतों. त्याबरोबर ती वळते, चौकोनी लाकडी जाळीचा छोटासाच दरवाजा असतो तो सरकावते व आपण वाकून आंत प्रवेश करतों.

आंत म्हणजे एका छोट्या जपानी बागेंत. पांचसहा फूट लांबीरुंदीच्या त्या जागेंत चीड, मोरपंख असले अगदीं छोटेसे चारपांच फूट उंचीचे ' वृक्ष ' आहेत, झुडपें आहेत, जमिनीवर रेती आहे, रेतींत मधोमध तऱ्हतऱ्हेच्या आकाराचे दगड आहेत, एक दगडी दिवा(शैलदीप)हि आहे. झाडांच्या, दगडांच्या दरम्यान पाणी चक्क एखाद्या ओढ्यासारखें आणून वाहतें केलेलें आहे. कोपऱ्यांत पाणी पडत असतें. त्याच्या त्या धारेकडे आपण क्षणभर कलदार दृष्टीनें पाहतों नि त्या दगडावर अलगद पावलें टाकीत जातों. बागेपलीकडच्या पडवीशीं पोंचतों तों ती किमोनो-कन्या तेथें केव्हांशी आलेली असतेच, ती तुमचीं पादत्राणें काढण्यास मदत करते, मग हळूच पडवींत उडी मारून सपातांचा जोड तुमच्या पुढें करते, तो घालून तुम्ही ' आतां पुढें काय ' म्हणून विचार करतां तोंच ती समोरचें बंद दार सरकावते आणि आंत चला म्हणते. आंत फक्त कोऱ्या चकचकीत चटया पसरलेल्या आणि त्यांवर दोन छोटे छोटे चौरंग. त्या चटयांचा स्वच्छ, कोरा मऊपणा तुम्हांला दुरूनहि जाणवतो नि तुम्ही आंत पाऊल टाकतां, तों ती तेथें आलेली असतेच. पलीकडे एका चौरंगाभोंवतीं दोन जपानी पुरुष व एक किमोनो-कन्या बसलेलीं असतात. त्या जपान्यांची साकेच्या सुखानंदांत फार प्रगति झालेली स्वच्छच दिसते. ते तुमच्याकडे काडीमात्र लक्ष देत नाहींत. तुमची किमोनो-कन्या मात्र हसून लवून टेबलापासच्या मऊ रेशमी गिरदीवर बसायला सांगते. तुम्ही बसतां तोंच ती साकेचे दोन नैवेद्यपात्राएवढे पेले घेऊन येते — एक तुमच्यासाठीं, एक स्वतः-साठीं. पण ती एकच पेला भरते व तुमच्या हातांत देते, तेव्हां तुम्ही तिला तिचा भरायला सांगतां. पण ती भरीत नाहीं. ' तुमच्या हातांतला रिकामा झाला म्हणजे त्यांतूनच घेईन ' असें सांगते. साकेचा पेला चवदार सावकाशीनें थेंब थेंब चाखायचा असतो. पण तुम्ही नवशिके — तुम्ही तो एका घोटांत गट्ट करतां — आणि त्याच्या झटक्यानें घसा थोडा चमकलेला असतो त्याची गंमत तुमच्या चेहऱ्यावर पसरते. त्यावर ती किणकिणें हंसते आणि ' तुम्हांला बिअर देऊं का ' विचारते. पण आपल्याला अद्याप गिंझांत बरेंच भटकायचें असतें —

साकेपेक्षांहि अधिक सणक असलेला अनुभव शोधायचा असतो. आपण बिल देतों, ' आरिगातो' म्हणतों नि बाहेर पडतों.

तुम्ही आतां ज्या रस्त्यावर आहांत तो किती तरी अधिक जिवंत आहे, सळसळलेला आहे. रस्त्यांवर दिव्याची तशी आरास नाहीं, पण बाजूच्या रांगेनें पसरलेल्या व्यग्र व्यवहाराच्या स्थळांकडून उजेडाची भरपूर आवक होत असते. त्यांच्या प्रवेशद्वारासमोर आतां बहुतेक पुरुषच असतात (चुकून एखादी स्त्री —पण बरोबरच्या पुरुषांबरोबरचें तिचें हसणें-खेळणें असें कीं तुम्ही दुरूनच दबून जातां!) त्यांतला एखादा तुमच्याकडे येऊन धिटाईचें आवाहन करतो, आणि तुम्ही त्यांतून पटकन् सटकतां. समोरून एक गायक-वादकांची टोळी येत असते. त्यांतला एक मुरली तोंडांत धरून चक्क स्वर काढीत असतो. (काय गंमत आहे पाहा — हे स्वर मला कोंकणांतल्या गुराख्याच्या पाव्याची आठवण करून देतात!) हे गिंझांतले फिरते कलावंत! गिंझांतल्या मादक गंमतीला थोडी मधुर स्वरांची झळाळी देणें एवढीच त्यांची माफक इच्छा. तुमच्याबरोबर म्हणाल त्या पेयगृहांत येऊन तुम्ही म्हणाल ती चीज वाजवून (आणि क्वचित् गाऊन) दाखविण्याची त्यांची तयारी असते! कॉफींत साईबरोबर संगीत ओतण्याची आणि बिअरच्या सोनेरी सळसळींत स्वरांची खुलावट मिसळण्याची ही कल्पना मला फार आवडली — पण याला स्वैर, मस्त पिण्याची जी बैठक लागते ती देण्याची आपली तयारी नसते आणि आपण तसेच पुढें जातों. तों पुढल्या कोपऱ्यावर एक चित्रकार दिसतो — झटपट चित्रकार! तेथल्या तेथें तुमची छबी उठवून देणारा चित्रकार! त्याच्या कलेचे नमुने आजूबाजूला ठेवलेले असतात. तो कोणत्या तरी चित्रावर अखेरचा हात फिरवीत असतो. तुमच्याकडे अगदीं लक्ष नाहीं असें दाखवितो—आणि अवचित भानावर येऊन हसतो—हसून स्वागत करतो आणि दहा मिनिटांत तुमचें चित्र काढून देण्याची हमी देतो. कलावंताची कदर केली पाहिजे असें आपलें मन सांगतें—पण निश्चय होत नाहीं. काय उपयोग? हा आपले अवयव रेखाटील, पण मनांतले भाव थोडेच रेखाटणार? गिंझाच्या वातावरणांत उन्मनस्क झालेली वृत्ति त्याच्या पेस्टेलच्या फटक्यांत थोडीच सांपडणार? म्हणून आपण त्याला आदरपूर्वक नकार देऊन पाऊल उचलतों—पण लगेच वाईट वाटतें. एका धडपडत्या कलावंताला साहाय्य करण्याची संधि आपण सोडली याचें वाईट वाटतें. आतां हें लिहितांना तर फारच

वाईट वाटत आहे. आपल्या उन्मनस्क वृत्तीची फिकटशी तरी छाया आपल्या चेहऱ्यावर पडली असेलच ना—त्यांतली थोडीशी तरी त्यानें रेखाटली असती तरी आतां मला त्या वेळच्या माझ्या अंतरंगांत थोडें डोकावून पाहतां आलें असतें.

आपलें पाऊल रेंगाळतें, पण आपण तसेंच पुढें जातों. तों ती मघांची फुलांचे गुच्छ विकणारी मुलगी पुन्हा पुढें उभी! गिंझाच्या चक्रव्यूहाची आणखी प्रचीति. तसें म्हटलें तर गिंझाचें जग लहानच—आणि तें स्वतःभोंवतींच फिरत असतें. आपण त्या मुलीला ओळखतों, पण ती मुलगी ओळख दाखवीत नाहीं. न ओळखतांच हसते—अगदीं फिकेंन हसते. आतां तुम्ही तो गुच्छ आनंदानें विकत घेतां—आणि परत देत नाहीं. कारण आतां तुमची वृत्ति बदललेली असते. तरंगत असते. स्वतःच्याच अस्फुट अस्थिर इच्छांमध्यें सुखावत असते. आपल्या अनुभवांना अज्ञात साहसांत ढकलून देण्यासाठीं आतुर झालेली असते. वाटतें, हा फुलांचा गुच्छ—कोणी सांगावें? प्रसादचिन्हच असेल तो! या स्वैरार्कर्षणाच्या मोहिमेंत कदाचित मार्गदर्शक ठरेल. ठरो वा न ठरो, हा गुच्छ हातांत वागविण्याची कल्पना आवडते. हा गुच्छ हातांत असला कीं गिंझाच्या या जगांत आपल्याला आपलें स्थान सांपडेल अशी आशा वाटते.

या वृत्तीवर तरंगत तरंगत आपण फिरूं लागतों. फिरत राहतों. एका गल्लींतून दुसऱ्या गल्लींत, दुसरींतून तिसरींत असा आपल्या पावलांचा अबोध, अस्थिर प्रवास सुरू राहतो. आपले डोळे फिरफिरत असतात. असंख्य गोष्टींचा वेध घेत असतात. आपलें मन भटकत असतें. आपले विचार भरकटत असतात. वृत्ति हेलावत असते. आपण अनेक साकेगृहें पाहतों, पेयगृहें पाहतों, नृत्यगृहें पाहतों, आणि साधीं आहारगृहेंहि पाहतों. त्यांचीं नांवें, त्यांची दर्शनी बनावट, त्यांच्या वास्तूचें शिल्प, त्यांच्या प्रसाधनाचे तरंग पाहतो—नजरेंत ओततों, अंतःकरणांत सांठवितों आणि त्यांची क्षणाक्षणाला वाढत असलेली गुंतागुंत एकसारखी दूर करीत असतों. त्यांचीं तीं नांवें—दरेक नांवाबरोबर अंतःकरणांत अनुभवाचें विश्व उमलतें. बार गिल्डा, बार डायना, बार सिल्व्हिया, बार ऐस्टेलेटा, बार ज्युलियेन —गिल्डा माझी जिनीवाची मैत्रिण. ती व मी मिलानमध्यें असेच भटकलों. असेच हिंडलों. मिलानचा शोध घेण्यास तिनें मला मदत केली. मग त्या वेळचें

वातावरण किती निराळें! किती निरभ्र! त्या वेळचा अनुभव किती शुद्ध! किती समृद्ध! माझी गिल्डा, तशी कोणाची डायना, तर कोणाची सिल्व्हिया; आपल्या बार्सच्या नांवांत लोकांचें स्मृतिविश्व ढवळून काढण्याचें असें चमत्कारिक सामर्थ्य आहे अशी त्यांच्या मालकांना कल्पना तरी असेल का? पण ही किमया नांवाची नव्हे—वातावरणाची आणि तुमच्या अनुभवांची! नाहीं तर बार लामेर, बार मिराबार यांनीं माझा काव्यात्मा उचंबळून यायला हवा होता! (मला फक्त हॉंगकॉंगचें हॉटेल मिराबार हें ऐषआरामी हॉटेल आठवलें!) आतां हा बार रापान, क्लब कोपाकाबाना अगर पापागायो—नंग तोकडी तुमान, चौकडीचा उघडा शर्ट, गवताची सताड हॅट आणि हातांत बांजो अगर मँडोलिन अशा थाटांतला कॅबालेरो माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला. मला स्पॅनिआर्डोचें गरम रक्त आवडतें. त्यांचा एकंदर उसळता कारभार मला पसंत आहे. त्यांच्या चित्रकलेंतील रसरसत्या रंगांनीं माझी नजर अनेकदां बांधून ठेवली आहे, पृथ्वी-वर प्रलय मांडणाऱ्या त्यांच्या गाण्यानें आणि नाचण्यानें मला एका काळीं वेड लागत असे. पण मी सिंगापूरला मले लोकांचें योगेत नृत्य पाहिलें—आणि स्पॅनिआर्डोच्या तुफानी नृत्यांतहि संयमाचें काव्य ओततां येतें हें अनुभवलें—आणि माझें स्पॅनिआर्डोच्या गाण्याबजावण्याविषयींचें रंगेल आकर्षण ओसरूं लागलें. मी या क्लबांच्या वाटेस गेलोंच नाहीं. पण मनांत विचार आला, पश्चिम युरोपांत अगर दक्षिण अमेरिकेंत मन भटकायला लावणारीं हीं नांवें देण्याचें जपान्यांना वेड कां? आणि मग एखादें जपानी नांव आढळतें का पाहूं लागलों —नि एक नांव आढळलें—बारा मोमोयामा! इतक्यांत आणखी एक प्रश्न उपटला—मोठमोठ्या गडगंज नाइट-क्लब्सचे मालक आपल्या क्लबांना क्लब क्राऊन, क्लब्स स्टार, क्लब सेव्हन, क्लब सिरो असलीं सपक नांवें कां देतात?

पण नांव सपक असलें तरी दर्शन सपक नाहीं. उलट चांगलें भडकच! एका क्लबची इमारत किल्ल्यासारखी आहे आणि तिच्या डोक्यावर निऑन लाइट्सनीं तारामंडळाच्या नर्तनाचा फेर धरला आहे! दुसऱ्या एका क्लबची इमारत लष्करी कोटासारखी वाटते. क्लब कार्लोवर आधुनिक वास्तुशिल्पाचा वर्षाव झालेला आहे, पण त्याच्या भिंती तटबंदीसारख्या दिसतात आणि त्याच्या प्रवेशद्वारावरचें शिल्प म्हणजे एखाद्या कलात्मक मुकुटाला जाडजूड कडे ठोकावें

तसें वाटतें! या असल्या अफाट-बेफाट इमारतींमुळें एक फायदा होत असेल! रहस्यमय वातावरण निर्माण होत असेल! आंत चाललेले प्रकार म्हणजे एखाद्या मध्ययुगीन राजवाड्यांत चाललेलीं गुप्त कारस्थानें, असा समज झाला तर त्यांचें आकर्षण वाढेलच! कांहींनीं आपला हेतु अगदीं उघडा केला आहे! उदाहरणार्थ, एकानें आपला क्लब म्हणजे अल्लाउद्दिनाची गुहा बनविली आहे! दर्शनी भाग ओबडधोबड दगडांचा; जागा वेडीवाकडी; आंतल्या भिंतीवर रत्नांची चमचम; मधूनमधून खजुरीचीं कृत्रिम झाडें. निळा धूसर प्रकाश — त्या सुरस आणि चमत्कारिक वातावरणांत वाटतें, येथें नुसतें कुजबुजलें तरी कटाचा संशय येईल! अरबी रंगमहालांतला पोषाख केलेल्या तेथल्या मुलीशीं बोलण्याचें सोडा, त्यांच्याकडे नुसतें पाहण्याची हिंमत होत नाहीं. बाहेर दारावरच, पायघोळ सलवारींतला हबशी, त्यांचा उघडाबंब देह, काळानिळा चेहरा, बटबटीत डोळे, कानाच्या पाळ्यांतून लोंबणारीं भलीं लठ्ठ बळीं, डोक्यावर पागोटें, आणि हातांत नंगी तलवार—त्याचा हा अवतार पाहूनच हबकलों होतों. त्यांच्याशीं माझा जपानी मित्र बोलला तेव्हां वाटलें होतें, हा म्हणतो आहे, 'तिळा उघड.' आंत गेल्यावर वाटलें, येथें एखादा बुदला असेल तर बरें—अलीबाबाच्या चोरासारखा त्यांत लपेन तरी!

ज्याला जपानी वातावरणाची चव चाखायची असेल तर त्यानें या तालेवार क्लबांत पाऊल सुद्धां टाकूं नये. एक प्रकारची दारू असते ना—तिचें प्राशन करण्यापूर्वी तिच्या पृष्ठभागाला काडी ओढून आग लावण्यांत येते. त्याच्या निळ्याजांभळ्या ज्वाला दिसतात छान, पण त्यांची आग भयंकर, आणि ती दारूहि भयंकर. या नाइट-क्लबांमधलें वातावरण मला या ज्वाळांची आठवण करून देतें. तेथला नाच म्हणजे धिंगाणा. तेथलें संगीत म्हणजे झाजचा गहजब! आणि तेथलें बॅण्डवादन म्हणजे वाद्यांच्या अंगांत संचारलेलें भूत! तेथें माणसें माणसांसारखीं बोलत नाहींत, माणसांसारखी भेटत नाहींत — फक्त जमिनीला लाथा मारीत नाचतात! माझ्यासारखा मनुष्य येथें शरमिंधा होतो. येथें आपल्याला थोडें देखील स्थान नाहीं याची तत्काळ खात्री पटते आणि मी तेथून पळ काढतों! एकदां माझे मित्र तकदीर अशाच एका क्लबकडे बोट दाखवून म्हणाले, या बिअर हॉलमध्यें जाऊं या – येथें टोकियो युनिव्हर्सिटींतले विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षणासाठीं पैसे मिळवितात, त्यांना आपण

मदत केली पाहिजे. आम्ही गेलों. तेथें आम्हांला विद्यार्थी दिसले नाहींत कीं विद्यार्थिनी दिसल्या नाहींत. दिसल्या त्या फक्त नाचऱ्या नखरेल्या! आम्ही पळालों!

* * *

तुम्हांला जपानी पेयगृहांतलें जपानी वातावरण चाखायचें असेल, जपानी आतिथ्य अनुभवायचें असेल, जपानी जिव्हाळा जाणायचा असेल तर तुम्ही छोट्या छोट्या पेयगृहांत चला. आपल्या जागा त्या! त्यांचें दर्शनच किती गोड! जपानच्या अभिजात सौंदर्यदृष्टीचीं फुलें विखुरलेलें! हा बार मॅग्नोलिया पाहा. येथें ही किलबिल कसली ऐकूं येते आहे? त्याच्या प्रवेशद्वारावर पक्ष्यांचा पिंजरा आहे. वाटतो मात्र एखाद्या रानाचा तुकडा! तेथें पांखरें स्वच्छंद उडत आहेत, बागडत आहेत, चिंवचिंवत आहेत! मात्र अगदीं स्वच्छंद नव्हेत हं. त्या 'राना'वरचीं तीं 'हिरवीं उनें' जरा नीट न्याहाळा, म्हणजे ध्यानांत येईल कीं ही कृत्रिम प्रकाशयोजना आहे. आणि तिच्या लहरींवर हे पक्षी नाचत आहेत! आतां हें पेयगृह पाहा. त्याचें वक्र, वळणदार, कोरीव छप्पर एखाद्या देवळाच्या छपरासारखें वाटतें. आणखी या पेयगृहासमोर?—कृत्रिम टेकडी आणि कृत्रिम जंगल! जंगलाचा छुटुपुटूचा नमुना जपानी पाइन्सच्या आणि सीडर्सच्या कृत्रिम अल्पकृतींनीं (बोन्साय म्हणतात त्यांना) निर्माण केलेला आहे. त्याचप्रमाणें या पेयगृहापुढचें हें छोट्या छोट्या तालवृक्षांच्या कुंड्यांचें शिल्प पाहा—कल्पसिंहाच्या मुखांचें शिल्प! जपानच्या अभिजात कुंभकलेचा साक्षात्कार घडतोसें वाटतें! आणि आतां या पेयगृहापुढें आडवींतिडवीं टाकलेलीं झाडांचीं खोडें—हवीं तशीं टाकलीं आहेत आणि हवीं तशीं कापलीं आहेत! पण जरा कोवळ्या नजरेनें पाहा—त्यांच्या आकारांत आणि रचनेंत एक संगति दिसेल आणि त्यांच्या स्वच्छ करकरीत कापावरच्या रेषांच्या रंगदार आकृति तुमची नजर खुलवतील!

यांच्या दर्शनानें आपलें भान हरपतें आणि आपण यांतल्या एका पेयगृहांत शिरतों. आंत नजर टाकल्याबरोबर जाणवतें, हें खरें जिव्हाळ्याचें वातावरण! तेथें दोनतीन मुली असतात त्या तुमचें हसून स्वागत करतात. कौंटरपलीकडे वयस्क ममासान (मालकीण) असते, तीहि तुमचें हसून स्वागत करते. (तेवढ्यांत तिचा एक काळा दांत दिसतो—शोभतो बरं का तो हिला!) त्या मुलींतली एक मुलगी उठते, तुमच्याकडे येते, तुम्हांला नेऊन एका टेबलापाशीं बसविते—पण

बसविण्यापूर्वी तुमचा ओव्हरकोट वगैरे असला तर काढून ठेवते. बहुतेक तुमची ती नेहमींचीच मैत्रीण असते. तिला तुमच्या आवडीनिवडी माहीत असतात. तुमची तिची पहिलीच भेट असली तरी चारदोन वाक्यांत तुमची जात ती ओळखते. तुमच्या आवडीचें पेय मागवते. स्वतःसाठींहि मागवते, पण त्यांत मद्यार्क जवळ-जवळ नसतोच. (मद्यपानानें जपानी स्त्रियांच्या गालांवर जी लाली लगेच चढते ती तिला बिलकुल आवडत नाहीं.) आणि मग ती तुमच्याबरोबर पीत—खरें म्हणजे बोलत—बसते. अल्पावधींत आपली कधींकाळची सखी भेटली असें वाटायला लावते—तुमच्या खांद्यावर हलका हात ठेवते, तुमच्या नजरेंत नजर मिळविते, तुमच्या हास्यांत हास्य ओतते, तुमच्या भावनांत भावना मिसळते. तुमची भाषा येत नसली तरीं तुमचें मन ओळखते—स्त्रीसहवासासाठीं आसुसलेलें तुमचें मन जाणते. तुमच्या अंतःकरणांत शिरते. तुम्हांला नृत्याची लहर आली तर तुमच्याबरोबर नाचाचीं चार सलगीचीं पावलें टाकते. (तिचीं दमलेलीं पावलें ' झोंपलीं ' तरी चेहऱ्यावरचें चैतन्य नाचतें.) तुमची चेष्टा, क्वचित् कुचेष्टा करते (पण अतिरेक होऊं देत नाहीं—अतिरेक होतोसा वाटला तर घारीच्या नजरेची ममासान तेथें हजर होते नि तुमच्या चेष्टेंत असा कांहीं भाग घेते कीं ती चेष्टा क्षणांत विरघळून जाते !) तुम्हांला चढली तर ती सावरते. त्या अवस्थेंत तुमच्या खिशांतले पैसे नाहींसे होत नाहींत आणि तिची मायाहि कमी होत नाहीं ! ती आदर्श प्रामाणिकपणानें वागते. ती पैसे चोरीत नाहीं, तसेंच चुकून कधीं दुसऱ्या मुलीचें आवडतें गिऱ्हाईक चोरीत नाहीं. ती फक्त तुमचें चित्त चोरते—आणि हें चोरलेलें चित्त जिभेवर खेळवीत तुम्हांला निरोप देते, " दोझो, माता इराश्शाही ने—पुन्हां येणार ना ? केव्हां येणार ?"

* * *

पेयगृहांकडून कॉफीगृहांकडे, हा कांहीं फारसा स्पृहणीय प्रवास नाहीं, पण मी तुम्हांला कॉफीगृहांत नेणार तो कॉफी पिण्यासाठीं मुळीं नाहींच. किंबहुना जें एक सहा मजली बादशाही कॉफीगृह आहे—ज्याच्या वरच्या वर्तुळाकार मजल्यावरून खालच्या मजल्यावर नजर टाकतां येते आणि जी टाकतांना वरच्या ताऱ्यावरून खालच्या ताऱ्यांवर, किंवा अधिक अचूक बोलायचें म्हणजे तारकांवर, नजर टाकल्यासारखें वाटतें. त्या ऐषआरामी, वैभवशाली कॉफीगृहांतहि मी तुम्हांला नेणार नाहीं. कारण हीं असलीं बादशाही कॉफीगृहें म्हणजे त्या भडक नाईट-

क्लबांच्याच आवृत्त्या. गिंझाचीं अव्वल कॉफीगृहें अशीं भडक नसतात. तीं सौम्य असतात आणि एक मृदु, सांस्कृतिक वातावरण तेथें दरवळत असतें. संस्कृतीचा जन्म समृद्धीच्या खातेऱ्यांत झालेला असतो असें एका खवट माणसानें म्हटलेलें आहे, तसा या कॉफीगृहांतील सांस्कृतिक वातावरणाचा जन्म त्यांच्यांतील जीवघेऊ स्पर्धेत झालेला आहे. पण आपल्याला त्याच्याशीं काय करायचें आहे? आपल्याला फक्त चारदोन घटका या सांस्कृतिक वातावरणांत रमून जायचें आहे, आणि चवीसाठीं मधून मधून कॉफीचे घुटके घ्यायचे आहेत. तुम्हांला चित्रकलेचा नाद आहे काय? मग तुम्ही माझ्याबरोबर या कॉफीगृहांत या. येथलें फर्निचर किती नमुनेदार आहे—सारें कांहीं बांबूचें. खुर्च्या बांबूच्या, टेबलें बांबूचीं, क्रॉकरी-कटलरीसुद्धां बांबूची! जपान्यांनीं झाडांच्या किडलेल्या खोडांतून स्थलचित्राचे सुंदर सुंदर नमुने निर्माण केले, ते काय बांबूंतून सौंदर्य निर्माण करण्यास चुकणार? पण मीं तुम्हांला फर्निचर पाहण्यासाठीं आणलेंच नाहीं. तें काय, तुम्हांला हव्या त्या कॉफीगृहांत आढळेल—दर कॉफीगृहांत फर्निचरचा नवा नमुना! एखाद्यांत तुम्हांला भूमितींतील आकृत्यांचें दर्शन होईल, तर दुसऱ्यांत शास्त्रज्ञाच्या प्रयोगशाळेंतील उपकरणें आपण पाहत आहोंत असा भास होईल! मीं तुम्हांला येथें आणलें आहे तें तुमचा चित्रकलेचा नाद पुरविण्यासाठीं. तो पहा, समोर फळा आहे. शेजारीं तऱ्हेतऱ्हेच्या रंगांचे खडू. जा आणि काढा हवें तें चित्र. तुम्हांला एखादें मॉडेल हवें का? तुमच्यापुढें कॉफीचा ट्रे ठेवणाऱ्या मुलीकडेच जरा आर्त अपेक्षेनें पाहा—ती थोडा वेळ मॉडेल म्हणून उभी राहील! तुमचें लक्ष चित्रकलेपेक्षां संगीताकडे अधिक आहे? हरकत नाहीं. या कॉफीगृहांत कॉफीच्या मेनूबरोबर संगीताचाहि मेनू देण्यांत येतो. तुम्हांला हवी ती रेकॉर्ड सांगा—लगेच तिचे स्वर घुमूं लागतील! (चारदोन गिऱ्हाइकांनीं एकाच वेळीं निरनिराळ्या रेकॉर्ड्स वाजवायला सांगितलें तर काय होतें तें मात्र मला विचारूं नका—मला माहीत नाहीं.) या पलीकडच्या कॉफीगृहांत मुळीं अभिजात संगीताचे जलसेच चालू असतात—आज बीथोव्हन तर उद्यां मोझार्ट. त्यांचे कार्यक्रम आगाऊ प्रसिद्ध होत असतात. तुमचा आवडता कार्यक्रम निवडून तुम्ही या. आतां कॉफीगृहांचा हा नमुना पाहा—या कॉफीगृहांत पुष्परचनेचे पाठ दिले जातात; यांत बाहुल्या करण्याचे; आणि यांत दुसरे कसले! यांतल्या या कॉफीगृहाची तर गंमतच आहे. त्यांच्या कौंटरवरची मुलगी तुम्ही आलांत कीं

तुमच्याकडे एक सौम्य हास्याचा कटाक्ष टाकते आणि मग सारा वेळ कौंटरवरच्या फुलदाणींतील फुलांशीं खेळत बसते—त्या वेळीं तिच्या कर्दळीच्या कळ्यांसारख्या बोटांची जी हालचाल होत असते ती नुसती वेड्यासारखी पाहत बसावेंसें वाटतें. एका कॉफीगृहांत उत्तम कलाकृतींचा संग्रह आहे, तर दुसऱ्या एकांत दुर्मिळ पुस्तकांचा आहे. अशा एक ना हजारों युक्त्या टोकियोंतल्या तीन हजार कॉफीगृहांच्या मालकांनीं एकमेकांवर मात करण्यासाठीं योजलेल्या आहेत—आणि गिंझांत तर या युक्त्यांना उधाण आलेलें आहे. कोठें नग्नप्राय परिचारिका आहेत, तर कोठें त्यांच्यावर कपड्यांचे उद्यांचे नमुने घालून कॉफीगृहाचें रूपान्तर फॅशन-शोमध्यें केलेलें आहे. मला मात्र हें मंद मंद प्रकाशाचें कॉफीगृहच आवडतें! बाहेर प्रकाशाचा झगमगाट माजलेला असतांना येथें फक्त मेणबत्त्यांचे नंदादीपच तेवत असतात. नेत्रज्योतींच्या त्या मंदमधुर प्रकाशांत अंतःकरण पावित्र्यानें भरून जातें, भरून जातें!

आतां खूप थकवा आला आहे. पाय दमले आहेत. पोटांत भूक जाणवत आहे. नजरा पेयगृहाकडून अगर कॉफीगृहाकडून आहारगृहाकडे वळत आहेत; आहारगृहांच्या दर्शनी कपाटांत तयार पदार्थांच्या प्लेटी लावून ठेवलेल्या आहेत, त्यांच्याकडे पाहून तोंडाला पाणी सुटत आहे. त्यांचा स्वाद नाकांत शिरतोसें वाटत आहे. जपानी अन्नाच्या कलात्मक रंगानें डोळे वेधले गेले आहेत. एखाद्या आहारगृहांत शिरण्याचा विचार जोरांत सुरू होतो. आपण जपानी अन्नाची कीर्ति ऐकलेली असते. सुकियाकीची ख्याति आपल्या कानांवर आलेली असते. सुशीची चव मनांत भरलेली असते. टेम्पुराचीं टेसदार वर्णनें आठवत असतात. पण याहिपेक्षां विशेष म्हणजे जपानी आहारगृहांतल्या भोजनपद्धतीच्या कथांनीं आपलें मन पुरें भारलेलें असतें. या आहारगृहांतली किमोनो-कन्या तुमचें स्वागत करते, तुम्हांला एका बैठ्या टेबलापाशीं बसविते, तुमचे कपडे खराब होऊं नयेत म्हणून त्यांच्यावर एक मलवस्त्र पसरते आणि तुम्ही सुरुवातीच्या सुपाची चव चाखतां तोंच ती शाक, मांस आणि मद्य यांच्या मिश्रणाची चवदार किमया तुमच्या डोळ्यांदेखत करून दाखवते. सुकियाकीपेक्षां सुशीनें तुमचें मन आकर्षिलें असेल तर समोरच्या त्या उभ्या कौंटरच्या दुकानांत चला. तेथला आचारी चांगल्या जिवंत हलत्याचालत्या माशाचा ताजा करकरीत तुकडा तुमच्या देखत कापून त्याची सुशी बनवून तुम्हांला देईल आणि ती खातांना तो तुकडा तुमच्या तोंडांत

उड्या मारतो आहे असें तुम्हांला वाटेल. टेम्पुरा म्हणजे भज्यासारखा] तळलेला मासा, त्याची तुम्हांला अपूर्वाई नसेलच. तुम्हांला कदाचित जपानांत येऊन चिनी जेवण जेवण्याची लहर आली असेल – अनेकांना येते – ठीक. येथें अनेक चिनी आहारगृहें आहेत आणि फिरत्या टेबलावर तुम्ही म्हणाल तेव्हां चिनी चहा, पक्ष्याच्या घरट्याचें सूप, चौचौ, आणि माशाचा आणि कोळंबीचा अगर मांसाचा थोडा कडू थोडा गोड प्रकार आणून हजर करण्याबद्दल त्यांची ख्याति आहे. कदाचित् तुम्हांला पाश्चात्य जेवण हवें असेल. हंगेरिअन गुलाशची तीव्र आठवण झाली असेल. हरकत नाहीं, या हंगेरिअन आहारगृहांतले वेटर्स थेट हंगेरिअन शेतकऱ्याचा रंगदार पोशाख करून तुम्हांला तो खाऊ घालील. येथें गिंझांत तुम्ही म्हणाल तसलें जेवण तयार आहे— अ ला अमेरिकन, ला बेले फ्रान्स, ल' एस्प्यानॉल, इतालिएन किंवा सुद अमेरिकानो— तुमची आवड ठरविण्याचा अवकाश, तुमच्या आवडीप्रमाणें तुम्हांला स्टिक, ऑनियन सूप, रिसोटो कॅटालान, स्पॅग्हेटी (अधिक किआंटी)—काय म्हणाल तो पदार्थ खिलवण्याची त्यांची तयारी आहे. गिंझांतल्या या आहारगृहांनीं, या युगांत पिकलेली, एकेक अंग आळविण्याची विद्या आत्मसात केलेली आहे— एका आहारगृहांत तुम्हांला फक्त सारडीन माशांचेच पदार्थ मिळतील; दुसऱ्या एकांत फक्त पंख असलेल्या प्राण्यांच्याच चवीचा पदार्थ घेतला जाईल; आणि तिसऱ्यांत फक्त कालवें ! या आहारगृहांच्या या आवडीनिवडी त्यांच्या दर्शनी भागावर येऊन विराजमान होतात. एका कालवप्रिय आहारगृहानें आपल्या प्रवेशद्वारावर कालवाच्या शिंपल्यांचें प्रसाधन केलें आहे, तर दुसऱ्या एका आहारगृहाच्या डोकेबाज मालकानें आपलें दुकान सुमिदा नदीच्या कालव्यांतील एका पडावावर थाटलें आहे !

आपण भोजन आटोपून बाहेर येतों तों अकरा वाजलेले असतात. गिंझांतला झगमगाट मंदावलेला असतो. एकेक दिवा मालवत असतो. एकेक निऑन विझत असतो. वातावरणावर अंधाराचा शिडकावा बसत असतो. कांहीं ठिकाणीं काळोखाचीं पुटेंच भासतात. एका निऑन लाइटच्या प्रकाशांत दुसरा विझलेला निऑन एखाद्या मृत देहाच्या सांगाड्यासारखा विद्रूप दिसतो. एका नाइट-क्लबच्या भिंती आंत भकास दिसतात. आणि पेयगृह कडीकपाटांत बंद करून ठेवल्यासारखें भासतें. आतां काळोख वाढलेला आहे. मॅग्नोलियाचे पक्षी चिपचाप

झालेले आहेत. कॉफीगृहांतली दरवळ वितळली आहे. रस्त्यांतली वर्दळ विरत चालली आहे. आतां ती फुलवाली दिसत नाहीं. ज्योतिष्याचा कंदील प्रकाशत नाहीं. पाय ओढीत चाललेला त्या कलावंताची मुरली वाजत नाहीं. आपलें बिऱ्हाड गुंडाळून चाललेल्या चित्रकारापुढें कसलीहि आकृति आकारत नाहीं. गिंझाच्या साऱ्या शक्ति आतां मंदावल्या आहेत. सारें चैतन्य आतां मालवलें आहे. सारा उल्लास आतां कोळपला आहे. आतां प्रत्येकाच्या डोळ्यांपुढें आपलें खाजगी खुराडें आहे, किंवा स्वतंत्र चाळे आहेत. ती अलाउद्दिनाच्या गुहेंतली अरब-कन्या पाहा—आतां तिच्या अंगावर नेहमींचा पोषाख आहे—तिचा कोमल हात एका अमेरिकन सोजिराच्या राठ हातांत आहे, आणि त्याच्याशीं नुकतीच झालेली दोस्ती व्यवस्थित वठविण्याची इच्छा तिच्या चेहऱ्यांवर दिसते आहे. आणि ही ? ही आपली 'ममासान'—तिचा किमोनो कायम आहे, पण तिच्या हातांतली व्यापारी बॅग किमोनोच्या संस्कृतीची जणूं चेष्टाच करीत आहे. आणि ही ?—कौंटरवरच्या फुलदाणींतलीं फुलें आपल्या बोटांच्या चैतन्यानें तजेल करणाऱ्या या मुलीची चाल कशी मरगळलेली आहे पाहा. आणि हा कोण ?—पेयगृहांत पाहिला होता. एका किमोनो-कन्येकडे नोटांचीं पुडकीं फेकीत होता. आणि आतां ?—झुकांड्या जात आहेत आणि झिंगलेले हात खिशांतून फुटकळ नाणीं काढून परतीच्या तिकिटासाठीं तीं पुरतील किंवा नाहीं याचा अंदाज घेत आहे. आणि ही ? ही ती पेयगृहांतली आपली सखी ! पण तिच्या-पाशी हें कोण ?—मूल ! तिचेंच मूल ! कोठें होतें तें इतका वेळ ? आपल्याला वाटलें होतें ही अविवाहित, हातांत रोमान्सचा पंखा घेऊन प्रणयाच्या गालिच्या-वर परीचीं पावलें टाकणारीं किमोनो-कन्या ! पण ही तर चक्क आई—चारदोन काटक्यांच्या घरट्यांत आपल्या पिलाला झोंपविण्यासाठीं चालली आहे !

संपलें—गिंझाच्या रंगभूमीवरचें या साऱ्यांचें आजचें काम संपलें ! आतां तीं सारीं आपापल्या खाजगी जगांत जातील—आणि उद्यां संध्याकाळीं आजचेच मुखवटे चढवून परत येतील !


संक्षिप्त गेशा



जपानला मी दोनदां गेलों, पण एकाहि मुक्कामांत गेशांच्या कार्यक्रमाचा अनुभव घेतला नाहीं. या माझ्या म्हणण्यावर तुमचा विश्वास बसणार नाहीं हें मला माहीत आहे, पण ही साधी वस्तुस्थिति आहे. अर्थात् ही विचित्रपणाची कमाल आहे. कारण गेशांना जपानबाहेर अक्षरशः तोड नाहीं. जपानची गेशा म्हणजे खरोखर इहलोकींची अप्सरा. ही देवांचें मनोविनोदन न करतां मानवांचें (पुरुषांचें) मनोविनोदन करते, एवढाच फरक. पण तिच्या संगतींत पुरुष स्वतःला देवच समजतात—आणि यांत त्यांचा फारसा दोष नाहीं. गेशांचा तो गुणच आहे.

तुमची करमणूक करणें हेंच् गेशांचें मुख्य कार्य. तिचें कौशल्य अनेक प्रकारांनीं व्यक्त होतें. ती तुम्हाला गोष्टी सांगते, तुमच्याशीं विनोद करते, तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळते, तुम्हाला खाऊं पिऊं घालते, नाचून दाखविते, गाऊन दाखविते आणि सामीसेनच्या स्वरांनीं सारें वातावरण करुणरम्य करून सोडते. विशेष म्हणजे हें सारें करतांना तुमच्या मनांत रोमांचाचे मळे फुलविते, अंतःकरणांत काव्याचे बगीचे बहरते आणि सभोंवतालच्या गद्य वातावरणांत आनंदाचें अमृत ओतते. हें ती अशा कांहीं जादुगिरीनें करते कीं तुम्हाला वाटतें तुमची एक जिवाभावाची मैत्रीणच तुम्हाला भेटली! किंवा एक नवीन रसरंग व्यक्ति तुमच्या जीवनांत शिरली! खरोखर गेशांचें व्यक्तित्व म्हणजे निसर्गाची एक खेळकर लकेर! तिचा कटाक्ष म्हणजे निळ्याभोर आकाशाची एक कडा. आणि तिचा बोल म्हणजे दयाळ पक्षाच्या गायनाचा एक तुकडा! आपल्या चित्ररम्य किमोनोची बाही फडफडावीत, आपल्या लालचुटुक झोरीची कडा उडवीत, आणि आपल्या शुभ्रसतेज हास्याची शोभा उधळीत ती आली कीं वाटतें, ही एखादी रंगदेवताच अवतरली—दूर रंगभूमीवर नव्हे तर अगदीं आपल्या आसपास!

गेशांचें असें गहिरें वर्णन मी वाचलेलें असतें. गेशा, चेरी आणि फुजी ही जपानची वैशिष्ट्यशाली त्रिपुटी. चेरीच्या हंगामांत मी गेलोंच नाहीं. फुजीच्या शिखरावरचा ढगाचा पडदा कधीं दूर झालाच नाहीं. पण गेशांच्या पार्टींत

सामील व्हायला निसर्गाची अशी कोणती अडचण नव्हती. तरी तशी संधीच मी शोधली नाहीं. कारण मला माहीत होतें कीं, गेशांची खरीखुरी गंमत अनुभवायची असेल तर जपानी भाषा यायला हवी. दुभाष्यामार्फत अनेक गोष्टी जमतात. जपानांत अशा अनेक गोष्टी जमवून घेतच होतों. पण दुभाष्याला अंतःकरणाची देवघेव जमत नाहीं—आणि कांहीं ठराविक काळ कां होईना, आणि ठराविक पातळीवरून कां होईना, पण एक प्रकारची अंतःकरणाची देवघेवच गेशा करीत असते. मला जपानी भाषा येत नव्हती, म्हणून मी गेशांशीं गप्पागोष्टी करूं शकत नव्हतों, विनोद करूं शकत नव्हतों, खेळ खेळूं शकत नव्हतों. अर्थात् नृत्य पाहूं शकत होतों, गाणें ऐकूं शकत होतों, सामीसेनच्या स्वरांनीं कान भरून घेऊं शकत होतों—पण मनोमनीचें नातें निर्माण झाल्याखेरीज त्यांत रस निर्माण होऊं शकत नव्हता, जिव्हाळा निर्माण होऊं शकत नव्हता. गेशांच्या कार्यक्रमांत नृत्याचें महत्त्व नृत्य म्हणून नसतें आणि गायनाचें संगीत म्हणून नसतें !

पण मी गेशा-पार्टीला जाण्यासाठीं जीव न पाखडण्याचें खरेंखुरें कारण निराळेंच होतें – आणि तें म्हणजे टोकियोच्या एका आरामगृहांत गेशाची एक संक्षिप्त आवृत्ति मला भेटली होती आणि तिनें दिला तेवढा अनुभव मला पुरे होता.

टोकियोच्या सुमिदा नदीच्या कांठीं अशीं अनेक उपहारगृहें किंवा आरामगृहें आहेत कीं नुसत्या चहापानासाठीं तुम्ही गेलांत तरी अंतःकरणांत रसिकतेची वसंतपंचमी साजरी करून बाहेर पडाल. आधीं मुळीं या आरामगृहांचें अभिजात जपानी वास्तुशिल्पच तुमचें चित्त वेधून घेतें, आणि टोकियोमधल्या लाकडी खोक्यासारख्या घरांच्या भुस्कट वास्तुशिल्पानें शिणलेली तुमची दृष्टि ताजीतवानी होते. तुम्हाला नकळतच ती या इमारतींच्या वक्र लयदार छपरांवरून फिरूं लागते. पण हें झालें नुसतें बाह्य आकर्षण. आवाराचें द्वार ओलांडल्याबरोबर तुमचें पाऊल पडतें तें एका शांतप्रसन्न बागेंत. तेथून तुम्ही इमारतींत प्रवेश केला न् केलात तोंच तुम्ही एका किमोनोकन्येच्या ताब्यांत जातां. तेथें ती तुमचा जो कबजा घेते तो ती तुम्हाला परत प्रवेशद्वारापाशीं आणून तिनें (तुम्हाला नकळत पण तुमच्याच पैशानें) बोलावलेल्या टॅक्सींत सोडीपर्यंत. तोंपर्यंत ती तुमच्या-भोंवतीं एखाद्या फुलपांखरासारखी नाचत राहते. तुमच्या सिग्रेटच्या धुराच्या

बलयासारखी तुमच्या वातावरणांत विलीन होते. तुमच्या पेयाच्या सोनेरी धारेची झळाळी तुमच्याभोंवतीं निर्माण करते. आणि तुमच्या चित्तांत आनंदाच्या अमृतलहरी आणून सोडते. तुमचें या आरामगृहांतलें वास्तव्य तिच्या आतिथ्यानें भारलेलें असतें. तिच्या बोलांनीं तें बोलकें बनतें. तिच्या हालचालींनीं वेडावून जातें. आणि तिच्या तालावर नाचत असतें. येथल्या पेयाला तिच्या स्पर्शाची रुचि असते. येथल्या गप्पांना तिच्या बोलांनीं कलाटणी मिळते. आणि येथल्या करमणुकीला तिच्या कल्पनांनीं स्फुरण चढतें. तुमच्या येथल्या अस्तित्वाची ती राणी असते--तिच्यामुळेंच तुम्ही येथें येतां, येथें बसतां, येथें रेंगाळतां आणि येथल्या प्रत्येक क्षणागणिक तुम्ही पैसा मोजीत असतां हें अतिशय सुखासमाधानानें विसरतां !

* * *

त्या दिवशीं संध्याकाळीं फुकुझावा आणि यामाकिटा हे माझे दोन मित्र अशा एखाद्या आरामगृहांत जाण्याची कल्पना काढतात आणि मी पूर्वीचा कांहींहि अनुभव नसून देखील भारावून जातों.

त्या आरामगृहांच्या आवाराचें फाटक जरासें उघडतें आणि शांततुष्ट प्रसन्नतेचेंच दर्शन झाल्यासारखें वाटतें. आम्ही आंत जातों नि टोकियोचें कर्कश धुळकट जग बाहेर राहातें. आमचा प्रवेश एका बगिच्यांत होतो. बगिचा कसला तो? एक तळें! तळ्याचें पाणी इकडे तिकडे पसरलेलें असतें, वाहात असतें, अनेक रीतींनीं आणि आकारांनीं आपलें अस्तित्व जाणवत असतें. त्या पाण्याची सोय पाहूनच बागेंतलीं झाडेंझुडप वाढलेलीं असतात. बागेंत समोरच एका (कृत्रिम) खडकाच्या खबदाडींतून पाण्याचा झोत पडतांना दिसतो. हा शेजारच्या सुमिदा नदींतूनच आणलेला असेल, पण नदीच्या पाण्यापेक्षां याचें दर्शन किती निराळें! जणूं सारी स्वच्छता, निर्मळपणा, आणि स्वच्छंद घेऊन तो आतांच आकाशांतून उतरला आहे! आणि पृथ्वीवरील पराक्रमाच्या कल्पनेनें सळाळून गेला आहे! या झोताचेंच पाणी पसरतें आणि तळें निर्माण करतें. या तळ्याच्या मधोमध एक झाड आहे. त्याच्या पिसाट फांद्या तळ्यावर पसरल्या आहेत. त्याचा बुंधा त्याच्या प्राचीनपणाची आणि त्याच्या बेफाम वाढीची ग्वाही देत आहे. त्याच्या खोडाला इतक्या गांठी, इतकीं पोक आणि इतकीं खबदाडें आहेत कीं जपानचीं बेटें समुद्रांतून वर येण्याच्या वेळीं उसळलेल्या

प्रलयांत गटांगळ्या खाणारा एखादा प्राणी येथें येऊन अडकला आणि पृथ्वीवर अस्तित्व मिळविण्यासाठीं या झाडाच्या रूपानें वाढला असें वाटावें !

त्या तळ्याच्या पाण्यांत चित्रविचित्र आकारांचे आणि मातीच्या व शेवाळाच्या रंगांचे दगड निरनिराळे काटकोन साधून टाकलेले असतात आणि त्यांच्यावरून उड्या मारीत आम्ही वेलींनीं वेढलेल्या एका दरवाजांत जातो आणि आरामगृहांत प्रवेश करतों. दरवाज्याच्या आंत ओसरींतच पादत्राणांच्या रांगा दिसतात आणि जपानी घरांत शिरण्याच्या प्राथमिक उपचाराची आठवण होते. पायांतलीं पादत्राणें काढण्यासाठीं बुटाच्या लेसांना हात लावतों न लावतों तोंच तीन किमोनो-कन्या झोरीच्या चवड्यावर तुरतुरत येतात, आणि आमचे बूट काढूं लागतात. माझे बूट दुसऱ्या कोणी काढावे हें मला आवडत नाहीं. माझ्या बुटाची लेस पकडूं पाहणारा हात मी दूर करतों, आणि एका नाजूक स्पर्शाची जाणीव माझ्या हातावर उमटते. बूट पायांतून निघाल्याबरोबर कलात्मक वेलबुट्टीच्या सुंदर सपाता आमच्या पायांत चढतात. हा विधि सुरू असतांना आमची नजर इकडे तिकडे भिरभिरते आणि गॅलरींत प्रत्येक खोलीच्या समोर आतिथ्याच्या आणि प्रसाधनाच्या किमोनोधारी प्रतिमा दृष्टीस पडतात. त्यांच्या डोक्यावर केशकलापाचे रचनाबद्ध मुकुट नसतात, कर्तनकलेचे आधुनिक संस्कार मिरविणारे त्यांचे केस रुळत, भुरभुरत असतात–आणि या गेशा नव्हत याची जाणीव होते. क्षणार्धांत त्या साऱ्यांच्या काळ्याभोर नजरा आमच्याकडे वळतात आणि क्षणभर पापण्या फडफडावून पुन्हा जमिनीचा वेध घेत स्थिरावतात ! जपानी सौंदर्याच्या या सरमिसळ रांगेची अधिक दखल घेण्यास फुरसत नसते. आमच्यासमोर सपाता सरसावणाऱ्या मुलींतली एक ‘ डोझो ’ ‘ डोझो ’ करीत आम्हाला एका खोलींत घेऊन जाते.

आम्ही खोलींत शिरतों नि पाहतों तों खोली अगदीं मोकळी, निर्लेप. तेथें फर्निचरचें नांव नाहीं. स्वच्छ ततामी (चटई) तकाकते आणि खोलीचा रिकामेपणा अधिकच जाणवतो. जपानी घराच्या खोल्या अशाच असतात असें मीं ऐकलें होतें, पण असल्या उपाहारगृहांत फर्निचरची व्यवस्था असेल असें वाटलें होते. मी थोडा आश्चर्यानें पाहातों तोंच त्या दुसऱ्या दोन मुली घाईघाईनें येतात नि भिंतींत लपलेलीं कपाटें उघडून त्यांतून तीन चौरंग आणि सहा गिरद्या बाहेर काढतात. लगेच ते चौरंग मांडतात आणि दरेक चौरंगाभोंवतीं दोन दोन गिरद्या टाकतात.

त्यांचें चौरंग मांडणें, गिरद्या टाकणें चालू असतें तों आम्हाला घेऊन येणारी मुलगी फुकुझावांना कांहीं तरी विचारते. त्याबरोबर एकदम हंशा पिकतो. आम्हाला घेऊन येणारी मुलगी तर त्या हंशांत फारच जोरानें सामील होते. कां नकळे, मला वाटतें, ते मलाच हंसत आहेत; चौरंगाभोंवतीं मला गुडघे टेकून अगर मांडी घालून बसतां येईल कीं नाहीं याची त्यांना शंका वाटत आहे; पाश्चात्य पाहुण्यांची असें बसतांना जी धांदल उडते ती त्यांच्या डोळ्यांसमोर उभी राहिली आहे; आणि मी त्यांच्यांतलाच अशी त्यांची समजूत झाली आहे. त्यांची गैरसमजूत होत आहे, त्यांना भारतीयांची माहिती नाहीं, हें मला समजत असतें. त्यांचा भ्रमनिरास करून त्यांना लगेच चकित करतां येईल हेंहि मला माहीत असतें. पण हा हंशा माझ्यामुळें पिकला हीच गोष्ट मला लागते. आणि मी तसाच हिरमुसल्या चेहऱ्यानें उभा राहातो. त्यांतली एक मुलगी एका गिरदीकडे बोट दाखविते नि मला म्हणते ' दोझो ', तरी मी उभाच राहातों. फुकुझावा आणि यामाकिटा गिरद्यांवर बसून चौरंगावरच्या ओल्या टॉवेलनें आपले चेहरे साफसूफ स्वच्छ करूं लागले असतात. तरी मी उभाच. आतां पिकलेल्या हंशांत, मला ' दोझो ' म्हणणाऱ्या मुलीनें बेताचाच भाग घेतलेला होता हें जाणवलेलें असूनहि मी उभाच. तेव्हां ही मुलगी हळूंच माझ्या हाताला स्पर्श करते नि म्हणते ' दोझो '. आतां तिच्या आवाजांत अशी कांहीं नाजुक किणकिण जाणवते, आणि तिच्या त्या स्पर्शांत असा कांहीं आपले-पणा भासतो कीं माझा हिरमुसलेपणा कोठच्या कोठें पळतो. मी मनमोकळें हंसतों नि गिरदीवर बसतों—आणि मला मांडी घालून झकास बसतां येतें हें दाखविण्यासाठीं ऐटीनें मांडी मोडतों आणि बदलतों. तिच्या तें ध्यानांत येतें आणि ती हंसते—बेताचें हंसते—इतकें बेताचें कीं सुरंगीच्या कळीची एक पाकळी उमलली असें वाटतें. हंसते नि सिग्रेटच्या पेटींतली एक सिग्रेट काढून मला द्यायला लागते. मी ओल्या टॉवेलनें तोंड पुसतां पुसतां, नको म्हणतों. त्याबरोबर तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटतें आणि त्यांत एक निराशेची रेषा तरळते. मी सिग्रेट ओढत नाहीं ही माझ्यांत कांहीं तरी उणीवच आहे असें तिला वाटत आहे, असें मला वाटतें, आणि आंत कांहीं तरी खुपतें. माझे मित्र सिग्रेट शिलगावून धूर सोडीत असतात आणि एक प्रकारच्या बेफिकीर नजरेनें धुराच्या वलयांचा वेध घेत असतात आणि मी मात्र इकडे चौरंगावरची काड्याची पेटी निरखीत असतों. पेटीच्या लेबलावर एका मोहरलेल्या फांदीचें नाजुक नक्षीदार चित्र असतें, आणि मला एकदम कोरिनच्या ' प्लम ब्लॉसम ' या विख्यात

चित्राचें स्मरण होतें. त्याबद्दल तिला कांहीं तरी विचारावेंसें वाटतें, पण भाषेच्या अडचणीमुळें विचारतां येत नाहीं. मित्रांच्या साहाय्यानें विचारतां आलें असतें, पण आतां तिच्याशीं बोलतांना मित्रांची मध्यस्थी नको असें वाटतें. तिच्याशीं आतां नुसतें निःशब्द संभाषण, असें मी ठरवितों आणि तिच्याकडे पाहून नुसताच हंसतों. इतक्यांत जाणवतें कीं तिचें नांव आपल्याला माहीत नाहीं, आणि मुलीचें नांव माहीत नसणें म्हणजे कोणत्या फुलाचा अमका गंध हें ध्यानांत न येणें. माझा निःशब्द संभाषणाचा बेत मोडतो नि मी तिला इंग्रजींत विचारतों, तुझें नांव काय. तिला तें कांहींच कळत नाहीं नि ती गोंधळून हंसते, व फुकुझावांकडे पाहाते. फुकुझावा माझा प्रश्न तिला जपानींत सांगतात आणि तिच्या जपानी उत्तराचें भाषांतर मला सांगतात—'प्लम ब्लॉसम.' मी पेटीवरच्या चित्रावर बोट ठेवतों आणि खुणेनेंच विचारतों, 'खरोखर ?' ती गोड हंसते नि खुणेनेंच सांगते, होय. मला आश्चर्य वाटतें. खरेंच, हिचें नांव प्लम ब्लॉसम ? कीं ही माझी नुसती गंमत ? पण लगेच वाटतें, करीना कां ती गंमत ? गंमत असली तरी किती गोड आहे ही गंमत ? —हें नांव किती छान आहे ? — कांहीं कां असेना तिचें खरें नांव ?–या वेळेपुरतें तिचें नांव प्लम ब्लॉसमच ! मी तिला हळूंच हांक मारतों, 'प्लम ब्लॉसम.' त्याबरोबर तिचा चेहरा उमलतो—अगदी कोरीनच्या त्या मोहरलेल्या फांदीवरच्या एखाद्या फुलासारखा ! गुलाबी चेहरा, काळेशार डोळे, फडफडत्या पापण्या, लालचुटुक ओठ आणि पांढरें शुभ्र हास्य —वाटतें, कोरीनच्या चित्राचा जीवंतपणा या असल्या चेहऱ्यांत आपलें प्रतिबिंब उमटविण्याच्या शक्तींत आहे !

इतक्यांत आम्हांला खोलींत घेऊन येणारी मुलगी—तिच्या किमोनोवर बांबूच्या कोवळ्या पानांचीं चित्रें असतात; मी तिचें नांव ठेवतों चिवार !— ती मुलगी येते. तिच्या हातांत साकेच्या तीन बाटल्या नि तीन पेले असतात. ती एकेका चौरंगावर एकेक बाटली नि एकेक पेला ठेवते. फुकुझावा तिला कांहीं तरी सांगतात नी ती साकेची बाटली–पेला घेऊन जाते नि लगेच बिअरची बाटली व ग्लास घेऊन येते. फुकुझावांना साकेपानाचा नाजुक नखरा पसंत नसतो. पेय कसें तोंडभर घ्यावें नि पोटभर प्यावें• अशी त्यांची थिअरी असते आणि त्यांचें शरीरहि या थिअरीला पोषक असें स्थूल बुटकें असतें. पण

यामाकाटांची साकेभक्ति अस्सल असते. रसिक असते. साकेचा एकेक थेंब जिभेवर विरघळवीत, त्याच्या कणांनीं शरीरांतलें चैतन्य हळुहळू फुलवीत, नजरेवर सोनेरी स्वप्नांचीं फुलपांखरें नाचवीत आणि अखेरीस मस्तकांत उसळलेल्या लाटांवर कल्पनांच्या लहान लहान होड्या डोलवीत बाटलींतला शेवटचा थेंब पेल्यांत ओतण्यांत साकेपानाच्या कलेचा विकास आहे—आणि या कलेच्या आस्वादांत शेजारच्या मुलीस सामील करून घेण्यांत साकेपानाचें सार्थक आहे—हें तें जाणतात. मुलीनें भरलेला छोटा पेला ते दोनहि हातांनीं हलका फुलका उचलतात, क्षणभर तसाच तो हातांनीं धरून आपली आर्त नजर त्या मुलीच्या कोवळ्या नजरेवर रोखतात; मग नजरेवर एक हंसू खेळवितात आणि पेला ओठाला लावतात, साकेचा एक थेंब चाखतात आणि तो पेला तसाच मुलीपुढें धरतात. ती खुदकन् हंसते, गोड हंसते, आणि हलक्या हातानें तो पेला त्यांच्याकडे लोटते. लोटते नि त्यांना कांहीं तरी म्हणते. तेव्हां ते आपली सारी नजर त्या पेल्यावर लावतात, दोनचार क्षण तसेच पाहात राहतात. आणि मग पेला तोंडाला लावून एका घोटांत् रिकामा करतात. रिकामा करतात नि तसाच पुनः भरतात—आणि तिला देतात. आतां ती तो स्वीकारते, नाजुक हातानें तोंडाकडे नेते आणि अतिशय आकर्षक पद्धतीनें पिऊन टाकते. पिते, भरते नि परत त्यांना देते—आणि त्यांचें कणाकणानें पिणें पुन्हा सुरू होतें.

इतका वेळ मी नुसता पाहातच असतों. प्लम ब्लॉसमनें पेला भरलेला असतो. मी तो दोनहि हातांनीं धरलेला असतो. पण तो तोंडाकडे मात्र नेत नाहीं. तो पेला माझें चित्त खेंचीत असतो. त्याचा एकेक थेंब तोंडांत विरघळला म्हणजे देहांतलें चैतन्य कसें शहारतें, कसें मोहरतें याची कल्पना तो चेतवीत असतो. पण मादक द्रव्यें माझें चैतन्य मोहरवीत नाहींत, हरपवितात हा अनुभव मला साशंक करतो. हा पेला घेतला तर त्याचे परिणाम काय होतील याची शंका मनांत रेघोट्या ओढते, आणि मी तो पेला तसाच थिजल्यासारखा हातांत धरून राहतों. साकेभक्त यामाकाटांना हें पाहवत नाहीं. ते मला पिण्याचा आग्रह करतात आणि मी चेहरा आंबट करून हंसतों. तेव्हां ते प्लम ब्लॉसमला कांहीं तरी सांगतात आणि ती माझ्या हातांतला पेला अलगद काढून घेऊन माझ्या तोंडाकडे नेऊं लागते. मी चपळाई करून तो पकडतों आणि तोंडाला लावून रिकामा करतों. पुढें काय करायचें मला माहीत असतें.

आतांच यामाकाटांकडून तें शिकलेलें असतें. मी तो पेला भरतों आणि प्लम ब्लॉसमपुढें करतों. पण ती तो घेत नाहीं. कांहीं तरी बोलते. मला अर्थात् तें समजत नाहीं. मी यामाकाटांकडे पाहातों. तेव्हां ते म्हणतात, तिचें असें म्हणणें आहे कीं आपण हा पेला घेतला तर तो भरून उलट तुला द्यावा लागेल, पण त्याला तर तुझी तयारी दिसत नाहीं, म्हणून ती गोंधळली आहे. त्यावर मी म्हणतों, खरेंच मला आणखी एक पेला घेणें मुळींच शक्य नाहीं. त्यावर ती म्हणते (आणि ती म्हणते तें यामाकाटा मला सांगतात), "आपण पुन्हाः घेणार नसाल तर आपल्या हातची साके पिण्याच्या भाग्यास मला मुकावें लागेल." ती असें म्हणते नि माझ्याकडे गंभीर नजरेनें पाहाते. त्यांत एक निराशेची छटा भासते. पारिजातकाच्या पाकळीवरचा हा ओरखडा मला सहन होत नाहीं. मी लगेच तो भरलेला पेला तिच्यापुढें धरतों—आणि माझी नजर काय म्हणायचें तें म्हणते. लगेच ती हंसते, मोकळें हंसते नि पेला रिकामा करते. लगेच पेला पुनः भरतो नि नाजुक हातांनीं माझ्यापुढें येतो. मी तो घेतों आणि तोंडाला लावतों. पितांपितां माझी नजर अभावितपणें मिटते—मिटलेल्या नजरेवर कसले भाव नाचतात नकळे, पण ती मिस्किल हंसते आणि मी तिच्या हंसण्याची परत-फेड करतों.

जरा वेळानें खाण्याचे पदार्थ येऊं लागतात. ते येत आहेत तोंच चिवार स्पिरीटचा स्टोव्ह घेऊन येते आणि तो पेटवते. इतक्यांत दुसरी एक मुलगी एक परडी घेऊन येते. परडींत मांस, नाना प्रकारच्या भाज्या आणि साकेची बाटली असते. लगेच एक परात स्टोव्हवर चढते आणि परातींत परडींतले जिन्नस शिजूं लागतात. मी यामाकाटांना हें काय म्हणून विचारतों. यामाकाटा सांगतात, ही सुकियाकी, जपानच्या पाकशास्त्राची राणी, जपानी जिव्हेची अधिष्ठात्री. जिव्हेला कशी लागेल नकळे, पण ती शिजत असतांनाचें दर्शनच मला मजेदार वाटतें. तापलेल्या परातींत शिजतांनाचा ओल्या भाज्यांचा चुरचूर आवाज, आगीच्या धगीनें त्यांचे क्षणाक्षणाला बदलणारे रंग, आणि त्यांत साके ओतल्याबरोबर उसळणारा घमघमाट—माझ्या संवेदनांची चेतना माझी मलाच जाणवूं लागते. माझें लक्ष सुकियाकींत गुंतलेलें असतें तोंच सारे चौरंग खाद्यपदार्थांच्या बशांनीं व पेल्यांनीं भरून जातात. या पदार्थांचें आणि त्यांच्या बशांचे व पेल्यांचे रंग माझी दृष्टि वेधून टाकतात आणि मी त्या पदार्थांकडे भारल्यासारखा बघत राहातों. हे

खायचे पदार्थ आहेत, आपल्या जिव्हेला त्यांचें आवाहन आहे, आपल्या रुचिसामर्थ्याची त्यांच्यांत आराधना आहे ही गोष्ट मी विसरून जातों. प्रत्येक बशी, प्रत्येक पेला म्हणजे सौंदर्याचा नमुना असतो. प्रत्येक पेल्याचा रंग, आकार—पेल्यागणिक नवा, आणि पेल्यागणिक वेड लावणारा! प्रत्येक पेला म्हणजे जणुं काय एकेक प्रयोगच! या एकेक प्रयोगानें माझें चित्त भारून जातें. इतक्यांत फुकुझावा सांगतात कीं यांपैकीं प्रत्येक बशीला, प्रत्येक पेल्याला इतिहास आहे, परंपरा आहे, आणि हें उपाहारगृह या परंपरेला जिवापाड जपत असतें. पैशाची रास ओतली तरी या वस्तु विकायला तें तयार होणार नाहीं. मला एकदम तें तळ्यांतलें झाड आठवतें—वाटतें, तें झाड, या बशा, हे पेले, यांच्यामध्यें एक जिव्हाळ्याचें नातें आहे आणि या नात्याचा या उपाहारगृहाला अभिमान आहे.

सुकियाकी तयार होते—आणि आमच्या बशांत वाढली जाऊं लागते. तिची चव आमच्या जिभेवर वितळते आहे आणि तिचा स्वाद आमच्या वृत्तींत मिसळतो आहे तोंच प्लम ब्लॉसम माझ्या चौरंगावरची साकेची बाटली घेते नि स्टोव्हवरच्या सुकियाकींत ओतते—एकदम चुर्र आवाज येतो आणि घमघमाट पसरतो. प्लम ब्लॉसम त्या साकेनें भरलेला तेवढाच भाग काढते, आणि माझ्या बशींत टाकते—आणि एकदम खट्याळ हंसते. त्याबरोबर सारेजण हंसतात. आणि मग यामाकिटा म्हणतात कीं तुमच्या चौरंगावरची साके तुमच्या पोटांत गेलीच पाहिजे असा तुमच्या मैत्रिणीचा कटाक्ष आहे! तिच्या नजरेच्या कटाक्षाइतकाच हा कटाक्ष मला सुंदर वाटतो. माझ्या साकेची चव शोधीत मी सुकियाकी खाऊं लागतों.

खाणें संपलें—आतां काय? खरें म्हणजे प्लम ब्लॉसमशीं गप्पा मारायला हव्यात. ती हंसली म्हणजे तिचे काळेशार डोळे मासोळीसारखे उड्या मारतात हें तिला सांगायला हवें. ती चेष्टा करूं लागली म्हणजे तिचे लालचुटुक ओंठ अगदीं मंद थरथरतात त्याचें वर्णन तिजपाशीं करायला हवें. आणि ती गंभीर झाली म्हणजे तिला एकदम हंसूं लोटणार असें वाटतें तें तिला कळवायला हवें. पण मी यांतलें कांहींच करूं शकत नाहीं. माझे दोनहि मित्र आपापल्या मुलींशीं गप्पा मारण्यांत रमून गेलेले असतात. मला त्यांचा हेवा वाटतो. मी तिच्याकडे नुसता पाहतों नि हंसतों. पण असें किती पाहणार नि किती हंसणार? मी आपला खिडकींतून बाहेर नजर टाकतों. बाहेर सुमिदा नदीचें पात्र दुथडी भरून चाललेलें असतें. वाहत्या पाण्यावर सायंकाळच्या छाया नाचत असतात.

पाण्यावरचे तरंग मध्येंच काळवंडतात—अगदीं प्लम ब्लॉसमच्या डोळ्यांसारखे. तिला हें सांगायला हवें. पण कसें सांगणार ? मला जपानी येत नाहीं आणि मित्रांच्या मध्यस्थीनें सांगावें असें वाटत नाहीं. मी आपला पुन्हा बाहेर पाहूं लागतों.

तों सामीसेनचा सूर ऐकूं येतो. मी चमकून पाहातों. तों खोलीच्या कोपऱ्यांत एक किमोनो-सुंदरी हातांत पंखा घेऊन उत्सुक मुद्रेनें उभी असते आणि एक साधारण वयस्क बाई सामीसेनच्या तारा छेडीत असते. म्हणजे आतां नृत्याचा कार्यक्रम—छान !

नृत्य सुरू होतें. नृत्य म्हणजे नृत्य नव्हेच ! नाचणाऱ्या मुलीचे पाय गुडघ्यांत लवतात आणि तिची टाबीनें वेष्टिलेलीं पावलें लयदार मुरडतात. यापलीकडे नृत्य असें दिसतच नाहीं. पण तिच्या हातांत घडीचा रंगीन पंखा असतो. तो उघडतो. मिटतो. फिरतो. निरनिराळे आकार धारण करतो. कोन काटकोन करतो. आडवाउभा होतो—आणि त्याच्या गतीबरोबर, फिरकीबरोबर, वक्र वळणाबरोबर नर्तिकेची नजर फिरते, नाचते, ओथंबते. आपल्या भारतीय नृत्यांत मुद्रांना अर्थ असतो तसाच या पंख्याच्या हालचालींना असतो हें लगेच ध्यानांत येतें. पण हा अर्थ मला समजणार कसा ? मला तो सांगणार कोण ? मित्रांनीं सांगितला असता–पण मला तो प्लम ब्लॉसमकडून हवा असतो, आणि ती तर सांगूं शकत नाहीं. कांहीं वेळ मी नृत्य तसेंच निर्बोध नजरेनें पाहातों. पण मग राहवत नाहीं, आणि तिला विचारतों. इंग्रजींतच विचारतों, पण तिला कळतें. ती लगेच उठते. तुरतुर पावलें टाकीत जाते आणि कागदपेन्सिल घेऊन तशीच चवड्यावर उडत पावलें टाकीत येते. नर्तिका नाचत असते. तिचे पंख्याचे हात सुरू असतात. ती पंखा पूर्ण उघडते आणि पाठीमागें नेऊन हळुहळू वर आणते. त्याबरोबर प्लम ब्लॉसमची पेन्सिल कागदावर रेखाटूं लागते —आणि उगवत्या चंद्राची आकृति उमटते. नर्तिका दोन रंगीत पंखे घेऊन पक्ष्याच्या पंखासारखे हलविते आणि प्लम ब्लॉसमच्या कागदावर उडणाऱ्या पक्षाचें चित्र निघतें. नर्तिकेचा पंखा डोक्यावर जातो आणि हवेंत तरंगल्यासारखा हळुवार फिरतो. त्याबरोबर आकाशांत संचरणाऱ्या ढगाची आकृति तयार होते. प्लम ब्लॉसमच्या चित्रकलेंतला वेग आश्चर्यकारक असतो. इतक्यांत स्वच्छशुभ्र पंखा हलक्याफुलक्या हालचालीनें वरुन खालीं येतो. त्याबरोबर प्लम ब्लॉसम

पेन्सिल टाकते, हातांतल्या कागदाचे बारीक बारीक तुकडे करते आणि ते वर धरून अलगद सोडून देते—आणि मला समजतें कीं हा हिमवर्षाव! पण आतां— ? नर्तिकेच्या आडव्या हाल्त्या हातावर दोन पंखे जुळून राहिले आहेत. हें हलणाऱ्या फांदीवर पक्षाचें डोलणें एवढें कळण्याइतकी माझी प्रगति झाली आहे. पण प्लम ब्लॉसम याचें चित्र कसें काढणार याचेंच आतां मला कुतूहल आहे. ती घोटाळते. हंसते. पण तिचा चेहरा गोरामोरा होतो. मी लगेच चौरंगावरची पेटी उचलतो, तिच्या हातांतली पेन्सिल घेऊन, पेटीवरच्या मोहरलेल्या फांदीवर पक्ष्याचें चित्र काढतों आणि पेटी हातांत घेऊन ती खालींवर हालवतो. तिला तें पटतें. ती कौतुकानें हंसते. पण लगेच तिचा चेहरा गंभीर होतो. हिरमुसला होतो. आपल्याला या नृत्याचें रेखाटन जमलें नाहीं याची ही खंत आहे हें मी ओळखतों. मी पेन्सिल तिला देण्याच्या मिषानें तिचा हात हळूंच दाबतो. तिला त्याचा आश्वासक अर्थ समजतो. तिची कळी खुलते.

नृत्य संपतें. सामीसेनचे सूर थांबतात. नर्तिका निघून जाते. पाठोपाठ सामीसेन जातें. आतां माझे मित्रहि निघण्याची तयारी करतात. इतक्यांत फुकुझावांना फोटो काढण्याची लहर येते. ते क्यामेरा सरसावतात. फ्लॅश बल्ब बसवतात आणि अँगल् घेण्याच्या उद्योगास लागतात. फोटोची ही कल्पना सर्वांनाच पसंत पडते. सर्वांचे चेहरे खुलतात. मुली झटकन् किमोनोंच्या सुरकुत्या साफ करतात. फुकुझावांचा क्यामेरा भराभर चालतो. प्लॅश लाइटचे बल्ब लगोलग पेटतात नि बदलतात. सर्वांचे सर्व तऱ्हेचे फोटो निघतात. एकत्र निघतात, वेगवेगळे निघतात. गंभीर निघतात, हंसत खेळत निघतात. इतक्यांत फुकुझावांना एक कल्पना सुचते आणि ते प्लम ब्लॉसमला कायसेंसें म्हणतात. त्याबरोबर यामाकाटा हंसतात, त्यांची मुलगीहि हंसते. पण प्लम ब्लॉसम विलक्षण लाजते, संकोचते, मानेनें नाहीं म्हणते, आणि ततामीवर नजर रोखून थिजल्यासारखी बसते.

मला कांहींच कळत नाहीं. हें काय चाललें आहे ? हे हंसतात कां ? ही संकोचते कां ? मी यामाकाटांकडे पाहातों, ते म्हणतात. फुकुझावा तुझ्या मैत्रिणीला तुला अगदीं खेटून बसायला सांगतात—त्यांना तसा फोटो घ्यायचा आहे, पण तिला तें मान्य नाहीं, ती नकार देत आहे.

माझ्या मनांत आनंद आणि निराशा यांच्या छटा एकदम एकमेकांवर उमटतात. तिला शेजारी घेऊन फोटो काढण्याची कल्पना किती गोड ! दोन

तासांत प्लम ब्लॉसमनें मला आपलेंसें करून घेतलेलें असतें. आम्हां दोघांत एक जिव्हाळ्याचें नातें निर्माण झाले असतें. तिच्या माझ्या स्नेहाच्या तरल अदृश्य धाग्याला फोटोचें मूर्तरूप देण्याची कल्पना मला फार आवडते. हें नातें निर्माण झालें खरें, पण आतां दहा पांच मिनिटांतच तें निमेल, प्लम ब्लॉसम मला पुनः भेटेल असा मुळींच संभव नाहीं—फुकुझावा या क्षणजीवी संबंधाला चिरस्थायी स्वरूप देण्याची ही युक्ति काढतात म्हणून मला फार आनंद होतो. पण होतो तोंच त्याच्यावर विरजण पडतें. प्लम ब्लॉसमला फुकुझावांची कल्पना मान्य नाहीं — माझ्या अंतःकरणांतला एक धागा तट्कन तुटतो.

हा असा फोटो काढण्याची कल्पना प्लम ब्लॉसमला कां पसंत नाहीं ? कारण स्पष्ट आहे. मला तिच्याबद्दल वाटतें तसें तिला माझ्याबद्दल वाटत नाहीं. तिच्या ठिकाणीं तो जिव्हाळा निर्माण झालेला नाहीं. स्नेहाचें तें स्पंदन तिला जाणवलेलें नाहीं. मला एकदम चरका बसतो. मी स्वतःशींच चूर होतों. विचार करूं लागतों. आपला असा तोल कसा सुटला ? तिच्या वागण्याचा अर्थ आपल्याला कळूं नये म्हणजे काय ? आपल्याला ही अशी एकच भेटली —पण तिला माझ्यासारखे रोज छपन्न भेटत असतील. छपन्न जणांचें आदरा-तिथ्य ती रोज करते. त्या सर्वांशीं तिनें असे स्नेहाचे नाजुक धागे जोडावे काय ? उपाहारगृहांत चहाच्या कपासाठीं अगर साकेच्या पेल्यासाठीं अगर ती भरून देणाऱ्या मुलीच्या स्नेहाळ हस्तस्पर्शासाठीं येणाऱ्या दरेक गिऱ्हाइकागणिक ती स्नेहाचे धागे स्वतःच्या अंतःकरणाभोंवती असे गुंडाळूं लागली तर लवकरच तिचें अंतःकरण श्रावणांत सुतें गुंडाळलेल्या पिंपळाच्या खोडासारखें होईल–!

माझें मीच समाधान करूं लागतों. प्लम ब्लॉसमला माझ्या स्नेहाची पर्वा नसली तरी ती माझा तिटकारा करीत नाहीं; माझ्या निकट फोटो काढून घेण्याची तिची तयारी नाहीं म्हणजे ती माझा तिरस्कार करते असें नाहीं, असें पटतें नि जरा बरें वाटतें. मन शांत होतें. पण लगेच तें पलटी खातें. विचारतें —पण मग ती अशी कां वागली ? इतका जिव्हाळा तिनें कां दर्शविला ? तिच्या हास्यांत इतका स्नेह कां ओसंडला ? तिच्या स्पर्शांत तिनें इतकी आपुलकी कां ओतली ? —म्हणजे, हा केवळ एक उपचार ! केवळ एक धंदेवाईक क्लृप्ति ? माझें मन एकदम धुमसूं लागतें. या दोन तासांतलें तिचें सारें वर्तन अंतरंगांत वर्दळूं लागतें. साकेच्या पेल्याला तिच्या ओठांचा नाजुक स्पर्श! पण

असे शंभर पेले रोज हिच्या ओंठांनीं कळकटत असतील! शंभर हातांना तिचा रोज जिव्हाळ्याचा स्पर्श होत असेल! गिऱ्हाइकाच्या हातांतल्या काडेपेटीवरील चित्रागणिक तिचें नांव बदलत असेल!

मन आतां निष्ठुर बनतें, दुष्ट बनतें, स्वतःच्या दुखावलेल्या अहंकारावर फुंकर घालण्यासाठीं विपरीतहि बनतें. म्हणतें, असें जर आहे तर मग असें फोटोला बसायला काय हरकत आहे? शंभर ओंठांनीं विटाळलेला साकेचा पेला चालतो तर शंभर शरीरांना चिकटून बसायला काय हरकत आहे? हा विचार मनांत येतो नि मन थोडें चरकतेंच — तूं काय शंभर गिऱ्हाइकांतलाच एक?

आतां मन अगदीं कोंडतें. एक प्रकारच्या बधीर दुःखानें भरून जातें. कांहीं बोलावेंसें वाटत नाहीं. कोणीच कांहीं बोलत नाहीं. साऱ्यांनाच विचित्र वाटतें. सारें वातावरण चमत्कारिक बनतें. ताणतें. एका उपाहारगृहाच्या क्षुल्लक मुलीनें आपल्या साध्या विनंतीला नकार द्यावा म्हणजे काय, या रोषाची छटा फुकुझावांच्या चेहऱ्यावर उमटते. उलट, गिऱ्हाइकाच्या तसें म्हटलें तर अगदीं साध्या अशा विनंतीला आपण मान देऊं शकत नाहीं म्हणून वाटणारी खिन्नता, आपल्या कर्तव्यांत कांहीं कसूर तर होत नाहीं ना अशी वाटणारी शंका, आणि आपल्या व्यक्तित्वाचा एक विलक्षण अभिमान या साऱ्यांच्या विलगमिश्र छटा प्लम ब्लॉसमच्या चेहऱ्यावर उमटतात. खोलींतलें वातावरण एक प्रकारच्या चमत्कारिक कुंदपणानें भरून जातें.

आणि मग यामाकाटांचें तोंड उघडतें, त्यांतून शब्द बाहेर पडतात आणि हें विचित्र वातावरण मोडतें. यामाकाटा मला सांगत असतात. असें गिऱ्हाइकाशीं खेटून बसून फोटोला बसणें हें या मुलींच्या वागणुकींत बसत नाहीं. या मुलींनीं गिऱ्हाइकांशीं कसें वागायचें अन् कसें वागायचें नाहीं याबद्दल कांहीं संकेत आहेत. या संकेतांत जें जें बसतें तें तें या मुली अगदीं जिव्हाळ्यानें पार पाडतील. तें पार पाडतांना त्यांत आपलें सारें अंतरंग ओततील. सर्वस्व वेंचतील. पण कांहीं झालें तरी या संकेतांच्या पलीकडे जाणार नाहींत. या तुझ्या मुलीला फुकुझावांच्या इच्छेला नकार देतांना अतिशय यातना होत आहेत. पण तिचा इलाज नाहीं. तुझा अपमान करण्याची लवमात्र बुद्धि त्यांत नाहीं.

यामाकाटांच्या खुलाशानें माझा जीव भांड्यांत पडतो. तिच्या वर्तनाची उमज पडते. प्लम ब्लॉसमनें जें स्नेहाचें वातावरण निर्माण केलें होतें हें ध्यानांत येतें

आणि विलक्षण आनंद वाटतो. तें संकेतांतल्या चवकटींतलें असेल, पण याला खोटेपणाचा स्पर्श नसतो ही जाणीव मन समाधानानें भरून टाकतें. आणि मी, ही फोटोची कल्पना सोडून द्या असें फुकुझावांना सांगण्याचा विचार करतों. मी त्यांना तसें सांगणार इतक्यांत 'चिवार' खोलींत प्रवेश करते, आणि खोलींतलें तंग वातावरण तिच्या लगेच ध्यानांत येतें. ती काय झालें म्हणून विचारते, आणि फुकुझावांनीं वस्तुस्थिति सांगितल्याबरोबर ती मोठ्यानें हंसते नि म्हणजे, "हात्तिच्या, ती बसत नसेल तर मी बसते". तिच्या या जपानी उद्गारांचा अर्थ माझ्या ध्यानांत येतो न येतो तोंच ती माझ्या शेजारीं येऊन बसते, मला घट्ट मिठी मारते आणि म्हणते, 'हं काढा—हवे तितके फोटो काढा.' तिच्या आविर्भावानें मी गार होतों. पण फुकुझावा लगेच क्यामेरा सरसावतात.

मी पार ओशाळतों—तिनें अशी चमत्कारिक मिठी मारली म्हणून, आणि अधिक म्हणजे ही मिठी खोटी होती म्हणून. या मिठींत जिव्हाळा नसतो, स्नेह नसतो, आपलेपणा नसतो. नुसताच शिष्टपणा असतो. संकेतांना आपण जुमानीत नाहीं असें दाखविण्याचा दिमाख असतो. हा दिमाखच मला बोंचतो. ही संकेतांना जुमानीत नाहीं—म्हणजे कांहींहि करण्याची हिची तयारी आहे. तिनें कित्येक गिऱ्हाइकांना अशा मिठ्या मारल्या असतील आणि त्या मिठ्यांना हवा तो अर्थ असेल. या जाणिवेनें मी अस्वस्थ होतों. फुकुझावांचें फोटो घेणें संपण्यापूर्वींच मी उठतों.

आम्ही निघतों. आमच्या तीनहि मुली आम्हांला पोंचवायला येतात. पण प्लम ब्लॉसम मागें मागें असते. मी टॅक्सीचा दरवाजा उघडतों तेव्हां चिवार आणि ती दुसरी मुलगी, दोघी आम्हाला मोठमोठ्यानें निरोप देतात—'आरिगातो, आरिगातो, आरिगातो गोझाय् मास्ता.' पण प्लम ब्लॉसमचा आवाज फारसा फुटत नाहीं. ती अजून मागेंमागेंच असते—पण आमची टॅक्सी निघते तेव्हां माझ्याकडे पाहाते, आणि त्या नजरेंत पाणी तरळतें.

ती नजर मला अद्याप दिसते आहे!

आसाकुसा



टोकियोच्या आसाकुसा कन्नोन मंदिराची कीर्ति मीं ऐकलेली होती. करुणेचा साक्षात् स्रोत असलेली आठ नऊ इंचांची इवलाली मूर्ति आणि त्या समोरचा हत्तीएवढा कंदिल—आणि तोहि आसाकुसाच्या गेशांनीं आपसांत वर्गणी करून उभारलेला, एवढा तपशील त्या मंदिराकडे ओढायला पुरेसा होता. पेन-परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेंत आसाकुसा-मंदिराला भेट समाविष्ट आहे हें पाहिलें तेव्हां खूष झालों, आणि वेळ आली तेव्हां आम्हा प्रतिनिधींना मंदिराकडे नेणाऱ्या बसमध्यें पटकन उडी मारली.


टोकियोच्या अनेक रस्त्यांत आणि अनेक वळणांत वेळ विसरलेली बस एकाएकीं थांबली आणि ' आलें आसाकुसा ' असा पुकारा झाला ! मी तर मधली पायरी सोडूनच रस्त्यावर उडी मारली—आणि आसाकुसाचें मंदिर आणि समोर टांगलेला तो हत्तीएवढा कंदील पाहण्यासाठीं नजर लावली. पण कसलें मंदिर नि कसलें काय ! समोर थाप गर्दी ! गर्दी म्हणजे अठरापगड गर्दी ! स्त्री, पुरुष, मुलें ! अठरा प्रकारचीं आणि अठरा तऱ्हांचीं ! लेदरचा जर्किन आणि भुंडी कौंटी कॅप घातलेले पुरुष तर गोणत्यासारखा अमेरिकन सॅक-स्टाइलचा झगा चढविलेल्या स्त्रिया, गेट्यांत रोवलेले सुरकतलेले पाय तर नायलॅानमध्यें तंग दिसणाऱ्या रेशमी पोठऱ्या, लालचुटुक झोऱ्या मिरविणाऱ्या मुली तर फाटक्या टेनिस-बुटांत पावलें लपविणारीं मुलें, दुर्बिणींत खुपसलेले डोळे तर क्यामेरे उडविणारे हात—पण मुख्य म्हणजे हा तपशील इकडून तिकडे फेकणारी गर्दी ! गर्दीची ही राळ कां हेंच ध्यानांत येईना. नजर सुन्न करून क्षणभर उभा राहिलों तोंच—

माझ्या नजरेस आमच्या मदाम सोफिया वाडिया दिसल्या. म्हणजे नेहमींच्या सळसळत्या सपेत साडीच्या, गोऱ्यापान भालप्रदेशावर कुंकवाचा उज्ज्वल टिळा रेखलेल्या, चेहऱ्यावर सदैव स्नेहाळलेलें स्मित असणाऱ्या सोफिया वाडिया नव्हत ! आतां त्यांच्या हातांत एक पताका होती. चेहरा गंभीर होता. नजर स्तब्ध होती. आणि वृत्ति भारलेली होती—आणि सभोंवार गेशांचा गराडा ! सर्व परंपरागत सौंदर्यप्रसाधनांचें कळीदार काव्य अंगावर सळसळतें आहे अशा गेशा ! किमोनोवर इंद्रधनुष्याची माया, चेहऱ्यावर गुलाबाच्या पाकळ्यांची शोभा, डोळ्यांत काळेशार पाणी आणि वृत्तींत शांत, तुष्ट समर्पण ! त्या क्षणीं मला मदाम सोफिया वाडिया अप्सरांनीं घेरलेल्या तपस्विनी महाश्वेतेप्रमाणें भासल्या !

मदाम वाडियांच्या दर्शनाबरोबर एकदम आधार सांपडला ! दिशा गवसली ! मी क्षणाचाहि विचार न करतां त्यांच्या दिशेनें निघालों—आणि मला कोणी अडविलें नाहीं. माझ्या एकेक पावलाबरोबर गेशांनीं मला वाट दिली. काय होतें आहे हें कळण्यापूर्वीच मी मदाम वाडियांच्या शेजारीं जाऊन उभा राहिलों. पण त्यांनीं माझ्याकडे पाहिलेंहि नाहीं. त्यांची नजर पुरी भारलेली होती. मी जाऊन पोंचतों आहे तोंच मिरवणूक सुरू झाली – आणि मिरवणुकीबरोबर मीहि !



मोरीबाना जपानी पुष्परचना कौशल्याचा एक नमुना



जपानी पागोडा (नारा)

क्षणांत ध्यानांत आलें कीं कन्नोनदेवीच्या दर्शनासाठीं असें समारंभानें जायचें आहे आणि मिरवणुकीचें नेतृत्व मदाम वाडियांकडे आहे ! आणि त्यांच्या डावी-उजवी-कडे-मागें असलेला गेशांचा ताफा हा या मिरवणुकीचा एक उपचार आहे ! ध्यानांत आलें नि मी एकदम विरमलों. पण आतां तेथून हलणें शक्य नव्हतें–दोनहि बाजूंना दुकानांची रांग आणि दुकानांच्या समोर गर्दी ! या महिलांच्या मिरवणुकींत मी एकटाच पुरुष ! 'लांबोडा' ! मला अतिशय शरमल्यासारखें झालें. इतक्यांत कुठूनसे उमाशंकर जोशी आले नि शेजारीं चालूं लागले. मला एकदम बरें वाटलें–आणखी एक 'वायकांत पुरुष मिळाला !' पण तेहि संकोचले होते. म्हणाले, 'We look like geisha boys, don't we ?' (आम्ही गेशा-पोऱ्याप्रमाणें दिसतों, नाहीं ?) अनेक क्यामेरे चालू होते, अनेक बल्ब जळत होते, पण निघालेल्या शेकडों फोटोंतला एकहि मिळवून ठेवण्याची हिंमत मला झाली नाहीं !

मिरवणुकीच्या अग्रभागीं असण्याचा एक फायदा झाला. बाजूच्या दुकानांतली आरास नीट न्याहाळून पाहतां आली. आजच्या या समारंभांत सारीं दुकानें मनःपूर्वक सामील झालीं होतीं. एकेक दुकान नववधूप्रमाणें सजलें होतें. जपानी प्रसाधनाच्या साऱ्या युक्त्याप्रयुक्त्यांचा वापर करण्यांत आला होता. किमोनोच्या दुकानांतल्या दिखाऊ पुतळ्यांवर ठेवणींतले नमुने चढले होते. बशाबरण्यांच्या दुकानांतली एकेक फुलदाणी पॉलिशनें झगमगली होती आणि वाडगा ऐतिहासिक दिमाखानें नटला होता. कापडावरचे रंग आणि रेषा सळसळत होत्या. फुलझाडांच्या दुकानावरचे निऑन लाइट्स तर नक्षत्रांचें तेज पिऊन फांकले होते. एकेक दुकान म्हणजे कालिदासाच्या उत्तरमेघांतील एकेका कवितेचें प्रत्यक्षिक ! मग त्या दुकानांतल्या हंसऱ्या चेहऱ्याच्या आणि चंचल नजरेच्या मुली यक्षिणीप्रमाणें भासाव्या यांत काय नवल ?

या दुकानांच्या भपक्यानें नजरेवर एक प्रकारची भूल पसरली. एक प्रकारच्या तंद्रींतच आम्ही देवळासमोरच्या पटांगणांत आलों. नि मग जरा भानावर आलों. माझी नजर तो हत्तीएवढा कंदिल धुंडाळूं लागली. पण तो कंदील बाहेर नव्हता, आंत देवळाच्या ओसरीवर होता. नजरेला समोरचें देवळाचें आवाढव्य वास्तुशिल्पच दिसलें. आठ–नऊ इंच उंचीच्या कन्नोनदेवीचें हें अवाढव्य मंदिर ! वाटलें, तिच्या अलौकिक शक्तीला साकार करण्याचाच हा प्रयत्न आहे ! कीं तिच्या चिंतनानें येणारी प्रतीतिच ही अंशी साकार झाली आहे ? कांहीं असो. समोरचें, देवळाचें सरळ, साधें, अखंड उंचावत गेलेलें छप्पर – एखाद्या पर्वताचें शिखर

समोर उभें राहावें तसें वाटलें, आणि त्याचीं दोन बाजूंना पसरलेलीं पाखें देवमाशांच्या जबरदस्त शेपट्यांसारखीं भासलीं. मला एकदम जाऊन तो कंदिल पाहावा असें वाटलें. गेशांनीं उभारलेला कंदिल तो. आतां आजूबाजूस गेशाच उभ्या होत्या. कंदिलाला, अलकेंतल्या यक्षाच्या बागेंतल्या ह्रियामाणकांच्या टेकडीचें कल्पनारम्य आकर्षण प्राप्त झालें. पण माझी एकट्याच सटकून जाण्याची हिंमत नव्हती. शिवाय आम्ही एका विधीच्या कचाट्यांत सांपडलों होतों. त्यांतल्या देवाल्याच्या पुढें कमळाच्या आकाराचें एक प्रचंड धूपपात्र होतें. धूपधूमाच्या संस्कारांनीं शुद्ध होऊनच देवळांत जायचें होतें. मदाम वाडिया त्या धूपदानाकडे गेला. गेशाहि त्यांच्याभोंवतीं जमा झाल्या. धूपदानाभोंवतीं एकदम गर्दीच उसळली, आणि मग या गर्दींत तो लाल रंगाचा कंदिल नीट पाहण्याचें राहूनच गेलें. एक निसटशी नजर टाकून मी पुनः बाहेर आवारांत आलों. आवारांत पेन–परिषदेचे अनेक प्रतिनिधि उभे होते. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करूं लागलों. व्याख्यान वगैरे गोष्टी चाललेल्या होत्या. पण माझ्या नजरेवर त्या दुकानांच्या आराशीची, गेशांच्या गराड्याची, मंदिराच्या भव्यतेची अशी कांहीं विलक्षण धुंदी पसरली कीं मला त्यांतलें फारसें कांही आठवतच नाहीं. एवढेंच आठवतें कीं, एकदम वर आकाशांत एक हेलिकॉप्टर आला – आणि त्यानें वरून कागदाचे असंख्य तुकडे उधळून दिले. वस्तुतः त्यानें उधळायला हवीं होतीं कल्पवृक्षाचीं फुलें, पण उधळल्या मात्र जाहिरातींच्या हस्तपत्रिका! पण त्यामुळें डोळ्यांवरचा अलकापुरीचा अंमल उतरला नाहीं. त्या हेलिकॉप्टरचीच कींव आली!

* * *

आसाकुसाचें हें चित्र डोक्यांत बसतें. कित्येक दिवस त्याचीच आठवण चाळवते. त्याचेच रंग डोळ्यापुढें तरळतात. वाटतें, एकदां हा आसाकुसा फुरसतीनें नजरेखालून घातला पाहिजे. म्हणून एक दिवस टॅक्सी रोखतों, आणि पुकारतों 'आसाकुसा'! लगेच टॅक्सी--ड्रायव्हरच्या अंगांत संचारतें. अनेकांच्या जिवाशीं शिवाशिवीचा खेळ खेळून तो एकदम टॅक्सी उभी करतो नि म्हणतो, 'आसाकुसा.' मी टॅक्सीच्या बाहेर पाहतों, पण मला ओळखीची एक खूण दिसत नाहीं. मी साशंक स्वरांत विचारतों, 'आसाकुसा ?' तो ठाम स्वरांत म्हणतो 'होय.' मला पटत नाहीं, पण नाइलाजानें उतरतों. एकाला विचारतों, 'आसाकुसा मार्केट ?' मी काय विचारतों हें त्याला नीट कळलें असावेंसें वाटत

नाहीं, पण तो बोट दाखवितो, आणि आपल्या बाळबटपणाची जाणीव असूनहि मी तो बोट दाखवितो त्या दिशेकडे जातों. जरा वेळानें दुतर्फा दुकानांच्या रस्त्याला लागतों. दुकानें दिसतात – किमोनोंचीं, कापडांचीं, बशा-फुलदाण्यांचीं, फुलझाडांचीं – नि खात्री पटते, बस्स याच रस्त्यानें परवां आपण गेलों. पावलांत आत्मविश्वास चढतो. नजर ओळखीनें पाहूं लागते. पण दिखाऊ पुतळ्यांच्या अंगावरच्या किमोनोंत तें पाणी दिसत नाहीं. फुलदाण्यांवरच्या पॉलिशांत तें तेज नाहीं. कापडावरच्या रंगरेषांत ती सळसळ नाहीं. निऑन–लाइट्समध्यें ती किमया नाहीं. हींच तीं दुकानें असें वाटतच नाहीं. छट्, आपलें चुकलें. परवांचा रस्ता तो हा नव्हे.

मी एका तिठ्यापर्यंत येतों. तेथून दोन बाजूंना दोन थेट तसेच रस्ते जातात. दोनहि बाजूंना दुकानें थेट तशींच असतात. खणा दोन खणांची, छोटीं, सुबक, नीटनेटकीं. जपानी प्रसाधनाचा एखाद दुसरा हात फिरलेलीं. एकादी बॉन्सायची कुंडी दारांत मिरविणारीं! निऑनच्या दिव्यांत एखादा नवलाचा डिझाइन दाखविणारीं. विकणाऱ्या मुलींच्या हास्यानें सजलेलीं. विक्रीचा व्यवहार नेटानें करणारीं. पण त्यांत त्या दिवसाचा भपका नाहीं, झगमग नाहीं, उत्सवी आरास नाहीं. साऱ्यावर एक प्रकारचा संथ बासेपणा! खालीं रस्त्यावर तर कचरा आणि चिखल! बरोबर आहे, त्या दिवसाचें सणाचें वातावरण आज कसें असणार? पण एकाहि दुकानाची ओळख पटत नाहीं. त्या दिवशीं डोळे भरून पाहिलेला एकहि चेहरा ओळख चाळवीत नाहीं. आपण कुठल्या तरी वेगळ्याच जगांत पडलों आहोंत असें वाटूं लागतें. हा आसाकुसा–बाजारच काय, असें एखाद्या दुकान-दाराला विचारावेंसें वाटूं लागतें. पण तेवढा धीर होत नाहीं. माझी गोंधळलेली नजर एकादोघां दुकानदारांच्या ध्यानांत आली आहे असें जाणवतें आणि माझें रेंगाळणें संपतें. पावलें झपाझप पडूं लागतात. मात्र नजर परवांची ओळख धुंडाळूं लागतेच. पण कांहीं लक्षांत येत नाहीं. जरा वेळानें हा रस्ता संपून आपण मोकळ्यावर येणार हें ध्यानांत येतें व या चक्रव्युहांतून सुटणार याचें समाधान वाटतें. पावलें अधिकच झपाट्यानें पडूं लागतात--आणि दीड दोन मिनिटांत खरोखरच त्या बाजाराच्या बाहेर मोकळ्या जागेंत येतों नि पहातों तों हें देवळासमोरचें पटांगण! म्हणजे परवां आपण याच रस्त्यानें आलों होतों, आणि आतां कांहीं ओळखलें नाहीं! म्हणजे परवांच्या समारंभाची किमया या दुकानांवर चढली होती तशीच आपल्या नजरेवरहि चढली होती!

मी समोर देवळाकडे पाहिलें. देऊळ अबाढव्यच, पण परवांची वास्तुशिल्पाची भव्यता आतां जाणवत नाहीं. तें समोरचें, आढ्याची उंची अतूट चढत गेलेलें छप्पर आतां मला बोजड, बेढबच वाटतें. कां नकळे, थायलँडमधल्या भातशेतांत काम करणाऱ्या काळ्या कपड्यांतल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर उंच दिवाळाची परडीसारखी हॅट असते तिची मला आठवण होते! मी पुढें होतों नि देवळांत नजर टाकतों. तो कंदिल दिसतो, पण त्याचा लाल रंग, त्याच्यावरचीं काळीं अक्षरें यांत एक निश्चेष्टपणा जाणवतो. देवळांत देवीच्या मूर्तीसमोर समयांची आरास असते त्यांत एक तांत्रिकपणा आढळतो. वरचें छतावरचें ड्रॅगनचें चित्र —ड्रॅगनच्या चित्रांतलें सौंदर्य मला कधीं आकलन झालेंच नाहीं, पण आज तें चित्र हिडिस वाटतें! छे, हें ठीक नाहीं, मघाशीं बाजारांत झालेल्या निराशेचा फारच पगडा आपल्या मनावर बसला आहे!

कांहीं तरी चांगलें, आवडण्यासारखें दिसेल म्हणून मागें वळून पाहातों आणि एक दगडी जपानी दिवा दिसतो. जपानी मंदिरांच्या आवारांत आणि जपानी बागांत दिसणारा दगडी दिवा मला फारच आवडतो. त्याचें शिल्प जपानी नसतें, भारतीय असतें, म्हणून तो मला आवडतो का? लहानपणीं तुळशीवृन्दा-वनाच्या कोनाड्यांत पाहिलेल्या निरंजनाची त्यानें आठवण होते म्हणून तो मला आवडतो का? कारण कांहींहि असो, नाराच्या कासुगा मंदिराकडे अगर निक्कोच्या तोशोगू मंदिराकडे नेणाऱ्या अशा दगडी दिव्यांच्या रांगा पाहून माझें मन हरखलें होतें. मंदिरांतल्या पावित्र्याचे हे कोणी रखवालदारच असा कांहींतरी विचार मनांत आला होता. मंदिराला असा एखादा दिवा अर्पण करण्याचें पुण्य महान् असें वाटलें होतें, आणि प्रत्येक वेळीं या दगडाच्या दिव्याला जाऊन हात लावावा असें वाटलें होतें. तसेंच आतां वाटतें. आणि मी त्या दिव्याकडे जातों. हा दिवा नेहमींसारखा लहान दीडदोन फुटांचा नसतो, दीपस्तंभासारखा चांगला उंच असतो. मी त्याला हात लावतों, त्याला टेकून उभा राहतों नि समोर पाहतों—

समोर एक कबुतरांचा अड्डा असतो आणि त्याच्या सभोंवतालीं लोखंडी बाकें टाकलेलीं असतात. जुनाट गंजलेलीं. समोरच्या एका बाकावर एक म्हातारा बसलेला दिसतो. त्याचें सारें दर्शन विटकें असतें. चेहऱ्यावर सुरकत्या, अंगावर विटका युकाता आणि पायांत तुटका गेटा अशी सारी सुतकी

कळा. पण समोर एक छोटें मूल कबुतराबरोबर खेळत असतें त्याच्याकडे तो नजर लावून पहात असतो. काय पाहात असतो तो? स्वतःच्या आयुष्याच्या आरशांत त्या मुलाचें भवितव्य पाहात आहे का तो? पाहातां पाहातां तो एकदम मांडी चाळवतो नि माझ्या ध्यानांत येतें कीं ह्याचा एक पाय थोटा आहे. एकदम वाटतें, अरे हा पाय युद्धांत तुटला. जपानच्या असंख्य लुळ्यापांगळ्या सैनिकांपैकीं हा एक. त्यांच्याप्रमाणेंच याचेंहि आयुष्य भकास आणि अंतःकरण ओसाड बनलेलें असेल. हा असा अपंग म्हातारा आणि कबुतराच्या प्रत्येक फडफडण्याबरोबर अंग बागडणारें तें मूल : जपानचें 'भूत' आणि 'भविष्य' एकमेकांशीं काटकोन करून जोडून ठेवलें आहे असें वाटतें.

इतक्यांत जपानचें 'वर्तमान' आईच्या रूपानें येतें आणि त्या मुलाला उचलून घेऊन त्याला लडिवाळपणें खेळवीत निघून जाते. तिचा पोशाख पाश्चात्य असतो. तिच्या लाल स्कर्टवरचे काळे झारदार पट्टे, तिचा पिवळा ब्लाऊज आणि डोक्यावरच्या अर्धा कापलेल्या केसांच्या भुरभुरणाऱ्या बटा. हें सारें तिच्या आधुनिक स्वच्छंद बेफिकीर वृत्तीची साक्ष देतें, पण तिच्या हातांत गुलाबी चित्रें रेखाटलेली रेशमी जपानी छत्री असते!—आणि ती जपानी जीवनावरच्या जपानी संस्कृतीच्या छायेसारखी वाटते!

मी चालूं लागतों—कुठें तरी जायचें म्हणून उजवीकडे वळतों आणि थोड्याच वेळांत एक विलक्षण दृश्य नजरेसमोर उमलतें. आपल्याकडच्या जुन्या बाजारासारखा (चोर बाजारासारखा) बाजार समोर पसरलेला असतो. छोटेछोटे आडवे कट्टे अणि त्यांवर मालांच्या—तयार मालाच्या राशी! कोट, पँट, शॉर्ट, शर्ट यांच्या घड्या, किमोनोंच्या घड्या, स्कर्टब्लाऊजच्या घड्या, नेकटायच्या बंडलांचे ढीग, बटनें, फण्या, खेळणीं, भांडीं, पेले, कपबशा–नाना प्रकार! या ढिगांच्या दरम्यान मालविक्ये उभे असतात, माल पुकारतात, किंमती ओरडतात, गिऱ्हाइकांशीं घालमेल करतात, हुज्जत घालतात, आणि मालाच्या घड्या खालच्या वर करीत दुसऱ्या हातानें ऐटींत सिग्रेट शिलगावतात! आणि गिऱ्हाइकें या साऱ्या गडबडींत एकमेकांची आणि स्वतःची ओढाताण करतात! आणि या साऱ्यावर ताण म्हणून एकादी विटक्या किमोनोवर विटका कोट घातलेली, मुलाला पाठुंगळीला मारलेली, आपलीं जाडीभरडीं रुंद चवड्याचीं पावलें गेत्र्यांत रोवलेली बाई या साऱ्याकडे आपण या गांवचेच नाहीं अशा तोऱ्यानें पाहात असते.

मी या उघड्या बाजाराकडे पाहात राहातों, तेथल्या दुकानांच्या दरम्यान पांचदहा पावलांचा फेरफटका करतों; कांहीं वेळ डोळे मिटून त्या ठिकाणच्या नुसत्या आवाजाचा आस्वाद घेतों नि वाटतें, हें खरें जीवन, उघडें, नागडें, कच्चें जीवन! – निदान आपल्या साऱ्या ओढाताणींच्या मुळाशीं असलेल्या पाशवी शक्तीचा संचार येथें आढळेल! आपल्या साऱ्या संस्कृतीच्या मुळाशीं असलेल्या जंजाळाचा आढळ येथें होईल. सौंदर्याच्या, स्नेहाच्या, प्रेमाच्या मुळाशीं असलेल्या सत्याचा साक्षात्कार – थेंबभर दुधांत, अगर पाण्यांत अगर तेलांत शास्त्रज्ञाच्या कांचेंतून जसा जंतूंचा होतो तसा साक्षात्कार – येथें होईल.

जपानच्या साऱ्या नाजुक साजुक मधुर मुलायम सौंदर्यानें भरलेल्या माझ्या अंतःकरणाला हा फटका जबरदस्त ठरतो, आणि मी तेथून काढतें पाऊल घेतों. चालूं लागतों, तो समोरून येणाऱ्या इसमाला पाहून माझी दृष्टि थबकते. त्याच्या खाकोटीला एक पडशी असते आणि हात दोन माकडांना ओढीत असतात! आपल्या गारुड्याचा अगर डोंबाऱ्याचा अवतार जपानांत पाहण्याची अपेक्षा मीं केलेली नव्हती. जरा वेळानें समोर एक म्हातारा-म्हातारीचें जोडपें कचऱ्याची हातगाडी ओढीत चाललेलें दिसतें. या जोडप्याच्या जीवनाचें वस्त्र चांगलेंच विरलेलें आहे हें त्याच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांत दिसतें. त्याच्या जीवनाच्या गांठी आणि ठिगळें त्याच्या अंगावरच्या कपड्यांत दिसतात. त्याच्या जीवनाचा पिकलेला सुकलेला पालापाचोळा त्या हातगाडींत ओसंडून चाललेला असतो. सौंदर्याची सुसंगति आणि जीवनांतली विसंगति यांचें एकदम दर्शन मला त्या जोडप्यांत दिसतें. मागसलेल्या देशांतलीं दृश्यें जीवनाच्या जीवघेऊ पाशांनीं खेचून आणून या सुधारलेल्या जपानांत आणून ठेवलेलीं दिसतात. माझें चालतें पाऊल, कांहीं कारण नसतां, अडखळतें!

* * *

जरा वेळानें मी थिएटर्सच्या विभागांत येतों. रस्त्याच्या दोनहि कडांनीं सिनेमा-थिएटरें एकमेकांना चिकटून उभी असतात; आणि त्यांचे पुढचे दर्शनी भाग चित्रपटांच्या पोस्टर्सनीं चितारलेले असतात. कांहीं वेळ माझें लक्ष थिएटर्सच्या लाउंजमधल्या व्यवस्थेवर ओझरती नजर फिरवीत जातें, पण थोड्याच वेळांत या पोस्टर्सनीं भारलें जातें. या पोस्टर्समुळें एक नवीनच जबरदस्त जग उमलतें – सामुराईचें जग. बहुतेक सर्व पोस्टर्सवर सामुराईच्या

जगांतलीं दृश्यें असतात. त्यांचे हाफ्पँट आणि सैल अंगरखा यांच्या विचित्र युतीचे पोशाख, तुळतुळीत तासलेलीं डोकीं, चमत्कारिक शेंड्या, कमरेला कसलेल्या पट्ट्यांस अडकवलेल्या तलवारी, नजरेंतले बेबंद भाव, चेहऱ्यावरचा क्रोध, शौर्य, स्त्रियांच्या नजरेंतली भीति अगर संपूर्ण शरणागति ! एक सामुराई एका स्त्रीची बाही पकडून तिला खेचीत आहे; दुसरा हातांत शत्रूचें कापलेलें मुंडकें घेऊन घोड्यावरून भरधांव सुटलेला आहे; एक स्त्री पिशाच्याच्या दर्शनानें निश्चेष्ट पडली आहे; हाराकिरीच्या क्रियेमुळें एका सामुराईच्या तोंडाचे स्नायु पिळवटले आहेत -- असें हें मध्ययुगीन जपानी सरंजामशाहीचें जग दोनहि बाजूंनीं अंगावर चालून येतें. मध्येंच एखाद्या अमेरिकन धमाल बोलपटाच्या पोस्टर्सनें यांत खंड पडतो तेवढाच. इतक्यांत माझें लक्ष एका निराळ्याच पोस्टरकडे जातें. या पोस्टरमध्यें नंग्या समशेरींचें हातघाईचें युद्ध दिसतें. पोशाख तसेच, जग सामुराईचें ; पण हें सामुराईचें सोंग स्त्रियांनीं आणलेलें. मी जरा आजुबाजूला नजर टाकतों नि ध्यानांत येतें कीं हें सिनेमाचें थिएटर नव्हे, तर तलवारींच्या मुकाबल्याचें -- आणि या समशेरीच्या मामल्यांत भाग घेणाऱ्या स्त्रियाच आहेत. त्या स्त्रीच्या वेशांत तर लढतातच, पण पुरुषांचा वेश धारण करूनहि लढतात. मला गंमत वाटते. काबुकी नाटकांत आजहि स्त्रियांचीं कामें पुरुष करतात आणि येथें पुरुषांची मर्दुमकी स्त्रिया गाजवतात ! काबुकींत पुरुषांनीं केलेल्या स्त्रीच्या हंसण्यामुरडण्याचा बदला त्या येथें समशेर-बहादुरीनें घेतात !

मी समशेरबहादुरीचा (नुसता चित्रमय) आस्वाद घेत उभा असतों तों शेजारच्या गल्लींतून दोन किमोनोधारी स्त्रिया भांडततंडत येतात. जपानी भाषेंतलें भांडण मी पूर्वी ऐकलेलें नव्हतें. जपानी स्त्रियांचें बोलणें म्हणजे कलदार बिलोरी, पण या बिलोरी बोलांना तड्यावर तडे जात असलेले मी आतां पाहात असतों. आधीं जपानी स्त्रिया रस्त्यावर येऊन अशा भांडतील यावरच मी विश्वास ठेवला नसता, आणि भांडल्या तर आपल्या बिलोरी बोलांचा असा भगरा करतील, हें मी स्वप्नांत देखील देखिलें नसतें, पण तें आतां समोर घडत असतें. नुसता भाषेचा भगरा नव्हे तर हावभावांचा थयथयाट ! त्यांचे किमोनोच्या बाह्यांतून बाहेर पडून एकमेकांवर चालून जाणारे हात म्यानांतून बाहेर पडलेल्या तलवारीसारखे भासतात. या भांडणाऱ्या बायांकडे पाहात राहणें शिष्टसंमत नाहीं हें माहीत

असूनसुद्धां माझी नजर त्यांच्यावर खिळून राहाते. पाहातां पाहातां त्यांचे भरदार भरभक्कम पाय आणि नाजुक निमुळते हात यांतला विसंवाद मनाला जाणवतो, आणि त्याबद्दल पूर्वी अनुभवलेलें असूनहि तो खटकतो. आणखी एक जाणीव होते. जपानी कातडी, गेशांच्या चेहऱ्यावर दिसते तशी गोडगुलाबी मुलायम नसते तर पिवळी भरभरीत असते; आणि गेशांच्या चेहऱ्यावरची माया म्हणजे प्रसाधनाची किमया असते. आणि मग त्या दिवसाचा गेशांचा गराडा आठवतो आणि त्यांच्या चेहऱ्याप्रमाणें त्यांच्या मानेलगतच्या पाठीचें प्रसाधनहि आठवतें. गेशांच्या किमोनोला पाठीवर मानेखालींच व्ही-च्या आकाराचा काप असतो, आणि जपानी रतिशास्त्रांत या जागेचें आकर्षण विलक्षण असतें. किमोनोची ओवी स्तन साफ आवळून-आच्छादून टाकते, आणि स्तनाच्या आकर्षणाची जागा पुष्ट पाठीचा मानेखालचा रंगरंगोटी केलेला भाग, विशेषतः मानेवरून उतरलेली लवदार केसांची नाजूक नखरेल रेषा, घेते!

माझ्या नजरेसमोर रतिशास्त्रांतला हा मानेमागचा विलास तरळत असतांनाच स्ट्रिप-टीज्चा पोस्टर दिसतो. स्ट्रिप-टीज् म्हणजे नटीनें वा नर्तिकेनें रंगमंचकावर येऊन अलगद् हातानें एकेक वस्त्र काढून टाकून कायद्याच्या कमाल मर्यादेपर्यंत (किंवा निसर्गाच्या नाजूक मर्यादेपर्यंत असें म्हणावें) विवस्त्र होणें. पाठीचा पुष्ट तुकडा नजरेसमोर मस्त नाचत होता म्हणून असेल मी, काडीचाहि विचार न करतां, स्ट्रिप-टीज्चें तिकीट काढतो.

मी बाल्कनीचें तिकीट काढलेलें असतें, पण स्ट्रिप-टीज्च्या थिएटरांत बाल्कनींतील जागा महत्त्वाची नसते, ती खालीं पिटांत असते. काबुकीच्या रंगमंचकाप्रमाणें या 'नागव्या' मंचकाचीहि एक पट्टी पिटांत, प्रेक्षकांत आलेली असते आणि आपला वस्त्रसंभार विंगांत फेकून कामें करणाऱ्या बाया येथें या पट्टीवर येऊन आपल्या देहाचे कोन-काटकोन-त्रिकोण प्रदर्शितात. येथेंच त्यांच्या शरीराचीं वेडींवांकडी वळणें व्यक्त होत असतात. म्हणून दर्दी प्रेक्षक या पट्टीच्या कडेच्या जागा पटकवितात. निदानपक्षीं रंगमंचकाच्या कडेलगतच्या! वर बाल्कनींत अगदींच फाल्तू, म्हणजे त्या मानानें सभ्य, किंवा लाजवट लोक! बाल्कनींत मला फारच थोडे लोक दिसतात, आणि त्यांत पांचसहा स्त्रियाहि असतात. (मी मनांतल्या मनांत विचारतों, पुरुषांच्या स्ट्रिप-टीज्ला एक तरी पुरुष प्रेक्षक मिळेल काय?) खालीं त्या मानानें बरेच. पण बहुतेक सारे माझ्या-

सारखे मध्यमवयस्क—खऱ्याखुऱ्या अर्थानें आंबटशोकी! तरुणांचा बहुतेक अभाव. आपल्याकडे स्ट्रिप्‌-टीज्‌चा मामला आला तर अशा कार्यक्रमांना तरुण तोबा करतील. आपल्या बहुतेक अविवाहितांना स्त्रीदेह म्हणजे एक गूढच असतें (आणि या गूढाचें शक्य तितकें संरक्षण करण्याची आपली नीति असल्या-मुळेंच आपल्याकडे स्ट्रिप्‌-टीज्‌ येण्याचा संभव नाहीं.) पण जपानी तरुणांनीं या गूढाचा केव्हांच भेद केलेला असतो. तरुण देहाची मस्त सळसळ ज्यांना कित्येक दिवसांत अगर वर्षांत पाहायला सुद्धां मिळालेली नसते तेच येथें गर्दी करतात. पण यांतले देखील निव्वळ नग्नदेहाच्या आकर्षणानें थोडेच येतात. नग्न देहदर्शनाच्या दरम्यान तमाशेवजा अगर फार्सवजा प्रहसनें असतात तीं पाहण्यासाठीं ते फार करून येतात. नग्नतेच्या बस्तादणी आपल्या कलेच्या कारवाया करीत असतात, तेव्हां हे प्रेक्षक बहुतेक थंड, सुस्त, सिग्रेट झुकी-तच असतात, पण जेव्हां एखादा फर्मास फार्स उघडतो तेव्हां ते एकदम जागे होतात, तवाने होतात, कान, डोळे, सारें शरीरच टवकारतात. लवकरच हंसणें-खिदळणें-ओरडणें सुरू होतें. हे फार्स म्हणजे भलतेंच रांगडें प्रकरण असतें. पाहतां पाहतां आमच्या समोर संडासाचा सीन मांडला जातो. मला कळमळा-यला लागतें, पण जपानी प्रेक्षकांना त्यांत विलक्षण रस वाटतो! (अगदीं अत्र्यांच्या गोमागणेश पितळी दरवाजा या गोष्टीमुळें आपल्याला वाटतो तसा—पण या गोमागणेशाचें प्रकरण स्टेजवर रंगविण्याची अत्र्यांना सुद्धां हिंमत होईल असें वाटत नाहीं!)

हा संडास-सीन संपतो, नग्न देहाचीं चेष्टितें सुरू होतात, आणि मद्यांचा हंशा–ओरडा एकदम थंड होतो. मी विचार करूं लागतों, नग्न देहाचें प्रकरण यांना असें बेचव कां वाटतें, आणि मग ध्यानांत येतें कीं ही सारी (उलटी) जादू त्या देहावर जे गडद रंगीत प्रकाश टाकण्यांत येतात त्याची आहे. जपानांत नग्न देह रंगीत प्रकाशानें अगदीं मारून टाकण्यांत येतात. पॅरिसच्या प्लास पिगालमध्येंच असें करीत नाहींत आणि म्हणून स्ट्रिप-टीज्‌चें माहेर अद्याप पॅरिसमध्येंच आहे. पुष्कळ प्रेक्षकांना ही फसवणूक पसंत पडत नाहीं. त्यांतले एकेक बाहेर पडूं लागतात. मीहि त्यांच्यात सामील होतों.

* * *


माझीं पावलें आपोआपच त्या 'चोर बाजारा' कडे वळतात. त्या बाजारांतला जोर, जोम, जोश मला अधिक आकर्षक वाटतो. तेथें प्रतीत होणारी बखवखलेल्या

जीवनाची उसळी मला आपल्याकडे खेंचीत असते. पण आतां, मघांशीं ज्या पेयगृहांकडे आणि आहारगृहांकडे माझें दुर्लक्ष झालें होतें तीं आतां नजरेंत भरूं लागतात. त्याचा स्वाद नाकांत शिरूं लागतो. कांचेच्या तावदानापलीकडे तयार पदार्थांच्या बशा असतात त्यांचें रंगरूप वेध लावतें. पण ध्यानांत येतें कीं या बशा, हे पदार्थ प्लास्टिकचे आहेत–जाहिरातीसाठीं मांडलेले आहेत. आणि मग जाणीव होते कीं येथल्या या उपहारगृहांची दृष्टि अधिक रोखठोक आहे. गिंझांतल्याप्रमाणें दर्शनी भागावर कलेची वायफळ उधळपट्टी करण्यापेक्षां आंतल्या खाद्य पदार्थांचें रोचक सत्य गिऱ्हाइकांच्या डोळ्यांत ओतण्याकडे त्यांचें अधिक लक्ष आहे. अर्थात् जपानी रक्तांत मुरलेलें कलाप्रेम जातें कोठें? दरवाज्यांत एकादी बॉन्सायची कुंडी किंवा शेवंतीचा रोपा ठेवलेला असतोच. पण आतां माझ्या मनावर खाद्यपदार्थांचाच अधिक अंमल असतो. मीं एका सुशीच्या दुकानांत शिरतों.

हें सुशीचें दुकान म्हणजे काय, दुकानाच्या मधोमध पार्टिशनवर एक आडवी फळी, आणि त्यावर भराभर ठेवण्यांत येणाऱ्या सुशीच्या बशा. या फळीपाशीं पांचसहा इसम उभे असतात. खात असतात, पीत असतात. आणि पार्टिशन-पलीकडच्या, सुशीच्या बशा देणाऱ्या मुलीशीं गप्पा मारीत असतात. पण ती मुलगी एखादाच शब्द बोलते, बहुतेक हंसतेच, आणि क्वचित् डोळ्यांभोंवता-लच्या वळ्या मुरडते. तिचें खरें लक्ष सुशी बनविण्यांत असतें. सुशी म्हणजे समुद्रांतील एका वनस्पतीच्या पापुद्र्यावर पसरलेल्या भातांत ताजा कच्चा माशाचा तुकडा गुंडाळून तयार केलेलें गोलाकार सॅण्डविच. ही मुलगी पापुद्र्या-वर भात पसरते, आणि त्यांत माशाचे लाल गुलाबी तुकडे टाकण्याचें काम तिच्या पलीकडचा एक पुरुष करतो. त्याचा उद्योग पाहून माझें काळीजच थरथरतें. एका पाण्याच्या टाकींतून तो जीवंत मासा काढतो, मोठ्या झपाट्यानें एका फळीच्या तुकड्यावर त्याचा तडफडणारा देह ठेवतो, आणि सुरीनें चीजचे तुकडे करावे तसे त्याचे तुकडे करतो! ताजा मासा म्हणजे जीवंत मासा— इतका जीवंत कीं, सुशींत गुंडाळलेला तुकडा सुद्धां तडफडत आहे असें वाटतें. माझ्या समोर बशी येते तेव्हां या तुकड्यानें तोंडांतून उडी टाकली तर या विचारानें हात थोडासा अडखळतोच! असा हा सुशीचा प्रकार! जीवो जीवस्य जीवनम् याचें प्रात्यक्षिक!

माझीं पावलें कन्नोन मंदिराकडे वळतात. मंदिराचें शिखर दिसत असतें—माझी दृष्टि त्याचा वेध घेत आहे तोंच कसला तरी गलका उठतो. घोषणा ऐकूं येतात. मंदिराकडूनच येत असतात. माझीं पावलें भराभर पडूं लागतात...... मंदिराच्या आवारांत गर्दी असते. तरुणांचा मेळावा असतो. कांहींच्या हातांत पताका असतात. एकीवर अणुगोलाचें प्रचंड चित्र असतें. कां नकळे, माझी दृष्टि त्या चित्राकडून मंदिराच्या कंदिलाकडे जाते. मी विचारतों हें काय आहे. एक जण सांगतो, अण्वस्त्रांच्या निषेधासाठीं हे विद्यार्थी जमलेले आहेत. पण मग हे या मंदिरांत कशाला? शांततेसाठीं प्रार्थना करण्यासाठीं हे इकडे आले आहेत. इतक्यांत या विद्यार्थ्यांच्या घोळक्यांतून एक जण मंदिरांत शिरतो. त्याच्या अंगावर बौद्धपंथीय पुजाऱ्याचा पोशाख असतो. तो देवळांत शिरतो. कन्नोनच्या मूर्तीपुढें लीन होतो आणि परवच्यासारखे भासणारे मंत्र म्हणूं लागतो. मी विचारतों, हे मंत्र कसले? मला माहिती पुरविणारा इसम सांगतो कीं, हे तरुण विद्यार्थी एका बौद्ध पंथाचे अनुयायी आहेत. असे अनेक पंथ महायुद्धानंतर उदयास आले आहेत.

मी ते मंत्र ऐकत उभा राहतों. इतक्यांत माझें लक्ष त्या बाकावर बसलेल्या म्हाताऱ्याकडे जातें. त्यानें आपला लाकडी पाय आतां शेजारी बाकावर ठेवलेला असतो! तो विद्रूप दिसतो, आणि माझें लक्ष पुनः त्या विद्यार्थ्यांच्या जमावाकडे जातें. त्यांतले कांहीं अतिशय देखणे, तरतरीत, जोमदार दिसतात. माझी नजर तो म्हातारा, तो लाकडी पाय आणि तरतरीत तरुणांचा मेळावा यांच्या दरम्यान फिरूं लागते. इतक्यांत त्या म्हाताऱ्याची इतका वेळ जमिनीवर खिळलेली नजर त्या मेळाव्याकडे वळते—आणि लगेच मागें येऊन जमिनीला भिडते. आतां ती अधिकच निस्तेज दिसते. माझ्या मनांतले सारे विचार एकदम गळून पडतात. मन अगदीं रिकामें झाल्यासारखें वाटतें. वाऱ्यावर उडणाऱ्या फाटक्या कपट्या-सारखे वाटूं लागतें. इतक्यांत मंदिराच्या पडवींत एक सुंदर गेशा एका गलेलठ्ठ पोटाळ पेहेलवानाच्या हातावर रेलून येतांना दिसते! गेशा जगाची करमणूक करतात, पण त्याचें प्रात्यक्षिक हें असें, आतां यावेळीं, मिळेल असें वाटलें नव्हतें! जगाच्या व्यवहारांत शक्तीचीच पूजा चालते! करुणादेवीच्या आवारांत सुद्धां!



कि नो मि या ची ज त्रा

आमची मोटर यावातानोच्या एका बसस्टँडवर थांबते.

"चला उतरा–" योशिए म्हणते. मी उतरतों नि माझें लक्ष स्टँडवर उभ्या असलेल्या बसकडे जातें. ही बस किती ऐषआरामी, ऐश्वर्यशाली! मला आमच्या एस्. टी.ची आठवण होते आणि हाडें आंतल्या आंत थरकांपतात!


आणि बसस्टँड तरी किती झकास! छोटासाच. पण तेवढ्या गर्दीतसुद्धां एका कोनांत बॉन्सायची कुंडी ठेवण्याची दक्षता! आणि तुमची विचारपूस करण्यासाठीं एक गोड हसरी पोरगी आहेच. पासीन तिला कांहीं तरी सांगतो, आणि ती फोन उचलते. मी योशिएकडे प्रश्नार्थक नजर टाकतों. ती म्हणते "हॉटेलमध्यें जागा आहे का याची चौकशी चालली आहे." बरोबर, आज, जत्रा! आज हॉटेलें भरगच्च असणार. जागा नसली तर कसें होणार बुवा!— काळजीची रेषा अंतःकरणावर उमटून जाते.

आतां तेथल्या खुर्चीवर टेकून वाट पाहण्याखेरीज दुसरा मार्गच नसतो. मी व योशिए एकमेकाकडे बघून करवादलेलें हसतों आणि जागा मिळेल तेथें टेकतों.

"आहे बुवा एका हॉटेलमध्यें जागा. त्याचा मनुष्यच आम्हांला न्यायला येतो आहे." पासीन सांगतो आणि लगेच कौंटरवरच्या पोरगीशीं 'आसो-अनोने'ची जपानी गंमत सुरू करतो. योशिए आपल्या निमुळत्या डोळ्यांभोवतालच्या वळ्या हसऱ्या करून त्यांच्या बातचितींत भाग घेते, आणि मी समोरच्या दुकानाचें निरीक्षण करीत बसतों.

समोरच्या दुकानांत दीपोत्सव सुरू असतो. जपानी दुकानांच्या समोर कंदिलांची रांग नेहमींच उजळत असते, पण आज या कंदिलांत कांहीं एक निराळीच झळाळी भासते. कंदिलांचे लाल, निळा, नारिंगी, हिरवा असे रंग ताजे तकतकीत भासतात आणि त्या प्रत्येक कंदिलावर जपानी चित्रलिपींतलें निळें, पिवळें, हिरवें, गुलाबी रंगाचें अक्षर असतें. साऱ्या कंदिलांवर एकच अक्षर. माझें लक्ष एका कंदिलावरील अक्षरावरून दुसऱ्या कंदिलावरच्या अक्षरावर उड्या मारतें. थोडा वेळ नजर अशी नुसती धावत राहते. जरा वेळानें ही चंचल नजर मधल्या हिरव्या कंदिलावरच्या गुलाबी रंगावर स्थिरावते – आणि मग कंदिलांवरचीं अक्षरें एकत्र येऊन या एका अक्षरांत विलीन होत आहेत असें वाटतें – आणि मग त्या अक्षरांच्या वेलांट्यांत इंद्रधनुष्य नाचूं लागतें. माझी नजर मुग्ध होते. या रंगांच्या जादूंत रमते – किती तरी वेळ रमते – मग अबोध बनते – क्षणभर रंग लोपतात, सफेत बनतात, पुन्हां उजळतात.

योशिएची 'पाध्ये' अशी हाक कानांवर येते नि माझी तंद्री मोडते. पुन्हां ती निळ्या, पिवळ्या, हिरव्या, गुलाबी, नारिंगी रंगांची रांग



साकार होते. इतक्यांत योशिएची आणखी एक हाक कानांवर येते नि मी उठतों. उठतां उठतां मी मनाला झटकतों आणि मग ध्यानांत येतें की हॉटेलचा माणूस आला आहे. त्याच्या हातांत तसाच एक कलिंगडाच्या आकाराचा कंदिल आहे. त्याच्यावरहि चित्रलिपींतलें तेंच अक्षर आहे. मी योशिएला विचारतों, "काय ग, या कंदिलावरचं हें अक्षर कसलं?" ती उत्तरते, "अहो, ही किनोमियाची जत्रा नाहीं का – तिचं हें बोधचिन्ह." माझ्या मनांत विचार येतो, एकंदरींत अक्षरांत दैविकता ओतण्याची आमची युक्ति जपान्यांनाहि अवगत आहे.

इतक्यांत पासीन मोटार नीट आडोशाला उभी करून येतो आणि आम्ही हॉटेलच्या माणसाबरोबर चालूं लागतों. दहापांच पावलें जातों तोंच आड-वाटेला लागतों – आणि मोटारचें, मोटाररस्त्याचें, बसस्टँडचें, दुकानांच्या झकपक आराशीचें आधुनिक जग संपुष्टांत येतें, आणि खडकाळ पाऊलवाटांचें खडक-खबदाडीचें, रानगवताचें, झाडाझुडपांचें, आणि या साऱ्याला वेढून राहिलेल्या संथ सुन्न काळोखाचें सनातन जग सभोंवार पसरतें. लवकरच या काळोखाची कळा आमच्या अस्तित्वांत भिनूं लागते. काळोखाचा एकेक कण

आमच्या रोमरंध्रांत शिरतो. त्याचें काजळ पापण्यांवर चढतें. त्याच्या लाटेवर हेलावत हेलावत मी चालत राहतों.

पण हॉटेलच्या माणसाच्या हातांतल्या कंदिलानें या काळोखाच्या विश्वांत एक उजेडाचा गोल निर्माण झालेला असतो. आम्ही सारे या गोलांत असतों. हा गोल आमच्याबरोबर चालत असतो आणि आम्ही त्या गोलांत पावलें टाकीत असतों. पण सभोंवतालचा काळोख चारी दिशांनीं आपल्यावर चालून येत आहे, आपल्या पोटांत आमचा हा उजेडाचा इवलासा गोल गडप करीत आहे, असें वाटतें. इतक्यांत या उजेडाचा एक पट्टा कडेच्या झाडाच्या फांद्यांच्या आधारानें त्याच्या विस्तारांत शिरलेला दिसतो; पण तेथें दाटलेला काळोख डोळे वटारतो आणि बिचारा उजेडाचा पट्टा मागें फिरतो. माझी नजर क्षणभर उजळलेल्या त्या विस्तारांतच अडकून पडते. क्षणार्धांत तिच्यावर अंधार येतो. डोळे पाहतनासे होतात — आणि आवाजाची दुनिया एकदम जिवंत होते. रातकिड्यांची किरकिर, पायाखालच्या खरख, बांधावरून पडणाऱ्या धारेचा संतत आवाज — या अंधाऱ्या आवाजांत माझें मन मुग्ध होतें आणि एक प्रकारच्या निरभ्र निर्मळ शांतीचा प्रत्यय येतो.

मी स्वतःला विसरतों आणि भूतकालांत जमा होतों. लहानपणीं कोंकणांत मी असाच रात्रींविरतां भटकलों होतों — कधीं चुडीच्या उजेडांत तर कधीं कंदिलाच्या, पण बहुतेक काळोखांतच. तो पाटाच्या पाण्यानें ओला झालेला काळोख. झाडांच्या विस्तारानें दाटलेला काळोख. क्वचित् आकाशांतील ताऱ्यांच्या प्रकाशानें विरविरित बनलेला काळोख. एकदां एका झाडांतून चीत्कार करीत उडालेल्या व लगेच दुसऱ्या झाडांत गडप झालेल्या पक्षाच्या झेपेनें तो काळोख हेलावला होता. एकदां रानमांजराच्या ओरडीनें तो कंपित झाला होता. एकदां शिडशिडलेल्या पावसानें तो शहारला होता — पण प्रत्येक वेळीं नंतर एक प्रकारच्या दाट, खोल स्तब्धतेचा, नीरव शांतीचा प्रत्यय आला होता. मला त्याची आठवण येते आणि तसाच प्रत्यय आतां येऊं लागतो.

जरा वेळानें आमची पाऊलवाट ओढ्यांत शिरते, ओढ्यांतल्या दरडीवरून उड्या मारते आणि पाण्याचा स्पर्श न होतां पलीकडे जाते. पलीकडे जातांना माझें डावीकडे लक्ष जातें, आणि काळ्याभुरकट पेस्टेलनें काढलेलें एक चित्र नजरेसमोर रेखतें. कांहीं नाहीं, एक साधें शेत, मध्यें छोटेंसें आवार आणि


आवारांत गडीगूप झालेलें कैंवळी घर. लहानपणीं भावंडांबरोबर लपंडाव खेळतांनाचा ‘ सुट्ट्यो ’चा पुकारा मला ऐकूं येतो आणि कोंकणांतले बालपणाचे ठसे अंतःकरणावर उमटवीत मी ओढा ओलांडतों.

ओढा पार होतो आणि आमच्या पाऊलवाटेचा एकदम रस्ता बनतो. रस्ता म्हणजे छोटीशी पांडण. उजवीकडे कमरभर उंचीचा धक्का आणि डावीकडे एकमेकांच्या खांद्याला खांदा भिडवून उभीं असलेलीं घरें. प्रत्येक घरासमोर किनोमियाचा कंदील, पण घरांत मात्र सामसूम. दुरून कसल्या तरी गलक्याचा आवाज येतो, पण तो कानांत सामावण्याची शक्ति आतां नसते. पाय दमलेले असतात. दिवसभराच्या प्रवासाचा थकवा अंगावर पसरलेला असतो. दमलेलीं पावलें थोडा वेळ ओढल्यावर हॉटेलच्या जाळीदार दरवाजाचें दर्शन होतें आणि शरीरांतल्या नसा एकदम मोकळ्या होत आहेत असें वाटतें. हलक्या पावलानें हॉटेलांत पाऊल टाकतों तों हॉटेलची मुलगी हातांत सपाता घेऊन समोर उभी ती आमच्यापुढें येते. कलादार हसते आणि लयदार लवून आमचें स्वागत करते. त्याबरोबर जपानचा साक्षात्कार होतो –आणि अंतःकरणांतल्या कोंकणच्या कळ्या एकदम किसाराणीच्या * फुलांत उमलतात!


हॉटेलच्या पडवींत बूट काढतांकाढतां डावीकडच्या ओसरीकडे लक्ष जातें ओसरीवर बुद्धिबळासारख्या खेळाचे दोन अड्डे सुरू असतात. मीं बुद्धिबळाचा उल्लेख केल्याबरोबर पासीन म्हणतो, “हां सांभाळ. तूं या खेळांचा अपमान करीत आहेस. या खेळाचं नांव ‘गो’. बुद्धिबळाच्या एकदम सातदां तोंडांत भडकवील असा हा खेळ आहे.” पासीनचें म्हणणें मला पटतें. त्या खेळांत गढून गेलेल्यांचे चेहरेच तसें सांगतात. बुद्धिबळें खेळतांनाची त्रस्त व्यग्रता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर सात पटींनीं वावरत असते. मनांतल्या डावपेचांच्या तेढीनें प्रत्येकाचा चेहरा अगदीं ओढलेला असतो. बाहेरच्या जगाविषयींची बेफिकिरी चेहऱ्यावर मख्खपणा धारण करून वावरत असते. सारे एकजात तरुण आहेत—पण आजची जत्रा त्यांच्या गांवींहि दिसत नाहीं. या जत्रेसाठीं मुद्दाम टोकिओहून आलेले आम्ही, पण आमचें आगमन त्यांच्या खिजगणतींतहि नाहीं.

---

* पारिजातकासारख्या पानांचें आणि करवंदीच्यांसारख्या फुलांचें, पारिजातकाची आठवण करून देणारें, एक जपानी झाड.



जपानी जत्रेचें एक दृश्य



निक्कोचें अलंकारिक वास्तुशिल्प

अतामीच्या मानानें हें हॉटेल गरीब. अतामीच्या गोड अनुभवांची पुनरावृत्ति येथें होत नाहीं. म्हणजे तुम्ही खोलींत शिरल्याबरोबर हॉटेलची मुलगी तुमच्या मागोमाग पिसाच्या पावलानें येत नाहीं. तुमच्या अंगावरचें एकेक वस्त्र अलगद हातानें दूर करीत नाहीं. आपलें शरीर लहान मुलाच्या निरागस कुतूहलानें, नि त्याचबरोबर प्रियकराच्या मिस्किल मुग्धतेनें तिच्या स्वाधीन करण्याचा अधुरा अनुभव मिळत नाहीं. हें चालू असतांना अंतः-करणाच्या अवकाशांत फुलपांखरें उडत आहेत असें वाटत नाहीं. न्हाणीघरां-तल्या गरमगरम पाण्यांत तुमच्या शरीरांतला सारा थकवा विरून टाका, असें ती शब्दांत बिलोरी हास्य मिसळून सांगत नाहीं. खरें म्हणजे, शरीर इतकें थक-लेलें असतें, इतकें थकलेलें असतें कीं या हॉटेलमध्यें न्हाणीघर–उष्ण झऱ्याचें न्हाणीघर–आहे का अशी चौकशी करण्याचेंहि मनांत येत नाहीं. मी खोलींत शिरतों नि भरकपड्यांनिशींच अंग ततामीवर झोंकून देतों. मुलीचें कार्य ततामीच करते. तिचा स्पर्श शरीराला विलक्षण विसाव्याचा वाटतो. पण सारीं इंद्रियेंच थकलेलीं असतात. डोळ्यांना बोध होत नाहीं. कान ऐकत नाहींत. अवयव हाल-चाल करीत नाहींत. किती तरी वेळ तसाच पडून राहतों. जरा वेळानें कानांना बोध होऊं लागतो. जवळपास कसलासा गलका सुरू आहे असा भास होऊं लागतो. मरूं दे–असेल जत्रेचाच कांहीं कार्यक्रम–पाहूं उद्यां, असें म्हणून इंद्रियें आवरण्याचा प्रयत्न करतों. पण लवकरच गलक्याला आकार येऊं लागतो. रूप येऊं लागतें. नाटकाविटकांतला संवाद ऐकूं येतोसें वाटतें. जत्रेंतलें नाटक ! शरीरांतली चेतना डोळे उघडते–अंगाला एक झटका देते. मी उठतों. खिडकींतून बाहेर पाहतों. नाटकाच्या स्टेजचा एक कोपऱ्यांतला तुकडा छपरां-च्या दाटीवाटींतून नजरेस पडतो. समोर उघड्यावर बसलेल्या गर्दीचा एक चिंचोळा तुकडाहि दिसतो. मुलें, बाया, बाप्ये–त्यांतला एक उठतो आणि तावातावानें बोलतो. पण त्याच्या हातवाऱ्यांचा वेध घेण्याची शक्ति पेंगलेल्या नजरेंत नसते. मी पुन्हा पडण्यासाठीं वळतों, इतक्यांत मुलगी अंथरूण घेऊन येते. मी अंथरुणावर लोळण घेतों नि डोळे मिटतों. थकलेले डोळे मिटतात, पण झोंपत नाहींत. डोळ्यांपुढें कसलीं तरी पुसट पुसट चित्रें सरकूं लागतात. जरा वेळानें तीं स्पष्ट होतात. कोंकणांत लहानपणीं जत्रेंत पाहिलेल्या नाटकाचीं चित्रें आकारतात. असाच गलका, अशीच थाप, रडणाऱ्या कार्ट्यांना उगी करूं पाहणाऱ्या आयांची अशीच कंटाळलेली नजर आणि नाटक चालू असतांना

उठून, 'अरे काय, तुम्हास आज बाईच अधिक झाली काय?' अशीं नटांना शिवी घालणारा प्रेक्षक !...मिटलेल्या पापण्यांवर तरळणारीं हीं दृश्यें केव्हां उडून जातात कळत नाहीं.

* * *

सकाळीं न्याहरीसाठीं आम्ही तिघेहि माझ्याच खोलींत जमतों. न्याहरीची वाट पाहत असतां पासीन भिंतीवर लावलेल्या एका नोटिशीकडे माझें लक्ष वेधतो आणि मिस्किलपणें हसतो. तें जपानी गौडबंगाल मला कांहीं कळत नाहीं, पण तें कळण्यासाठीं फार वेळ वाट पाहावी लागत नाहीं. पासीन लगेच सांगतो, "ती नोटीस म्हणते कीं पाहुण्यांना एखाद्या सन्मान्य गेशाचा कार्यक्रम करायचा असेल तर पंचवीस टक्के कर द्यावा लागेल, आणि एखाद्या नफेबाज स्त्रीला (म्हणजे वेश्येला) आणायची असेल तर पंधरा टक्के कर द्यावा लागेल." एकंदरींत गेशा महाग. गेशा मनाची करमणूक करते, तर वेश्या शरीराची गरज भागविते. "जपानमध्यें एकंदरींत शारीरिक गरजेच्या वस्तु स्वस्त!'' माझ्या या उद्गारांवर पासीन हसतो आणि योशिए म्हणते, "Padhye, I didn't know you were so wicked."

न्याहरी येते. न्याहरींतल्या भातावर माझी नजर खिळते. कोंकणांत लाल भात असतो, थेट तसाच हा भात आणि त्यांत काळेपांढरे तीळ. पासीन म्हणतो, "हा भात हें आजच्या सणाचं मुख्य पक्वान्न." मला गंमत वाटते. जपानी संस्कृतींत किती कोंकण भरलें आहे हें! मग मी आमच्या धुंधुर्मासाची माहिती सांगतों, तिळाच्या लाडवांचें वर्णन करतों, संक्रांतीच्या सणाचा तपशील रंगवितों आणि माझ्या भातांतले तीळ गोळा करून योशिएच्या भातावर टाकून म्हणतों, "तिळ-गूळ खा आणि गोड बोला!"

आणि मग सणांचें वर्णन करण्याला भरती येते. पासीन आजच्या सणाची माहिती सांगतो. आजचा सण हा किनोमियाचा सण. किनोमिया म्हणजे यावा-तानोचें कुलदैवत. सागरी दैवत. या मच्छिमार गांवाचें आवडतें दैवत. पण किनोमिया कसला! तो महामिस्किल. चावट. सदान्‌कदा खोड्या करण्यांत गुंतलेला. या खोड्या निरुपद्रवी असल्या तर हरकत नव्हती. पण याच्या खोड्या म्हणजे उत्पात. आज काय समुद्रावर एखादें वादळ उठव, उद्यां समुद्राच्या पोटांत एखादें गलबत गडप कर – असे याचे उद्योग. त्याला ताळ्यावर आण-

ण्याचे असंख्य प्रयत्न यावातानोनें केलें. नवससायास झाले. आराधना झाल्या. साकेच्या हजारों बाटल्या रिकाम्या झाल्या. पण किनोमियाचे क्रूर चाळे चालूच. अखेर एक दिवस त्यानें गांवच्या म्होरक्यालाच बुडविलें. तेव्हां मात्र गांव संतापला. याचा पुरा बंदोबस्त करायचा निश्चय झाला. समुद्रकांठच्या गुहेंतून किनोमियाची उचलबांगडी केली आणि त्याला दूर डोंगरावर नेऊन ठेवलें तर त्याचे चाळे बंद होतील, असा पुजाऱ्याला दृष्टान्त झाला. लगेच गांवानें पूर्वेकडच्या डोंगरावर एक सुंदर देऊळ बांधलें आणि किनोमियाला तेथें नेऊन ठेवलें. देऊळ सुंदर आणि ठिकाण रम्य. किनोमिया खूप झाला. समुद्रावरचीं बेभरंवशी वादळें थांबलीं. पण पुजाऱ्याला पुन्हां दृष्टान्त झालाः किनोमियाला समुद्रदर्शनाची फार इच्छा झाली आहे; त्याला एकदां समुद्रदर्शन घडवा. तेव्हांपासून या गांवचे लोक किनोमियाला समुद्रकांठीं मोठ्या समारंभानें आणतात. एक दिवस किनोमिया समुद्रकांठानें हिंडतो, हुंदडतो आणि मग लोक त्याला पुन्हा समारंभानें परत पोंचवितात. आज किनोमियाला परत पोंचविण्याचा समारंभ. किनोमियाच्या या कथेनें आजच्या सणाचा अर्थ मला समजतो आणि त्यांत एक नवीनच रस वाटूं लागतो. जत्रेंत सामील होण्याचा एक नवाच उत्साह अंगांत संचारतो.

* * *

आम्ही किनोमियाची गुहा पाहण्यास जातों. गुहा म्हणजे काय, एक अवाढव्य खबदाड. अगदीं उघडें. येथें बसून बादळाचे तडाखे मनसोक्त चाखण्याची सोय. गुहेंत आम्हांला किनोमिया दिसत नाहींच, पण त्याच्या प्रतिमाहि दिसत नाहींत. दहाबारा लाकडी देव्हारे बेडेवांकडे ठेवलेले आढळतात, पण त्यांपैकीं एकाहि देव्हाऱ्यांत किनोमियाची मूर्ति दिसत नाहीं. फक्त सशाच्या प्रतिमा आणि साकेच्या बाटल्या दिसतात. त्यांत एक मोठा देव्हारा असतो, त्यांत किनोमियाची मूर्ति दिसेल म्हणून मी पाहूं लागतों, पण त्यांत साके-सशाबरोबर फक्त एक चकचकीत धातूचा आरसा दिसतो. मी पासीनला विचारतों,

—या एकाहि देव्हाऱ्यांत किनोमियाची मूर्ति नाहीं हें कसें ?

—मूर्ति ? कसली मूर्ति ? जपान्यांच्या देवळांत मूर्तिबिर्ति कांहीं नसते.

—म्हणजे ?

—म्हणजे म्हणून काय विचारतोस ? अरे, देव कधीं दिसतो काय ? तो अदृश्य असतो. मग त्याची मूर्ति कशी बनवायची ?

—आणि तो आरसा ?—ती साकेची बाटली ?

—आरसा म्हणजे आत्म्याचें प्रतीक.

—आणि ती साके ?

—साके हवीच. ती आत्म्यापेक्षां अधिक आकर्षक आणि अधिक वास्तव.

—आच्छा ! म्हणजे, आत्म्याचा शोध लावायचा असेल तर आधीं भरपूर साके प्या, असा किनोमियाचा संदेश आहे !

('पाध्ये, यू आर व्हेरी व्हेरी मिस्चिव्हस'—योशिए.)

—बरं, हा ससा कशाला ?

—ससा ? ससा नव्हे तो वेड्या. कोल्हा.

—कोल्हा ? जपानी कोल्हा सशासारखा दिसतो कीं काय ? बरें, तो इथें कशाला ?

—अरे, कोल्हा हा किनोमियाचा आवडता प्राणी – तुमच्या शंकराच्या नंदीसारखा.

—कां ?

—आपल्या व्रात्य उद्योगांत त्याचा उपयोग होतो म्हणून. कोल्ह्याबद्दलच्या जपानी लोकांच्या समजुती तुला माहीत नाहींत वाटतें ? अरे, कोल्हा हा महा-मिस्किल अन् महाबिलंदर. हव्या त्या प्राण्याचें अगर व्यक्तीचें रूप घेऊन लोकांना हुलकावणी देण्यांत वाकबगार. मच्छीमारीला गेलेले कोळी एखाद्या बेटावर उतरले म्हणजे किनोमिया कोल्ह्याला सुंदर तरुणीचें रूप घेऊन तिकडे पाठवी, आणि ते कोळी तरुणीच्या लीलांत रमले कीं इकडे वादळ उठवून त्यांचीं गलबतें बुडवी !

किनोमियाचें कौतुक करीत आम्ही पलीकडच्या टेकडीवर जाण्यासाठीं निघतों. तोंच गुहेच्या आवारांतच एक स्तंभ दिसतो. स्तंभ म्हणजे कातळांत रोवलेला एक लाकडी खांब आणि त्याच्या मुंधांत काळ्याकाळ्या गोट्यांची रास. "हें काय ?" मी विचारतों. "हें त्या किनोमियानें बुडविलेल्या गांवच्या म्होरक्याचें स्मारक." ते देव्हारे आणि तें स्मारक – आजच्या सणाचें रहस्य या दोहोंत सामावलेलें दिसतें.

टेकडीचा आकार मोठा विलक्षण असतो. एका खडकावर दुसरा, दुसऱ्या-वर तिसरा, अशी ती चढत जाते. आम्हीहि तसेच चढत जातों. धारेवर येतों तों समुद्र आणि खालीं टेकडी – एका कराळ कड्याच्या रूपानें तुटलेली. मी

कड्याच्या कांठावर जातों आणि खालीं नजर टाकतों. कड्याच्या पायथ्याशीं लाटांचा राक्षसी खेळ सुरू असतो. एक पिसाळलेली लाट येते, खसकन् फुटते आणि लगतच्या घळींत लपकन् शिरते. शिरते नि फेंसाळून परत येते. परत येतांना थोडी लालट होऊन येते. पासीन सांगतो, परत येतांना लाट थोडी लाल वाळू घेऊन येते; पण लोकांना वाटतें, यांत रक्त मिसळलेलें आहे – किनो-मियाच्या एखाद्या उपद्यापाचें.

परत येतांना रस्त्याच्या कडेला एक खांब पडलेला दिसतो, आणि पासीन थबकतो. त्या खांबापाशीं जातो. खांब खरोखर नमुनेदार असतो. लाकडाचें रेषासौंदर्य दाखविण्याच्या जपानी कलेचें कौशल्य त्या खांबांत पहिल्या नजरेंतच दिसतें. एखाद्या स्त्रीच्या नितळ मानेवर लवदार केसांची माया दिसावी तशा त्या खांबाच्या रेषा दिसतात. त्या खांबाच्या टोकाचें कोरीव काम हा त्याच्या सौंदर्याचा अक्षरशः कळस असतो. पासीनच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटतें – हा स्तंभ असा बेवारशी कां पडलेला बुवा?

—बेवारशी? मी विचारतों.

—वास्तविक आजच्या सणांत या स्तंभाचें फार महत्त्व. दर वर्षी त्या गुहे-पासून जत्रेच्या चौकापर्यंत तो उचलून नेण्याची शर्यत लागते. हा दिसतो नाजुक, पण त्याचें वजन भारी आहे. त्यांतली ती गांठ पाहा, म्हणजे खात्री पटेल. मी मी म्हणविणाऱ्या तरुणांचा दम उखडतो तो. पण यंदा असा बेवारशी कां पडलेला बुवा?

शेजारच्याच आवारांत एक इसम पार्सिमनचीं फळें निरखीत असतो त्याला पासीन विचारतो; आणि तो सांगतो कीं, यंदा हा स्तंभ उचलून नेण्याच्या शर्यतींत भाग घेण्यासाठीं कोणी तरुण पुढें सरसावलाच नाहीं. दिवसेंदिवस तरुण मंडळीचें या असल्या सणांत लक्षच नाहीं. गांवांत सण उसळतो आणि हे तरुण गांवांत उनाडक्या करीत हिंडतात, नाहीं तर 'गो'चे अड्डे मारून बसतात. मला लगेच हॉटेलच्या ओसरीवर खेळत बसलेल्या त्या 'गो'–भक्तांची आठवण होते. काल रात्रीं आम्ही आलों तेव्हां ते जे 'गो'च्या अड्ड्यावर ठाण मारून बसलेले होते ते आज सकाळीं आम्ही बाहेर पडलों तेव्हां तेथें कायमच होते. काल त्यांनीं आमच्याकडे ढुंकून बघितलें नव्हतें आणि आज सकाळींहि बघितलें नव्हतें. या बहाद्दरांचा विचार करीत करीत आम्ही परत येतों आणि

येतांक्षणींच माझें लक्ष त्यांच्याकडे जातें. त्यांचे चेहरे तसेच आक्रसलेले असतात. त्यांची नजर तशीच गढलेली असते. त्यांची वृत्ति तशीच मख्ख असते. मला खरोखर त्यांच्या निष्ठेचें कौतुक वाटतें.

पण त्या कौतुकांत रमून जायला अवसर मिळत नाहीं. क्षणार्धांत आमच्या भोंवतीं मुलांचा गराडा पडतो. आळींतलीं झाडून सारीं मुलें आमच्या भोंवतीं गोळा होतात. एकमेकांच्या मागेंपुढें सरकून आमच्याकडे टक लावून बघतात. आमच्याकडे म्हणजे माझ्याकडे. माझा अवतारच तसा असतो. एक हिंदी माणूस तीं प्रथमच पाहत असतात. लांडा जपानी युकाता चढविल्यामुळें त्याचे पाय उघडेओके नागवे दिसत असतात. मला मात्र हा मुलामुलींचा मेळावा पाहून खूप गंमत वाटते. अंगणांत अवचित पांखरांचा थवा येऊन किलबिलावा तसें वाटतें. मुलींचे ते छोटेछोटे शेंदरी, गुलाबी रंगांचे किमोनो, त्यांवरच्या बाहुल्यांच्या गोंडस आकृत्या, त्यांच्या झुलत्या तरंगत्या बाह्या; निमुळत्या काळ्याभोर डोळ्यांतलें अधीर, उत्सुक, लाजवट हसूं. माझें मन कोथिंबिरीच्या वाफ्यासारखें मोहरून जातें. आणि ते मुलगे–जपानी मुलगे. छोटेछोटे, एवढ्याशा बांध्याचे, नितळ चेहऱ्याचे, निर्मळ नजरेचे! नेहमींच्या खरी बुटावर, लांड्या पाटलोणीवर निळ्या रंगाचा, पाठीवर किनोमियाच्या अक्षराचा लाल छाप असलेला सैलसा अंगरखा चढविला, नितळ डोक्याला एक पांढरा फडका टापशीसारखा बांधला, कपाळाला पांढऱ्या चंदनाचा उभा नाम फांसला, आणि कमरेला आवळलेल्या पट्ट्याला एक छोटीशी तरवार अडकवून दिली, कीं झालों आपण या सणाचे सैनिक–अगदीं सामुराईचे अवतार–असें त्यांना वाटत असावें. माझ्या मनांत विचार येतो, आणखी दहाबारा वर्षांनीं हे मुलगे या सणाकडे पाठ फिरवून 'गो'च्या अड्ड्यांत रमणार!

पण हा विचार फार वेळ ठरत नाहीं. या मुलांच्या दुधाळ ओठांवर नाचणारा सणाचा आनंद दिसतो. त्यांच्या कोवळ्या चेहऱ्यांवरची क्षणांत उमलणारी, क्षणांत मावळणारी निरागस माया नजर टिपते. त्यांच्या इवलाल्या मूर्तींची इवलाली हालचाल डोळ्यांचा वेध घेते. त्यांच्या हातांतल्या धरफेंकीच्या चेंडू-बरोबर माझी दृष्टि खेळते आणि नाजुक जिवणीवर ओघळलेला कँडीचा आमसुली मुखरस अलगद पुसणाऱ्या बाहीबरोबर ती फडफडते. माझ्या क्यामेऱ्याला याहून अधिक उत्कृष्ट विषय कोणता? मी क्यामेरा सरसावतों नि मुलें खूष होतात. फोटोसाठीं ग्रूप करण्याची धांदल सुरू करतात. एकमेकांना ओढतात,

खेंचतात. मी बांधाकडच्या फुलझाडांकडे जाऊन क्यामेरा रोखतों. इतक्यांत फुलझाडावरची एक गांधीलमाशी चवताळून उठते आणि माझ्या हाताला कडाडून डसते. माझ्या बोटांत वेदनेची सणक उठते आणि मी हात झाडतों. मुलांना त्याचीच गंमत वाटते. तीं खिदखिदळून हसतात, आणि मग मीहि हसतों, पण बोट ठणकत असतें. कसा तरी फोटो काढतों आणि बोटाकडे नजर टाकतों तों बोट चांगलें सुजलेलें. पासीनला दाखवतों, पण तो एक खट्याळ हास्य करून म्हणतो, " किनोमियाची मधांशीं चेष्टा केलीस ती ! "

* * *

जरा वेळानें आम्ही जत्रेच्या चौकांत फेरफटका करावा म्हणून निघतों. आमच्याबरोबर कांहीं मुलेंहि येतात. त्यांतली एक मुलगी फारच गोड असते. मी तिचा गालगुच्चा घेतों. त्याबरोबर तिच्या पाठुंगळीला असलेलें छोटेंसें मूल रडूं लागतें. ती मात्र लाजते, मुरडते, खुशालते, आणि माझी दोस्त बनते. पण आमची मैत्री मुकी. मला तिच्याशीं खूप खूप बोलायचें असतें. पण बोलतां येत नाहीं. म्हणून नुसताच हसतों आणि ओथंबलेल्या नजरेनें तिच्या नजरेंत पाहतों. मीं असें पाहिलें कीं तिची नजर गोंधळते, ओशाळते, आनंदते. आमचा हा एक खेळच सुरू होतो. अन् मग तिच्या पाठुंगळीच्या मुलालाहि समजतें कीं हा मित्रपक्षांतला आहे, आपल्या ताईचा दोस्त आहे. त्याचें रडणें पार पळतें.

चौकाच्या तोंडाशींच दोन हातगाड्यांवर अष्टपादाचीं (ऑक्टोपसचीं) सोंगें सजवून ठेवलेलीं दिसतात. एकाला विदूषकाचें रूप दिलेलें असतें तर दुसऱ्याला अस्वलाचें ! दुपारीं किनोमियाच्या मिरवणुकींत हीं प्रकरणें सामील होणार ! हा धार्मिक समारंभाला दिलेला ' लाइट टच् ' ! त्या भयंकर जलचराला विनोदाचें साधन बनविण्याची ही युक्ति, खोडकर किनोमियाला डोंगरावरच्या देवळांत अडकून ठेवण्याच्या युक्तीइतकीच मजेदार !—हा विचार माझ्या मनांत येतो तोंच समोरच्या सताड उघड्या मांडववजा घरांत ठेवलेली मिकोशी दिसते आणि तिच्या वैभवानें आणि सौंदर्यानें माझी नजर एकदम बांधली जाते. मिकोशी म्हणजे शिंटोपंथीय देवळाची प्रतिमा. जपानी देवळाच्या वास्तुशिल्पाची सारी किमया या मिकोशींत गोळा झालेली असते. जपानी मंदिराचें वैभव त्याच्या छपरांत असतें तसें या मिकोशीचेंहि असतें. लाकडाचें कोरीव काम, लाखेचें रंगकाम आणि पितळेचें नक्षीकाम यांचा तसाच वर्षाव या मिकोशीवर झालेला

दिसतो. पण माझें लक्ष मिकोशीच्या तोरीवर खिळतें. मंदिराची ही प्रतिमा बनवितांना कलाकार तोरीलाहि विसरलेला नाहीं. कसा विसरणार? तोरी हा जपानी मंदिरांच्या वास्तुशिल्पाचा एक चमत्कारच. तोरी म्हणजे मंदिराचें प्रवेशद्वार. आपल्या सांची स्तूपाचें प्रवेशद्वार मनांत आणा म्हणजे तोरीची कल्पना येईल. पण दोहोंत कोण फरक! सांचीचा दरवाजा म्हणजे सालंकृत शिल्पाचा मुक्तविलास. उलट तोरी म्हणजे साध्या सौंदर्याचा निर्लेप नमुना. तोरीचें सौंदर्य हें साध्या, सलग, नितळ रेषांचें सौंदर्य आहे. एखाद्या आदिवासीनें सहज भिंतीवर ओढलेल्या रेषेचें सौंदर्य असतें तसें. मेघदूतांतील एखाद्या ओळीची ओवीशीं तुलना करा म्हणजे सांचीच्या प्रवेशद्वाराची या प्रवेशद्वाराशीं तुलना होईल. पण मला सांचीइतकें दूर जावें लागतच नाहीं. समोरच्या मिकोशीचें सालंकृत सौंदर्य आणि तोरीचें हें साधें, सहज सौंदर्य यांचीच तुलना पुरते.

पासीन मला एका कैंबळी झोपडीकडे नेऊं लागतो. मी विचारतों, कसली झोपडी ही? पासीन म्हणतो, पाहा म्हणजे समजेल. ही झोपडी अशी भर चौकांत कां? पासीन उत्तरतो, तें तूं त्या झोपडीलाच विचार. झोपडीपाशीं गेल्यावर मात्र समजतें कीं ही झोपडी नव्हे, तर रथ – किनोमियाचा रथ. हा रथ इथें असा कैंबळ्यानें शाकारून कां ठेवला आहे? या प्रश्नाचें उत्तर मिळत नाहीं. तेव्हां मी आपला रथाच्या प्रवेशद्वाराचें कलाकौशल्यच पाहूं लागतों. पण त्यांतली कारागिरीची सांकेतिक उधळण माझें मन पकडूं शकत नाहीं. म्हणून मी रथाच्या बाजूकडे वळतों आणि एकदम ट्रॅन्स्फर सीन झाल्यासारखें वाटतें. आतां संकेत सुटतात आणि कलेची सळसळ सुरू होते. तेथें झाडावरचे बगळे, चिनी सर्पराक्षस असलीं सांकेतिक दृश्यें दिसत नाहींत, तर जपानी जीवनांतलीं आणि जीवनांत भिनलेल्या लोककथांतलीं दृश्यें आढळतात. एकमेकांच्या अंगावरच्या उवा मारणारीं माकडें, पंख फांकून भांडणाऱ्या कोंबड्या, चौखूर उधळलेले घोडे, मुलांशीं बागडणारे कुत्रे, औषध कुटणारा नोकर, पंख्यानें वारा घेणारी स्त्री आणि प्रियेसहवर्तमान चेरीचा मोहर पाहण्यांत दंग झालेला सामुराई – या दृश्यांच्या कोरीव शिल्पानें मी भारला जातों आणि एक प्रकारच्या तंद्रींत तीं दृश्यें पाहात रथाला प्रदक्षिणा घालतों.

या तंद्रीच्या आधीन होऊनच मी त्या चौकांत हिंडतों. इकडेतिकडे उगाच भटकतों. वाऱ्याची एक सुस्त लहर येऊन कागदाच्या कपट्याशीं घोटाळून जाते, तिची गति पाहतों. एक लड्ड मांजर घराच्या दाराशीं बसून तोंड पुशीत असतें

त्याची हालचाल बघतों. उघड्या घरांत अकारण दृष्टि टाकतों. एक फेरीवाला रात्रींचा राहिलेला माल विकीत असतो, त्याच्या समोर उभा राहतों. तो माझ्याकडे पाहतो, पण त्याच्या नजरेंत साधें कुतूहलदेखील दिसत नाहीं. मी एका मुलाला उचलून घेतों नि तें रडूं लागतें तेव्हां त्याला घ्यायला आलेल्या बाईच्या चालण्यांत कांहीं जोम दिसत नाहीं. चौकांत दोघेचौघे एक प्रचंड दारूच्या पिंपासारखा ढोल एका बांबूला बांधीत असतात, त्यांच्या हातांत कांहीं जोर भासत नाहीं. साऱ्या चौकावर एक प्रकारची सुस्ती पसरलेली असते. काल येथें नाटकाचे रंग उधळले. आतां त्या रंगाची धूळ झाली आहे. दोन दिवसांच्या धबडग्याचा शीण साऱ्या वस्तूंवर, साऱ्या वृत्तींवर, साऱ्या हालचालींवर पसरला आहे. त्यांतच, आज हा सण संपणार, खेळ खलास होणार, याची रंजीस जाणीव मिसळलेली असते.

* * *

पण दोन वाजतां आम्ही चौकांत परत येतों तों तेथें उत्साह नुसता नाचत असतो. बायका, पुरुष, मुलें गर्दी करून तयार असतात. त्यांतच मुलांची धांदल. धांदल आणि धांवपळ! लाल झोऱ्या इकडेतिकडे धावत आहेत; किमोनोच्या रंगीन बाह्या फडफडत आहेत; पाठीवरचीं अक्षरें दुपारच्या उन्हांत तकतकत आहेत; बिलोरी बोल एकमेकांत मिसळत आहेत; डोळ्यांवरच्या पापण्या उत्सुकतेनें उडत आहेत—मुलांच्या उत्साहास अंत उरत नाहीं. पण अद्याप पुजाऱ्यांचा पत्ता नाहीं आणि गांवच्या म्होरक्यानें दिलेल्या जेवणांत गुंतलेल्या मानकऱ्यांचा पत्ता नाहीं.

इतक्यांत पुजारी अवतारतात. लगेच झोऱ्या थबकतात, बाह्या स्थिरावतात, बोल थंडावतात, पापण्या टवकारतात. पण पुजारी मंडळी आपल्या डोक्यावरची चहाच्या किटलीवरील टिकोजीसारखी काळी टोपी मागची पुढें आणि पुढची मागें सरकविण्यापलीकडे कांहींच करीत नाहींत. मला तो पुजाऱ्यांचा अवतार मजेदार वाटतो. तोंडांत पांढऱ्या कागदाचे कपटे, अंगांत सफेत सैल चोळणा आणि अजागळासारख्या बाह्यांचा अंगरखा, आणि या पांढऱ्या पोशाखाचें महत्त्व मिरविणारी मुद्रा. जपान्यांच्या मतें पांढरा रंग हा पावित्र्याचा रंग; काळींकुट्ट पिशाचें त्याला घाबरतात. या पांढऱ्या रंगाचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविण्यासाठीं कीं काय, एक पुजारी उठतो आणि कागदी चिर-

फळ्यांची एक भलीथोरली चवरी ढाळीत पुढें सरसावतो. पण लोक त्याची दखल घेत नाहींत. ते स्वतःतच दंग असतात. बायका किमोनोच्या बाहीआड तोंड लपवून खिदळत असतात. पुरुष एकमेकांशीं गंभीर चेहऱ्यानें मसलती करतात. आणि मुलें कंटाळून जाऊन एकमेकांना ओढतात किंवा ढकलतात. आपल्याकडे कोणीच लक्ष देत नाहीं असें पाहून तो चवरी-ढाळ्या पुन्हां आपल्या जागेवर जाऊन बसतो. इतक्यांत गांवचे मानकरी हलत-डुलत, ढेकर देत हजर होतात. त्यांतले कित्येक फडतूस असतील, पण पोशाखाचा रुबाब त्यांच्या चेहऱ्यांवर वावरत असतो. हा पोशाख म्हणजे एक काळा किमोनो, त्यावरून बांधलेला तपकिरी रंगाचा परकर आणि या साऱ्यावर मजेत रुळणारा एक काळा कुळकुळीत झगा !

आतां मिरवणुकीची रांग लागते. सर्वांच्या पुढें तो ढोल. त्याच्या मागें पुजाऱ्यांचा ताफा. नंतर गांवचे मानकरी. नंतर तो चवरीढाळ्या. मग खांद्यावर मिकोशी धारण केलेले पुजारी – आणि त्या साऱ्यांच्या मागें तीं अष्टपादादि प्रकरणें. सारे जण 'चलो, हुश्शार!'च्या तयारींत शक्ति ताणतात. पुजारी 'टिकोजी' सरकवतात. चवरीढाळ्या चवरी सरसावतो. मानकरी रुमालानें तोंड पुसतात. मिकोशीधारी मिकोशी या खांद्यावरून त्या खांद्यावर नेतात. पोरें हात-गाड्यांच्या दोरखंडांना हात आवळून पकडतात. आणि कांहीं बाया, मुंबईच्या म्युनिसिपल मास्तरणी राजाबाई टॉवर पाहायला निघालेल्या मुलांना रस्त्यावर राखण्यासाठीं जिवाचा आटापिटा करतात तसा, या मुलांना दोरखंडांना जखडून ठेवण्याचा आटापिटा करण्यासाठीं त्यांच्या शेजारीं पाय गेट्यांत रोवून उभ्या राहतात. इतक्यांत एक पुजारी हातांत झाडाचा टाळा धारण करून पळतपळत येतो, मिरवणुकीच्या अग्रभागीं येऊन ठाकतो आणि एकदम अंगांत आल्या-प्रमाणें स्नायुदार गळ्यानें ओरडत आणि हातांतला टाळा हवेंतच आपटीत चालूं लागतो. "हा असें काय करतोय् ?" मी विचारतों. पासीन उत्तरतो, "तो पिशाच्चांना शापतो आहे आणि बडवतो आहे !"

त्या पुजाऱ्याच्या अंगांत पिशाच्च नाहीं तरी पिशाच्चाला घातलेल्या शिव्या शिरतात—त्याच्या पायांत भलताच जोर येतो. चालतांचालतां तो पळूं लागतो. तो पळतो म्हणून ढोल पळतो. ढोल पळतो म्हणून चवरी पळते. चवरीबरोबर मिकोशी पळते. आणि या साऱ्यांच्या पावलांबरोबर पाऊल राखण्यासाठीं गांवचे मानकरीहि पोटांतलें जेवण आणि साके सांभाळीत धडपडूं लागतात.

अर्थात पोरांनाहि चेव चढतो. तीं हातगाडीचें दोरखंड खेचतात, आणि कोलमडून पडतात. कांहीं हसतात, कांहीं दांतओठ खातात, आणि एकदोन रडूंहि लागतात. पण त्यांच्या 'मास्तरणी' त्यांना सांभाळतात आणि पोरें आपल्या गतीनें चालू लागतात. पण त्यांची गंमत पाहत बसायला मला फुरसत नसते. मला किनोमियाची संगत सोडायची नसते. मीहि पळूं लागतों.

पण पुजाऱ्यांचे पाय चौखूर उधळतात. त्यांच्या तोंडून शिव्यांबरोबर फेस येतो. ढोल झिंगून जातो. चवरीला फेंफरें येतें. मिकोशी बावटळते. मानकऱ्यांची प्रतिष्ठा झुकांड्या खाऊं लागते. साऱ्यांच्या अंगांत कसें वादळ संचारतें—नि किनोमिया खूष होऊन जातो.

पुजाऱ्यांच्या पावलाला पाऊल भिडविण्याची ताकद माझ्यांत नसते. शिवाय सभोंवतालचा निसर्ग माझें पाऊल अडखळवीत असतो. यावातानो हें इतर चार खेड्यांसारखेंच एक खेडें – प्रवासखात्याच्या मार्गदर्शिकेंत त्याचा उल्लेख नसतो. उलट जपानचीं कांहीं विख्यात सौंदर्यस्थळें मीं अगोदरच पाहिलेलीं होतीं. आराशियामा येथील ओई नदीवरच्या लाकडी पुलावर उभा राहून पलीकडच्या टेकडीवरील वनश्रीची रंगीन जादू मीं अनुभवलेली होती. हॅकोनेच्या एका शिखरावर उभा राहून तळच्या तळ्यांतील नौकांचा विहार मीं बघितलेला होता. निक्को येथें सुगीच्या दुतर्फा रांगांतल्या रस्त्यावर उभा राहून त्या जगप्रसिद्ध वृक्षांची प्राचीन सावली मीं घेतलेली होती. ओइसोच्या पुळणीवर लोळतलोळत पॅसिफिकच्या लाटांवर स्वार होऊन हवाईचीं स्वप्नें मीं रंगविलेलीं होतीं. त्या मानानें येथला निसर्ग साधा. पण तो माझ्या परिचयाचा असतो. लहानपणीं नादवलीला जो निसर्ग अंतःकरणांत शिरला आणि स्थिरावला त्याच्याशीं त्याचें सख्खें नातें असतें. रस्त्याकांठच्या पसबलेल्या भाताचा उग्रमधुर गंध आतां तसाच नाकांत शिरतो. शेतांतल्या बिलोरी पाण्याची किणकिण कानांभोंवतीं तशीच रेंगाळते. भाताचीं रोपें वाऱ्याच्या झोताबरोबर आपल्या लयदार माना तशाच लववीत जातात. आणि या साऱ्याकडे दुतर्फा डोंगरावरचा निसर्ग मुग्ध कौतुकानें तसाच पाहत असतो. पण मी या डोंगरांच्या रांगांकडे जरा नजर लावतों आणि आंत कांहीं तरी खटकतें. ध्यानांत येतें कीं—कोंकणच्या डोंगरावर चिडाच्या अष्टवक्र झाडांनीं उमटतात तशा चित्राकृति नाहींत. त्या डोंगरावरील वनश्रीला अशी नाजुक नक्षीदार कळा नाहीं. सुगीच्या झाडाची कलापूर्ण उभार अंजनाच्या झाडांनाहि नाहीं—आणि कोंकणचे डोंगर असे स्नेहाळ

वाटत नाहींत. क्षणभर मन खट्टू होतें. पण अंतरंगांतला अभिमान उफाळतो नि लगेच म्हणतो, पण डोंगरावर एकाकी उभ्या राहणाऱ्या सात्विनाची मिजास येथें कुठें आहे? अभिमानांत आव्हान असतें, पण मनाची रुखरुख दूर होत नाहीं.

ती दूर सारण्यासाठींच मी पळूं लागतों. पाय पळत असतात आणि दृष्टि समोरच्या देखाव्यावर खिळलेली असते. तो देखावा आजहि दृष्टिसमोरून हलत नाहीं. दोनहि बाजूंचे डोंगर येऊन एकमेकांना मिळत आहेत. ते जेथें मिळतात तेथल्या तिकोनाला आडवा बांध टाकून पुरुषभर उंचीचा प्राकार तयार करण्यांत आला आहे. प्राकारावर किनोमियाचें मंदिर आपलें शोभिंवत शिखर घेऊन उभें आहे. प्राकाराच्या पायऱ्यांवर मंदिराची तोरी आपल्या साध्या, शुद्ध, सलग सौंदर्याचें वरदान घेऊन सर्वांच्या स्वागतासाठीं सज्ज आहे. प्राकाराच्या मागें शक्ति आणि सौंदर्य यांची एकदम प्रतीति आणून देणारे सुगीचे वृक्ष, सहस्रार्जुनाप्रमाणें आपलीं शृंगारलेलीं मस्तकें आकाशाला भिडवून, आपलीं सामर्थ्यशाली पावलें भूमीवर रोखून आणि आपले सुंदर सालंकृत बाहू दिमाखानें उभारून दुतर्फा उभे आहेत, आणि त्यांच्या मधून जाणारा अवाढव्य पायऱ्यांचा रस्ता स्वर्गसोपानाप्रमाणें भासत आहे. त्या देखाव्यांत स्वर्गाचें सौंदर्य आणि धरेची वास्तवता यांचें मीलन झाल्यासारखें वाटतें. मी क्षणभर स्वस्थ उभा राहतों. त्या देखाव्याकडे डोळे भरून पाहतों. सारीं इंद्रियें डोळ्यांत जमा झाल्याची एक अपूर्व जाणीव होते आणि मन एक प्रकारच्या पावित्र्यानें, परिपूर्तीनें, गूढतेनें भरून जातें. मला एकदम चार वर्षांपूर्वी पाहिलेल्या दापोलीच्या केशवराजाचें स्मरण होतें. किनोमिया आणि केशवराज— एकानें दुसऱ्याचा साक्षात्कार होतो, निसर्गसौंदर्यातील दैविकतेची प्रतीति येते, आणि आंत, अंतरंगांत परिपूर्तीचा शांत, संतुष्ट प्रवाह वाहूं लागतो. कोंकण आणि जपान यांच्यामधला भौगोलिक भेद आणि अभिमान आतां गळून पडतो आणि निसर्ग व मानव यांना जोडणाऱ्या सनातन संबंधाची निर्भर जाणीव तेवढीच उरते.

आतां एका पावन वृत्तीनेंच मी प्राकाराच्या पायऱ्या चढून जातों. जातों तों ती धांवतपळत आलेली पार्टी आतां स्थिरस्थावर झालेली दिसते. प्राकाराच्या मधोमध ढोल आपलें बेढब रूप घेऊन पडलेला असतो. आपल्या सौंदर्यानें आत्मरत बनलेली मिकोशी एका मंडपाखालीं अलिप्त आविर्भावानें उतरलेली

असते. पावित्र्याचा दिमाख मिरवणारी चवरी एका झाडाच्या मुंधाशीं अगतिकपणें आडवी झालेली असते. पुजाऱ्याच्या तोंडांतले शाप शांत झालेले असतात. त्याच्या हातांतला टाळा जमिनीवर लोळत असतो. कांहीं वेळापूर्वी चौखूर उधळणारे पुजारी मंडपासमोर रांग लावून स्वस्थ बसलेले असतात आणि गांवाचे मानकरी आपल्या पोशाखाची प्रतिष्ठा सांभाळीत गंभीर चेहऱ्यांनीं इकडे तिकडे फिरत राहतात, नाहीं तर एकमेकांशीं खलबतांच्या गंभीर आविर्भावानें बातचीत करीत असतात. आणि मी–मला यांत कांहींच स्थान नसल्यानें–प्राकाराच्या प्रवेशद्वारापाशीं येऊन मिरवणुकींतल्या इतर प्रकारांची प्रतीक्षा करीत राहतों. मधुनमधून तोरीचें सौंदर्य न्याहाळतों आणि तोरीच्या दोन बाजूंस उभारलेल्या उभ्या पताकांवरच्या चित्रलिपीचें गूढ उलगडतें का याचा विचार करतों. अखेर पासीनचें साहाय्य घेतों आणि पासीन सांगतो, "या पताका, 'महान् देव किनोमिया' आणि 'दक्षिण जपानमधील सर्वश्रेष्ठ मंदिर' यांचा जयजयकार करीत आहेत." मी कांहींच बोलत नाहीं. मनांतल्या मनांत एवढेंच विचारतों कीं, या दक्षिणेंतल्या सर्वश्रेष्ठ मंदिराचा पत्ता टोकिओच्या प्रवासव्यवस्थाविशारदांना नाहीं हें कसें?

इतक्यांत एक मिरवणूक येते—अष्टपाद विदूषकाची. हा विषदूक एकटा नसतो. त्याला चांगल्या चालत्याबोलत्या, नाचत्या, अगदीं उंडारलेल्या विदूषकांची सोबत असते. या विदूषकांच्या सोंगांत कांहीं कमतरता नसते. आणि कमतरता पडूं नये म्हणून हातांत साकेच्या बाटल्या असतात. ते त्या एकमेकांच्या तोंडांत आणि मधूनमधून अष्टपाद विदूषकाच्या तोंडांत ओतीत असतात. कांहींच्या तोंडांना मुखवटे असतात आणि ज्यांच्या नसतात त्यांच्याहि चेहऱ्यांना साकेच्या कृपेनें मुखवट्यांची कळा आलेली असते. साकेचा प्रभाव केवढा असतो याची पूर्वी मला कल्पना नव्हती. साकेशीं माझा परिचय फारच माफक होता. तो कोमल होता. मोतिया हास्याच्या शोभेनें आणि नाजुक हातांच्या स्पर्शानें तो सुंदर बनलेला होता. त्यांत पानापेक्षां अनुपानाह्लाच अधिक महत्त्व होतें. एका उपाहारगृहांतल्या छोट्याशा खोलींतलेंच त्याचें वास्तव्य आणि एका मुलीच्या हातून पेला घेऊन पिणें व लगेच तो भरून तिला देणें–फार तर याची पुनरावृत्ति करणें—एवढाच त्याचा उपचार मला माहीत होता. साकेचा असा धांगडधिंगा मीं पूर्वी पाहिलेला नव्हता. पण आतां तो अगदीं नजरेवर आदळतोच! आणि साकेचा सर्वगामी प्रभाव अंतःकरणांत शिरतो. साके तोंडांत पडली तर

आत्मा चळतो आणि बाहेर पडली तर शरीर चळतें ! असाच एक अंतर्बाह्य चळलेला पुरुष साकेची एक भली थोरली बाटली गदेसारखी फिरवीत झपाझप पायऱ्या चढत प्राकारांत शिरतो आणि गांवच्या मानकऱ्यांच्या तोंडांना ती लावण्याचा प्रयत्न करतो. कांहीं तोंडें फिरतात, कांहीं तोंडें वासतात — आणि कांहीं पलीकडचीं, नुसतेंच प्रेक्षकाचें काम करणारीं, किमोनोच्या बाहीआड लपून खुदखुदूं लागतात.

इतक्यांत एक स्त्रियांची मिरवणूक येते. धुळीच्या वादळानंतर गारगार वारा यावा तशी. ही मिरवणूक नृत्याचीं पावलें टाकीत येते. निमग्न पावलें टाकीत येते. विदूषकांच्या मेळ्याकडे दुर्लक्ष करते आणि पुढें सटकून नृत्याच्या पावलांनींच प्राकाराच्या पायऱ्या चढते. वर येते, मधोमध ठेवलेल्या ढोलाभोवतीं फिरते आणि ढोलासभोवतीं फेर भरून नाचूं लागते. सरळ रेषेचें वर्तुळ बनतें, चेहऱ्याकडे चेहरा वळतो, नेत्रांना नेत्र मिळतात, लयींत लय मिसळते — प्रत्येकीचें नृत्य एका विशाल नृत्याच्या वलयांत विलीन होतें. नृत्य साधेंच असतें. हात वर जातात, डोक्यावर झुळतात, खालीं येतात. पुन्हां झुळतात — एकदां एका बाजूला, एकदां दुसऱ्या बाजूला, पुन्हां वर. प्रत्येक वेळीं पावलांच्या आघाताला साथ करीत एकादें कमळ उमलावें, पाकळ्या पसरून विस्तारावें आणि पुन्हां मिटावें, तशा आकृति उमलतात, उघडतात, बदलतात, बदलते रंग धारण करतात. मध्येंच एक स्त्री हळूंच उडी मारते, जागा बदलते, तिच्या जागीं दुसरी येते, एका किमोनोऐवजीं दुसरा किमोनो येतो, रंग पालटतो आणि साऱ्या नृत्याचें रंगीन दर्शन बदलून टाकतो ! पण या साऱ्यावर एक तंद्री असते — सात्त्विक तंद्री, श्रद्धाशीलतेची तंद्री, कर्तव्यपूर्तीची तंद्री. या तंद्रींतच पावलें पडत असतात, हात झुळत असतात, आणि किमोनोचे रंग बदलत असतात.

पाहतां पाहतां स्त्रियांच्या नृत्यांत पुरुष सामील होतात. मोगऱ्याच्या फुलांत झेंडूचें फूल शिरतें. पण ती तंद्री अद्याप शिल्लक असते. इतक्यांत साकेची जरा फाजील आराधना केलेला एक मानकरी नृत्यांत सामील होतो नि ती तंद्री भंगते. नृत्यांतल्या एकदोन स्त्रियांना हसूं फुटतें. त्या तें सांवरतात, तरी पण त्यांच्या निमुळत्या डोळ्यांभोंवतालच्या वळ्यांत रेंगाळतांना तें दिसतेंच. इतक्यांत आणखी एक साकेभक्त नृत्यांत शिरतो. त्याच्या साकेचा अंमल त्याच्या कपड्यांवर चढलेला असतो. त्याचा मानकरी झगा त्याच्या अंगावर उलटा, पुढून

चढलेला असतो. त्याचा शेव त्याच्या नाचत्या पावलाखालीं येत असतो आणि त्याच्या नाचत्या पावलाशीं घासाघीस करीत असतो. एकदोन स्त्रियांना हें अति वाटतें. त्या हळूच बाहेर पडतात. पण अनेकांची तंद्री अद्याप अभंगच असते. त्यांची समाधि कायम असते. त्यांपैकीं एक पाठुंगळीला मूल बांधूनच नाचत असते. एका साकेभक्ताला यामुळें एक कल्पना सुचते. तो कठड्याशीं मूल घेऊन उभ्या असलेल्या एका स्त्रीकडे जातो. तिच्या हातचें मूल घेतो आणि त्याला घेऊन नृत्यांत सामील होतो. पण पोटांतली साके आणि हातांतलें मूल, एकदम सावरणें जरा कठिण असतें. ती स्त्री हसण्याचा प्रयत्न करते, पण तिच्या चेहऱ्यावर काळजी दाटते. ती त्याच्याकडे जाते, त्याच्याकडे हास्याचा एक कटाक्ष टाकून त्याच्या हातून मूल अलगद काढून घेते.

इतक्यांत मुलांची मिरवणूक येते. त्यांचीं कोवळीं कोवळीं तोंडें आतां कोमेजलेलीं असतात. तीं तो अष्टपाद अस्वल जेमतेम प्राकारापुढच्या पटांगणांत आणतात आणि त्याला तेथें तसाच टाकून प्राकारांत येतात. समारंभाचे चालक जणुं या मुलांची वाट पाहत असतात. तीं आल्याबरोबर पुढाऱ्यांची रांग उठून उभी राहते. झाडाचा टाळा एकाच्या हातांत जातो. चवरी दुसऱ्याच्या हातांत जाते. मिकोशी खांद्यावर चढते. कागदाचे कपटे तोंडांत फिट्ट बसतात. टाळेवाल्याचें तोंड शिव्या ओकूं लागतें—मिकोशीची मिरवणूक सुरू होते. प्राकाराबाहेर जाते आणि थांबते. मिकोशी एका सुगी वृक्षाखालीं उतरते. पुजारी आणि मानकरी मिकोशीभोंवतीं फेर धरून बसतात आणि त्यांच्या तोंडून मंत्र, परवचा म्हणण्याच्या थाटांत स्रवूं लागतात. पण मुलें, बायका, इतर पुरुष इकडे फारसें लक्ष देत नाहींत. बायकांचें नृत्य चालू असतें. मुलें तोंडांत आइस्क्रीम भरीत असतात आणि उरलीसुरली साके रिकामी करण्याचा उद्योग पुरुषमंडळी इमानेंइतबारें पार पाडीत असतात.


* * *

मिकोशी पुन्हां प्राकारांत येण्याची वाट पाहायला हवी. पण आम्हांला फुरसत नसते. आम्हांला आजच टोकिओला परतायचें असतें. प्राकाराच्या मागें आकाशांत काळेकुट्ट ढग गोळा होण्यास सुरुवात झालेली असते. मंदिरांत परत जाण्यापूर्वीच वादळ चाखण्याचा मनसुबा किनोमियानें केलेला असेल. आम्ही प्राकारांतून निघतों. कानांत तो मंत्रांचा परवचा घुमत असतो. मनांत वादळ

घोंघावत असतें. डोळे गांवांतलीं दृश्यें पाहत असतात आणि जें पाहिलें नाहीं त्याची कसर पासीन भरून काढीत असतो. तो सांगत असतो कीं आज यावातानोंत कोणाचेंहि घर बंद नाहीं. कोणाचाहि हात रिकामा नाहीं. कोणाच्याहि घरांत शिरावें, वाटेल तितकी मिठाई खावी आणि हवी तितकी साके झोकावी. खात फारसें कोणी नाहीं — पिणें मात्र अखंड ! मग मारामाऱ्या काय, न् दंगे काय ! क्वचित् खूनसुद्धां ! दुसऱ्या दिवशीं गांव शुद्धीवर येतो तेव्हां आदल्या दिवसाचा जमाखर्च समजतो !

आम्हीं बसस्टँडवर येतों तों पाऊस चांगला सुरू झालेला असतो. झाडाच्या फांद्यांतून वादळ घोंघावत असतें. या वादळांतून मोटार हांकायची कशी याची काळजी पासीनच्या चेहऱ्यावर पसरलेली असते. पण कांहीं असलें तरी प्रथम चहा पाहिजे, म्हणून एका रेस्टोरॉंमध्यें शिरतों. तेथील लोकांच्या चेहऱ्यावर चिंता रेघोट्या ओढीत बसलेली दिसते ! काय झालें तरी काय ? पासीन चौकशी करतो, तेव्हां समजतें कीं यावातानोचे दोन तरुण कोळी काल मच्छीमारीसाठीं गेले होते ते वादळांत सांपडले आणि बुडून मेले !

मला त्या 'गो 'च्या अड्डयावरचे तरुण आठवतात — आणि तो रस्त्याकांठीं अगतिकपणें पडलेला शर्यतीचा स्तंभ नजरेपुढें येतो !



बा
धा

" कमॉन्—आय् इल शो यू ए फेमस स्पॉट."

—यावातानोला जातांना रस्त्याकांठच्या एका रेस्टोरॉंमध्यें आम्ही चहा पीत बसलों होतों तेव्हां पासीन म्हणाला.

मी लगेच उठलों. जें जें पासीन दाखवील तें तें मला पाह्यचेंच होतें. जपानचीं रम्य सौन्दर्यस्थळें, कलासुंदर घरें, आतिथ्यशील माणसें, जें जें पाह्यला मिळेल तें तें मी पाहण्यास उत्सुक होतों.

आमचें रेस्टोरॉं समुद्रकांठच्या एका टेकडीच्या टोंकावर होतें. त्याच्या पिछाडीस एक छोटीशी बाग होती. त्या बागेंत नेऊन पासीन म्हणाला, " पाहा. "

समोरचें दृश्य खरोखरीच विलक्षण होतें. एक कभिन्न कराळ कडा—उभाच्या उभा! त्याचें काळेंकुट्ट खडकाळ अंग दुपारच्या तिरप्या उन्हांत तकाकत होतें. त्याच्या कपारीचीं अणकुचीदार टोंकें मगरीच्या दाढांसारखीं इतक्या दुरूनसुद्धां डोळ्यांना खुपत होतीं. समुद्रापासून सुमारें तीसचाळीस फुटांवर तो कडा एकदम उचलला होता आणि त्याच्या खालीं बेडकाच्या तोंडाच्या आकाराची एक अभद्र घळ निर्माण झाली होती. घळीच्या तळाचा काळा कुळकुळीत कातळ बाहेर येऊन पसरला होता आणि त्याच्यावर दहावीस शिळा —अफाट आकाराच्या—अस्ताव्यत पसरल्या होत्या. त्यांतली एक–विशेष आक्रस्ताळी–आपल्या खडबडीत अंगाच्या कडा, फरशीच्या पात्यांप्रमाणें, परजून जो येईल त्याला सरळ चिरण्यासाठीं सज्ज होती. मला एकदम ती जपानी लोककथा आठवली. सृष्टीच्या प्रारंभीं वादळदेव सुसानोवो संतापला आणि त्यानें जगावर विनाशाचा वर्षाव केला—त्या वेळीं त्यानें फेंकलेल्या दरडींतलीच ही एक अस्सल आजतागायत हजर होती! मी तिकडे थोडें निश्चल नजरेनें पाहण्याचा प्रयत्न केला. समुद्राच्या सुसाट लाटा या शिळांवर फुटत होत्या आणि त्यांचें फेसाळलेलें भ्रमिष्ट पाणी त्या घळींत एखादी चवताळलेली नागीण खबदाडींत घुसावी तसें घुसत होतें. माझे डोळे फिरताहेतसें वाटलें.

मीं एकदम नजर फिरविली आणि जरा बाजूला गेलों. मात्र दृष्टि त्या खडकाकडेच वळली. पण आमच्या टेकडीवरचें एक चिडाचें झाड आतां मध्यें आलें. समुद्रावरच्या पिसाट वाऱ्यानें त्याचा वक्र विस्तार चांगलाच झोडपला

होता. त्याच्या फांद्या पिळवटल्या होत्या आणि सळ्यांचे झुपके विस्कटले होते. त्या झाडाला जखणीचें रूप आलें होतें. त्या झाडाच्या विपरीत विस्तारांतून ती शिळा फारच भयंकर दिसली.

पासीन म्हणाला, "हें ठिकाण आत्महत्येसाठीं प्रसिद्ध आहे. समोरच्या कड्यावरून शरीर झोकून दिलं कीं चूक म्हणून व्हायची नाहीं. प्रथम तें त्या उचलल्लेल्या भागावर अलगद आदळेल आणि मग त्या शिळेवर अचूक फेंकलं जाईल–मग त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडायला किती वेळ!"

त्या नुसत्या कल्पनेनें माझें डोकें सुन्न झालें. पण पासीन या ठिकाणाला चांगला सरावलेला असावा. शेजारीं एक जपानी गृहस्थ उभा होता. त्याच्याशीं तो मोकळ्या आवाजांत बोलूं लागला.

जरा वेळानें मला म्हणाला, "हा जपानी गृहस्थ सांगत होता — गतवर्षी एका मातबर घराण्यांतील मुलीनं आपल्याला आपल्या ऐटा प्रियकराशीं लग्न करतां येत नाहीं म्हणून येथून उडी घेतली आणि घेतली म्हणजे कशी? प्रियकराला मिठी मारून आपल्या मोटरींत बसली आणि मोटर भरवेगानं सोडली ती कड्यावरून थेट खालीं—"

माझ्या डोळ्यांसमोर कड्यावरून कोसळणारी मोटर आली नि ते भोवळले, पण पासीन निर्विकार आवाजांत बोलतच होता—"ऐटा म्हणजे अस्पृश्य–तुमच्या हिंदुस्थानांत अस्पृश्य आहेत तसे—"

पण माझें तिकडे लक्ष नव्हतें. पाय यांत्रिकपणें पासीनच्या मोटरीकडे वळले आणि यांत्रिकपणेंच मोटरींत जाऊन बसलों. डोळ्यांसमोर चित्रविचित्र दृश्यें उमटत, नाहींशीं होत. ती भयंकर दरड–तिला फेसाळ विळखा घालणारी लाट–मोटर तिच्यावर आदळते–भयंकर आवाज होतो–कानांत शिरतो–इंद्रियें बधिर होतात–सुरू होतात–त्यांच्यावरचा ताबा उडतो–कानांवर शब्दांचा आघात होतो...

पासीन आणि योशिए जपानमधील आत्महत्यांची चर्चा करीत असतात.

जपानमधलें आत्महत्यांचें प्रमाण उभ्या जगांत अधिक आहे–एका तेरा वर्षांच्या मुलानें डोकेंदुखी असह्य झाली म्हणून उंदराचें विष खाल्लें—प्रचलित सरकारबद्दल घृणा असह्य झाली—एका जोडप्याची अखेरची इच्छा 'आमचा

विवाहविधि व दहनविधि एकदमच उरका '—एका प्रेताच्या खिशांत चिठी: ' मृत्यु किती मधुर आहे! '

ती शिळा—त्या भ्रमिष्ट लाटा–ती चक्काचूर झालेली मोटर—मृत्यु मधुर...विवाहमंत्र–!

यावातानोला गेलों, तेथल्या जत्रेच्या वातावरणांत शिरलों नि शुद्धीवर आलों!

* * *

परत येतांना अतामीच्या एका हॉटेलमध्यें आम्ही चहासाठीं थांबलों. दीडदोन दिवसांच्या जत्रेच्या धबडग्यानें आमचें शरीर आणि मन आंबून निघालें होतें. पासीन मोटर हांकतां हांकतां अगदीं दमून गेला होता. चहा पिण्यासाठीं आम्ही खालीं टेकलों ते टेकलोंच. पासीननें तर ततामीवर लोळणच घेतली. अखेरीस थोडी विश्रांति घ्यावी, रात्रीचें भोजन उरकावें आणि निघावें असें ठरलें. जपानमध्यें सारें कांहीं छान आहे, पण रस्ते भयंकर आहेत. म्हणून लोक आगगाडी पसंत करतात. पण टाइमटेबलाच्या पाशांतून सुटण्यासाठीं आम्ही मोटरनें निघालों होतों. जपानच्या चिखलभरल्या खड्डेखांचीच्या रस्त्यानें मोटर हांकणें दिवसांहि कठिण. रात्रीं तर मृत्यूशीं हस्तांदोलन करूनच निघावें. पण पासीनला आज रात्रीं टोकियोला पोचायलाच हवें होतें.

तास दीडतासाच्या विश्रांतीनें पासीनच्या नसा जरा मोकळ्या झाल्या. हिंमत जागी झाली. शिवाय जपानी रस्त्यांच्या चिखलांत मोटर थोडी घसरली म्हणजे त्याच्या अंगावर गोड शिरशिरी उठे!—त्यानें ॲक्सीलेटरवर पाय टाकला.

आम्ही निघालों. पण जेवणाची सुस्ती पाश पसरूं लागली. स्टेशनसमोरच्या कॉफीगृहांत थोडी कॉफी ढोसावी असें ठरलें. कॉफीगृहांत शिरलों. चांगली तेजदार कॉफी मागविली. ती आणून देणाऱ्या मुलीनें आपलें मोतिया हास्य केलें आणि पासीनच्या कंटाळलेल्या चेहऱ्यावर एक खेळकर छटा उमटली. पासीन त्या मुलीशीं जपानींत हास्यविनोद करूं लागला. योशिएहि त्यांत सामील झाली. मला मात्र त्या मुलीच्या बदामी डोळ्यांभोंवतालचें हसरें जाळें निरखण्यापलीकडे कांहींच करतां येण्यासारखें नव्हतें. यांत किती वेळ गेला-समजलेंच नाहीं. एकदम माझें घड्याळाकडे लक्ष गेलें. मी चमकलों नि म्हणालों, "चला उशीर झाला!"

पासीन म्हणाला, " चला "—पण त्यांत जोम नव्हता. त्यानें आणखी एकेक कप कॉफी मागविली. मुलीनें कॉफी आणली आणि पुन्हां ती गोड हसली. पण आतां बोलत न बसतां लगेच निघून गेली. पासीनच्या चेहऱ्यावर एकदम थकवा पसरलेला दिसला. कॉफीचा एकेक घोट तो घेत होता, पण तोंडावाटे शब्द निघत नव्हता. अखेर कॉफीचा कप अर्धभरला टाकून तो उठला—

पण उठला तसाच बसला. म्हणाला, "नाहीं बुवा, आपली ताकद नाहीं. पार दमलोंय् मी. आपण हॉटेलांत परत जाऊं या—रात्रभर विश्रांति घेऊं नि सकाळीं जाऊं."

"होय, पण तुझ्या कामाचं काय?"

"जळूं दे तें—दहा यार्ड गाडी हांकण्याची तयारी नाहीं माझी."

माझें काय, मला बरेंच वाटलें. जपानी हॉटेलांतल्या मऊ गाद्या-गिरद्यांवर लोळत लोळत पापण्यांवर स्वप्नांचीं फूलपांखरें नाचविण्याच्या कल्पनेनें मी खूष होऊन गेलों. योशिएहि खूप दिसली.

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आठनऊ वाजतां आम्ही निघालों. आमची मोटर मैल दीड मैल आली, तोंच तिच्या इंजिनांतून कसलासा चमत्कारिक आवाज येऊं लागला.

"काय झालं बुवा या मोटरीला?—असा आवाज कधीं आला नव्हता,"—पासीन म्हणाला.

एक दोन मैल आम्ही तसेच आलों. मोटरचा तो आवाज हळूहळू वाढत होता—आणि मग एकदम गपकन् थांबला—कारण मोटरच थांबली. इंजिन बंद पडलें होतें.

सुदैवानें जवळच एक मोटरचें रिपेर-शॉप होतें. वर्कशॉपच्या मॅनेजरनें आमची मोटर ओढून आणवली. लगेच त्यानें इंजिनचें झांकण उघडलें. डोळे इंजिनवरून फिरविले. इंजिनचे एकदोन भाग काढले, त्यांची चांगली तपासणी केली. इंजिनांत चारपांचदां ठाकठूक केली—आणि शेवटीं म्हटलं,

"चांगला तास दीडतास लागेल दुरुस्त व्हायला."

आमचे सर्वांचेच चेहरे पडले. आम्हांला टोकिओला जायची घाई होती. शिवाय पोटांत कावळे ओरडूं लागले होते. ओडावाऱ्याला न्याहारी करायचा बेत होता. आमच्या चेहऱ्यावरची भूक पाहून कीं काय मॅनेजर म्हणाला,

"येथून जवळच डोंगरांत एक रेस्टोरॉं आहे. आमची मोटर तुम्हांला तेथें पोचवील. तास दीड तासांत चहाबी पिऊन या—तोंपर्यंत तुमची गाडी दुरुस्त करून ठेवतों."

आणि आम्ही त्या रेस्टोरॉंकडे निघालों.

दहा पांच मिनिटांतच आमचा रस्ता डोंगरावर चढला आणि पासीनची मोटर बिघडली तेंच बरें झालें असें वाटूं लागलें. जपानचा सारा मुलूखच मस्त आहे; पण इतक्या रमणीय भागांतून मी पूर्वी कधीं गेलों नव्हतों. रस्ता नागमोडी वळणें घेत घेत डोंगराची एकेक उंची काबीज करीत आहे, सुरुचें जंगल निसर्गाची मिजास आणि मानवाची व्यवस्था यांच्या मिलाफाचे मुक्त नमुने दाखवीत आहे, या जंगलाच्या अवकाशांतून कधीं स्वच्छंद समुद्राचें तर कधीं समृद्ध खोऱ्याचें दर्शन होत आहे—आणि जपानच्या निसर्गाचा सारा रंगदारपणा अंतःकरणाचे कोपरेन् कोपरे खुलवून टाकीत आहे—

इतक्यांत एक छोटेंसें शिंटो मंदिर दिसलें आणि त्याच्या आवारांत कसला तरी विधि चालला आहे हें ध्यानांत आलें. यावातानोला दिसले होते तसे भटजी आणि एकदोन प्रतिष्ठित नागरिक तोंडानें (परवचा म्हटल्याप्रमाणें) कांहीं तरी म्हणत आहेत आणि हातानें कसलें तरी धान्य इतस्ततः उडवीत आहेत असें दिसलें. मी नीट ऐकूं लागलों—तेव्हां "ओनी वा सोटो; फुकुवा उची" हा मंत्र ते पुनः पुन्हां म्हणत आहेत असें लक्षांत आलें. मीं योशिएला विचारलें—

"हा कसला मंत्र?"

"याचा अर्थ 'पिशाच्चांनो, हट जाव; देवतांनो, आंत या' असा आहे—हातानें भात व घेवड्याचे दाणे उडवतांना म्हणण्याचा तो मंत्र आहे."

"पण हें सारं कशासाठीं चाललं आहे?"

"पिशाच्चांना घालविण्याचा विधि आहे तो. वास्तविक तो वर्षांतून एकदांच करतात, पण ह्या भागांत भुताखेतांचा फार धुमाकूळ चालतो, तेव्हां हा विधि वारंवार होतो. एखादा भूतबाधेचा विशेष प्रकार झाला तर मुद्दाम करतात."

जपानसारख्या सुधारलेल्या देशांतले लोक अशा भोळ्या समजुतींच्या आधीन असावेत याचें मला नवल वाटलें. पण फार नाहीं. पुष्कळदां हा भूमीचा आणि वातावरणाचा गुण असतो. आमचे मोठमोठे सुशिक्षित कोंकणांत गेले कीं त्यांचें असेंच होतें हें मला माहीत होतें.

रेस्टोरॉंचें दर्शन झाल्याबरोबर दृष्टि निवली. जपानी चीड (मात्सु) आणि मोरपंख (सुगी) यांच्या डंवरलेल्या राईच्या मधोमध, जपानी वास्तुशिल्पाचें सौंदर्य उधळीत उभी असलेली एक डगडगीत इमारत. जपानी कलेची चोखंदळ नजर तिच्यावर सर्वत्र पसरलेली होती. इमारतीच्या तकतकीत लाकूड-सामानाची रेषान् रेषा व्यक्त होत होती आणि रंध्याचा स्पर्श न झालेल्या खांबांत आणि तुळयांत निसर्गाची स्वाभाविक लय व्यक्त होत होती. खोल्यांच्या सरकत्या भिंतींवरील रम्म्याच्या तावदानांत किडीनें पोखरलेल्या फळीचा स्थलचित्र निर्माण करण्यासाठीं उपयोग केलेला पाहिला, तेव्हां तर जपानी कलावंतांच्या निसर्गसाधनेचा साक्षात्कारच झाल्यासारखा वाटला !

मी विचार करूं लागलों—निसर्गाच्या प्रत्येक लोकविलक्षण घटनेंत भुतेंखेतें, पिशाच्चें शोधणाऱ्या जपान्यांच्या भोळ्या वृत्तींत आणि या कलात्मक निसर्ग-साधनेंत कांहीं नजिकचें नातें असेल का ?

रेस्टोरॉंच्या मुलींनीं न्याहारी आणली आणि पासीन त्यांच्याशीं 'अनोने' 'आसोदेस्का' करीत बसला. योशिएहि त्यांत भाग घेत होती. त्या जपानी संभाषणांत सामील होणें मला शक्यच नव्हतें, तेव्हां त्या मुली हसल्या म्हणजे हसायचें — आणि त्यांच्या मासोळीसारख्या डोळ्यांतल्या लकाकीचा कवडसा निरखायचा – एवढेंच मला जमण्यासारखें होतें. पण बाहेर निसर्ग मस्त पसरला होता, आणि त्याच्याकडे टक लावून बघतांना त्या मेळाव्यांत असून नसल्यासारखें होण्याची उत्कृष्ट सोय होती.

समुद्रकांठच्या एका टेकडीवरील धारेवर हें रेस्टोरॉं होतें. तेथून टेकडी एकदम खालीं उतरली होती आणि तिच्या पायथ्याशीं धडकणाऱ्या समुद्राचा लयदार आवाज रेस्टोरॉंमध्यें ऐकूं येत होता. चीड आणि मोरपंख यांच्या शाखांचा शिवशिवता विस्तार येथून दिसत होता. आपल्या डौलदार शाखांवर नक्षीदार पानांचा मोहर घेऊन सरळ ताठ उभे असलेले मोरपंख आणि त्यांतच मधूनमधून पसरलेले, वक्र वळणाचे, पिळवटलेल्या फांद्यांचे आणि गोंडेदार

विस्ताराचे चीड पाहून महाकाव्य आणि विडंबनगीत यांचें हें मोठें मजेदार मीलनच झालें आहे असें मला वाटलें, आणि एकदम एक खट्याळ विचार मनांत आला कीं, मथुरेच्या शिल्पसंग्रहांतील बुद्धाच्या मूर्ति आणि एप्स्टाईन–हेन्री मूर–लिप्चिझ् यांच्या शिल्पकृति यांचें संयुक्त प्रदर्शन भरविलें तर कसें दिसेल ?

एकदम वाटलें, या मात्सु-सुगींच्या बनांत हिंडलेंच पाहिजे. योशिए–पासीनला (विशेषतः पासीनला) रेस्टोरँमधल्या मुलींच्या कलदार हास्याचें आणि कांचेरी आवाजांतल्या संभाषणाचेंच अधिक आकर्षण दिसलें. मी एकटाच बाहेर पडलों. खरोखर तें भटकणें म्हणजे सारीं इंद्रियें मोहरून टाकणेंच होतें. त्या बनांतल्या कोवळ्या लुसलुशीत गवताचा पोपटी रंग—आणि मधूनमधून त्याच्यावर पडलेल्या चिडाच्या तांबूस करड्या सळ्यांचा थर—पिसांच्या पथारीवरून चालतां चालतां एकदम सरक खेळांत सामील झाल्यासारखें वाटे. खेळाच्या नादांत मी टेकडीच्या टोंकाला केव्हां गेलों तें ध्यानांतच आलें नाहीं. तेथून पाहिलें तों तो परवां पाहिलेला भयंकर कडा समोर उभा ! तो येथून इतका जवळ, अगदीं पलीकडेच असेल असें वाटलें नव्हतें. त्या कड्याच्या अणकुचीदार कपारी, त्याच्या पायथ्याच्या त्या भयंकर शिळा आणि त्याच्या भोवतालीं फेंफरें आल्यागत फेसाळणाऱ्या समुद्राच्या लाटा—सारें कांहीं स्वच्छ दिसत होतें. मला ती आत्महत्येची हकीगत आठवली—मी परत फिरलों.

* * *

तासभरानें आम्ही वर्कशॉपकडे परतलों, तेव्हां मॅनेजर अद्याप भकास चेहऱ्यानें आणि त्रस्त नजरेनें मोटरच्या इंजीनकडे पाहातच होता. आमची चाहूल लागल्यावर त्यानें आमच्याकडे फक्त एक धुकट कटाक्ष टाकला. पासीननें विचारलें तेव्हां थकलेल्या स्वरांत तो एवढेंच म्हणाला, “ आश्चर्य आहे. कांहीं पत्ता लागत नाहीं. बिघाड तर कांहीं दिसत नाहीं. ”

कपाळावर हात मारून घ्यायचा तेवढेंच आमचें शिल्लक राह्यलें. मोटरीची प्रकृति ताळ्यावर येईपर्यंत येथें नुसतें हायहुश्श करीत राहण्याची कल्पना असह्य होती.

पण आशेचा एक किरण फिरकला. मॅनेजर म्हणाला, “ माझा मेक्यानिक आला म्हणजे तो कांहीं करतो का पाहूं—आज अद्याप तो कां आला नाहीं कळत नाहीं. ”

तो एवढें म्हणतो आहे तोंच तो मेक्यानिक आला. त्याच्या डोळ्यांत जाग्रण आणि चेहऱ्यावर कसली तरी त्रस्त उत्सुकता. आल्याबरोबर तो म्हणाला,

" काल रात्रीं देवळापलीकडच्या पुलावर मीं एक भूत पाहिलं."

" काय भूत ! " मॅनेजर ओरडलाच ! अर्थात् मला तें कांहीं कळलें नव्हतें. पण पासीनच्या खुलाशानंतर समजलें – कीं काल रात्रीं त्यानें भूत पाहिलें होतें.

सविस्तर माहिती सांगतांना तो म्हणाला, " रात्रीं एक दीडच्या सुमार असेल. मी त्या पुलावरून चाललों होतों. तों समोरून एक स्त्री आणि एक पुरुष एकमेकांना अगदीं बिलगून येत असलेले दिसले. प्रथम त्यांच्या आकृत्या सफेत धुकट दिसल्या. क्षणार्धांत त्या स्वच्छ झाल्या. स्त्रीच्या अंगावर एक झोंकदार रंगीन किमोनो होता. मीं निरखून पाहिलें. किमोनोवर रक्ताचे डाग—आणि तिच्या हातांत मोटरचें चाक ! क्षणभर कांहीं दिसेनासें झालें. आणि नंतर पाहतों तों आकृत्या पुन्हां धुकट ! क्षणार्धांत त्या बाजूच्या जंगलांत शिरल्या—आणि पाहतां पाहतां नाहींशा झाल्या."

जरा वेळानें एक शुष्क हास्य करून तो म्हणाला, " दुर्दैव माझं—त्यावेळीं मजपाशीं क्यामेरा नव्हता, नाहीं तर फोटो घेतला असता त्यांचा."

जपान्यांचें फोटोचें वेड मला माहीत होतें. चिनी माणसाच्या डोळ्यांना चष्मा लावला नि खांद्याला क्यामेरा अडकविला कीं जपानी माणूस तयार होतो, ही व्याख्या मीं ऐकलेली होती. पण भुताचा फोटो घेण्याइतकी या वेडानें मजल मारली असेल याची मला कल्पना नव्हती !

कांहीं वेळ तो त्या भुताबद्दलच बोलत होता. जरा वेळानें मॅनेजरनें त्याला आमची मोटर पाहायला सांगितलें. त्यानें लगेच बाह्या सरकविल्या आणि ओव्हर-ऑल चढवून, इंजिनांत डोकें खुपसलें. बराच वेळ त्याचें ठाकठूक सुरू होतें. इंजिनचे बरेचसे अवयव बाहेर आले, आंत गेले. पण कांहीं बोध होतो असें त्याचा चेहरा सांगेना. अखेरीस म्हणाला,

" कांहीं कळत नाहीं बुवा ! भुतानें झपाटलें-विपाटलें कीं काय ? "

मॅनेजरचे एकदम डोळे लकाकले. म्हणाला, " असेल ! असेल ! "

" तसें असेल तर ही ठाकठूक काय कामाची ? "—मेक्यानिक म्हणाला.

लगेच त्यानें ओव्हर-ऑल उतरला. पलीकडे पाटाचें पाणी वाहात होतें तेथें गेला, हातपाय धुतले, चेहरा धुतला, चुळा भरून टाकल्या आणि पलीकडच्या छोट्याशा देवळाकडे चालूं लागला. तेथल्या डोणींतल्या पाण्यानें पुन्हां हातपाय धुतले. शेजारच्या एका झुडपाचा टाहळा तोडून घेतला. देवळासमोर गेला. तोंडानें कांहीं तरी बडबडत टाहळा अतिजोरानें हवेंत फिरवला. मग त्यानें गुडघे टेकले. टाहळ्यासकट हात जोडले आणि डोळे मिटून प्रार्थनेस सुरवात केली.

पंधरावीस मिनिटें त्याची प्रार्थना सुरू होती. आम्ही इकडे चूपचाप उभे होतों.

प्रार्थना आटोपून तो आला, तेव्हां त्याचा चेहरा विलक्षण शांत दिसला. डोळ्यांतलें जाग्रण पार उडालें होतें; चेहऱ्यावरची व्याकुळता नष्ट झाली होती; नजरेंत निश्चिति होती. मला वाटलें, तें भूत आतां शांत झालें असो वा नसो, आमची मोटर हा आतां अधिक हुशारीनें पाहूं शकेल.

परत आल्याबरोबर त्यानें ओव्हर-ऑल चढविला आणि इंजिनांत डोकें खुपसलें.

पंधरावीस मिनिटांत इंजिनांत एक ठिणगी चमकली, त्याबरोबर त्यानें डोकें बाहेर काढलें. म्हणाला—

" झाली दुरुस्त ! दहा मिनिटांत सुरू करतों."



साहित्यिक येती घरा...

टोकिओला भरलेली आंतरराष्ट्रीय 'पेन परिषद्' ही एक अलौकिक पर्वणी वाटली — साहित्यिकांना आणि बिगरसात्यिकांनाहि! साहजिक आहे. जपानमध्यें लेखक हा राजा आहे. त्याला विशेष मान आहे. खास भाव आहे. उच्च प्रतिष्ठा आहे. समाजांतली एक उपटसुंभ अडगळ अशी त्याची संभावना होत नाहीं. त्याच्या लिखाणाची 'लेखणीचे चाळे' अशी वासलात लागत नाहीं. "तुम्ही

लिहितांबिहितां हें ठीक आहे, पण तुम्ही पोटासाठीं काय करतां?" असें कोणी त्याला विचारीत नाहीं. लेखक हा हिरो असतो—'चायां'तील गेशापासून लिफ्ट चालविणाऱ्या मुलीपर्यंत सर्वांचा. असंख्य वाचक त्याला राष्ट्राची दौलत मानतात. वर्तमानपत्राचीं पृष्ठें त्याच्या छायाचित्रांनीं रंगून जातात. सुंदर नटीच्या चेहऱ्याइतकाच सुंदर शैलीकाराचा चेहरा जपानी वाचकाला प्रिय असतो. नटनटींच्या दर्शनासारखीच त्याच्या दर्शनासाठीं झुंबड उडते. त्याच्या चरित्राच्या तपशीलांत अनेक जीव मश्गूल असतात. त्याच्या जीवनाला रहस्यकथेचें गूढ प्राप्त होतें. त्याच्या कृपापत्राला प्रेमपत्राचें आकर्षण चढतें आणि त्याच्या शब्दांना सुंदर कटाक्षांची किमया प्राप्त होते. जपानमध्यें लेखणीला अद्याप मोल आहे—जगांत इतरत्र लेखकाला कस्पटाप्रमाणें किंवा बारगिराप्रमाणें गणलें जात असतांना जपानांत त्याचें भक्तिभावानें पूजन होत असतें. तेव्हां 'पेन परिषद्' ही जपानांत एक राष्ट्रीय पर्वणी ठरायचीच!

पण पर्वणी म्हणजे कशी? या परिषदेच्या निमित्तानें स्पेंडर–आंगस विल्सन–ॲलेक वॉघ–स्टाईन्बेक–जॉर्ज मिकेश–आंद्रे शाम्सॉ–हेल्मूथ ग्लासेनॉफ्–ॲन्तोनी स्लोमिन्स्की यांच्यासारखे जगप्रसिद्ध लेखक टोकिओला जमा झाले, तेव्हां लोकांचीं माथींच भडकलीं. या शब्दसृष्टीच्या मानकऱ्यांना कोठें ठेवूं नि कोठें नाहीं, कोठें नेऊं नि कोठें नाहीं, कोठें उडवूं नि कोठें नाहीं असें त्यांना झालें. आकाशवाणी–चित्रवाण्यांच्या वेळापत्रकांचा तोल गेला आणि वृत्तपत्रांचे रकाने बेहोष झाले. शेकड्यांनीं खास कार्यक्रम झडले. शेकड्यांनीं खास अंक रस्त्यावर आले. शेकड्यांनीं मुलाखती रंगल्या--आणि हजारोंनीं त्या पाहिल्या, ऐकल्या, वाचल्या! स्वागतसमारंभांचे सोहाळे असंख्य झाले. मंत्र्यांनीं मेजवान्या दिल्या. वकिलातींत पार्ट्या उडाल्या. व्यापाऱ्यांनीं भेटी उधळल्या. उद्यानांत उपाहार उजळले. 'चायां'त सामीसेनचे स्वर झंकारले. रंगमंदिरांत गेशांच्या नृत्यांचीं पावलें रुणझुणलीं, नाट्यगृहांत काबुकीची नांदी वाजली आणि नोहचीं भरतवाक्यें घुमलीं. या कार्यक्रमांनीं डोळे दिपले, कान रमले, अंतःकरणें उचंबळून आलीं. जपानच्या पेन–क्लबनें तर कमाल केली. आपलें प्रत्येक देवालय म्हणजे सौंदर्यदेवतेचें निवासस्थान, प्रत्येक राजवाडा म्हणजे इतिहासाचा वैभवशाली कवडसा, प्रत्येक उद्यान म्हणजे सौंदर्याची आरास आणि प्रत्येक विधि म्हणजे संस्कृतीचें लावण्यलेणें हें दरेक प्रतिनिधीस पटवून देण्याचा त्यानें चंगच बांधला. साहित्यसंमेलनाचें

रूपांतर त्यानें सांस्कृतिक यात्रेंत केलें. परिषदेच्या प्रतिनिधींना जपानी संस्कृतीचें अमृत मोठ्या निष्ठेनें पाजलें. त्यासाठीं त्यांना मोठ्या समारंभानें देवस्थानांत नेलें, तेथें लावण्यसुंदर गेशांकडून त्यांचें स्वागत करविलें, राजवाड्यांत हिंडविलें, इतिहासप्रसिद्ध उद्यानांतून फेरफटका करवून आणलें, चहापान-चंद्रदर्शना-सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांत रमविलें आणि प्रत्येक प्रतिनिधीच्या अंतःकरणांत जपानविषयींचें प्रेम आणि आकर्षण यांची कायमची प्रस्थापना केली.

जपान पेन-क्लबच्या या सांस्कृतिक दृष्टींत आधुनिक टापटीपहि होती. तिच्या जोरावरच क्लबनें हे सारे कार्यक्रम मोठ्या कौशल्यानें पार पाडले आणि परिषदेच्या मुख्य कार्याशीं त्यांची मोठी बेमालूम सांगड घालून दिली. ज्या सांके कायकानमध्यें ही परिषद् भरली होती, तिच्या प्रथमदर्शनानेंच जपान-क्लबच्या या वैशिष्ट्याची ओळख पटली. सांके कायकान हा कलात्मकता आणि आधुनिकता यांच्या सर्जनशील संगमाचा एक नमुनाचा आहे. किंबहुना ही इमारत म्हणजे आधुनिक वास्तुशिल्पानें निर्मिलेली एक मयसभा आहे. ही इमारत म्हणजे कांच आणि पोलाद यांचे पुरस्परविरोधी गुण एकमेकांत वितळवून निर्मिलेली एक जादूमय कृतिच. तिचें पोलाद कांचेसारखें कल्दार आहे, तर कांच पोलादाचा आभास निर्माण करणारी आहे—आणि या दोघांच्या युतीनें लोकांची दृष्टि आणि बुद्धि गुंगवून टाकणारें एक आश्चर्य निर्माण झालेलें आहे. आपल्या प्रतिनिधींची बुद्धि आणि दृष्टि अशी गुंगवून टाकण्याचा पेन-क्लबचा इरादा होता का नकळे, पण एका पोलिश प्रतिनिधीला तसेंच वाटलें असेल. पहिल्या दिवशींच तो आला, एका दरवाजांतून तडक आंत निघाला—आणि पोकळीचा भास निर्माण करणाऱ्या कांचेच्या तावदानावर टचकन् आपटला, आणि अर्थात् आंत जाण्याऐवजीं सरळ हॉस्पिटलमध्यें गेला. अशी ही मयसभा—नवलाईची मयसभा, कल्पकतेची मयसभा, शिल्पसौंदर्याची मयसभा ! या मयसभेंत सांस्कृतिक विलासाचें वातावरण नुसतें दरवळलेलें होतें. त्याचा आस्वाद घेण्यासाठीं त्याच्या अंतरंगांत डोकावून पाहण्याची गरज नव्हती. लिफ्टमधून वर जातांना बाहेर नुसती ओझरती नजर टाकली, तरी ती सहज एखाद्या शिल्पकृतीवर, नाहीं तर चित्रकृतीवर, नाहींतर एखाद्या पुस्तकांच्या रांगेवर पडे. सांके कायकानच्या व्हरांड्यांतसुद्धां कला आणि संस्कृति यांचीं चिन्हें विखुरलेलीं होतीं.

अशा या मयसभेंत जपान पेन-क्लबनें मोठें अभिजात साहित्यसंमेलन भरविलें. पण 'अभिजात' साहित्यसंमेलन म्हणजे काय ? त्याचीं लक्षणें कोणतीं ?

महाराष्ट्रीयांच्या तीं परिचयाचीं आहेत. स्वागताध्यक्षाच्या भाषणाची अध्यक्षीय भाषणावर कुरघोडी (जी अध्यक्षाच्या गंभीर प्रकरणावर आगाऊ उताऱ्यासारखी ठरावी), खडाजंगी वादविवाद, बाहेरगांवच्या पाहुण्यांची (स्वतःच्या भाषणाचा भाग तेवढा वगळून) संमेलनांत सरसहा गैरहजेरी, संमेलनाच्या मंडपाची अगर सभागृहाची अब्रू वांचविण्याचा स्थानिक श्रोत्यांनीं घेतलेला पत्कर, आणि दीर्घकाल लक्षांत राहील असें एखादें भाषण अगर घटना, हे साहित्यसंमेलनाच्या अभिजातपणाचे कांहीं विशेष.

कावाबाटांच्या स्वागताध्यक्षीय भाषणानें अभिजातपणाचा पहिला विशेष लगेच प्रत्ययास आणून दिला. वास्तविक कावाबाटा म्हणजे केवढे थोर साहित्यिक. कादंबरीकारांचे कादंबरीकार अशी त्यांची ख्याति. पण स्वागताध्यक्षीय पद त्यांना बाधलें हेंच खरें. नाहींतर त्यावेळीं जपानांत गर्जत असलेलें तुफान हें जगांतल्या या थोर थोर साहित्यिकांच्या स्वागतास आलें आहे, अगर हें तुफान म्हणजे जपानच्या प्रकृतीचें प्रतीक आहे, अशीं विधानें त्यांनीं कशीं केलीं असतीं? तीच गोष्ट वादाची. पेन–क्लब म्हणजे जगांतल्या अतिशय शिष्ट, संभावित, सोज्ज्वळ साहित्यिकांची संस्था. यांचें संमेलन म्हणजे परस्परपरिचय, परस्परचौकशी, आणि गंभीर प्रश्नांची जांभया देत केलेली चर्चा—अशा संमेलनास वादाची बाधा होण्याचें कांहींतरी कारण? पण संमेलनाचें अभिजात स्वरूप सिद्ध करण्यासाठीं तो बाधला आणि अगदीं अभिजात पद्धतीनें बाधला. म्हणजे तो प्रथम पडद्याआड वाजला, मग त्याचे शैलीदार आवाज बाहेर आले आणि नंतर त्याचे तितकेच शैलीदार पडसादहि उमटले. सारें कसें असल्या वादांच्या नियमांना धरून झालें. म्हणजे परिषदेच्या मुख्य विषयाला त्याचा फारसा स्पर्शहि झाला नाहीं. एकदां एका कोरीअन प्रतिनिधीनें जपानच्या इतिहासकालीन साम्राज्यवादावर हल्ला केला. (पण हेंहि अगदीं प्रथेस धरून झालें—साहित्यसंमेलनांत एखाद्या पाहुण्यानें यजमानाच्या तोंडावर थुंकलेंच पाहिजे.) खरा वाद माजला तो अवांतर मुद्द्यावर. कारण साहित्यसंमेलनाला साहित्यिक येतात ते साहित्याची नाडी तपासण्यासाठीं थोडेच येतात? ते येतात ते संस्थेच्या असाहित्यिक कारभारांतल्या एखाद्या प्रकरणाची शेंडी पकडण्यासाठीं. येथें असेंच झालें. १९५६च्या हंगेरिअन क्रांतीचें बौद्धिक नेतृत्व केलेले एकदोन साहित्यिक हजर होते. हंगेरींत पेन-सेंटरची चाललेली विटंबना

वेशीवर टांगण्याच्या जिद्दीनेंच ते आले होते. पण परिषदेंत कांहीं कम्युनिस्ट राष्ट्रांचेहि प्रतिनिधि होते; आणि जपान पेन-क्लबमध्यें 'पुरोगामी' लेखकांचा बराच भरणा असल्यानें त्यांना अगदीं घरचा आधार होता. तेव्हां या वादांत शीतयुद्धाची दारू अगदीं ठांसून भरली गेली. आणि तरी स्फोट झालाच नाहीं. कारण असले स्फोट संभावित साहित्यिकांच्या प्रतिष्ठेला मानवणारे नसतात. पडद्याआड एकमेकांच्या कपड्यांची हवी तितकी ओढाताण झाली, तरी पडद्याबाहेर व्यासपीठावर पोशाख आवरून-सावरूनच बसावें लागतें. अर्थात् ही 'पुरोगामी' लेखकांची परिषद् असती तर वस्त्र अगदीं भर चवाठ्यावर टरकावलीं गेलीं असतीं. पण ही पडली नुसत्याच लेखकांची परिषद्, तेव्हां स्फोट झालाच नाहीं. तडजोड झाली.

जगाच्या कानाकोपऱ्यांतून साहित्यिक पेन-परिषदेसाठीं आले. पण परिषद् हें नुसतें निमित्त होतें. ते खरे आले होते ते जपानच्या आतिथ्याचा आणि सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठीं. त्यांना गिंझांतल्या नशापाण्याची चव घ्यायची होती, आसाकुसांतल्या उत्तान प्रकरणांचा अनुभव घ्यायचा होता, उष्ण झऱ्याच्या न्हाणीघरांत शरीर शिथिल करायचें होतें, कार्युकाईंत (फुलांच्या जगांत) फुलपांखरांसारखें उडायचें होतें, 'चाया'(चहाघरां)तील चिजांची चव चाखायची होती, 'माचीआई'त (थोरल्या 'चायां त') मजा मारायची होती, निचिगेकींत नग्नतेचे संभावित नमुने पाह्यचे होते, कॉफीगृहांतील कुमारिकांशीं कुजबूज करायची होती, स्ट्रिपूटीजमधल्या वस्त्रहरणाच्या विलासांनीं डोळे विस्फारायचे होते आणि एकंदरींत 'जिवाचा जपान' करायचा होता. ज्यांच्या प्रकृतीला हें मानवणारें नव्हतें त्यांना क्यामेरे, दुर्बिणी, बाहुल्या, फुल्दाण्या वगैरेंची खरेदी करायची होती, आणि आपल्याशीं अगदींच धाडस नाहीं असा आरोप येऊं नये म्हणून पाचिंकोंच्या यंत्रावर नशिबाच्या गोट्या उडवायच्या होत्या. आणि अर्थात् या साऱ्यावर सभ्यतेचें मुलायम आवरण घालण्यासाठीं काबुकीझा, ताकाराझुका, कोकुसाय कायकान् इत्यादींना भेट द्यायची होती, नाहींतर सुमो कुस्त्यांच्या आखाड्यांत एक वेळ खेप घालायची होती. इतकें सगळें साधायचें तर परिषदेंत वेळ फुकट घालवून कसें चालेल? तेव्हां परिषदेचें काम सुरू झालें, की ते शहाजोगपणें बाहेर सटकत आणि शहराच्या कांहीं अव्वल भागांत मनमुराद हिंडत.

साहजिकच परिषदेच्या मंडपाची इभ्रत सांभाळण्याचें काम स्थानिक मंडळीकडे आलें आणि तें त्यांनीं सारी शक्ति व बुद्धि वेंचून पार पडलें. परिषदेचें काम इंग्रजी-फ्रेंच भाषांत चाले. पण या भाषांचें अज्ञान स्थानिक श्रोत्यांची श्रद्धा ढळविण्यास समर्थ ठरलें नाहीं. ते सुरवातीपसून शेवटपर्यंत सभागृहांत निश्चल बसून राहात, आणि संपल्याबरोबर सांपडेल त्या साहित्यिकाची सही मिळविण्यासाठीं वही पुढें करीत. मात्र त्यांची साहित्यिकांवरची भक्ति भक्कम असल्यामुळें त्यांनीं या सही घेण्याच्या विधीची कधीं विटंबना केली नाहीं. म्हणजे प्रभाकर पाध्याला 'अहो ढवळे' असें संबोधून सही मागितली नाहीं, किंवा प्रभाकर पाध्याच्याच हातांतल्या वर्तमानपत्राचा कोपरा फाडून त्याच्यावर सही करा म्हणून त्याला विनंती केली नाहीं. या जपानी श्रोत्यांना परिषद् संपल्यावरसुद्धां उसंत नव्हती. गिंझाच्या आसपास भटकत असलेल्या साहित्यिकांना पकडून त्यांच्या सह्या त्यांना घ्यावयाच्या असत. 'झेड्ड' ॲव्हेन्यूवरच्या एका बाहुल्यांच्या दुकानांतल्या एका मुलीनें माझ्या कोटावरचा पेनचा बिल्ला पाहून सहीसाठीं वही पुढें केली—ती या श्रोत्यांपैकींच एक!

परिषदेचा अविस्मरणीय अनुभव जॉन स्टाईन्बेक यांनीं आणून दिला. सुरवातीच्या उद्घाटनाच्या अधिवेशनांत त्यांनीं साहित्य–संमेलनाच्या इतिहासांतलें सर्वांत छोटें भाषण केलें आणि सांगितलें कीं, आपण या परिषदेला आलों आहोंत ते बोलण्यासाठीं नाहीं तर ऐकण्यासाठीं. दुर्दैवानें तेंहि त्यांना साधलें नाहीं, कारण त्याच दिवशीं त्यांना 'एशियन फ्ल्यू'नें गांठलें आणि पुढले आठ दिवस त्यांना इम्पीरिअल हॉटेलच्या खोलींत तळमळत काढावे लागले. पण त्यांचा हॉटेलच्या खोलींत अडकलेला मुक्कामहि परिषदेला जाणवला. म्हणजे अभावानें नव्हे, तर तापाच्या आवेगांत त्यांना सुचलेल्या सुभाषितांनीं. एक दिवस जॉन डॉस पॅसॉस उठले आणि त्यांनीं स्टाईन्बेकचीं सुभाषितें वाचून दाखविलीं. त्यांतलीं दोन माझ्या अद्याप लक्षांत राहिलेलीं हीं : Hospitality is the most charming form of torture, आणि Silence never produces misinformation.

'आतिथ्य म्हणजे अति-आकर्षक अत्याचार' हें स्टाईन्बेकचें सुभाषित ऐकून जपान-पेनच्या यजमानांना काय वाटलें नकळे. पण कांहींहि वाटलें असलें तरी त्यांना या अत्याचारकारक कर्मांतून मुक्त होणें शक्यच नव्हतें. आतिथ्य हा

जपान्यांचा दुसरा स्वभाव आहे, आणि जपान-पेनच्या कार्यकर्त्यांनीं तर त्याचें एक शास्त्रच बनविलें होतें. या शास्त्राच्या सपाट्यावर सांपडल्यानंतर प्रतिनिधींच्या इच्छांचा, गरजांचा आणि मागण्यांचा विचार करण्यापलीकडे दुसरा कसला विचारच त्यांना अशक्य झाला. त्यांची विचारशक्ति प्रतिनिधींच्या साऱ्या संभाव्य अडचणींशीं विनिमय करीत राहिली. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीचा, किचकट कटकटीचा, आयत्या वेळीं उद्भवणाऱ्या अडचणींचा, आगाऊ विचार करूनच जपान-पेनचे स्वयंसेवक ठिकठिकाणीं उपस्थित होते. त्यांचा चेहराच सांगे कीं, कांहीं काळजी करूं नका, आम्ही हजर आहोंत. विमानतळावर उतरून घ्यायला आल्याशिवाय तुमच्या अंतःकरणांतली धाकधूक कमी होत नाहीं? ठीक आहे, जपान-पेनची लांबरुंद फीत बाहीला लावून आमचा स्वयंसेवक विमानतळावर हजर आहे. कस्टम्सच्या भानगडी तुम्हांला जमत नाहींत?—डोण्ट वरी, कस्टम्सच्या अधिकाऱ्यांचें सहकार्य आम्हीं अगोदरच मिळविलेलें आहे. सामानाच्या बॅगवर एखादें फर्मास लेबल चिकटविल्याशिवाय तुम्हांला प्रवासाचें सार्थक झाल्यासारखें वाटत नाहीं?—बट् डोन्च्यू रिमेंबर, आमच्या क्लबच्या शिक्क्याचें एक लाल लेबल आम्हीं तुमच्याकडे अगोदरच रवाना केलें होतें. तें चिकटविण्यास तुम्ही विसरलां हा, साहेब, आमचा दोष नाहीं. हॉटेलमध्यें तुमचें आगमन राक्षसवेळीं होणार आहे म्हणून काळजी वाटते तुम्हांला?—पण घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं, आम्हीं हॉटेलला पक्क्या सूचना देऊन ठेवलेल्या आहेत, तुम्ही कौंटरवरच्या कारकुनाला तुमचें फक्त नांव सांगा. परिषद् हें नुसतें निमित्त, जपान पाहणें ही तुमची अंतरींची इच्छा?—वा राव, हें काय आम्हांला ठाऊक नाहीं? अहो, आम्ही तें नीट ओळखून आहोंत. जेवढें म्हणून शहाजोग करतां येईल तेवढें सारें आम्हीं केलेलें आहे. काय म्हणतां, प्रतिनिधींच्या परिचय-पत्रिकेंत तुमची माहिती नाहीं?—हें कसें काय झालें बुवा! तुम्हीं वेळेवर पाठविली होती काय? पण हरकत नाहीं. तुमची माहिती आम्हांला द्या, आम्ही ती सायक्लोस्टाईल करून लगेच सर्वांना वांटण्याची व्यवस्था करूं. अच्छा, म्हणजे तुमचा त्या व्यक्तीबरोबर फोटो यायला हवाय्?—व्हाय् डोण्च्यू टेल अवर फोटोग्राफर? तुम्हांला अनेक बैठकींना हजर राहणें जमणार नाहीं?—ठीक आहे, प्रत्येक दिवसाच्या चर्चेचा सारांश दुसऱ्या दिवशीं सकाळीं तुमच्या कप्प्यांत आढळेल!... कोणतीहि अडचण असो, तिचें शक्य तितकें निरसन

करण्याचा प्रयत्न जपान-पेनच्या लोकांनीं—चेहऱ्यावरचें निरंतर हास्य किंचित् देखील ढळूं न देतां—केला!

हें सारें त्यांना जमलें कसें? मला तरी याचें उत्तर एकच दिसतें—तपशिलाकडे लक्ष पुरविण्याची संवय. ही संवय नसली तर अंतराळांत भराऱ्या मारणाऱ्या कल्पना सुचतील, पण पृथ्वीवरची व्यवस्था कांहीं नीट राहणार नाहीं. उदाहरणानेंच बोलायचें तर रंगूनला एअर-कंडिशन्ड विमानतळ बांधतां येईल, पण तेथल्या संडासांत टॉयलेट—पेपर असेलच अशी खात्री बाळगतां येणार नाहीं. जपान-पेनच्या तपशीलविषयक जाणिवेची जाणीव मला जपानला जाण्यापूर्वी दिल्लीलाच आली. एक दिवस पेनकडून एक जोडपाकिट आलें. आणि त्यांतून बॅगांना लावण्याचीं लेबलें निघालीं. प्रत्येक लेबलावर पेन—कॉंग्रेसचा शिक्का होता, आणि माझ्या नांवाच्या 'पी' या आद्याक्षराचा ठळक छाप होता. आम्हांला जपानांत गेल्यावर एक कार्यक्रमांची पुस्तिका मिळाली. प्रत्येक कार्यक्रमाचें एकेक पान त्या पुस्तिकेंत होतें. आणि प्रत्येक पानाचा एक तुकडा कापून घेण्याची व्यवस्था होती. तुम्हांला कार्यक्रमाला जायचें असेल तर तुम्हीं त्या कार्यक्रमाच्या पानाचा तुकडा सही करून कचेरींतल्या एका पेटींत टाकायचा, म्हणजे त्या कार्यक्रमाला नेणारी बस ठराविक वेळीं तुमच्या हॉटेलसमोर उभी राहील. अखेरचे दोन दिवस परिषदेचें स्थलांतर टोकिओहून कियोटोला झालें. निघण्याच्या आदल्या दिवशीं आमच्याकडे एक पत्र आणि एक लेबल आलें. पत्रांत कोणता प्रतिनिधि कियोटोच्या कोणत्या हॉटेलमध्यें उतरणार याची माहिती होती, आणि सोबतचें लेबल तुमच्या बॅगला लावून तेथेंच ठेवा, ती तुम्हांला किओटोला तुमच्या खोलींत आढळेल अशी सूचना होती. माझी व्यवस्था मियाको हॉटेलमध्यें होती, तर कांहींची कियोटो हॉटेलमध्यें होती. पांचशें प्रतिनिधींच्या गर्दींत हा मियाकोचा आणि हा कियाटोचा हें कळणार कसें, अशी शंका गाडी कियोटो स्टेशनांत शिरतांना माझ्या मनांत आली. पण जपान-पेनच्या लोकांनीं या गोष्टीचा विचार अगोदरच करून ठेवलेला होता. त्यांचे स्वयंसेवक हातांत 'मियाको', 'कियोटो' असे फलक धरून उभे होते आणि प्रतिनिधि आपापल्या फलकाभोंवतीं गोळा झाले. एका गोष्टीचा विचार करण्यासच पेनचे कार्यकर्ते विसरले. आम्हांला एकेका खोलींत दोघादोघांनीं राह्यचें होतें, आणि आमच्या जोड्या आम्हांला निवडण्याची संधि न देतां पेन-क्लबच्या लोकांनीं निवडल्यामुळें

माझ्या एका दोस्ताला त्याच्या सहकाऱ्याच्या घोरण्यामुळें अखंड जाग्रण करण्याची पाळी आली. दुसऱ्या दिवशीं त्यानें झोंपण्याच्या फंदांत न पडतां सारी रात्र कियोटोच्या कांहीं वेंचक वस्तींत भटकण्यांत घालविली! या एवढ्या उणिवेमुळें जपान-पेनच्या इतर व्यवस्थेचा पक्केपणाच माझ्या मनावर ठसला. अर्थात् जाग्रणाची पाळी माझ्यावर आली असती तर तो तसा ठसला असता काय शंका आहे. पण सारी व्यवस्था जपान-पेनच्या लोकांनीं इतकी हसत, खेळत, फुलत केली कीं, ही पोलादी व्यवस्था आणि ही फुलोरी वृत्ति यांचा संयोग घडला तरी कसा याचें अद्याप मला नवल वाटत आहे.

कसा कां घडेना, त्याचे सुखद संस्कार माझ्या मनावर कायम आहेत, आणि पेन-परिषदेची जेव्हां जेव्हां मला आठवण होते, तेव्हां तेव्हां परिषदेच्या कार्यक्रमांपेक्षां ही व्यवस्थाच मला अधिक आठवते--आणि मग मला जपानमधला दुसरा एक अनुभव आठवतो. मी जपान सोडलें तोच दिवस. माझें विमान रात्रीं निघायचें होतें. संध्याकाळीं ४।५ वाजतां माझ्या चष्म्याच्या काडीचा स्क्रू हरवला. तो रविवारचा दिवस होता. सारीं दुकानें बंद होतीं. अखेर शोधतां शोधतां एका गल्लींतलें एक कोपऱ्यांतलें दुकान अर्धें-उघडें सांपडलें. आम्हीं दुकानदाराला आमची अडचण सांगितली. पण दुर्दैवानें त्याच्याकडे इतका छोटा स्क्रू नव्हता. मी अगदीं निराश झालों – इतक्यांत तो म्हणाला, थांबा, कांहीं जमतें का पहातों. असें म्हणून त्यानें एक तार घेतली आणि कानशीनें घासून आमच्या डोळ्यांदेखत एक स्क्रू बनविला. मला वाटलें, आतां हा भरपूर पैसे उकळील. पण त्यानें आकार केला बरोबर चार आणे—तयार स्क्रूला नेहमीं जितका पडला असता तेवढा!

—असे हे हाडींमांसीं खिळलेले गुण!





भेट

आज आम्हांला नुसती भटकेगिरी करायची आहे, कोणत्या भागांत जाऊं बोला—मी मियाको हॉटेलच्या कौंटरवर विचारलें.

—मग तुम्ही सिंक्योगोकु मार्केटांत जा.

—काय आहे त्या मार्केटांत असं?

—तुम्ही जा म्हणजे समजेल. किओटोचं ते एक आश्चर्य आहे.

वात्स्यायन नि मी निघालों. सिंक्योगोकूच्या प्रवेशद्वारांतच ध्यानांत आलें कीं, आपण एका झकपक बाजारांत शिरत आहोंत. तेथल्या दुकानांचा भपकाच तसा होता. पण थोडेंसें हिंडल्याबरोबर समजलें कीं, भपका हा कांहीं या मार्केटचा विशेष नव्हे. हें मार्केट म्हणजे एक स्वतंत्र जग आहे आणि या जगावर जपान्यांच्या आगतस्वागताच्या आणि कलात्मकतेच्या छटा नाचत आहेत. यांतलीं बरींचशीं दुकानें म्हणजे छोटीं छोटीं प्रदर्शनेंच होतीं. या दुकानांतली एकेक फुलदाणी म्हणजे जपानी कुंभकलेचा नमुना वाटे, आणि एकेक बाहुली म्हणजे हस्तकलेची साक्षात् प्रतिमा भासे. येथें काय नव्हतें? कापडापासून क्यामेऱ्यापर्यंत आणि खेळण्यापासून खाद्यपदार्थांपर्यंत हवी ती वस्तु—दुकानांतील मुलींच्या हास्यानें उजळून मिळण्याची सोय येथें होती. या दुकानांतून त्या दुकानांत असें भटकायला लावण्याची एक अमूर्त जादूच त्या मार्केटांत होती. आणि असें भटकून पाय थकले, तर बीअरच्या पेल्यानें ताजेतवाने होण्याची सोय करण्यास जपानी चतुराई विसरली नव्हती. तुम्हांला बीअर पसंत नसेल तर पाचिंको खेळा आणि पाचिंकोच्या जुगारांत फसवणूक होत आहेसें वाटलें, तर नेमबाजीच्या जुगारांत नशीब फळफळतें का पहा. पण असल्या कोणत्याच भानगडींत न पडतां त्या मार्केटांत नुसतें भटकलें तरी पुरे होतें. त्या मार्केटांतला साधा फेरफटका हा एक अनुभव होता आणि मी व वात्स्यायन या अनुभवांतच मश्गुल होतों. पाय चालूं लागले कीं चालायचें, आणि पाय दमले कीं नजर दुकानांतल्या प्रसाधनांवर फिरवीत उभें राह्यचें, असा आमचा खाक्या होता—

इतक्यांत पलीकडच्या नाक्यावरील दृश्याकडे माझें लक्ष गेलें आणि नजर चकित झाली.

चकित व्हावी असेंच तें दृश्य होतें. दोन स्त्रिया. तरुण. सुंदर. त्यांतली विशेष तरुण ती आमच्याकडे धृष्ट नजरेनें पाहात आहे आणि तिच्याहून थोडीशी वडील असलेली दुसरी तिला खेंचून नेत आहे. अशा भर बाजारांत एक स्त्री दुसरीला खेंचीत आहे, एवढेंच दृश्य चकित करायला पुरेसें आहे. पण त्यांतल्या एका स्त्रीची दृष्टि आमच्यावर खिळली आहे आणि दुसरी स्त्री तिला ओढून

नेत आहे—कोणाचीहि वृत्ति अगदीं अंतरंगापासून ढवळून निघायला मग अवकाश किती ? पण त्याहि परिस्थितींत त्या दोन तरुण स्त्रियांकडे, विशेषतः या ओढाताणीच्या पवित्र्यांतल्या स्त्रियांकडे पाहात राहण्याइतकी माझी नजर निर्ढावलेली नव्हती. ती एकदम गोंधळली, आणि शेजारच्या दुकानांतल्या बाहुल्यांकडे वळली. वळली पण लगेच मागें फिरली आणि त्या दृश्याकडे धावली. पण आतां तें दृश्य होतेंच कुठें ? तें केव्हांच अंतर्धान पावलें होतें. आतां ती आमच्याकडे धृष्ट नजरेनें पाहणारी तरुणीहि नव्हती आणि तिला भरबाजारांत खेंचणारी तिची मैत्रीणहि नव्हती. त्या विघ्नसंतोषी बाईनें तिच्या (कीं आमच्या ?) त्या निरुपद्रवी समाधानांत बिब्बा घातला होता !

क्षणभर वाटलें, आपल्याला भरबाजारांत उभ्या उभ्या एखादें स्वप्न तर पडलें नाहीं ? स्वप्न या भपकेबाज बाजाराला अगदीं शोभेसें होतें, पण क्षणांत तें विरलें. डोळ्यांवर तें स्वप्न तरळत आहे आणि आंत हुरहूर, तगमग किंवा असेंच कांहींतरी होत आहे—आणि तरीहि कांहीं घडलेंच नाहीं अशा आविर्भावांत वात्स्यायनांशीं गप्पा मारण्याचा मी प्रयत्न करीत आहें—

इतक्यांत आमच्यासमोर त्या दोन स्त्रिया उभ्या ! आणि त्यांतली ती तरुण, सुंदर, आमच्याकडे धृष्ट दृष्टीनें पाहणारी–डाव्या हातांत मखमली मिजाशीची मनिबॅग आणि उजव्या हातांत रंगीबेरंगी ऐटबाज वेष्टनांत गुंडाळलेली कसलीशी वस्तु धरून आमच्याकडे–माझ्याकडे–पाहात आहे. तिची दृष्टि संकोचलेली आहे, चेहरा गोंधळलेला आहे, पण त्याच्यावर एक प्रकारची अधुरी उत्सुकता आहे आणि म्हणूनच तो कमालीचा आकर्षक दिसत आहे.

हें काय चाललें आहे तरी काय ? अजून तें स्वप्नच सुरू आहे कीं काय ? पण स्वप्न कसें असेल ? ती तर अगदीं खरी दिसत आहे. तिच्या ओठांवर कांहींतरी उत्सुक शब्द अडखळत आहे. माझें एकदम वात्स्यायनांकडे लक्ष गेलें आणि त्यांच्या चेहऱ्यावर कसलीशी अलिप्तताच भासली, याचेंहि मला आश्चर्य वाटलें. तोंच तिच्या तोंडून शब्द फुटला—एक अर्धाच, आणि लगेच माझ्या ध्यानांत आलें कीं, हिला इंग्रजी नीटसें येत नाहीं. आतां काय करायचें ? पण 'ज तोंडून व्यक्त होत नव्हतें तें हातांतून व्यक्त होत होतें—होतें आहेसें वाटत होतें. तिच्या हातांतली वस्तुच बोलकी बनत होती—

एकदम माझ्या डोक्यांत प्रकाश पडला—ही ती हातांतील वस्तु आपल्याला देण्याचा प्रयत्न तर करीत नसेल ? पण कां ?—अन् कां नकळे, क्षणांत वाटलें, ही आपल्याला ती भेट देत असेल. आणि मीं एकदम म्हटलें—तिच्या इंग्रजीच्या ज्ञानाची पुसटशी जाणीवहि न होतां म्हटलें—Is this a present ? (आपण ही भेट देत आहांत का ?) माझ्या तोंडून 'प्रेझेंट' हा शब्द बाहेर पडला मात्र, तिचे डोळे लकाकले आणि ओठांशीं अडलेलें इंग्रजी फटकन् बाहेर पडलें. "Yes-Yes—Present-Kyoto doll!" (होय होय, भेट—आमच्या किओटोची बाहुली !)

तिच्या डोळ्यांतल्या मासोळीची उडी, तिच्या कलदार बोलण्याचा बिलोरी आवाज आणि तिच्या हातांतल्या वस्तूची रंगीन झळाळी—या साऱ्यांचें मिश्रण माझ्या मनांत सळसळलें आणि मी पार गोंधळून गेलों. कसलें कांहीं आकलनच होईना. हा भर बाजार, त्यांत मी कुठचा कोण, ही जपानी बाई मला पाहते, लगेच एक वस्तु विकत घेते आणि ती मला देण्यासाठीं माझ्यासमोर येऊन उभी राहते—कशास कांहीं पत्ता ! कांहीं संगति ? कांहीं अन्वयार्थ ? एकदम मीं तिच्याकडे पाहिलें. तिच्या नजरेवर नजर रोखून पाहिलें आणि मला तिच्या तरळत्या नजरेंत विलक्षण कळकळ दिसली. लगेच मीं ती वस्तु घेण्यासाठीं हात पुढें केला. एकदम तिचा चेहरा हास्यानें फुलला.– आनंदानें उजळला !

त्या वस्तूचा स्पर्श किती गोड लागला ! जणूं मुलखाचें माधुर्य त्यांत ओतलेलें होतें. माझ्या साऱ्या वृत्ति भरभरून आल्या. मला काय बोलावें, काय करावें हेंच सुचेना. सुदैवानें मी क्षणांत ताळ्यावर आलों आणि खिशांतल्या डायरींत तिचा नांवपत्ता लिहून घेण्याचें मला सुचलें.

* * *

भेट आली कीं परतभेट गेलीच पाहिजे ही जपानी पद्धत मला माहीत होती. सुदैवानें मजपाशीं एक सुबकशी हस्तीदंती हत्तींची जोडी होती. दुसऱ्या दिवशीं हॉटेलच्या पोऱ्याबरोबर ती तिच्याकडे पाठवून दिली. आपली ही परतभेट योग्य आहे कीं अयोग्य आहे, तिच्या भेटीच्या मानानें ती क्षुल्लक ठरेल कीं भारी ठरेल, भारी ठरली तर तिला आपल्या डोक्यावर हें भलतेंच ऋण लादलें गेलें असें नाहीं का वाटणार, वगैरे कसल्याहि गोष्टीचा विचार मीं केला नाहीं. कसा करणार ? जपानी भेटीचें शास्त्र मला माहीतच नव्हतें. परतभेटीनें भेट देणाऱ्या

व्यक्तीला अडचणींत पडल्यासारखें वाटतां कामा नये, तिचा अपमान झाल्यासारखें वाटतां कामा नये, वगैरे मला कांहीं ठाऊक नव्हतें. आपल्याकडची सर्वोत्कृष्ट वस्तु तिला द्यायची, आणि तिच्या भेटींत ज्या उदार, आतिथ्यशील, संस्कारित अंतःकरणाचें दर्शन झालें त्याचा होईल तितका सन्मान करायचा एवढीच माझी बुद्धि होती. माझ्या जवळच्या वस्तूंत ही हत्तींची जोडी सर्वोत्कृष्ट होती, म्हणून ती मीं पाठविली. अशी वस्तु आपल्यापाशीं निघाली याचाच मला आनंद झाला, आणि त्या आनंदाच्या भरांत मी ती जोडी पाठवून दिल्याचेंहि विसरून गेलों.

पण दुसऱ्या दिवशीं सकाळींच माझ्या खोलींतला टेलिफोन वाजला. फोनवर स्त्रीचा आवाज. माझ्या स्मृतीनें एकदम गिरकी खाल्ली! हा तिचाच आवाज. पण त्या आवाजांतून माझ्या नांवाच्या आद्याक्षरापलीकडे कसला बोध झाला नाहीं. टेलिफोनवर संभाषण करण्याइतकें–आपल्या तुटपुंज्या इंग्रजीला चेहऱ्यावरच्या, नजरेंतल्या भावांची जोड दिल्याशिवाय आपल्या मनांतला आशय व्यक्त करण्याइतकें–त्या भाषेचें ज्ञान तिजपाशीं नव्हतें. तो फोन वाजला तसाच तुटला––फक्त तुटतांना अडखळला!

जरा वेळानें फोन पुन्हां वाजला. आतां हॉटेलच्या कौंटरवरचा कारकून बोलत होता, "मिस कियो साकुराय् आपल्या भेटीबद्दल आपले आभार मानीत आहेत आणि आपण टोकिओला परत केव्हां जाणार म्हणून विचारीत आहेत.–" मी केव्हां जाणार, कोणत्या गाडीनें जाणार वगैरे सांगितलें. मिनिटभरांत टेलिफोन पुन्हां वाजला. तो कारकून सांगत होता—"मिस् साकुराय् आपल्याला निरोप द्यायला स्टेशनवर येतील."

याच कारकुनानें आमच्यापाशीं सिंक्योगोकू मार्केटची शिफारस केली होती. त्याच मार्केटमध्यें साकुराय् मला भेटली—नुसती एकदांच भेटली असें नव्हे आतां ती मला पुन्हां भेटणार—स्टेशनवर मला निरोप द्यायला येणार! खरेंच सिंक्योगोकू मार्केट हें एक आश्चर्य आहे. कारकून म्हणाला तें अगदीं बरोबर. माझ्या आयुष्यांतला एक आश्चर्यकारक अनुभव मला याच मार्केटांत आला.

पण मी टोकिओला जाणार हें हिला कसें समजलें? अच्छा! म्हणजे मी पेन-परिषदेसाठीं आलेला प्रतिनिधि एवढें तिला ठाऊक आहे, आणि पेन-परिषदेच्या प्रतिनिधींची हालचाल तिला पक्की माहीत आहे. साहित्यिकांबद्दल प्रेम आणि

आदर यांनीं भारावून गेलेल्या असंख्य जपानी मुलांमुलींपैकींच ती एक आहे. परवां सिंक्योगोकूमध्यें तिनें आम्हांला पाहिलें आणि या भावनांची कदर करण्यासाठींच तिनें ती बाहुली मला भेट दिली. तिच्या मैत्रिणीला तिचा हा सारा भावडेपणा वाटला असावा आणि म्हणून ती तिला परावृत्त करीत असावी.

कांहीं कां असेना, साहित्यिकांबद्दलचा आदर व्यक्त करण्यासाठीं तिनें मला निवडलें होतें. आणि मला निरोप देण्यासाठीं ती मुद्दाम किओटो स्टेशनवर येणार होती. मला फार फार बरें वाटलें. धन्य वाटलें. स्टेशनवर मी तिची अधीरतेनें वाट पाहूं लागलों. पण गाडीला आठदहा मिनिटें उरलीं तरी तिचा पत्ता नाहीं. आंत निराशा दाटली. अस्वस्थता संचरली. आतां गाडी सुटायला फक्त चारपांच मिनिटें आहेत. आतां कसली येते ती? माझी अधीर अस्वस्थ नजर फलाटाच्या टोकांपर्यंत फिरून आली. आतां कसली येते? तरीपण नजर स्टेशनवर फिरत होतीच. पुरता निराश होऊन मी माझ्या जागेवर येऊन बसणार, इतक्यांत ती दिसली. धावत धावत येत होती. धांदलीनें येत होती. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत ती धांदल मला मजेदार वाटली.- इतक्यांत ती आली. हसली आणि नजर माझ्या नजरेवर रोखून तिनें आणखी एक वस्तु माझ्यापुढें धरली. मी थक्क झालों, मला कांहीं कळेनाच. ही आणखी भेट कशाला? तसें मीं तिला म्हटलें. पण माझें म्हणणें तिला कळलेंच नाहीं. ती आपली आग्रह करीत आणि ती वस्तु माझ्या हातांत कोंबण्याचा प्रयत्न करीत राहिली.

अखेर मीं ती घेतली, कृतज्ञ हातांत धरली आणि कृतज्ञ नजरेनें तिच्याकडे पाहात राहिलों. बोलणें शक्यच नव्हतें. मन मात्र आदर, आपुलकी, कृतज्ञता यांनीं भरून गेलें. त्यांतच विषादाची एक छटा उमटली. ही किओटोची कुठली कोण—मुद्दाम मला भेट देते, मला निरोप द्यायला येते. आणि येते ती अशी कीं, क्षणांत हा संबंध संपणार! आतां पुन्हां कधीं ती मला भेटणार नाहीं. भेटण्याचा संभव नाहीं. तिच्या भेटींच्या रूपानें तिची स्मृति शिल्लक राहील. पण कोरडी स्मृति! अंतःकरणांत एक सूक्ष्म वेदना उठली—पण कृतज्ञतेच्या भावनेंत भिनून गेली.

इतक्यांत गाडी हलली. मी घाईघाईनें चढलों आणि तिचा निरोप घेऊं लागलों. भारतीय पद्धतीनें तिला नमस्कार केला. आणि ती—गाडीच्या बरोबर पावलें टाकीत चालूं लागली—आणि वाढत्या वेगानें पावलें टाकतां टाकतां 'सायोनारा' 'सायोनारा' असें पांच वेळां म्हणाली. हळूहळू तिची मूर्ति मागें मागें जाऊं

लागली, दिसेनाशी झाली आणि तिच्या कलदार आवाजाला कारुण्याची झार आणणारा तो 'सायोनारा' तेवढाच माझ्या कानांत झंकारत राहिला.

*   *   *

योशिएला ही हकीगत मीं सांगितली—उत्साहानें सांगितली आणि तिनें माझ्या साऱ्या उत्साहावर आणि अभिमानावर घडाभर थंड पाणी ओतलें. ती म्हणाली—

—त्यांत इतकं हुरळून जाण्यासारखं काय आहे? भेटी देणं आणि भेटी घेणं याचं आम्हां जपानी लोकांना वेडच आहे. त्यासाठीं कसलंहि निमित्त पुरतं. आज काय कोणाचा वाढदिवस आहे, मग दे त्याला चित्राची एक फ्रेम, आज काय ऑगस्टमधलं चंद्रदर्शन आहे, मग दे काव्याचं अगर चित्रांचं पुस्तक बक्षीस. बाहुल्यांचा सण आला कीं प्रत्येक मुलीला बाहुली मिळते आणि चेरीच्या मोहराच्या दिवसांत चेरीच्या फुलांची नक्षी काढलेले रुमाल सारखे फडफडतात. आम्ही जपानी लोक भेट देण्यासाठीं निमित्तच शोधीत असतों.

—पण—मीं कांहीं तरी बोलण्याचा प्रयत्न केला.

—पणबिण कांहीं नको.

—अग पण ती मला स्टेशनवर निरोप द्यायला कां आली?

—हात्तिच्या! त्याचं कारण उघड आहे. तिनं तुम्हांला एवढीशी बाहुली दिली, आणि तुम्हीं परतभेट काय पाठविली तर भारी किंमतीचे हस्तीदंती हत्ती. तेव्हां त्याची परतफेड करणें भागच होतं. आम्ही जपानी लोक असलं ऋण डोक्यावर घेऊन राहणारे नाहींत.

असेल, तसें असेल! पण खरेंच, तसें असेल? माझें अंतःकरण विषादानें भरून गेलें. आपलें कांहीं तरी हरवलें, कांहीं तरी हरपलें असें वाटलें. सारा उत्साह, सारा अभिमान गळून पडला. जड पावलानें हॉटेलांत परतलों.

पण खोलींत आलों, टेबलावरच्या त्या बाहुलीकडे पाहिलें नि म्हटलें, नाहीं. योशिए म्हणते तें इतर जपान्यांच्या बाबतींत खरें असेल, पण साकुरायूच्या बाबतींत तें बिल्कूल खरें नाहीं. असणें शक्य नाहीं. तिची भेट म्हणजे नुसता उपचार नाहीं. ती भेट अशीतशी नाहींच मुळीं. निर्मळ स्नेहाचा धागा तिच्या भोंवतीं गुंडाळलेला आहे.

आणि आज ती बाहुली मी माझ्या कपाटांत पाहतों, तेव्हां त्या बाहुलीच्या मागें साकुरायूची मूर्ति — काळ्याभोर केसांची, इवलाल्या मासोळीसारख्या डोळ्यांची, प्राजक्ताच्या फुलासारखें हसणारी मूर्ति उमलते, आणि मग—

—स्वतःला इंग्रजी येत नसतांनासुद्धां पुतण्याकडून लिहवून घेऊन नियमित पत्रें पाठविणाऱ्या,

—ॲपेण्डिसायूटिसच्या आजारांत मीं दिलेल्या हत्तींच्या जोडीवर नजर खिळवून पोटांतल्या वेदना विसरूं पाहणाऱ्या,


—पत्रांतून चेरीच्या कळ्या पाठविणाऱ्या,

—वर्षदिनाची पत्रिका पाठवितांना कोमल कलादृष्टि व्यक्त करणाऱ्या,

—स्वतःचा फोटो पाठवितांनाचा संकोच शालीनतेनें आकर्षक करणाऱ्या,

—आणि जपानचें सांस्कृतिक सौंदर्य मला कळविण्याकरितां (पुतण्याच्या साहाय्यानें कां होईना पण) शब्दांचें सारें सामर्थ्य गोळा करणाऱ्या—

त्या राजस स्त्रीच्या स्नेहाचा सुगंध माझी स्मृति दरवळून टाकतो.



चंद्रोत्सव

योमुरा सिक्युरिटीजकडून आलेलें चंद्रोत्सवाचें निमंत्रण मी पाहातों आणि माझें मन हरकून जातें. जपानी चंद्रोत्सव म्हणजे शरदृऋतूंतील चंद्रदर्शनाचा समारंभ. जपानी रसिकतेच्या मुग्ध स्वप्नाळूपणाचें आणि भावगर्भ काव्यात्मकतेचें प्रतीक, असें या उत्सवाचें वर्णन मीं वाचलेलें असतें. तें आतां प्रत्यक्षच अनुभवायला मिळणार म्हणून खूप होऊन जातों. चांदण्याचें हिम कणकणानें पसरत पृथ्वीवर येत आहे, आजूबाजूचीं झाडें–फुलझाडें त्याच्या पिठुर मायेनें रोमांचित झालेलीं आहेत, चांदण्यानें फुललेल्या अंगणांत एक शोभिवंत चौरंग मांडलेला आहे, त्याच्यावर लाकडाच्या एका स्वच्छ नितळ पात्रांत पंधरा 'ओडाङ्गो' (भाताचे लाडू) कोमल कौशल्यानें रचून ठेवलेले आहेत, शेजारींच एका नक्षीदार फुलदाणींत सुसुकी गवताच्या नुकत्याच पसवलेल्या रोपाची पुष्परचना शोभते आहे, रंगीन खाद्यपदार्थांच्या बशीवर चंद्राचे किरण पसरले आहेत, चौरंगाच्या एका बाजूला किमोनो-कन्या सामीसेनच्या सुरावर नाचत आहेत, त्यांच्या किमोनोंच्या रंगीन बाह्या आणि त्यांच्या हातांतले रंगदार पंखे यांच्या विभ्रमांची युति मजेदार वाटत आहे–चौरंगाच्या दुसऱ्या बाजूला झाबुतान,(गिरद्या)वर बसलेले युकाताधारी पुरुष चांदण्यानें फुललेल्या नजरेनें एकमेकांशीं गप्पा मारीत आहेत, मधूनच त्यांच्या गप्पांना काव्य-गायनाची स्फूर्ति चढत आहे,–माझ्या नजरेसमोरच्या निमंत्रणावर हीं दृश्यें उमटूं लागतात. पण हीं कोमल काव्यमय दृश्यें 'पेन'परिषदेच्या असंख्य प्रतिनिधींच्या उभार उत्साहांत कशी काय उमटणार ? मात्र, चंद्रोत्सवाच्या उत्साहानें मन पुरतें भारलेलें असतें. असल्या शंकांना अवसर देण्यास तें बिलकूल तयार नसतें.

मनाचा हा उद्योग सुरू असतांनाच अंतःकरणांत कांही तरी शाश्वत, सनातन असें जागृत होत आहे असें वाटतें. कसल्या तरी निरंतर अनुभवाचा धागा आतांच्या अपेक्षेशीं जोडला जात आहे, आणि त्याला तरल स्पंदन प्राप्त होत आहे, असें वाटूं लागतें. पण तो अनुभव साकारत नाहीं. त्याला गंध-रूप-लक्षण प्राप्त होत नाहीं. स्वप्नाच्या तरल स्मृतीप्रमाणें होतें. क्षणांत तो सांपडतोसा वाटतो, क्षणांत निसटतो. निसटतो म्हणूनच त्याला पकडण्याचा प्रयत्न सुरू होतो. निकरानें सुरू होतो. मग तो अबोध अनुभव कोठल्या तरी एका शब्दांत जमा होत आहे असें वाटतें. शब्द अगदीं जिभेच्या टोकावर येतो, पण उमटत नाहीं. जादूचें फुलपांखरूं मुठींत सांपडलें म्हणून मूठ उघडावी तर कांहीं नाहीं !—

अशी मूठ चारदां, पांचदां, अनेकदां उघडतों...आणि मग एकदम अवचित आठवतें–अरे! हा शब्द म्हणजे 'कोजागिरी'!

माझा मीच चकित होतों. 'कोजागिरी' हा शब्द आठवूं नये ना? ज्या कोजागिरीच्या कार्यक्रमांनीं मन आणि देह अनेकदां न्हाऊन निघाला, त्याचें स्मरण होऊं नये? इतकें आपलें व्यक्तित्व आपल्या संस्कृतीला पारखें व्हावें? आधुनिक जीवनानें आपल्या व्यक्तित्वाचे धागे इतके कुरतडावे? पण मग जपानमध्यें सांस्कृतिक सणांना—अभिजात सांस्कृतिक सणांना-इतकें महत्त्व कसें? त्यानें तर आधुनिक जीवन पूर्ण आत्मसात् केलें आहे! मग त्याच्या जीवनांत प्राचीन संस्कृति इतकी भिनलेली कशी? आणि माझा भारतीय आत्मा जागृत करण्याची शक्ति तिच्यांत आली कोठून? जी शक्ति मला पाश्चात्त्यांच्या सणांत—त्यांच्या ख्रिस्मसमध्यें, ईस्टरमध्यें अगर ऑल सोल्समध्यें कधीं आढळली नाहीं, ऑल सोल्सच्या रात्रीं चर्चच्या आवारांत मेणबत्त्यांची आरास पाहूनहि अगर मिलानच्या ड्युओमोमध्यें लाल फुलांची पूजा पाहूनहि जो माझा भारतीय आत्मा जागृत झाला नाहीं तो जागृत करण्याची शक्ति जपानच्या चंद्रोत्सवांत कशी आली? मन आश्चर्यानें भारून जातें. लगेच जपानविषयींची आपुलकी त्यांत मिसळते. कांहीं काळ आंत, अंतरंगांत कसलें तरी अबोध समाधान पसरत आहे असें वाटतें... नि मग जरा वेळानें जाणवतें कीं, भारतीय संस्कृति आणि जपानी संस्कृति यांच्यांत कसलें तरी जिव्हाळ्याचें नातें आहे, कसल्या तरी नाजुक धाग्यानें दोघांचें सांस्कृतिक जीवन एकत्र बांधलेलें आहे. हें कसलें नातें आहे हें ध्यानांत यायला फार वेळ लागत नाहीं. लक्षांत येतें कीं, मानव आणि निसर्ग यांच्यामधील सुमंगल संबंधांच्याच अधिष्ठानावर या दोनहि संस्कृति उभारलेल्या आहेत.

दिवसभर पावसाची पिरपिर चालू होती. आज कसलें चंद्रदर्शन नि कसला चंद्रोत्सव, या विचारानें मन सारखें रंजीस होत होतें. आतां पावसाची झड थांबली आहे. तासभरांत पावसाचा थेंब उतरलेला नाहीं. पण खोलीच्या खिडकींतून आकाश काळवंडलेलें दिसत आहे. वाटतें, जावें का, जाण्यांत कांहीं अर्थ आहे का? तरी पण जाण्याची तयारी करतोंच. एक मन दुसऱ्या मनाची समजूत घालतें—चंद्र दिसला नाहीं तरी समारंभ असेलच. चंद्राच्या किरणांत न्हाऊन निघतां आलें नाहीं, तरी समारंभाच्या प्रकाशझोतानें रंगून

निघतां येईलच. कपडे करून लिफ्टपर्यंत येतों, तों समोर स्वच्छ नितळ आकाशांत चंद्राचा गोल जपानी कंदिलाप्रमाणें टांगलेला! नजर तिकडेच लागते—वेध घेत राहते. इतक्यांत जाणिवेचा झटका बसतो कीं, चंद्र चांगला कासराभर वर आला आहे, आपल्याला उशीर झाला आहे. मी घड्याळाकडे एक अधीर नजर टाकतों नि जाऊन लिफ्टचें बटन खसकन् दाबतों!...

उद्यानाच्या प्रवेशद्वारांत योमुरा सिक्युरिटीजचे डायरेक्टर आमचें सपत्निक स्वागत करतात. त्या दोघांनींहि किमोनो घातलेला असतो, आणि त्यांच्या भोवतालीं असणाऱ्या कंपनीच्या इतर अधिकाऱ्यांचा पाश्चात्त्य पोशाख त्यांच्या अस्सल जपानी पोशाखाशीं विसंगत दिसतो. उद्यानाच्या आवारांत आमचें पुन्हां स्वागत करणारे कंपनीचे लोकहि पाश्चात्त्य पोशाखांतच असतात. मला त्यांचें अस्तित्व अनावश्यक वाटतें. किंबहुना खुपतेंच. खरें म्हणजे, यांनीं यांच्याऐवजीं किमोनो घातलेल्या मुली ठेवायला हव्या होत्या. त्यांच्या दाणेदार हास्यानें आमचें सुंदर स्वागत झालें असतें. या मुलींच्या विचारांत चंद्रोत्सवाच्या समारंभाचा विचार मिसळतो नि माझी नजर अंगणांत सुसुकीशोभित चौरंगाच्या आसपास नृत्य करणाऱ्या किमोनो-कन्यांना शोधूं लागते. पण त्या कोठेंच दिसत नाहींत. उलट जरा दूरवर, बागेंतल्या तळ्याच्या पलीकडे गर्दी दिसते आणि तिचा गलका कानांवर येतो. ही गर्दी, गलका, बाजार नजरेंत शिरतो आणि मनांत फुललेल्या सुरंगीच्या कळ्या कोमेजून जातात. चंद्रदर्शनाच्या शांत, तुष्ट, कलात्म विधीच्या अपेक्षेनें माळलेल्या माळा विस्कटून जातात. तो बाजार नजरेला अगदीं नको असतो, आणि तरी नजर तिकडेच धावते, स्वतःला फसवते, कांहीं तरी शोधूं लागते.

तळ्याच्या अलीकडच्या रस्त्यानें आम्ही जात असतों. थोडेंसें गेल्यावर एका स्टॉलकडे जाण्याची सूचना मिळते. आम्ही तिकडे जातों. स्टॉलभोवतीं बरीच गर्दी असते. एकदोघे जरा बाजूला होतात. एक कच्ची सिमिटाच्या रंगाची बशी घेऊन तिच्यावर ब्रशाचे फटकारे ओढण्यांत दंग झालेले दिसतात. हा काय प्रकार बुवा, असें म्हणून मी त्या गर्दीत शिरतों. पाहतों – एका टेबलावर निरनिराळ्या आकारांच्या आणि घडणीच्या बशा, फूलदाण्या ठेवलेल्या असतात. मधोमध रंगाचें साहित्यहि असतें. मी चौकशी करतों नि समजतें कीं, हे रंग, हे ब्रश, या बशा, या फूलदाण्या म्हणजे साहित्यिकाच्या अंगांत दबून बसलेल्या चित्रकाराला आव्हान होत.

शब्दांच्या साहाय्यानें चित्रें रेखाटण्याच्या तुझ्या कौशल्याचा तुला खूप अभिमान आहे नव्हे का? पाहूं या तुझी चित्रदृष्टि खरोखरच किती अस्सल आहे ती. घे त्यांतली एक बशी. बशी नको असेल तर फूलदाणी घे आणि काढ त्यावर एखादी आकृति. शोभूं दे त्यावर तुझी नाजूक नखरेल सही. मग दे ती इकडे. आम्ही ती रातोरात भट्टींत घालूं, चांगली तावून सुलाखून काढूं आणि मग ती आपल्या पक्क्या रंगांची आणि झकपक पॉलिशची शोभा मिरवीत तुझ्या हॉटेलांत हजर होईल आणि तुझ्या सेवेला रुजू होईल. कल्पना सुंदर! पण 'पेन'च्या प्रतिनिधींत स्वतःच्या अंगीं अभिजात चित्रकला अगदीं उसळ्या घेत आहे अशी खात्री असणारे फार! त्यामुळें त्या टेबलाभोवतीं या प्रकट्टू पाहणाऱ्या चित्रकारांची थाप गर्दी लागून राहिलेली. आतां, चित्रकला अगदीं अष्टांगांनीं प्रसन्न झाली, म्हणून ती असल्या चरबट चव्हाट्यावर कशी चमकणार? अर्थात् मला स्वतःला याची विवंचना नसते. ब्रशाची नाजूक करामत आपल्याला जमणार नाहीं हें मला माहीत असतें. म्हणून मी, इतर साहित्यिक आपल्या हातांतल्या ब्रशांची कशी शोभा करतात हें पाहत उभा राहतों, नि उत्तम करमणूक होते! एक साहित्यिक बिगारींतल्या पोरांच्या मक्तेगिरीवर आक्रमण करतो आणि 'उमाळ्यावरी येतसे सूर्यबिंब विशाल' बशीवर उठवून खालीं सही ठोकतो. दुसरा खिशांतून एक नटीचें चित्र काढतो आणि तिची छबी बशीवर उमटविण्याचा प्रयत्न करतो. पण या साऱ्यांचें परिमार्जन एक गोरी साहित्यिका करते. कुसुंबी, काळा आणि गडद हिरवा या तीन रंगांच्या दहा-पांच फटकाऱ्यांत ती मला यामागाचीच्या 'रूरल लिरिक पोएम्' या काव्यात्म चित्राचें स्मरण करून देते. आमचे हिंदी उपन्यासकार वात्स्यायनसुद्धां एक सुंदर चित्र तन्मयतेनें रंगवितांना दिसतात. (बिचाऱ्यांच्या वांट्याला अखेरीला निराशाच येते. नंतर तीन दिवस सकाळ-संध्याकाळ ते हॉटेलच्या कौंटरवर आपली बशी आली का असें उत्सुकतेने विचारीत आणि 'वुई आर सॉरी सर' असा ठराविक जबाब त्यांना मिळे.) मला हें साहित्यिकांचें चित्र-रेखाटन पाहत राहण्यांतच मजा वाटते; पण आजकाल गमतीचा निर्भेळ आस्वाद कोणाला सहनच होत नाहीं. स्टॉलवरच्या एका माणसाचें माझ्या रिकामटेकड्या उद्योगाकडे लक्ष जातें नि तो एक बशी व ब्रश माझ्या हातांत कोंबतो. माझा नाइलाज होतो. आंतल्या आंत चरफडतों. पण लवकरच

चरफडीचें रूपांतर काळजींत होतें आणि हें नसतें लचांड निभावणार कसें अशी विवंचना लागते. मग लगेच एक कल्पना सुचते. आपल्याला चित्रकर्म जमत नसेल, पण लहानपणीं आठल्ये गुरुजींच्या कृपेनें घटवलेली आपली मोडी सही तर आपल्यापाशीं आहे! तिचे चार–दोन फराटे या ब्रशीवर ओढले तर या जपान्यांना ती त्यांच्या चित्रलिपीप्रमाणेंच मोहक वाटेल! ते मला चित्रकार म्हणणार नाहींत, पण कॅलिग्राफिस्ट तर म्हणतील? कॅलिग्राफी (अक्षर-लेखन) हा आजकाल चित्रकलेचा एक शहाजोग प्रकार गणला जातोच. हा विचार मनांत येतो आणि माझ्या ब्रशी-ब्रश धरण्याच्या क्रियेंत एक ऐट येते. मी ब्रश रंगांत बुडवितों नि ब्रशीवर मोडी सही उठविण्याच्या उद्योगास लागतों. पण लेखणीचें मस्त वळण विसविशीत ब्रशांत कसें येणार? सही मध्येंच फसफसते! हातांतली ब्रशी तशीच आपटून फोडावी असें वाटतें. पण तेवढें धैर्य होत नाहीं. काय करावें म्हणून मन घोटाळत आहे तोंच स्टॉलवरचा मनुष्य माझ्या हातांतली ब्रशी ओढून घेतो नि माझें नांव विचारतो. मला त्याचा राग येतो नि सूड म्हणून मी त्याला भलतेंच नांव नि भलताच पत्ता देतों. वाटतें, भली जिरेल! (पण पुढें वात्स्यायनांची ब्रशी मध्येंच गळफटल्याचें समजलें तेव्हां त्यांच्याऐवजीं आपलीच जिरली याची जाणीव झाली, पण अर्थात् मी कोणाला तसें सांगितलें नाहीं.) इतक्यांत टेबलावर ब्रशांशेजारींच बोरूंची रास पडलेली दिसते–आणि एकदम खंत वाटते. खरेंच, ब्रशाऐवजीं बोरू घेतला असता तर सही कशी मस्त जमली असती!

त्या स्टॉलभोंवतालच्या गराड्यांतून बाहेर पडतों नि वाटतें, हा काय चंद्रोत्सव–हें चंद्रोत्सवाचें विडंबन! पण लगेच ध्यानांत येतें कीं, नाहीं, यांत एक रीत आहे. तिचा कलेशीं संबंध आहे. या उत्सवाच्या मूळ हेतूची त्यांत कदर आहे. आतां आमचे साहित्यिकच त्याचें विडंबन करतात त्याला लोक काय करणार? आणि योमुराच्या लोकांनीं या कलात्मक कार्यक्रमाऐवजीं आम्हांला सर्कशींतल्याप्रमाणें पेटत्या कड्यांतून उडी मारायला सांगितलें असतें तर आम्ही काय करणार होतों?

दहापांच पावलें जातों तों आणखी एक स्टॉल दिसतो. त्याचें दर्शन थोडेंसें चमत्कारिकच दिसतें. एका चौकोनी टेबलावर बांबू उभारून त्यांना दोऱ्या बांधलेल्या आणि या दोऱ्यांना चारपांच इंच रुंदीच्या आणि दीडदोन फूट लांबीच्या

कागदाच्या चिरफळ्या टांगलेल्या. खालीं टेबलावर शाईची दौत आणि बोरूंची रास. यांतली एक चिरफळी घ्यायची आणि तिच्यावर आपलें एक आवडतें वचन लिहायचें–आणि अर्थात् खालीं सही करायची. कां नकळे, माझ्या डोक्यांत एक मिस्किल कल्पना येते. मी एक चिरफळी घेतों, तिच्यावर मर्ढेकरांची 'पिपांत मेले ओल्या उंदीर' ही ओळ अतिशय काळजीपूर्वक लिहितों आणि खालीं लफ्फेदार सही करतों. सही करतों नि मनाला एक प्रकारची उपरति होते. आपण हें कां केलें? जेथें एखादें सुंदर सुभाषित लिहायचें तेथें हें अभद्र वचन कां लिहिलें? हा नुसता मिस्किल व्रात्यपणा! जरा वेळानें ध्यानांत येतें कीं, हा नुसता निरागस मिस्किलपणा नाहीं. त्यांत एक चीड आहे–मघांशीं माझी कॅलिग्राफी फसली त्याची चीड. मग मन पश्चात्ताप पावतें आणि ती चिरफळी फाडून तिचे राई-राईएवढे तुकडे करतें. अर्थात् जें मनांत होतें तें हातांनीं वठत नाहीं. तेवढें धैर्य होत नाहीं. पण एक सत्कृत्य आपण मनोमन केलें एवढ्यानेंच मन थोडें शांत होतें. निर्मळ बनतें.

जरा पुढें जातों तों आणखी एक घोळका दिसतो. हें काय आणखी, असें म्हणून मी त्यांत शिरतों, तों एक मनुष्य लिफाफ्यांची रांग लावून बसला आहे आणि त्याच्या हातावर एक छोटासा रंगीन पक्षी उडत, बागडत, चिवचिवत असलेला दिसतो आहे. मी विचारतों, हें काय? शेजारचा इसम सांगतो, हा पक्षी तुमचें साहित्यिक-भविष्य सांगेल–समोरच्या लिफाफ्यांपैकीं हवा तो तूं मनांत धर, पक्षी तो नेमका हुडकून काढील आणि चोंचींत धरून तुझ्या हातांत देईल; त्या लिफाफ्यांत तुझें भविष्य असेल. हा खेळ मला फार पसंत पडतो. पण आपलें भविष्य कळण्याअगोदर इतरांच्या ललाटीं काय आहे तें कळावेंसें वाटतें. म्हणून मी तसाच उभा राहतों. तों एक साहित्यिक स्वतःच्या लिफाफ्याची मागणी करतो. पण पक्षी कोणताच लिफाफा उचलीत नाहीं, फक्त चोंचीनें एक-दोन इकडचे तिकडे करतो. तेव्हां तो साहित्यिक कबूल करतो कीं, आपण थोडी लबाडी केली होती, एकदम दोन लिफाफे मनांत धरले होते. मग तो एक लिफाफा निश्चित करतो, पक्षी तो उचलतो आणि त्याचें भविष्य बाहेर पडतें कीं—तुम्ही छानछोकीच्या आणि शिंदळकीच्या गोष्टी लिहाल! त्याबरोबर हशा पिकतो, आणि त्याच्या शेजारचा मित्र, त्याच्या पाठीवर थाप मारून, 'लेका, तुला खूप पैसा मिळणार' असें त्याचें अभिनंदन करतो. नंतर दुसरा

एक साहित्यिक आपलें नशीब उघडतो. त्याला सांगितलेलें असतें कीं, तुम्ही प्रेम-पत्रें लिहाल ! लोक एकदम 'वाहवा ! वाहवा !' असें ओरडतात, कारण त्याचें वय असतें सत्तरीच्या पलीकडे ! मग मला वाटतें, आपणहि आपलें भविष्य पाहावें. मी माझा लिफाफा योजतों आणि पक्षी नेमका तो उचलून आणून देतो. पण लिफाफा उघडण्यास हात कचरतो. तुम्ही 'हजार पाकक्रिया'-सारखा ग्रंथ लिहाल असें त्या लिफाफ्यांत आलें तर काय करायचें ? अखेरीला धीर करून लिफाफा उघडतों. आणि त्यांत निघतें : 'तुम्ही परीक्षेचे पेपर लिहाल.' मग ध्यानांत येतें कीं, हें भविष्य वगैरे कुछ नाहीं, नुसती गंमत आहे. यांत कौतुक करायचें तें त्या पक्ष्याचें. तो तुमची नजर अचूक हेरतो आणि लिफाफा काढून देतो.

* * *

या घोळक्यांत एक मध्यमवयस्क स्त्री असते. माझें भविष्य बाहेर पडतें तेव्हां ती हसते नि माझ्याकडे पाहते. लगेच माझ्याकडे येते नि माझें नांवगांव विचारते. मी भारतीय आहें हें समजल्यावर तिला थोडा आनंद होतो. तिनें नेहरूंचें आत्म-चरित्र वाचलेलें असतें. ती माझ्या लेखनाबद्दल चौकशी करते. तिच्या आवाजांत आपुलकी असते. नजरेंत सलगी दिसते. ती विचारते, तुम्हीं चहापानाचा विधि केलात? मी म्हणतों, नाहीं. ती म्हणते, मग चला आणि आम्ही चालूं लागतों. चालतांना ती स्वतःबद्दल बोलते. ती एक भाषांतरकर्त्री असते. तिनें इंग्रजींतून पुष्कळ कथा—कादंबऱ्या जपानींत आणलेल्या असतात. एच्. इ. बेट्स्‌चें 'डॅफोडिल स्काय' तिनें नुकतेंच भाषांतरलेलें असतें. बेट्स् तिचा आवडता लेखक. मी म्हणतों, छान ! बेट्स् माझाहि आवडता लेखक आहे. त्याची प्रतीकात्मक शैली मला फार आवडते. त्याचीं रसदार निसर्गवर्णनें मला अतिशय आवडतात. ती म्हणते, हीं वर्णनें जपानच्या कोवळ्या नक्षीदार निसर्गाला छान लागू पडतात, म्हणून बेट्स् जपानींत आणतांना फार मजा येते यावर मी बेट्स्‌च्या 'स्टेशन' या कथेबद्दल बोलतों—आणि मी बोलत असतांना ती हळूच माझा हात आपल्या हातांत घेते.

आम्ही चहापानाच्या घरांत येतों. घर चांगलें उंची असतें. जपानी कारा-गिरीच्या आणि सौंदर्यदृष्टीच्या खुणा सर्वत्र दिसतात. तोकोनोमांतलें चंद्रोदयाचें चित्र बहारदार असतें. फुलदाणींतलीं लिलीचीं शुभ्र फुलें नाजूक छटांनीं

शोभतात. छतावरची नक्षी फारच जिवंत दिसते. त्याला टांगलेले दोन कागदी कंदील म्हणजे दोन नक्षत्रगोलच येथें आणून लावले आहेत असें वाटतें. खालची तातामी तकतक तकाकते. मधल्या चौरंगावरचें लाखेचें पॉलिश सोनेरी झळाळीनें लकाकतें. पण हें चहागृह नव्हे. चहापानाच्या विधीचें अस्सल ठिकाण नव्हे. चहाच्या जपानी विधीबद्दल मीं थोडेंसें वाचलेलें असतें. त्याचें मला आकर्षण असतें. म्हणूनच आदल्या रात्रीं मी एका चहापानाच्या समारंभाला मुद्दाम गेलों होतों. गेलों नि फजित पावून परत आलों. तो चहापानविधि नव्हता, चहापान-विधीची चेष्टा होती. तीन-चार समानधर्म्यांनीं अलिप्त वृत्तीनें साजरा करण्याच्या समारंभास तीन-चारशें लोक हजर होते. अर्थात् कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं अशी स्थिति झाली. (माझा पायपोस कांहीं काल अक्षरशः हरवला!) आणि मग धांदल, गडबड आणि गोंधळ यांची यथेच्छ खैरात झाली. गैरलागू नाट्यप्रयोग, गैरलागू भाषणें आणि गैरलागू उपचार यांनीं बेजार होऊन परत आलों. मघांशीं या बाईनें चहा-पानाच्या विधीचा उल्लेख केला तेव्हां याची भरपाई होईल अशी आशा मनांत दाटली. पण हें चहागृहच नसतें, निदान कल्पनेंतल्या चहापानाच्या पर्णकुटीशीं याचा कांहीं संबंध नसतो. येथील चहा-पानाचीं उपकरणें अगदीं अभिजात असतात. चहादेखील हिरव्या पेजेसारखा विधियुक्त असतो. तो देतांना सुंदर, शालीन अगत्य व्यक्त होतें; पण चहापानाच्या पर्णकुटींतल्या त्या शांतीचा प्रत्यय येत नाहीं, ती शांतितुष्टि निर्माण होत नाहीं. जगाच्या जंजाळापासून क्षणभर मुक्त झाल्याचा साक्षात्कार होत नाहीं. अंतः-करणांत अर्थगर्भ आत्मचिंतनाचा आशय निर्माण होत नाहीं. कारण आत्म-चिंतनांत रमून जाण्याचें हें ठिकाणच नव्हे – आणि असतें तरी काय उपयोग? मिसेस नाकामुराला (माझ्या नूतन मैत्रिणीला) आत्मचिंतन वगैरे गोष्टी साफ पसंत नाहींत हें स्पष्ट असतें. ती सारखी बोलत असते. आपण भाषांतरलेल्या पुस्तकांबद्दल बोलते, भाषांतराच्या अडचणींबद्दल बोलते, आणि स्वतःबद्दलहि बोलते. अर्थात् स्वतःबद्दल कोरून, मापून बोलते. स्वतःच्या प्रोफेसर नवऱ्या-बद्दल बोलते, त्याच्या विद्वत्तेची स्तुति करते, आणि आपण त्याच्यापासून घटस्फोट घेतला असल्याचेंहि सांगून टाकते. मी एकदम कान टवकारतों. आतां एखाद्या मानवी समस्येची ओळख होणार अशी आशा वाटते. आणि मीं, तूं घटस्फोट कां घेतलास असें विचारतों. त्याचें मात्र ती धड उत्तर देत नाहीं. स्वभाव, स्वातंत्र्य, लेखनावर जगण्याची हौस वगैरे गोष्टींचें बयाण लावते,

पण निश्चित कांहीं सांगत नाहीं. मी मात्र हा प्रश्न आडूनतिडून अनेक प्रकारांनीं विचारतों. विचारतांना चेहरा करुण करतों. आवाजांत सहानुभूति ओततों स्त्री एकटी राहूं शकत नाहीं, तिच्या विकासाला पुरुषाच्या सहवासाची आवश्यकता असते, एकलकोंड्या जीवनामुळें तिच्या ठिकाणचा प्रतिभेचा झरा आटण्याचा संभव असतो, असें मी भावनानिर्भर आवाजानें सांगतों. माझ्या सांगण्याचा विलक्षण परिणाम होतो. तिचा चेहेरा लालीलाल होतो. डोळे पाणावतात. ओठ स्फुरण पावतात. ती एकदम पर्स उघडते, रुमाल काढते. मला वाटतें, तो डोळे पुसण्याकरितां. पण ती तो माझ्यापुढे धरते आणि म्हणते, मी हा आपल्याला भेट देऊं ? मी चकित होतों. आपल्या बोलण्याचा असा कांहीं परिणाम होईल अशी कल्पना नसते. तिला बोलकें करावें नि तिच्या रहस्याला वाचा फोडावी एतढीच माझी इच्छा असते. मला काय बोलावें कळतच नाहीं. एका अनोळखी स्त्रीकडून ही असली हातरुमालासारखी भेट घेण्याची कल्पना मला कशीशीच वाटते. पण तिच्या हातांतला तो सुंदर रुमाल आणि तिचा तो आर्त आकृष्ट चेहरा पाहिल्यावर मला नाहीं म्हणण्याचें धैर्य होत नाहीं. मी नुसता पाहत उभा राहतों. ती 'घ्या ना' म्हणते आणि रुमाल हातांत कोंबते. मी तो अगदीं हलक्या हातानें, त्याला फारसा दाट स्पर्श होणार नाही अशा रीतीनें घेतों आणि अलगद खिशांत ठेवून देतों – आणि अभावितपणें हात कपड्याला पुसतों ! मग एकदम वाटतें, अरे, तिच्या ध्यानांत तर आलें नाहीं ? पण ती भारावलेल्या नजरेनें दूर कोठें तरी पाहात असते. थोड्याच वेळांत भानावर येते नि म्हणते, "अच्छा ! तुम्ही टोकिओला आलांत म्हणजे मी तुम्हांला फोन करीन." एवढें म्हणते नि निघून जाते. मी तसाच उभा राहतों. काय करावें क्षणभर समजतच नाहीं. नुसता समोरच्या तळ्याकडे पाहतों. इतक्यांत 'पेन-परिषदे'चा एक ऑस्ट्रेलियन शिलेदार एका मायको (उमेदवार गेशा) मुलीला हातावर झुलवीत झुलवीत येतो नि म्हणतो, "तुला गांठलंन् वाटतं तिनं. आतां भरली कंबक्ति तुझी. आतां सोडणार नाहीं ती तुला. सारखी कोणाचा तरी पाठलाग करीत असते. मला पण पकडलंन् होतं. पण मी निसटलों — नि मला ही मधाची कुपी गवसली," असं म्हणतो नि आपल्या मुलीच्या गालावर टिचकी मारतो. तीहि नजर उडवून हसते आणि त्याच्याबरोबर चवड्यावर उडतीं पावलें टाकीत निघून जाते. मला चमत्कारिक वाटतें. मी तसाच तेथें उभा राहतों. चालण्याची उमळच पायांत उरत नाहीं. निर्बोध नजरेनें तळ्याच्या पाण्याकडे पाहत राहतों. माझा मलूल हात

अभावितपणें खिशांत जातो नि त्या रुमालाला स्पर्श झाल्याबरोबर सटकन् बाहेर येतो. जरा वेळ तसाच लोंबत राहतो. मग पुन्हां खिशांत जातो. आंतल्या आंत रुमालाची चुरगळी करतों आणि ती बाहेर काढून तळ्यांत फेकून देतों, नि मन एकदम अपराधी बनतें. आंतल्या आंत खाऊं लागतें. कां केलें मीं असें? कां फेकला गेला तो रुमाल? एका मायकोशीं उंडारलेला प्रणय राजरोस करीत हिंडणारा सांगतो म्हणून? ती बाई तरुण असती, तयार असती तर ही मायको भेटेपर्यंत थांबला असता का तो? असल्या या इसमाकडून नीतिपाठ घ्यावा मीं? एका स्त्रीच्या चारित्र्यावर दुसऱ्यानें उडविलेल्या शिंतोड्यानें मीं माझें मन मलिन करून घ्यावें? शाबास माझी! मी स्वतःची निर्भर्त्सना करूं लागतों. स्वतःशींच कुढूं लागतों. आपलें व्यक्तित्व घरंगळतें आहे असें वाटूं लागतें –

इतक्यांत उमाशंकर जोशी कोठूनसे येतात आणि 'काय पाध्येमहाराज' अशी हांक मारतात नि माझी सुटका करतात. 'काय ड्रिंक वगैरे कांहीं नको काय?' असें विचारतात व मी त्यांच्याबरोबर चालूं लागतों. उजवीकडे रस्त्याच्या कडेला कॉफीचे, फळांचे, रसपानाचे स्टॉल्स असतात. तेथल्या मुली हास्याचीं फुलें उधळून कॉफी, रस वगैरे देत असतात. मी रस पितों, पण तो देणाऱ्या मुलीच्या हास्यांत हास्य मिसळूं शकत नाहीं. उमाशंकरजींना त्या हास्याचें कांहीं नसतेंच. मग आम्ही दोघे चालूं लागतों. त्या तळ्यांत पाणी आणणाऱ्या ओढ्यावर एक छोटासा लाकडी पूल असतो तेथपर्यंत येतों, आणि त्या पुलाच्या कठड्यावरच बसतों. आणि दृष्टि समोरचें दृश्य रेखूं लागते—

समोर एक विश्वच पसरलें आहे. तळ्याच्या विस्तारावर छायाप्रकाशाचा खेळ सुरू आहे. तळ्याच्या कांठीं असलेल्या झाडांच्या विस्तारांतून येणाऱ्या चंद्रकिरणांनीं पाण्यावर प्रकाशाचीं फुलें फुललीं आहेत आणि पाण्याच्या तरंगावर तीं वायलप्रमाणें लहरत आहेत. उघड्या विस्ताराच्या तरंगांवर चंद्राच्या प्रकाशामुळें जरतारी शोभा पसरली आहे, आणि मध्येंच चंद्राचें प्रतिबिंब वाऱ्याच्या लहरीबरोबर अलगद हलत आहे. तळ्याच्या पलीकडच्या कांठाकडे एक लहानशी होडी वल्हवली जात आहे आणि चंदेरी प्रकाशांत हा एक भव्य पक्षीच आपले विशाल पंख पसरून जात आहे असें वाटत आहे— आणि त्याच्या झपाट्यामुळें तळ्यावरचे खरे-खुरे हंसपक्षी भयचकित होऊन पंख फडफडवीत पळत आहेत! पलीकडच्या कांठावर लोकांनीं दोन-तीन जाळ

पेटवले आहेत. समोर असे हे प्रकाशाचे प्रकार प्रकटले आहेत, पण आमच्या भोंवतीं मात्र झाडाच्या छायांचा अंधारच दाटला आहे. हवेंतल्या ओलाव्यामुळें तोंदेखील ओला वाटतो. अगदीं अंगाला चिकटतो. त्यामुळें विलक्षण निर्भर वाटतें. विश्रब्ध वाटतें. उमाशंकर कांहीं बोलले म्हणजे शांतता भंगते. पण मी फारसें कांहीं बोलत नाहीं. म्हणून संभाषण वाढत नाहीं. आम्ही नुसते समोरच्या दृश्याकडे टक लावून पाहत बसतों. समोरून लोक जात-येत असतात, ते नजरेंत व्यत्यय आणतात नि दृष्टि भानावर येते. मग उजवीकडच्या जंजाळाची जाणीव होते—आणि मग जाणवतें कीं, आपण इकडे आलों ते असे स्तब्ध–निःस्तब्ध बसून राहण्यासाठीं नाहीं. आपणहि या जंजाळांत शिरलें पाहिजे, पाहिलें पाहिजे. पण उठण्याची ऊर्मिच होत नाहीं.

इतक्यांत तो ऑस्ट्रेलियन आपल्या मायकोला हातावर खेळवीत समोरून जातो नि माझी तंद्री भंगते. मी आंतल्या आंत बेचैन होतों. आतां हा आला. जरा वेळानें ती भाषांतरकर्त्री आली तर! तिला भेटण्याचें आतां मला धैर्य होणार नाहीं. समोरचें शांत विश्व एकदम अस्वस्थ बनतें. त्यांत तिच्या त्या रुमालाची चुरगळी मला दिसते – आणि मन पुनः अपराधी बनतें. या अपराधानें रांधलेल्या मनानें मी तिला पुन्हां भेटूं शकत नाहीं. तिला टाळलेंच पाहिजे, आणि टाळायचें असेल तर पलीकडच्या गर्दींत शिरलें पाहिजे. गर्दींत कोणीच भेटत नसतें. भेटलें तरी ओळखत नसतें. गर्दी ही आजच्या जगाची एक अजब किमया आहे. गर्दींत पाहतां येतें, पण न्याहाळतां येत नाहीं. जाणवतें, पण बोध होत नाहीं. भावतें, पण आंत शिरत नाही. अशा या गर्दींतच आतां शिरलें पाहिजे. मी उमाशंकराना कांही तरी सबब सांगतों नि उठून चालायला लागतों. चालायला म्हणजे काय, जवळ जवळ पळायलाच! एकदां गर्दींत मिसळतों आणि मग सुटलों असें वाटतें.

* * *

या गर्दीला मुळीं एक आत्मा नाहींच. पांच-दहा आत्मे आहेत आणि ते पांच-दहा प्रकारांनीं व्यक्त होण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांतला एक आत्मा हिगाशियामा टेकडीची काळवंडलेली आकाशरेषा न्याहाळीत आहे. दुसरा गप्पा-ष्टकांत गर्क झाला आहे. तिसरा बिअरचे पेले भरून देणाऱ्या मायकोंच्या दृष्टी-बरोबर खेळत आहे. कांहीं वेळापूर्वी या गर्दीचा रसिक आत्मा रंगमंदिरांत होता.

'आकेबोनो' नृत्याच्या थाटानें बेहोष झाला होता. त्या नृत्याच्या सौंदर्याची पखरण करणाऱ्या नर्तिकांच्या पदक्षेपाबरोबर तो नाचत होता. त्यांच्या हातांतील पंख्यांच्या तरल हालचालींबरोबर त्याच्या डोळ्यांच्या पापण्या फडफडत होत्या. रंगदार किमोनोच्या बाह्यांबरोबर तो हिंदळत होता. आणि त्यांच्या वाद्यांच्या करुण स्वरांबरोबर तो कंप पावत होता. पण लवकरच तेथल्या गर्दीनें तो गुदमरला. तहानेनें त्याचा जीव व्याकुळ झाला. मायकोच्या हातांतील पेयांची सोनेरी सळसळ त्याच्या नजरेपुढे नाचूं लागली. त्याची एकेक कला विलग होऊं लागली—आणि त्यानें हळूच काढता पाय घेतला. लवकरच रंगमंदिर रिकामें झालें. गर्दी सोनेरी पेयाकडे वळली.

तरी पण आमच्या रसिक आत्म्याची नृत्यलालसा मधूनच जागृत होते आणि त्याची दृष्टि पुनः रंगमंदिराकडे वळते. पण आतां तेथें किमोनोच्या चित्ररम्य बाह्या फडफडत नसतात. ऐटदार हातांतले पंखे हालत डोलत नसतात. बदामी डोळ्यांच्या नितळ पापण्या उडतपडत नसतात आणि सामीसेनचे सूर मूक बनलेले असतात. एखादी किमोनो-कन्या त्या रंगमंदिराच्या रेषदार-लयदार खांबाच्या आधारानें उभी असते, पण तिच्या डोक्यावर आतां केशकलापाचा मुकुट नसतो. तिच्या पावलांत चैतन्याचें स्फुरण नसतें. नेत्रांत अर्थांचे संकेत नसतात. आतां तिची वृत्ति मुग्ध असते. नजर निश्चल असते. आणि चेहऱ्यावर एक प्रकारचा संकोच असतो. पण आमच्या आत्म्याची रसिकता आतां रंगदार बनलेली असते. सोनेरी पेयाची सळसळ त्याच्या अंगांत शिरलेली असते. हा मुग्ध, लाजवट कारभार त्याला पसंत पडत नाहीं. त्याला मायकोंचे आणि गेशांचे वार्तालाप आणि नेत्रसंकेत हवे असतात. त्याहि त्याचें स्वागत करण्यास सज्ज असतात. आपलें सोनेरी (दांतांचें) हास्य खुलवितात आणि आमचा आत्मा या सोनेरी हास्याशीं हातांतल्या पेयाच्या सोनेरी धारेची सांगड घालण्यांत रमून जातो.

तरी रसिकतेची, अव्वल अभिजात रसिकतेची आराधना अद्याप सुरू आहे... समोर पाहा. तळ्याचा पृष्ठभाग उजळला आहे. कांठावरून तळ्यांत डोकावणाऱ्या रंगमंदिराचे दिवे प्रकाशूं लागले आहेत. पाणरेषेवरून टांगलेल्या कंदिलांतील मेणबत्त्या आपले रंगीन किरण फांकूं लागले आहेत. कंदिलांच्या प्रतिबिंबाची रांगच रांग पाण्यांत उमटली आहे आणि तळ्याच्या तरंगांबरोबर हालतडोलत

आहे. मागची मंदिराच्या देवदारी पडद्यावरची चिडाची हिरवी आकृति जिवंत झाली आहे. आपली नजर क्षणांत या आकृतीकडे धावते. क्षणांत पाण्यांतल्या प्रतिबिंबांचा वेध घेते. आकृतीकडून प्रतिबिंबांकडे आणि प्रतिबिंबांकडून आकृती-कडे, अशी तिची एकसारखी धावपळ होते–आणि मग प्रतिबिंबांचे हालते संस्कार आकृतीवर होतात, आणि तें चिडाचें झाडच हालतें आहे असें वाटतें. आपल्या नजरेवरचा भ्रम असा रंगलेला असतांनाच नर्तिका येतात आणि त्यांचें नृत्य सुरू होतें. आतां या नर्तिकांचें रूप पालटलेलें असतें. त्यांच्या नृत्याचें रूपहि पालटलेलें असतें. हिरव्या-निळ्या किमोनोंची जागा लाल–शेंदरी किमोनोंनीं घेतलेली असते. त्यांच्या नाजुक मस्तकांवरचे केशकलापांचे रचनाबद्ध मुकुट उतरविले असतात. त्याऐवजीं सुंदर स्वाभाविक केस रुळत, भुरभुरत असतात. त्यांचीं पावलेंहि आतां सांचेबंद नसतात. त्यांत एक स्वैर स्वच्छंद गति असते. एक मोकळी मिजास असते. हावभावांत अंतःस्फूर्ति असते. हातांतले पंखेदेखील रूढ संकेतांनीं बांधलेले नसतात. त्यांत नवा अर्थ असतो, अन्वय असतो. सामीसेनच्या करुण स्वरांची जागा आता कोटोच्या चैतन्यमय स्वरांनीं घेतलेली असते. असें हें मुक्त, स्वतंत्र, जिवंत नृत्य. त्याच्या गतीनें वातावरणाला एक नवीनच जाग येते. नवीनच शक्ति संचरते, आणि त्याच्या रंगीन आकृतींनीं तळ्याच्या पृष्ठभागावर एक जादूची दुनियाच निर्माण होते. वाटतें, या कोणी पाताळींच्या जलकन्याच चंद्रदर्शनासाठीं येथें आल्या आहेत–आणि चंद्रोत्सवाच्या नृत्याचीं पावलें टाकीत आहेत.

असें हें रसरंग नृत्य. चैतन्यशाली नृत्य ! पण आमच्या रसिक आत्म्याला तें आतां रिझवूं शकत नाहीं. त्याचें चित्त पकडूं शकत नाहीं. तें सोनेरी हास्य आणि ती सोनेरी धार यांनीं त्याचा पुरा कबजा घेतला आहे. तें हास्य त्याच्या नजरेवर डवरलें आहे आणि ती धार त्याच्या धमन्यांत नाचत आहे. एका मामुली जादुगाराच्या कारागिरीनें नजरबंद झालेली त्याची दृष्टि नृत्यांगनांच्या तरल पदक्षेपांचा वेध घेऊं शकत नाहीं. जुझुत्सूच्या उड्यांत अडकलेली त्याची बुद्धि त्यांच्या हातांतल्या पंख्यांबरोबर डोलूं शकत नाहीं. गर्दीतील गप्पांच्या आधीन झालेली त्याची वृत्ति नृत्यांतील आकृतीशीं समरस होऊं शकत नाहीं. खरें म्हणजे किओटोच्या डोंगराळ भागांतील ग्रामकन्यांचा रंगदार आणि ढंगदार पोशाख करून पाहुण्यांना टेम्पुरा खाऊं घालणाऱ्या गेशांचीच त्याला भुरळ पडली आहे.

(आणि त्यांच्या एकेक हास्यकटाक्षांसाठीं एकेक टेम्पुरा पोटांत ढकलून अजीर्णाला आमंत्रण देण्याची त्याची तयारी आहे.) आणि अगदीं पोटांतली गोष्ट म्हणजे सोनेरी धारेच्या त्या प्रमत्त पेयाच्या पेल्यानेंच त्याला पुरतें पकडलें आहे.

आतां हा आत्मा म्हणजे आपला पूर्वीचा रसिक आत्मा उरलेला नाहीं. 'आकेबोनो' नृत्यांतल्या हिगाशियामा टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या मंदिराचें अगदीं उषःकालींच दर्शन घेऊं पाहणाऱ्या अभिसारिकांच्या लयबद्ध पदक्षेपांचें आकर्षण त्याला उरलेलें नाहीं. अंधकारानें भरलेल्या गुहेंत लपून बसलेल्या सूर्यदेवते (आमातेरासू ओ–कामी)ला बाहेर आणून विश्वावर सूर्यकिरणांचा वर्षाव करूं पाहणाऱ्या नृत्याच्या आवेगाची त्याला पर्वा नाहीं. त्याचा आतां पुरा कायापालट झाला आहे. त्याच्या बेहोषीचीं चिन्हें बदललीं आहेत. आतां हा आत्मा म्हणजे ग्रीक वाङ्मयाच्या एका डोळ्यांत हसूं आणि दुसऱ्या डोळ्यांत रडूं आणणाऱ्या डायोनिससचा आत्मा! सुरईतील द्रव्यानें जीवनाचा बगीचा बहरून टाकण्याची मनीषा बाळगणाऱ्या उमरखय्यामचा आत्मा! शुक्राचार्यांच्या संजीवनीविद्येची क्षणार्धांत राळ करून टाकणाऱ्या शक्तीचा आत्मा! किंवा महाभारताच्या संहाराचें सर्वभक्षक उपसंहारांत रूपान्तर करणाऱ्या प्रेरणेचा आत्मा! आणि खुद्द जपानमध्यें 'साकोमारी'च्या रमण्यांत, स्त्री-पुरुषांमधील नाजूक भेदावर आधारलेल्या संस्कृतीचाहि गदारोळ करूं पाहणाऱ्या त्या अग्निगर्भ पेयाचा आत्मा! इहलोकांतील मामुली संकेतांच्या आणि भेदाभेदांच्या पलीकडे आतां हा आत्मा गेला आहे. आपल्या आवडत्या पेयांतला भेदाभेदहि तो ओळखीत नाहीं. बिअर, साके, शांपेन, 'व्हिसुकी' असल्या भेदांची क्षुद्र माया तो जाणीत नाहीं. त्याच्या मुळाशींच असलेल्या ब्रह्माचीच फक्त त्याला आस आहे. परतत्त्वाचाच स्पर्श त्याला झाला आहे! आतां तळ्याच्या पृष्ठभागावर प्रतिबिंबांची माया निर्माण करणाऱ्या समोरच्या नृत्याची त्याला काय पर्वा असणार? त्या नृत्यांत निमग्न असलेल्या नर्तिकांच्या पोशाखांत एक नवीन थाट असेल; त्यांच्या केशकलापांत नवीन स्वैरता असेल; त्यांच्या नेत्रांवर नवीन संकेत असतील; पदक्षेपांत नवीन तरलता असेल अगर स्वरांत नवीन गोडवा असेल—पण ऐहिकाच्या पलीकडे दृष्टि लावून बसलेल्या आत्म्याला या साऱ्याची कसली क्षिति!

समोरच्या नृत्याची माया आतां तो स्वतःच आत्मसात् करूं लागतो. नर्तिकांच्या तरल पावलांचें अनुकरण स्वतःच्या अस्थिर पावलांनीं करूं लागतो.

कोटेच्या स्वरांत आपला घोगरा स्वर मिसळतो. पंख्याच्या हालचालीचे संकेत आपल्या खिशांतल्या (मळक्या) हातरुमालाच्या कशावशा केलेल्या फडफडींत पाहूं लागतो. त्याचें सारें जग त्याच्या या असल्या उद्योगांत येऊन सामावतें!

असें पांचदहा मिनिटें चालतें. कांहीं पाहुण्यांना समोरच्या नृत्याची कदर असते. त्यांचा जीव अस्वस्थ होतो. ते व्याकुळ नजरेनें समोर पाहूं लागतात. समोरच्या नर्तिकांत कसली तरी चलबिचल सुरू आहे असें त्यांना वाटतें. ते जरा न्याहाळून पाहूं लागतात—तों रंगमंदिरांतले दिवे जातात. तेथें अर्थसूचक अंधार पसरतो. अंधारांतल्या अस्पष्ट आकृत्या एकेक नाहींशा होतात. तळ्याच्या पृष्ठभागावरचें जलकन्यांचें नृत्य केव्हांच निमालेलें असतें. आतां तेथें चंद्राचें प्रतिबिंब थरकांपत असलेलें दिसतें. पण आमचा मश्गूल आत्मा!– हे बदल त्याच्या मनाला स्पर्श करीत नाहींत. तो यांच्या पलीकडे गेलेला असतो. अंधार-उजेडाचें सर्वसाधारण जग त्याच्या खिजगणतींत नसतें. तें अंधारलेलें रंगमंदिर त्याला प्रकाशलेलें वाटतें, आणि आपल्याच पावलांनीं तेथें नृत्याचा थयथयाट सुरू आहे अशी त्याची खात्री असते. तळ्याच्या पृष्ठभागावर त्याला चंद्राचें एक बिंब दिसत नाहीं, अनेक दिसतात. तीं थरकांपत नसतात, प्रतिभेनें स्फुरलेलीं दिसतात. आजच्या चंद्रोत्सवाचा त्याला अगदीं साक्षात्कार घडलेला असतो!

*   *   *

आतां आपलें येथें कांहीं काम नाहीं. आपण आतां परतायला हवें. मी निघतों. मघांच्याच रस्त्यानें निघतों. मघांच्या त्या पुलावर येतों. त्यावर टेकतों नि समोरच्या विश्वाकडे नजर टाकतों. पण आतां कांहीं भासत नाहीं. कांहीं जाणवत नाहीं. पंख वल्हवणारा पक्षी अदृष्ट झाला आहे. प्रकाशाचीं फुलें कोमेजलीं आहेत. चंद्रप्रकाशाची जरतारी शोभा काळी पडली आहे. झाडांच्या छायांचा अंधार अस्वस्थ बनला आहे.

मी उठतों नि चालायला लागतों. एक प्रकारच्या तंद्रींतच चालतों. समोरून कोणी येतें-जातें याचें भान उरत नाहीं. कोणा येण्याजाणाऱ्यालाहि माझें अस्तित्व जाणवत नाहीं.


चालतां चालतां मी आडवाटेला लागतों. तळ्यापासून दूर, झाडाझुडपांनीं भरलेल्या भागांत येतों. सगळीकडे चांदणें टिपूर पडलेलें असतें. झाडें, झुडपें, वेली, रस्ता, जमीन – सारीं चांदण्यानें फुललेलीं असतात. पृथ्वी, आप, वायु, आकाश – पंचमहाभूतेंच चंद्रप्रकाशांत न्हाऊन निघत असतात. चंद्रप्रकाशाच्या अभिषेकांत पावन होत असतात. सारें विश्व कसें साक्षात्कार आल्यासारखें चूर बनलेलें असतें.

मीच एकटा चालत आहें. पण माझ्या व्यक्तित्वाचा कण न् कण चांदण्यानें भारलेला आहे. माझ्या आंत, अंतःकरणांत, शांतीचा, प्रसन्नतेचा अपूर्व अनुभव येत आहे. मी त्यांत गढून गेलों आहें, आणि बाहेर पावलें टाकण्याच्या माझ्या क्रियेंत एक प्रकारच्या लयतत्त्वाचा प्रत्यय येत आहे.

इतक्यांत माझें लक्ष डावीकडे दूर जातें. एक डेरेदार वृक्ष. त्याच्या तळाशीं एक बांक, आणि एक जोडपें. निश्चल बसलेलें. निश्चल नजरेनें आकाशांतल्या चंद्राकडे पाहत असलेलें. दोघांच्याहि अंगांत किमोनो आहे. त्याच्यावर छाया-प्रकाशाचीं फुलें फुललेलीं आहेत. आणि सभोंवतालीं नीरव, निःस्तब्ध शांति आहे !

मी जरा न्याहाळून पाहतों. निरखून पाहतों. नि माझ्या ध्यानांत येतें कीं, मघां प्रवेशद्वारापाशीं माझें, सर्वांचें, ज्या जोडप्यानें स्वागत केलें होतें तेंच हें जोडपें – योमुरा सिक्युरिटीज्चे डायरेक्टर आणि त्यांची पत्नी !

कात्सुरा बंगला



कात्सुरा व्हिला म्हणजे तोशिहिटोच्या जीवनाशीं दैवानें जो मजेदार खेळ केला त्याचें हें एक फल आहे.

खेळ मजेदार पण विपरीत. त्याला असें गोड फळ आलें हें आपलें साऱ्यांचें भाग्य ! तोशिहिटो हा सम्राट्‌ ओगिमाची याचा नातू. याला दत्तक घ्यावें अशी त्यावेळचा कर्तुमकर्तुम् सेनानी हिदेयोशी याची लहर लागली. खुद्द सम्राट्‌ आणि त्याचे दाही दिशांचे सरदार-दरकदार हिदेयोशीच्या पायावर लोळण घेत होते. पण आपण हलक्या कुळांत जन्मलेले ही जाणीव त्याला जाळीत होती. आपलें नाहीं

तरी आपल्या वंशाचें रक्त उजळावें म्हणून त्यानें बादशहाचा वंशज दत्तक घ्यायचें ठरविलें आणि तोशिहिटोला मांडीवर बसविलें. तोशिहिटोला बालवया-पासून वाङ्मयाचा नाद. वृत्ति जात्याच रसिक. पण दैवानें त्याला हिदेयोशीच्या रणांगणांतून जाणाऱ्या मार्गावर खेंचलें. त्यानें मुकाट्यानें म्यानांतून तलवार काढली आणि रिकाम्या म्यानांत रसिकता भरून ठेवली. पण दैवाची लीला अशी मिस्किल! लवकरच हिदेयोशीच्या पोटीं औरस पुत्र जन्माला आला. झालें. नैसर्गिक ओढीनें कृत्रिम ओढीवर मात केली. हिदेयोशीनें तोशिहिटोला एक निष्प्रभ किताब अर्पण केला आणि त्याला राजवाड्यांत परत पाठवून दिलें.

दैवाचा हा चमत्कारिक खेळ तोशिहिटोच्या पथ्यावरच पडला. त्यानें आपली बंदिस्त रसिकता बाहेर काढली आणि न पेलणारी तलवार म्यानांत कायमची अडवून टाकली. त्यानें युसाईचें शिष्यत्व पत्करलें. युसाई हा त्यावेळचा विख्यात वाङ्मयसेवक. कोकिंश्यूवरच्या टीकेमुळें विद्वज्जगांत मान्यता पावलेला. शिवाय त्याच्या संग्रहीं कोकिंश्यू[1] आणि गेंजी मोनोगाटारी[2] या दोन महान् ग्रंथांचीं हस्त-लिखितें. कालिदासाच्या मेघदूताचें हस्तलिखित संग्रहीं असण्यासारखेंच हें भाग्य. तोशिहिटोनें युसाईचें शिष्यत्व स्वीकारलें आणि त्याच्यापाशीं कोकिंश्यू आणि गेंजी मोनोगाटारीचा अभ्यास केला. गुरूच्या मृत्यूनंतर या महान् हस्तलिखितांचा ताबा शिष्याकडे आला. या दोन ग्रंथांनीं त्याची अभिरुचि बनविली. या दोन ग्रंथांनीं त्याची कलादृष्टि घडविली.

कात्सुरा बंगला आणि कात्सुरा बाग हीं या कलादृष्टीचींच उदाहरणें. मानवी संस्कृतीच्या इतिहासांतल्या अर्थपूर्ण खुणा म्हणून विख्यात झालेलीं उदाहरणें. फ्रँक लॉइड राइटसारख्या वास्तुशास्त्रज्ञाला वेड लावणारीं उदाहरणें. हा बंगला आणि ही बाग एन्श्यू कोबोरीनें बांधली अशी आख्यायिका आहे. एन्श्यू कोबोरी हें त्या काळचें एक प्रस्थ होतें. गाढा विद्वान्, कर्तबगार प्रशासक, आणि प्रतिभा-शाली वास्तुशास्त्रज्ञ म्हणून त्याची कीर्ति होती. चहापानविधीचा पंडित म्हणूनहि त्याला फार मान होता. त्यानें बांधलेलीं चहागृहें आज जपानांत राष्ट्रीय

१.) ९०५ सालीं राजाज्ञेनें तयार करण्यांत आलेला प्राचीन व अर्वाचीन कवितांचा संग्रह.

२.) गेंजीची कथा. लेडी मुरासाकी हिनें अकराव्या शतकाच्या पहिल्या दशकांत लिहिलेली कादंबरी. जगांतली पहिली कादंबरी.

स्मारकें म्हणून गणलीं जातात. अमर्याद पैसा, अमर्याद वेळ आणि अमर्याद स्वातंत्र्य दिलें तरच तो वास्तुरचनेचा विचार करण्यास तयार असे. कलावंताच्या ध्यानीं, मनीं आणि स्वप्नींच काय तीं वावरणारीं हीं अमोल स्वातंत्र्यें तोशिहिटोनें त्याला बहाल केलीं असें ही आख्यायिका सांगते. पण यांत कांहीं अर्थ नाहीं. तोशिहिटोला कोबोरीची गरज नव्हती. कात्सुरा बंगल्याची आणि बागेची रूपरेखा त्याच्या मनांत तयारच होती. गेंजी मोनोगाटारींत अशा अनेक बंगल्यांचीं वर्णनें आहेत. तीं त्याच्या अंतरंगांत मुरलेलीं होतीं. आणि तींच या बंगल्याच्या रूपानें साकार झालीं. म्हणजे दहाव्या–अकराव्या शतकांतील वास्तुशास्त्राचा आत्मा या बंगल्यांत आहे आणि तो राईट–कॉर्बुशिएसारख्या आधुनिक वास्तुशास्त्रज्ञांना वेड लावणारा आहे. हीच या बंगल्याची किमया आहे. खरें म्हणजे ती अस्सल जपानी वास्तुशास्त्राची किमया आहे. चिनी वास्तुशास्त्राचे संस्कार प्यालेल्या वास्तुशास्त्राची नव्हे. ज्या वास्तुशास्त्राचें शुद्ध सुंदर रूप तिसऱ्या शतकांत बांधलेल्या इसे मंदिरांत दिसतें त्या वास्तुशास्त्राची. हें जपानी वास्तुशास्त्र जन्मतःच आधुनिक आहे आणि त्याची आधुनिकता सनातन आहे. ही सनातन आधुनिकताच वाङ्मयाच्या द्वारें कात्सुरा बंगल्यांत उतरली.

वाङ्मयीन अभिरुचींतून हा बंगला जन्मला आणि वाङ्मयीन रसांत तो अनेकवार न्हाऊन निघाला. वाङ्मयाचे अनेक वारे त्याच्या दालनांतून वाहिले. अनेक वाङ्मयीन स्मृति त्याच्या वातावरणांत दरवळल्या. अनेक वाङ्मयसेवकांच्या पदस्पर्शानें त्याची तमामी पवित्र झाली. वाङ्मयसेवकांनीं सांगितलेलीं अनेक रहस्यें त्याच्या कडीकपाटांत दडून बसलीं आणि तेथून अलगद निसटलीं. लेडी मुरासाकी, शे शेनागन[३] आणि ओ–नो–कोमाची[४] यांच्या जीवनांतल्या अनेक रहस्यांचा

३.) १००२ च्या सुमारास लिहिलेल्या माकुरा नो सोशि या डायरीवजा खमंग खुमासदार पुस्तकाची लेखिका.

४.) प्राचीन जपानची एक सुंदर पण निर्घृण स्त्री. तिच्यावर आषक झालेल्या एका सरदाराला तिनें फर्माविलें कीं त्यानें आपल्या रथांतून लागोपाठ शंभर रात्रीं तिच्याकडे खेपा घातल्या तर ती त्याला भेटेल. दुर्दैवानें शंभरावी खेप पुरी होण्याच्या ऐन अगोदर तो मेला. ही प्रमत्त स्त्री म्हातारी होऊन पैशाच्या व रूपाच्या दृष्टीनें अतिशय हैलाखीच्या स्थितींत मेली. तिच्या जीवनावरचें एक नोह नाटक प्रसिद्ध आहे.

भेद येथें झाला. गैंजी, नारिहिरा[५] वगैरेंच्या प्रणयकथांचे गहिरे आणि कोमल रंग येथल्या लाकूडकामाच्या रेषांत अनेकवार खुलले. तीनचार कवींनीं एकत्र बसून बांधलेल्या कवितांच्या सांखळ्या (रेंगा)[६] येथें अनेकवार सांधल्या आणि अनेकदां तुटल्या. येथल्या फुसुमावरील कानो तान्यूच्या[७] चित्रांना चर्चेचे धुमारे अनेकदां फुटले आणि कित्येकदां तुटून पडले. वाङ्मयाच्या अनेक वेली येथें वळचणींवरून आढ्याला पोंचल्या. जपानी वाङ्मयाच्या इतिहासांतलें हें एक विरामस्थान आहे.

या बंगल्याच्या निर्मात्यांची अभिरुचि त्याच्या भागाभागांत दिसते. तोशिहिटोच्या ' ओल्ड शोइन'मध्यें[८] ती दिसते, तशीच ती, नंतर वीस वर्षांनीं बांधलेल्या तोशिताडाच्या 'न्यू गोटेन'मध्यें[९] दिसते. बंगल्याच्या भिंतींत ती दिसते तशीच छपरांतहि ती दिसते. बंगल्याच्या निरनिराळ्या भागांच्या प्रमाणांत ती दिसते. फुसुमावरच्या मेपलपर्णांच्या साध्या नक्षींत ती दिसते. तोकोनोमाच्या भिंतीवरील निसर्गदृश्यांत दिसते. व्हरांड्यांतील फळ्यांच्या पोतांत आणि रेषांत दिसते. सज्जाच्या बांबूकामांत दिसते. पाणरेषेच्या सलग पट्टींत दिसते. छपराच्या किंचित् वाकलेल्या कडेंत ती दिसते. एकंदर बंगल्याच्याच साध्या, सुबक, तरल दर्शनांत ती दिसते. तें सारेंच दर्शन सुरुचिर साधेपणानें संस्कारलेलें आहे.

५.) ' इसे–कथा ' या काव्यकथांचा लेखक आरिवारा–नो–नारिहिरा (८२३–८८०). मधुनमधून गद्यानें जोडलेला काव्यसंग्रह असें या पुस्तकाचें स्वरूप आहे. त्यांत लेखकाच्या प्रणयकथांचाच भरणा आहे.

६.) रेंगा : तीन किंवा अधिक कवींनीं बसून केलेला काव्यरचनेचा प्रयोग. एकानें ७,५,७ अशा मात्रांची तीन ओळींची कविता रचायची; दुसऱ्यानें ७,७ मात्रांची दोन ओळींची, आणि तिसऱ्यानें पुनः पहिल्याच्याप्रमाणें. पहिली आणि दुसरी, व दुसरी आणि तिसरी मिळून एक सलग अर्थाची कविता बनली पाहिजे हा मुख्य नियम. इतर अनेक पोटनियम आहेत. अशा प्रकारें एका कवितेंतून दुसरी निर्माण होते, म्हणून कवितेची सांखळी असें या प्रयोगाला म्हणतां येईल.

७.) एकरंगी चिनी पद्धतीच्या चित्रकलेचा वस्ताद (१६०२–१६७४). तोकुगावा राजवटीच्या सुरवातीच्या कालांतला दरबारी चित्रकार.

८–९.) तोशिहिटोनें १६३६ मध्यें बांधलेल्या आग्नेयेकडच्या भागाला ' जुनें शोइन ' म्हणतात आणि १६५८ मध्यें तोशिताडानें बांधलेला दक्षिणेकडेच्या भागाला ' नवें गोटेन ' म्हणतात.

ज्या मोमोयामा[१०] युगांत वास्तुशिल्पावर ऐश्वर्यशाली अलंकारांची उधळपट्टी होत असे, त्याच कालांत हें साध्या सुरुचिर दृष्टीचें प्रतीक निर्माण झालें. तोशिहिटोच्या नशिबाशीं दैवानें जो खेळ केला, त्याचीच जणूं परतफेड झाली! ऐश्वर्याचें प्रदर्शन करण्यांत हिदेयोशी अग्रेसर होता. त्याच्या दत्तकपुत्रानेंच ही साधी सुबक वास्तु निर्माण केली. प्रथम दत्तक घेऊन मागाहून बेफिकीरपणें फेंकून दिल्याचा हा जणूं त्यानें सूडच घेतला. पण एका सुसंस्कृत, अभिरुचि-संपन्न अंतःकरणाचा तो सूड! विनाशाऐवजीं विकास हा त्याचा प्रकृतिधर्म ठरला! आज निशी होंगांजी मंदिरांत असलेल्या हिदेयोशीच्या दरबारी दिवाणखान्यावर कोरीव शिल्प आणि रसरंग आरास यांचा वीट आणणारा वर्षाव झाला होता. तोशिहिटोनें विनम्र साधेपणा हाच परवल मानला. हिदेयोशीचा दिवाणखाना भव्य विशाल आहे; कात्सुराचा दिवाणखाना नम्र आटोपशीर आहे. त्या दरबारी दिवाणखान्याच्या फुसुमावर सुवर्णरसांत डुंबलेला कानो तान्यूचा कुंचला मनसोक्त नाचला आहे, तर त्याच कानो तान्यूची अतिशय संयमशील कला कात्सुराच्या फुसुमावर रेखलेली आहे. हिदेयोशीच्या दिवाणखान्यांतला रम्मा कोरीव शिल्पाच्या तावदानांनीं मढविलेला आहे, तर कात्सुराचा रम्मा साध्या सफेत गिलाव्याचा आहे. त्या दरबारी वास्तूची तक्तपोशी अनेकरंगी रेखाकृतींनीं चितारलेली आहे, तर कात्सुराच्या तक्तपोशींत हिनोकी लाकडाच्या फळ्यांचें नैसर्गिक रेषासौंदर्यच काय तें व्यक्त होतें. हिदेयोशीनें सत्ता आणि संपत्ति यांचें उन्मत्त प्रदर्शन मांडलें, तर तोशिहिटोच्या संस्कारसंपन्न अभिरुचीचें निर्मळ दर्शन कात्सुराच्या साधेपणांत झालें.

पण साधेपणा म्हणजे भिकारपणा नव्हे. साधेपणा म्हणजे कंजुषपणा नव्हे, अगर चुकारपणाहि नव्हे. साधें दर्शन आणि समृद्ध अंतरंग असा हा प्रकार आहे. कात्सुराचें सामान साधें दिसेल, पण त्याचें मोल भारी आहे. तें दिसायला सामान्य दिसेल, पण आहे खरोखर दुर्मिळ, दुष्प्राप्य, मोठ्या सायास–प्रयासानें

१०.) मोमोयामा युगाचा काल १५६८–१६१५ मानला जातो, पण त्याचा प्रभाव नंतरहि राहिला. त्याचें अतिशय झगझगीत रूप, कात्सुराच्याच सुमारास बांधलेल्या निक्को येथील तोशोगू मंदिरांत आढळतें.

मिळविलेलें. त्यावर अमाप रसिकता खर्च झालेली आहे आणि त्यासाठीं उभा जपान पालथा घातलेला आहे. लाकूड दूरच्या जंगलांतून कसोशीनें निवडून आणलेलें आहे. बांबू चिवारीच्या एका प्रसिद्ध बेटांतून आणले आहेत. आणि शाकार छपरावर चढण्यापूर्वी हिनोकीच्या कित्येक सालींचें भुस्कट फुकट गेलेलें आहे. एखाद्या ग्रंथाच्या साध्या प्रासादिक शैलीमागें अनेक ग्रंथांचें अनेक दिवसांचें अध्ययन असतें तसेंच हें आहे. तोशिहिटोच्या कित्येक दिवसांच्या वाङ्मयीन अभ्यासाचा तो आविष्कार आहे.

बंगल्याच्या भिंतींत, छपरांत अगर सज्जांत जी दृष्टि आहे तीच बागेच्या तळ्यांत, टेकड्यांत अगर झाडांत आहे. कारण तिच्यावरहि तोशिहिटोच्या वाङ्मयीन अभिरुचीचे तसेच संस्कार झालेले आहेत आणि त्याचें वाङ्मयीन आणि सांस्कृतिक जीवन तिच्याशीं तसेंच निगडित आहे. ही बाग म्हणजे तळें, टेकड्या, दरडी. दगड, झाडें, झुडपें, आणि शेवाळ यांचा तो एक पट आहे. खोल दृष्टीनें बनविलेला पट. तळें कात्सुरा नदीचें पाणी आणून बनविलेलें आहे. त्याला अधूनमधून ओढ्याचें अगर कोंडीचें स्वरूप दिलेलें आहे. ओढ्यांवर ठिकठिकाणीं फरशांचे पूल आहेत. त्यांच्या कांठीं इकडेतिकडे ओबडधोबड दगड टाकलेले आहेत. एकदोन ठिकाणीं रेताड किनारा आहे. तळ्याचें पाणी अधूनमधून उभारलेल्या टेकड्यांच्या आणि उंचवट्यांच्या दरम्यान पसरलेलें आहे. टेकड्यांच्या कधीं माथ्यावर, कधीं बाजूवर, तर कधीं पायथ्याशीं चित्रविचित्र आकारांचीं आणि विस्तारांचीं चीड–चेरी–सुगी–हिनोकीचीं झाडें आहेत. तळ्याकांठच्या जमिनीवर आणि बंगल्याकडच्या पटांगणावर हिरवेंचार शेवाळ पसरलेलें आहे आणि त्यावर तऱ्हेतऱ्हेच्या आकाराचे दगड अंतरा-अंतरावर टाकून पाऊलवाटा बनविलेल्या आहेत. हें सारें यदृच्छेनें झालें असें वाटतें, पण सारें विचारपूर्वक बनविलेलें आहे. एकेका झाडाचा वेडावांकडा विस्तार, दगडाचा विक्षिप्त आकार, वाटेचें विचित्र वळण, ओढ्याचा तऱ्हेवाईक ओघ—सारें कांहीं मुद्दाम घडविलेलें आहे. दगड दूरदूरच्या खाणींतून आणलेले आहेत. झाडें कसोशीनें वाढविलेलीं आहेत. शेवाळाची जात मोठी दुर्मिळ आहे. आणि वाटेचीं वळणें वळतांना पावलांना वारंवार विस्मयाची ठेंच लागावी अशी व्यवस्था केलेली आहे. वरवर नजर फिरवली कीं वाटतें, हें सारें नैसर्गिक आहे, निसर्गाचीच ती किमया आहे किंवा सृष्टीच्या प्रारंभकालीं इझानागी

आणि इझानामी [११] यांनीं त्या साऱ्या वस्तु जशा निर्माण केल्या आणि इकडे तिकडे भिरकावल्या तशाच त्या पडल्या आहेत. बागेंतल्या दिव्यांचा आणि दोणींचा ढंग असा आहे कीं, त्या कोणी एखाद्या लहरी शक्तीनें बनविल्या आणि येथें आणून टाकल्या असें वाटावें. प्रत्येक दिव्याचा आणि दोणीचा आकार वेगळा आहे, कळा वेगळी आहे. त्यांच्या दगडाची खाण वेगळी आहे. अनादिकाळीं जणूं त्यांची उत्पत्ति झाली, इतकें त्यांचें दर्शन जुनें आहे, जुनाट आहे. कांहींना तडे गेले आहेत. कांहींच्या कपच्या उडाल्या आहेत. पण तडे मुद्दाम गेले आहेत, आणि कपच्या मुद्दाम उडविलेल्या आहेत. निसर्गानें हें सारें आपल्या लहरीनें केलें असा भास निर्माण करण्याचा आग्रह या साऱ्या खटाटोपाच्या मुळाशीं आहे. कारण निसर्ग येथें प्रमुख आहे. त्याच्या लहरीला महत्त्व आहे. त्याची कदर आहे. निसर्ग हा कोणी शत्रु नाहीं. तो मित्र आहे, सखा आहे. त्याला जिंकायचें नाहीं, तर त्याच्याशीं सहकार्य करायचें, सहजीवनाचे संबंध जोडायचे, अशी जपानी दृष्टि आहे. त्या दृष्टींतून या बागेची निर्मिति झालेली आहे. बाग अर्थात् कृत्रिम, मानवानें बनविलेली, पण ती निसर्गाचा स्वाभाविक भाग वाटली पाहिजे. सारी खटपट मानवाचीच. म्हणजे तोच पाणी सांठवतो, टेकड्या रचतो, झाडें लावतो, पाऊल-वाटा बांधतो, पण जोंवर या साऱ्यांवर निसर्गाचे संस्कार झाले नाहींत, निसर्गानें त्यांना आत्मसात् केलें नाहीं, म्हणजे शेवाळ वाढलें नाहीं, झाडावर बांडगुळें धरलीं नाहींत, पाण्यांत लव्हाळे वाढले नाहींत आणि दिव्याच्या तोंडाच्या कपच्या उडाल्या नाहींत तोंवर बाग तयार झाली असें जपान्यांना वाटतच नाहीं.

जपानी वास्तुशास्त्रांत निसर्गाकडे पाहण्याची ही दृष्टि अंतर्भूत असते म्हणूनच त्याच्या योजनेंत निसर्ग हा घराचा भाग असतो आणि घर निसर्गाचा भाग असतें. जपानी घर भोंवतालच्या निसर्गावर ताठ मान काढून दिमाखानें उभें रहात नाहीं. आजूबाजूच्या झाडींत लोपून जाण्यांत तें धन्यता मानतें आणि जपानी मानवसुद्धां एखाद्या उंच व्यक्तीनें निंच वस्तूकडे अधिक्षेपानें पहावें तसें


---

११. प्रारंभीं फक्त चिखलाचा समुद्र होता. त्यांतून इतर देवतांबरोबर इझानागी आणि इझानामी या देवताहि निर्माण झाल्या. त्यांनीं जपानचा भूदेश निर्माण केला, अशी जपानी लोकांची समजूत आहे.

निसर्गाकडे पाहात नाहीं. खालीं ततामीवर बसून समान पातळीवरून निसर्गाकडे दृष्टिक्षेप करण्यांत तो सार्थक मानतो. तसेंच जपानी घर निसर्ग आणि मानव यांच्यामध्यें पडदा उभारीत नाहीं. उलट, त्याच्या सरकत्या भिंती बाजूला होतात, घर सताड उघडें होतें आणि भोवतालचा निसर्ग हा घराचाच एक भाग बनून जातो. मग निसर्गाचा हिरवा रंग मानवाच्या डोळ्यांत आणि मनांत शिरतो. निसर्गाचे वारे घरांतून वाहूं लागतात. आणि घरांतलीं मनें बाहेरच्या झाडांबरोबर हालूं-डोलूं लागतात. जपानी वास्तुशास्त्रांत निसर्ग आणि मानव, घर आणि बाग अशीं एकमेकांत रमतात, एकमेकांत मिळून जातात.

कात्सुरा बंगला आणि कात्सुरा बाग अशींच एकमेकांत मिळून गेलीं आहेत. त्यांच्यांत कसलाहि केव्हांहि दुरावा राहूं नये म्हणून सज्जानें त्यांना जोडलें आहे. कायमचें जोडलें आहे. सज्जा बंगल्याचाच भाग आहे, पण काबुकी रंगपटाचा एक तुकडा प्रेक्षकांत घुसतो तसा तो बागेंत घुसला आहे. थंडी, वारा, पाऊस यांचा मारा सोशीत आहे. सूर्याची ऊब उपभोगीत आहे. तो बागेशीं हसतो, खेळतो, बोलतो तसाच बंगल्यांतल्या मानवाशींहि हसतो, खेळतो, बोलतो. त्याला बोलावतो. मग मानव येतो, सज्जावर बसतो आणि बागेकडे नजर टाकतो. समांतर पातळीवरून नजर टाकतो. आणि मग त्याला बागेचें निखळ नैसर्गिक दर्शन होतें. निसर्ग त्याला अधिक नैसर्गिक वाटतो. त्याच्या नैसर्गिक रूपांत तो रमून जातो. त्याची एक प्रकारची तंद्री लागते. त्या तंद्रींत त्याला हांक ऐकूं येते. निसर्गाची हांक. अंतःकरणाला भिडणारी हांक. ती त्याला ओढते. खेंचते. तो सज्जावरून उडी मारतो आणि बागेकडे धावतो.

तोशिहिटोला, तोशिताडाला, आणि त्यांच्यामागून अनेकांना निसर्गाची अशीच हांक ऐकूं आली. तिनें त्यांना असेंच ओढलें. अनेकदां ओढलें. तुम्हांआम्हांलाहि ओढील. निदान मला ओढलें —



इम्पीरिअल हॉटेल

"तूं इम्पीरिअलमध्येंच उतरायला हवं—इम्पीरिअलची ऐट कांहीं निराळीच आहे," पासीननें आग्रहानें म्हटलें.

पण पासीनच्या दुसऱ्या एका आश्वासनाप्रमाणेंच या आश्वासनाचा, त्या रात्रीपुरता, पुरा फज्जा उडाला!

हें दुसरें आश्वासन टोकिओच्या हवेबद्दल होतें. आम्ही सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत टोकिओला पोंचणार होतों. पण टोकिओला उन्हाळ्याची एक प्रखर लाट येऊन गेल्याचें नुकतेंच वाचलें होतें, म्हणून आम्ही पोचूं तेव्हां टोकिओची हवा कशी असेल याची फिकीर करूं लागलों. तेव्हां पासीन म्हणाला होता,

"डोण्ट्च्यू वरी. सप्टेंबरच्या बरोबर चार तारखेला टोकिओची हवा बदलत असते. या तारखेला कांहीं तरी होतं—तुफान तरी येतं अगर पाऊस तरी कोसळतो, पण हवा निश्चित बदलते. सप्टेंबरच्या चार तारखेला टोकिओंत शरद् ऋतूचे वारे वाहूं लागतात. तूं कांहीं काळजी करूं नकोस. टोकिओंत आपल्याला झकास हवा मिळेल."

पण आम्ही हॅनेडा विमानतळावर उतरलों, तेव्हां शरदाचा सोडाच, पण कसलाच वारा वाहात नव्हता. वाऱ्याची एक झुळूक नव्हती. सगळीकडे कोंदटल्यासारखें झालें होतें. रात्रीं नऊ वाजतां आम्ही इम्पीरिअलमध्यें आलों, तेव्हां हवेंत गुदमरलेल्या उन्हाळ्याच्या वाफा चांगल्या दाटल्या आहेत असेंच जाणवलें.

आठनऊ तासांच्या वैमानिक प्रवासानें आणि कस्टम्स वगैरेंच्या कटकटीमुळें जीव अगदीं त्रासला होता. केव्हां एकदां खोलींत जाऊन पडेन असें झालें होतें. हॉटेलांत नांव नोंदविण्याचे वगैरे औपचारिक विधि कसेतरी उरकले आणि एक प्रकारच्या भ्रांत अवस्थेंत खोलींत शिरलों. शिरल्याबरोबर ध्यानांत आलें कीं, खोलींतली हवा अधिकच कुंद आहे. पंख्याच्या आशेनें वर पाहिलें तर छत उघडें, ओकें आणि इतकें ठेंगणें कीं, तें अंगावरच उतरतें आहे वाटलें. अशा छताला पंखा लावला तर त्याचें पातें गळ्यावरून अलगद फिरायचें!

सुदैवानें टेबलावर एक बैठा पंखा होता. तो सुरू केला आणि खुर्चीवर कोट टायू फेंकून देऊन पलंगावर अडावा झालों. पण लगेच पंख्याची घरघर कानांत शिरूं लागली आणि आज रात्रीं झोपेचें खोबरें, हा विचार मनाला डसला.

दहावीस मिनिटें तसाच पडून राहिलों. पण भूक कोकलत होती. म्हणून उठलों, चेहऱ्यावर गार पाण्याचे हबके मारले आणि भोजनगृहाकडे निघालों. भोजन-

गृहाचा दरवाजा खसकन् उघडला आणि आंत पाऊल टाकणार तोंच एका वेटरनें अडविलें आणि (अर्थात् अगत्याच्या स्वरांत) म्हटलें,

"साहेब, इथं कोट-टाय् चढवून यायला हवं —"

मला संताप आला — इम्पीरिअलचा आणि मला त्यांत आणून टाकणाऱ्या पासीनचा. म्हणे 'इम्पीरिअल'! — उंच छताची भव्य इमारत बांधतां येत नाहीं आणि हा कोट-नेकटायचा थाट पाहून घ्या. इकडे घामाघुमीनें जीव जातोय् आणि म्हणे कपडे करकचून या!

पण एकीकडे जिवाचा असा संताप होत असतांनाच मनाच्या एका कोपऱ्यांत या हॉटेलांत अशी ही रुबाबदार शिस्त आहे म्हणून बरेंहि वाटत होतें. तरी पण पुन्हां खोलींत जाऊन कोट-टाय् चढविण्याची माझी तयारी नव्हती. त्यांत हा उकाडा! म्हणून मीं त्या वेटरला म्हटलें,

"या कोट-टायूच्या भानगडीखेरीज दोन घास गिळण्याची कांहीं सोय नाहीं का तुझ्या या हॉटेलांत?"

"साहेब, मग तुम्ही ग्रिल्‌मध्यें जा."

"कुठाय् तुझं ग्रिल् हें?"

"तुम्ही असे सरळ जा, मग उजवीकडे वळा आणि मग आर्केडमधून खालीं उतरा कीं तुम्ही ग्रिल्‌मध्येंच शिराल."

मी समोर गेलों. उजवीकडे वळलों. एका कॉरिडॉरमध्यें शिरलों. कॉरिडॉर निरुंद होता. त्याचेंहि छत डोक्याला भिडूं पाहात होतें. त्यांतच उजेडाचा जवळजवळ अभाव, म्हणून कॉरिडॉर अधिकच चिंचोळा भासत होता. चार चार पावलांवर दुतर्फा रांग लावून बसलेल्या दुकानांच्या जाहिराती. खिडक्यांत मालांचे नमुने नटवूनथटवून ठेवलेले होते, पण त्यांच्या भोंवतीं दिव्यांची आरास नव्हती. एखाद्या दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशांत त्यांचें अर्धेमुर्धें दर्शन होईल तेवढेंच. त्यामुळें ते जादुगाराच्या टेबलावरील वस्तूंप्रमाणें रहस्यमय वाटत होते.

पण त्यांच्या रहस्याचा भेद करूं पाहण्याच्या मनःस्थितींत मी नव्हतों. मी तसाच त्या नमुन्यांवर निसटती निस्तेज नजर टाकीत, त्या पावलागणिक अधिक अधिक अज्ञात भासणाऱ्या कॉरिडॉरमधून जात होतों. किती वेळ चाललों, आतां मला कांहीं आठवत नाहीं. एकच गोष्ट आठवते, मी कॉरिडॉरमधून ग्रिलमध्यें उतरलों तेव्हां आपण पाताळांत उतरतों आहोंत असें वाटलें होतें.

आणखी एक गोष्ट आठवते. त्या रात्रीं मला घडशी झोंप लागली नाहीं. तो घरघरणारा पंखा, छातीवर उडी घेऊं पाहणारें छत आणि गुदमरविणारी हवा यांनीं माझ्याविरुद्ध कट केला होता!

* * *

दुसऱ्या दिवशीं मी शक्य तितक्या लवकर शहरांत फेरफटका करण्यासाठीं निघालों. खोलीचा दरवाजा उघडला नि दृष्टि थबकलीच—खोलींतला उजेड बाहेर कॉरिडॉरमधला अंधार कापीत पसरावा हा उलटा न्याय मनाला खटकला.

दोनहि बाजूंनीं हारीनें उभ्या असलेल्या खोल्यांच्या मधून जाणाऱ्या कॉरिडॉर-मध्यें पहिला संस्कार अंधाराचाच झाला. भिंतीला मधूनमधून छोटे छोटे दिवे होते आणि दुरून एका बाजूनें बागेंतला हिरवा प्रकाश आंत येत होता. पण यामुळें काळाकुट्ट अंधार शेवाळला, एवढेंच. दिव्यांच्या प्रकाशाचीं मंद पिवळसर वर्तुळें लालट-काळट खडबडीत भिंतीवर मऊ मखमली माया पसरीत होतीं, आणि दुरून येणाऱ्या प्रकाशाच्या रेखा तिच्यावर नाजुक पिसासारख्या पसरल्या होत्या; आणि त्या कॉरिडॉरमधल्या अंधारावर — अर्धअंधारावर — छाया-प्रकाशाच्या मृदुमजेदार आकृति अधांतरीं नाचत असलेल्या दिसल्या. त्याचा कसला तरी नाजुक नाजुक स्पर्श आपल्या वृत्तींना होत आहे असें वाटलें.

एक प्रकारच्या लहरणाऱ्या वृत्तीनेंच मी बाहेर आलों. समोर रस्त्यापलीकडे एक पार्क दिसला. प्रथम या पार्कमध्येंच जावें असा विचार केला आणि रस्ता ओलांडण्यासाठीं रस्त्याच्या कडेला उभा राहिलों. पण रस्त्यावरच्या वाहनांची जीवघेऊ गर्दी मला पलीकडे जाऊं देण्याचें लक्षण दिसेना. मध्येंच कंटाळून मागें पाहिलें आणि हॅटेलच्या दर्शनी भागाकडे प्रथमच लक्ष गेलें. लक्ष गेलें आणि दृष्टि खिळली. मला वास्तुशास्त्रांतलें फारसें कांहीं कळत नसतांनासुद्धां या इमारतींत कांहीं तरी अप्रूप आहे याची तत्काल जाणीव झाली. पार्कमध्यें जाण्याचा विचार विसरलों आणि मी त्या इमारतीकडेच पाहत राहिलों.

तें दर्शनच विलक्षण होतें. सभोंवतालच्या इमारतींच्यापेक्षां पार निराळें. वेगळ्याच शैलीचें आणि वेगळ्या प्रकृतीचें. आजूबाजूच्या इमारती उंच उभार; ही दुमजली असूनहि बैठी. त्या नितळ झकपक, ही मळकट खडबडीत. त्या आधुनिक, ही प्राचीन नव्हे, पौर्वात्य नव्हे—कांहीं वेगळीच. कोणाच्या तरी प्रतिभा-शाली लहरीची निर्मिति. तिच्यांत एक विलक्षण एकात्मता वाटली. रचनेंत कांहीं

एक व्यक्तित्व जाणवलें. नजर बांधून ठेवण्याची शक्ति आढळली. नुसती नजर बांधून ठेवण्याची नव्हे, तर पाहणाराच्या मुग्धतेला वाचा फोडण्याची. मीं शेजारींच उभ्या असलेल्या एका गृहस्थाला म्हटलें,

" काय मजेदार आहे ही इमारत ! "

" फ्रँक लॉइड राइटनें बांधलेली इमारत—मजेदार असायचीच," तो गृहस्थ आपले अमेरिकन उच्चार उधळीत म्हणाला.

" राइटनें बांधलेली ? "

" होय. आणि त्यांना तिचा विलक्षण अभिमान आहे. या इमारतीच्या रूपानें आपण जपानी वास्तुकलेचा मोठा गौरव केला आहे असं त्यांचं म्हणणं आहे."

" मला त्यांतलं फारसं कांहीं कळत नाहीं. पण समोरचीं टेरेसवरचीं चिडाचीं खुजीं झाडं तेवढींच जपानी लक्षणं मला या इमारतींत दिसताहेत. कदाचित् हें पुढलं कमळाचं तळं— "

" जरा सराईत दृष्टीनें पाहिलं तर आणखी कांहीं दिसतील. राइटनें या इमारतीला कोणता दगड वापरला आहे तो पाहा. अशा मातबर इमारतींना हा दगड वापरलेला सहसा आढळणार नाहीं. 'ओया' नांवाचा लाव्हारसानें बनवलेला हा दगड आहे. "

माझ्या नजरेसमोर कोंकणचा जांभा दगड आला. तोहि असाच लाव्हारसानें बनलेला. त्याचा रंगहि असाच लालट-काळसर. फरक एवढाच कीं, या ओया दगडाला जांभ्याच्यासारखे पांढरे डोळे नाहींत.

आतां सकाळच्या तिरप्या उन्हांत हा दगड थोडा तकाकत होता, आणि आपला छिद्रमय पोत व्यक्त करीत होता.

" राइटनें हा दगड लाकडासारखा वापरला आहे. जपानी वास्तुशिल्पज्ञ लाकूड कापून त्याच्या अंतरंगांतील रेषासौंदर्याचं दर्शन घडवितात, तसं यानं या ओया दगडाच्या कणकणींत पोताचं दर्शन घडविलं आहे. ते समोरच्या प्रवेश-द्वाराचे स्तंभ पाहा. वरचा मजला शिरावर तोलून धरणारी ती स्तंभांची रांग पाहा. वरच्या खिडक्यांच्या चौकटी पकडणारे ते खांब पाहा. त्यांना कठड्या-सारख्या पट्टीनें दिलेला आडवा छेद पाहा. म्हणजे राइटनें दगड लाकडासारखा कसा वापरला आहे याची तुम्हांला कल्पना येईल. दगडाचा उपयोग असा

कांतीव कापीव लाकडाप्रमाणें केल्यामुळें ही इमारत खडबडीत दगडाची असून-सुद्धां नाजुक वाटते. राइटनें या इमारतीवर जी थोडीशी नक्षी काढली आहे ती देखील लाकडावरच्या नक्षीसारखी आहे. ती छपराखालची टेरेसच्या कडेसारखी पुढें आलेली पाणरेषा पाहा—एखादी अलंकारिक रेषा सहज ठेवून दिल्याप्रमाणें वाटते. "

" खरंच, हें छप्पर किती छान आहे ! "

" जपानी घरावरच्या साध्या छपरासारखं हें छप्पर, पण त्याच्यामुळें या इमारतीला खूप मजा आली आहे. राइटनें या सबंध इमारतीवर एक सलग छप्पर टाकलेलं नाहीं. दोन बाजूंना दोन स्वतंत्र बंगल्यासारखे भाग उभारून त्यांच्यावर एकाच छापाचीं दोन छपरं टाकलीं आहेत आणि त्यांना मधल्या टेरेसनं आणि टेरेसमागच्या मजल्यानें जोडून दिलं आहे. हीं दोन छपरं, एखाद्या भव्य धिप्पाड सेनानीच्या कोटाच्या खांद्यांना आलंकारिक किनखापी झिरमिळ्यांचा बुट्टा शोभतो तशीं या इमारतीच्या दोन बाजूंवर शोभताहेत. या इमारतीची अशी तीन भागांत विभागणी केल्यामुळेंच ती बोजड वाटत नाहीं. पण ती अतिशय मजबूत आहे आणि टोकिओची एक अजरामर—अक्षरशः अजरामर—इमारत अशी तिची ख्याति आहे. तुम्हांला माहीत असेलच कीं १९२३ च्या भयंकर भूकंपांतून आणि गेल्या महायुद्धांतल्या वैमानिक माऱ्यांतून ही इमारत सहीसलामत सुटली आहे. "

" विमानमाऱ्यांतून सुटली हा कांहीं तिच्या मजबूतपणाचा पुरावा नाहीं. तो नशिबाचा भाग ! "

" पण १९२३ च्या भूकंपांतून ती बचावली हा नशिबाचा भाग नव्हे. राइटनें लवचिक पायाचं आणि खांबांवर वरचे दगड मधोमध तोलण्याचं तंत्र मोठ्या खुबीनं वापरलं म्हणून ती तगली. शिवाय या ओया दगडालाहि त्याचं श्रेय दिलं पाहिजे. "

" ओया दगडाला ? "

" हो—कारण या दगडांत अंग चोरण्याचा मोठा अमोल गुण आहे. हा मऊ दगड एकमेकांवर आदळला म्हणजे एकमेकांत भिनतो व एकमेकांना पकडतो. हा गुण काळ्या दगडांत नाहीं. काळ्या दगडाचं भांडण हें वैऱ्यांच्या

भांडणासारखं असतं, तर या मऊ दगडांचं भांडण प्रेमिकांच्या भांडणासारखं असतं—त्याचा शेवट मीलनांत होतो."

दगडांत रसिकता पाहण्याच्या त्याच्या बुद्धीचें कौतुक करावें कीं राईटच्या शिल्पकलेचें करावें हेंच क्षणभर मला समजलें नाहीं !

"आजकाल राईटच्या या इमारतीची चेष्टा करण्याची फॅशन झाली आहे. ही इमारत जुनी आहे, तिचं तंत्र जुनंपुराणं आहे, तिच्यांत जागेची उधळपट्टी आहे वगैरे टीका कांहीं लोक करीत असतात आणि तुलनेसाठीं बाजूच्या या 'ॲनेक्स'कडे बोट दाखवीत असतात. पण निसर्गानेंच या आक्षेपकांची अशी कांहीं फजिती केली म्हणतां—"

"फजिती ?"

"हो—अगदीं सोळा आणे. गेल्या वर्षी वीस वर्षांत झालं नव्हतं असं विलक्षण तुफान झालं. चोवीस तासांत सोळा इंच पाऊस पडला. या ॲनेक्समध्यें पाणी भरलं. त्याचीं विद्युत्यंत्रं बंद पडलीं. दिवे गेले. लिफ्टस् थांबलीं. पण राइटच्या इमारतीला काडीमात्र इजा पोंचली नाहीं."

मीं म्हटलें, निसर्ग किती मिस्किल आहे !

"पण या इमारतीची खरी गंमत आहे ती तिच्या दर्शनांतहि नाहीं आणि तिच्या तांत्रिक पक्केपणांतहि नाहीं. ती तिच्या आंतल्या वातावरणांत आहे. त्या वातावरणांत तिचा आत्मा आहे."

पण या इमारतीवरचें एवढें भाष्य मला पुरें होतें. अधिक भाष्यानें मला अजीर्ण झालें असतें. शिवाय आत्म्याची प्रतीति अनुभवानें घ्यायची असते. म्हणून मीं त्याला म्हटलें,

"मी या हॉटेलांतच राहात आहें, तेव्हां त्या वातावरणाचा अनुभव मी घेणारच आहें."

असें म्हणून मीं त्या गृहस्थाचे आभार मानले आणि टोकिओच्या रस्त्यांत हिंडण्यासाठीं निघून गेलों.

* * *

दोन तासांनीं चांगला हैराण होऊन परत आलों. टोकिओच्या रस्त्यावरची धूळ, धांदल, ओरड यांनीं जीव वैतागला होता. मोटारींची बेफाट धावपळ,

स्कूटर्सचा पिसाट झपाटा, सायकलींचा जीवघेऊ खेळ, गर्दीची वेडी ओढाताण, आणि या साऱ्याला खिजगणतींतहि न घेणाऱ्या गेव्यांची टपकूटपकू, यांनीं प्राण कासावीस झाले होते. खोलींत जाऊन ऐसपैस पसरावें म्हणून हॉटेलकडे परतलों.

हॉटेलचा भलाभक्कम दरवाजा कसातरी लोटला आणि चावी घेऊन खोलीकडे निघालों. ओट्यावरच्या लाउंजवर आल्यावर वाटलें, येथेंच पडावें. आणि तेथल्याच एका खुर्चीवर टेकलों. पांचदहा मिनिटांत आपल्याला आराम वाटत आहे, आणि शरीरावरचा ताण ओसरत आहे असें वाटूं लागलें.

दहावीस मिनिटांत अगदीं ताजातवाना झालों. शरीरांत एक प्रकारचा मोकळेपणा आला. वृत्ति हलकीफुलकी झालीसें वाटलें. नकळतच आजुबाजूचें निरीक्षण करूं लागलों. लाउंजमधल्या खुर्च्यांवर लवंडलेल्या व्यक्तींकडे पाहूं लागलों. त्यांतल्या कांहीं स्वतःशींच मग्न होत्या. कांहीं गप्पा मारीत होत्या. कांहीं माझ्यासारखेंच इतरांच्या हालचालींचें निरीक्षण करीत होत्या. पण प्रत्येकीच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा निश्चित आराम, मोकळेपणा दिसत होता. प्रत्येकीच्या वागण्याबोलण्यांत, बसण्यांत, नुसतें पाहण्यांतसुद्धां एक प्रकारचा सहजपणा, एक प्रकारची नैसर्गिकता, निरामयता, मुक्ति जाणवत होती.

मानवांतल्या या दुर्मिळ विशेषाचा असा अनुभव मला पूर्वी कधींच कोणत्या हॉटेलच्या लाउंजमध्यें आला नव्हता.

मी विचार करूं लागलों, या लाउंजची ही जादू आली कोठून ?

इतक्यांत माझें लक्ष उजवीकडच्या कोपऱ्यांत गेलें. तेथें बागेंतून येणाऱ्या हिरव्या प्रकाशाच्या छटा लाउंजमधल्या प्रकाशांत ढगांत धुकें विरावें तशा विरत होत्या.

माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळालें. या लाउंजमधली ही आरामाची जादू त्यांतल्या प्रकाशांत आहे. या मंद मंद प्रकाशांत तुमच्या आत्म्याला भिडण्याची, तुमच्या मनावर हळुवार फुंकर घालण्याची, तुमच्या शरीराला रेशमी स्पर्श करण्याची शक्ति आहे.

इम्पीरिअल हॉटेलमध्यें तुम्ही प्रवेश करतां तो एका धुळकट, भडक, उजाड जगांतून श्रांत, शांत, विश्रब्ध जगांत. प्रकाशाची जादू वापरून राइटनीं हें जग निर्माण केलें आहे. त्यासाठीं त्यांनीं येथल्या प्रकाशाला मोठे मऊ मुलायम कंगोरे पाडले आहेत. इम्पीरिअलमध्यें तुमचें पहिलें पाऊल पडतें तें एका लांब

रुंद पडवींत–आणि तें पडल्याबरोबर प्रकाशाच्या परिवर्तनाचा पहिला प्रत्यय तुम्हांला येतो. डोळ्यांत सुया टोचणारा प्रकाश आतां बाहेर राहतो आणि आंतला प्रकाश डोळ्यांवर रेशमी पिसांचा फुलोरा फिरवूं लागतो. मग तीनचार पायऱ्या चढून तुम्ही एका ओट्यावर जातां आणि तेथें प्रकाशाचें आणखी एक असें परिवर्तन होतें कीं, तुमचें पाऊल थबकतेंच. स्वच्छ सफेद कागदाच्या तावदानांनीं बनविलेल्या दारा–खिडक्यांच्या जपानी गृहांत नांदणाऱ्या सौम्य कोमल प्रकाशाचा एक मुलायम प्रकारच आतां तुमच्या नजरेशीं खेळूं लागतो.

अवकाशावर ओटीपडवीचे उंचसखल प्रयोग करूनच राइटनीं प्रकाशाची ही सूक्ष्म गंमत निर्माण केली आहे. आपल्या कोंकणांत ओटी–पडवीचा हा प्रयोग प्रत्येक घरांत आढळतो—फक्त प्रकाशाच्या परिवर्तनाची आणि वितरणाची सूक्ष्म दृष्टि तेवढीच त्यांत नसते.

या ओट्यावरच्या खुर्चीवर तुम्ही लवंडलां म्हणजे चांदण्या रात्रीं विरळ धुकें हवेंत विरावें तसा हा प्रकाश तुमच्या वृत्तींत विरूं लागतो आणि तुमच्या शरीराचा आणि मनाचा सारा थकवा दहापंधरा मिनिटांत उडून जातो.

थकवा उडून जातो. तुम्ही ताजेतवाने होतां. आणि तरी तुम्ही शांत मुग्धच राहतां. सारे लोक असेच राहतात. म्हणून या लाउंजमध्यें गप्पांचा गलका होत नाहीं. लोक येथे बोलत नाहींतच, नुसते कुजबुजतात. गोष्टी करीत नाहींत, हितगुज करतात. वादविवादांत सांपडत नाहींत, सुखसंवादांत निमग्न होतात. जीवनाचे प्रश्न सोडविण्याचा खटाटोप करीत नाहीत, जीवनाचा आस्वाद लुटण्याचे बेत करतात! येथें असेंच कांहीं वातावरण तयार होतें कीं, नेहमीं आरडाओरड करणारे जपानीसुद्धां येथें हळू आवाजांत बोलतात.

राइटनीं या लाउंजची, साऱ्या हॉटेलचीच, अशी कांहीं रचना केली आहे कीं, असें विश्रब्ध वातावरण तयार व्हावें. कारण राइटनीं ओळखलें कीं हॉटेल म्हणजे कांहीं चवाठा नाहीं, चावडी नाहीं, किंवा चहाकॉफीचें दुकानहि नाहीं. हॉटेल म्हणजे मन आणि शरीर यांचा थकवा दूर करण्याची जागा. हॉटेल म्हणजे आराम. हॉटेल म्हणजे गुजगोष्टींचें ठिकाण. येथें मन, शरीर, वृत्ति, मुक्त–स्वतंत्र व्हायला हवी. राइटनीं प्रकाशाची किमया केली आणि हें श्रांत, शांत, विश्रब्ध ठिकाण निर्माण केलें.

* * *

लाउंजमधली ही शांतप्रसन्न वृत्ति तुम्ही त्या कॉरिडॉरमधून खोलीकडे जाऊं लागलां म्हणजे तरंगूं लागते.

खोलींतून बाहेर जातांना तुम्ही किरमिजी अंधाराकडून उजेडाकडे जातां. आतां तुम्ही उजेडाकडून छायाप्रकाशाच्या आकृतींनीं हेलावणाऱ्या आणि हेलावत हेलावत तरल बनलेल्या अस्फुट अंधाराकडे जात असतां. जातांजातां त्या अर्ध-अंधारावर तरंगणाऱ्या छायाप्रकाशाच्या आकृतींबरोबर तरंगूं लागतां. त्यावर डोलत डोलतच तुम्ही खोलीचें दार उघडतां. खोलींतल्या प्रकाशाची तिरीप तुमच्या नजरेवर आदळते नि तुम्ही भानावर येतां. पण तुम्हांला हें भान, ही जगाची जाणीव, ही बाहेरची ओढणी आतां नको असते. म्हणून तुम्ही लगेच खिडकीवरचा पडदा सरकवतां, प्रकाश परतवून लावतां, जगांत ओढणाऱ्या अवकाशाची जाणीवच बुझवून टाकतां, आणि अंधाराच्या आवरणांत शिरून कसल्या तरी गूढ गूढ रहस्याच्या स्वाधीन होतां. मग तुमचें रूपांतर एखाद्या कवींत होतें, नाहीं तर योग्यांत तरी होतें.

इम्पीरिअलमध्यें राहणाऱ्या पाहुण्यांमध्यें असें परिवर्तन घडविण्याचें राइटच्या मनांत होतें कीं नाहीं मला माहीत नाहीं. पण मी मात्र जेव्हां जेव्हां बाहेरून खोलींत आलों तेव्हां तेव्हां बाहेरचें जंजाळ पार दूर राहिलें आहे आणि आपला एका शांत, निरामय जगांत प्रवेश झाला आहे असा प्रत्यय मला आला. असा प्रत्यय जपानी चहागृहांत येतो. असा प्रत्यय यावा, जगाच्या जंजाळाचा विसर पडून माणसाचें मन घटका दोन घटका तरी शांतीच्या, समाधानाच्या, तृप्तीच्या आणि चिंतनाच्या स्वाधीन व्हावें म्हणून जपानी साधकांनीं चहागृहाची योजना केली आहे. हें चहागृह जगाच्या रहदारीपासून अगदीं दूर दूर अशा एखाद्या शांत-निवांत स्थानीं असतें. कोठल्या तरी अगदीं अलिप्त बागेंत त्याची योजना असते. त्याच्याकडे जातांजातांच तुमची वृत्ति बदलूं लागते. त्याच्याकडे जाणारा रस्ताच तुमच्यांत बदल घडवूं लागतो. तो एखाद्या शांत निभ्रन्त बागेंतून जातो. तळ्यांतून जातो. पाणी ओलांडतो. वेलीवनश्रीच्या पलीकडे नेतो आणि शांतीची साधना व आत्म्याची आराधना यांना योग्य अशा एखाद्या झोपडींत नेऊन तुम्हांला सोडतो. चहाच्या निमित्तानें तुम्ही या झोपडींत येतां, पण तेथें तुम्ही खरोखरच चहा पीत नाहीं, चहाच्या रूपानें शांति आणि साधना यांचाच आस्वाद घेतां.

इम्पीरिअलचा जपानी आत्मा तो हाच असेल. अर्थात् राईट तुम्हांला जगाच्या रहदारीपासून दूर नेत नाहींत. बागा आणि तळीं ओलांडायला लावीत नाहींत. एखाद्या छोट्या संकुचित झोंपडींत बंद करीत नाहींत. पण ते तुम्हांला जगाच्या गोंधळ-गडबडीपासून खास दूर करतात. एक प्रकारच्या अलिप्त, निवांत वातावरणांत नक्की आणून सोडतात. कवि किंवा योगी यांना मानवेल अशा ठिकाणीं अवश्य नेतात. आतां तुम्हांला प्रतिभेचा साक्षात्कार अगर आत्म्याचें दर्शन होईल कीं नाहीं हें ते सांगूं शकणार नाहींत. पण तुम्हांला शांति लाभेल, विश्रांति लाभेल, एवढी ग्वाही ते नक्की देतात.

किमान पक्षीं तुम्हांला रात्रीं चांगली आरामशीर झोप लागेल. निदान मला तशी लागली. त्या पहिल्या रात्रीच्या त्रस्त अनुभवानंतर निद्रानाशानें मला मुळींच सतावलें नाहीं—अगदीं नाहीं, पासीनचें टोकिओच्या हवेबद्दलचें भविष्य साफ चुकलें तरी नाहीं.



किओटो

किओटोला मी आगगाडीनें गेलों. पण किओटोचा हा प्रवास, सुरवातीला तरी, मी रस्त्यानेंच करणार आहें—जपानच्या प्रसिद्ध तोकायडो रस्त्यानें. याचें कारण दुसरें तिसरें कांहीं नाहीं. हा रस्ता मला फार आवडतो. जपानच्या माझ्या किती तरी आठवणी या रस्त्याशीं निगडित आहेत. या रस्त्याचीं किती तरी दृश्यें माझ्या नजरेसमोर नाचत-आहेत.

'योशिडाज् फॉली' (योशिडाचा मूर्खपणा) म्हणून टीकाकारांनीं प्रथम ताडलेला पण जकातीचें भरपूर उत्पन्न देऊन या टीकाकारांचीं तोंडें बंद करणारा या रस्त्याचा एक तुकडा, जपानच्या भयंकर रस्त्यांना असलेला एकच एका

अपवाद म्हणून, माझ्या चांगला लक्षांत राहिला आहे. योकोहामांतल्या एका वळणावरच्या, अंगाऱ्याधुपाऱ्यानें पूजलेल्या, बाहुल्यानें मला जपानच्या नवसाळ प्रकृतीची ओळख प्रथम याच रस्त्यावर करून दिली. केटेल उपाहारगृहासमोरच्या एका विनोदी पुतळ्यानें, या उपाहारगृहाचा जर्मन मालक प्रथम पहिल्या महायुद्धांत कसा पकडला गेला आणि नंतर एका जपानी रमणीनें त्याला कसें घट्ट पकडून ठेवलें, याची हकीगत या रस्त्यावरच सांगितली आणि हर्न, मॉर्गन प्रभृतींच्या तत्सम कथांची आठवण करून दिली. ओडोवाराच्या रस्त्यांत मधोमध वाढलेल्या एका चिडाच्या झाडानें, अतामीच्या त्या चिडाप्रमाणें आपणहि साहित्यिकांचें लक्ष वेधून घेतलें आहे, असें या रस्त्यावरच सांगितलें. या रस्त्यानेंच, डोंगरावर चढून, जपानच्या पासिफिक किनाऱ्याचे खडकाळ कातळ खालच्या खिदळणाऱ्या लाटांकडे ओढाळ नजरेनें कसे पाहतात तें दाखविलें, आणि खोऱ्यांत उतरून, जपानी शेतकरी अवखळ नदीच्या कांठीं कशी संथ शेती करतो आणि दिसण्यांत गरीब पण कारागिरींत मातबर झोपड्या कशा बांधतो, याचें दर्शन घडविलें; आणि मग, हाकोनेच्या डोंगराळ भागांत शिरून, जपानचे उन्हाळी झरे उसळले म्हणजे सारें वातावरण गंधकाच्या दर्पानें कसें भरून टाकतात हें पटवून दिलें.

पण या रस्त्यावरच्या माझ्या लोभाचीं हीं नुसतीं मामुली कारणें आहेत. अधिक जबरदस्त कारणांचा जपानच्या इतिहासाशीं आणि कलानिर्मितीशीं संबंध आहे. इतिहास तोकुगावा शोगनांचा आहे आणि कलानिर्मिति हिरोशिगेची आहे. तोकुगावांनीं जपानवर सत्ता हस्तगत करून राजधानी एडोला (म्हणजे सध्यांच्या टोकिओला) आणली, तेव्हां बंड करायला टपलेल्या सरदारांना त्यांनीं असें फर्माविलें कीं, तुम्हीं एडोला येऊन राहिलें पाहिजे आणि एडो सोडून जायचें असेल तेव्हां आपलीं बायकापोरें ओलीस ठेवलीं पाहिजेत. या हुकमाचे ताबेदार या रस्त्यावरून गड-सासवड करीत, तेव्हां त्यांच्या तप्त मस्तकांना छाया पुरविण्यासाठीं तोकुगावांनीं या रस्त्याच्या कडेनें जीं झाडें लावलीं तीं अद्याप उभीं आहेत आणि आपल्या पिळवटलेल्या पेडांनीं आणि वठलेल्या गांठींनीं शोगनांच्या मनस्वी कारभाराचें वर्णन करीत आहेत. तोकुगावाच्या एका जासुदाबरोबर किओटोला गेलेल्या हिरोशिगेला या रस्त्यानें इतकें भारलें कीं, त्याच्या अनेक दृश्यांना त्यानें रंगरेखेंत जखडून टाकलें. या रस्त्यानें मी जेव्हां जेव्हां गेलों तेव्हां तेव्हां तोकुगावाचा

तो इतिहास या झाडांतून सळसळला आणि हिरोशिगेच्या कलेची रंगत ठिकठिकाणच्या दृश्यांत उमटली.

टोकियोहून किओटोला जाणें म्हणजे थोडेंसें इतिहासांतच प्रवेश करणें आहे. किंवा नव्या जगांतून जुन्या जगांत पाऊल टाकण्यासारखें आहे. हें नुसतें नद्याखोरीं ओलांडणारें भौगोलिक स्थलांतर नव्हे, तर तें अधिक खोल आशयाचें सांस्कृतिक स्थलांतर आहे. तुम्ही किओटोंत शिरतां म्हणजे एका निराळ्याच जगांत शिरतां. या जगाचे रीतनियम निराळे, ठोकताळे निराळे आणि मोजपट्ट्याहि निराळ्या. पाश्चात्त्य जगाच्या नव्या नवलाईपासून परंपरागत जपानीपणाच्या जुन्या अभिमानापर्यंतची ही मजल आहे. राजकारणाच्या धुरळ्याकडून चहापानाच्या निःशब्द चिंतनाकडे, निऑन लाईट्स्च्या झगझगाटाकडून धूसर सावल्यांच्या मंद विलासाकडे, कालव्यांतल्या केरकचऱ्याकडून नदीच्या पात्रांत वाळत घातलेल्या चित्रसुंदर कापडांकडे, कारखान्यांच्या चिमण्यांकडून पागोड्यांच्या कळसांकडे, डोक्यांत सणक उठविणाऱ्या राहत्या पिंजऱ्याकडून नजरेला वेड लावणाऱ्या वास्तूंकडे, पुलाखालीं बूट साफ करतांना अचकटविचकट बोलणाऱ्या गटार–भवान्यांकडून डोक्यावर मोळी आणि अंगावर चित्रमय पोशाख धारण करून हसऱ्या निरागस नजरेनें नुसतें पाहात राहणाऱ्या रानवट पोरींकडे—हीं या स्थलांतरांचीं कांहीं निवडक लक्षणें आहेत.

गिंझा हें टोकिओचें प्रतीक मानलें तर जिऑन हें किओटोचें प्रतीक मानावें लागेल. रस्त्यांतल्या कर्कश गलक्यानें टोकिओचे कान किटतात, तर देवळांतल्या मंत्रजागरानें किओटोचे कान ताजेतवाने होतात. सुमोच्या अगर बेसबॉलच्या सामन्यांनीं टोकिओचा जीव उडतो, तर महोत्सवांतल्या मिरवणुकींनीं किओटोचें चित्त बेभान बनतें. टोकिओंतला गृहस्थ टी. व्ही.च्या पडद्यावर नजर रोखून बसतो, तर किओटोचा पुरुष डोंगरमाथ्यावरचें विरळ धुकें नवनवीं वस्त्रें विणतें तीं पाहात बसतो. टोकिओच्या रंगपटावर जीवंत व्यक्तींचीं वस्त्रें टर्कावून त्यांना बाहुल्या बनविण्याचा उद्योग चालतो तर मातीच्या बाहुल्यांना जीवंत माणसाची कळा आणण्यांत किओटोला सार्थक वाटतें. अणुस्फोटाच्या विखारी राखेनें प्राणास मुकलेल्या एका कोळ्यावर एका दमांत सातशें कविता लिहून टोकिओ अमेरिकेचे उपकार फेडतें, तर आपली खानदानी दौलत वैमनिक माऱ्यापासून वांचविल्याबद्दल किओटो अमेरिकेच्या लँग्डन वॉर्नरचें स्मारक उभारतें. टोकिओची टूम अद्ययावत् आहे, तर किओटोच्या चालींत सनातनी लकब आहे.

अर्थात् टोकिओची बाधा किओटोला झालेली आहेच. तेथेंहि पाचिंकोच्या गोट्यांचा आवाज कान किटवितो. तेथेंहि निऑन लाईटस्च्या सांगाड्यांनीं इमारतींचा चेहरा बिघडतो आणि सिनेमाच्या जाहिरातींनीं म्होरा लडबडतो. तेथेंहि दुकानांच्या खिडक्यांत कृत्रिम केसांचे मुकुट दिसतात (आणि हृदयांत कळ उठते) आणि जेवणाच्या जाहिरातीचे प्लॅस्टिक पदार्थ दिसतात (आणि तोंडांत चोथा जमा होतो.) पण किओटोच्या आधुनिक बाजारांतहि परंपरेची एक ऐट आहे. तेथें मिठाईची शोभा दिसते ती अभिजात. कुंभकलेचे नमुने येतात ते न्यारे. बाहुल्यांची माया खुलते ती सुरंगी. पुष्परचनेची शोभा फांकते ती सजेली. आणि हस्ताक्षरांचे नमुने आढळतात ते तर हस्तकलेचे कलावंतच! किओटोच्या बाजाराची खरी गंमत आहे ती हमरस्त्यांवर नाहीं, तर गल्ल्यांत. तेथें शिरा आणि पाहा—जपानी खरेदी-विक्रीची सारी रंगत तेथें आढळेल. एखाद्या गल्लींत नुसतीं पेयगृहेंच आढळतील—पण एकेक पेयगृह कसें, तर चहागृहासारखें ; फक्त दोनतीन गिन्हाइकांना अवकाश; त्यांनीं परस्परांशीं सलगीचे संबंध जोडायचे आणि—व्हिस्की नव्हे—साके प्यायची. एखाद्या गल्लींतल्या दुकानांत नुसते कागदाचे नमुने आढळतील—पण हे कागद वर्तमानपत्रांतल्या बातम्या छापण्यासाठीं नाहींत, तर हस्ताक्षरकलेच्या स्वैर संचारासाठीं. एखाद्या गल्लींत नुसतीं कापडाचीं ठाणें असतील—पण या कापडांवरचे कामोगावाच्या पात्रांत खुलविलेले रंग एकेका रमणीच्या अंतरंगांत स्वप्नांची नवी सृष्टि फुलवतील.

तरीपण किओटोचा खरा आत्मा दुसरीकडेच दंग आहे. दुसऱ्याच स्वप्नांनीं त्याची दृष्टि भारली आहे. दुसऱ्याच गोष्टींनीं त्याचें चित्त चोरलें आहे. खरें म्हणजे तो आपल्या सांस्कृतिक कलास्वादांत दंग आहे. चहापानविधीचा आद्य पंडित सेन-रिक्यू याच्या निःस्पृह कथा ऐकण्यांत तो रमला आहे. सांजुसांगेण्डो देवा-लयांतल्या धनुर्विद्येच्या एकलव्यतेंत तो चूर आहे. या वर्षीचें मियाको-ओडोरी (चेरी-नृत्य) कसें रंगेल याची त्याला चिंता आहे. जिऑन-मात्सुरीच्या (जिऑन-महोत्सवाच्या) मिरवणुकींत रथाच्या वरच्या मजल्यावरून संगीताचे कोणते सूर सोडायचे यांचे बेत तो आंखीत आहे. जपानच्या अभिजात पुष्परचनेवरचें, (काटक्या, गवत, शेवाळ, दगड आणि लोखंडाचे तुकडे यांनीं उभारलेल्या) नवपुष्परचनेचें आक्रमण कसें परतवून लावायचें याच्या फिकीरींत तो आहे. नोह नाटकाचे मशालीचे प्रयोग हेइआन मंदिरांत यंदा कसे रंगतील

याची त्याला काळजी आहे. त्याची नजर मारुयामा पार्कमधील चेरीच्या मोहरावर आहे, आराशीयामा पार्कमधील नौकाविहारावर आहे, हिगाशीयामा डोंगरावर उसळलेल्या मेपलपर्णांच्या वार्षिक रंगोत्सवावर आहे.

संध्याकाळ झाली, उजेड सरला, रात्रीच्या छाया पसरल्या कीं, किओटोच्या आत्म्याचीं पावलें जिऑनच्या दिशेनें पडूं लागतात. किओटोच्या संस्कारमय जीवनाचा तेथला तो गोड झंकार ऐकायला त्याचे कान आतुर झालेले असतात. जिऑनमध्यें आतां अस्फुट अंधारच आहे. कामट्यांच्या कुंपणामागील घरें बंदच आहेत. त्यांच्या फटींतून येणारा उजेड मंद आहे. त्यानें अंधार शहारला आहे. सारें कसें स्तब्ध आहे. एखाद्या घरांतून संगीताचा अस्पष्ट स्वर येतो, पण त्यानें स्तब्धता थरारलीच आहे. वातावरण मोहरलें आहे. किओटोच्या आत्म्याचें अंतःकरण कसल्यातरी अबोध अपेक्षेनें आतुर बनतें. दृष्टि अंतराळांत पाहाते, त्याचें पाऊल अधांतरीं पडतें. वृत्ति कशानें तरी — ज्याचा अर्थ कळत नाहीं. बोध होत नाहीं, दिशा समजत नाहीं, पण जें हवेंहवेंसें वाटतें, ज्याच्याशिवाय मन रितें रितें वाटतें अशा कशानें तरी — भरून जाते. या वृत्तीनें दृष्टि मोहरते, अंतरंग शहारतें, निराशा गोड वाटते, अपेक्षा आतुरते आणि पंचेंद्रियें पार्थिवापलीकडच्या अनुभवाचे कण टिपूं लागतात. — आणि मग, एका घराचें दार सरकतें, उजेडाची तिरीप बाहेर येते, बंद कवाड उघडतें आणि वातावरणाला एकदम सुरंगीच्या कळ्या येतात. कोण ही ? — शेवंतीच्या फुलांनीं फुललेला किमोनो, जरतारीनें झगमगणारी ओबी, तकतकीत केशकलापाचा डौलदार शृंगार, काजळलेले डोळे, फडफडणाऱ्या पापण्या, हातांतल्या कागदी कंदिलाच्या उजेडानें उजळलेलें अंग, किमोनोच्या लयींत लय मिळवून टाकलेलें पाऊल. अशी ही मूर्ति बोलत नाहीं, बघत नाहीं, इकडे तिकडे करीत नाहीं ; स्वतःच्या मार्गानें जाते. आपलें मन मुग्ध होतें. आपली अस्फुट अपेक्षा क्षणभर थबकते, दुसऱ्या क्षणीं खुशालते आणि मग नुसतीच हुरहुरते. पण किओटोचा आत्मा ओळखतो. त्याचीं पावलें पडूं लागतात.

सकाळीं उठा आणि हिगाशीयामाकडे एक नजर टाका. त्याची उन्हानें उजळलेली झाडी पहा. लगेच तुमचें पाऊल त्या डोंगराच्या दिशेनें पडूं लागेल. जरा वेळानें पाऊल चढण चढूं लागेल. डंवरलेल्या झाडीचीं नवींनवीं रूपें नजरेस पडतील. नवनवीन वलयें विस्तारूं लागतील. हिरव्या रंगाच्या नवनव्या छटा खुलत जातील.

आकाशरेषेचीं नवनवीं दर्शनें होत जातील. इतक्यांत तुमची वाट जरा वांकडी पाहते. तिच्याबरोबर तुमचेंहि पाऊल वळतें. तुमचीहि नजर वळते. वर वर जाते, सुगीच्या शेंड्याचा वेध घेते. खालीं पाहते, पायाखालच्या दगडाचें रूप न्याहाळते. बाजूला पाहते, सुगीच्या मोरपंखी नक्षीचा नखरा निरखते. हें सारें करतांना स्वतःला विसरते. सभोंवारच्या निसर्गाशीं एकरूप होऊन जाते. मग भिन्नतेची जाणीवच लोपते. तेथें नांदणाऱ्या विश्रब्ध शांततेंत विलीन होऊन जाते. आणि मग या शांततेंत सामावलेल्या तत्त्वाची खोल खोल प्रतीति येते. पायाखालच्या भूमीवर या तत्त्वाचें पाऊल उमटलेलें दिसतें. सभोंवतालच्या वनराजीवर त्याचीं रूपें रेखलेलीं दिसतात. आज या रूपाचा रंग हिरवा आहे-पोपटी हिरवा, गडद हिरवा, काळाशार हिरवा. त्यावर क्वचित् कोठें हळद पिंजर पसरलेली. उद्यां तो लालीलाल होईल. त्यांतून ज्वाळा उफाळतील. पण परवां त्याची कळा काळी किडकिडीत होईल. आणि नंतर, कांहीं दिवसांनीं, त्यावर हिमाचें पांढरें शुभ्र वस्त्र पसरेल. हें सारें होईल, पण अंतर्यामीं तें सारें एकच असेल.

या प्रतीतीनें भारलेली नजर सारें कांहीं पाहात असते—आणि कांहींच पाहात नाहीं. इतक्यांत तुम्ही टेकडीच्या माथ्यावर येतां, सावध होतां आणि झाडीच्या बाहेर पाहातां. तों समोर एक टेकडी. तुमच्या टेकडीशीं काटकोन करून उभी असलेली. तिचा माथाहि गर्द झाडींनें भरलेला. तुमची नजर तिच्यावर फिरते. तिच्या आकाशरेषेचा वेध घेत जाते—आणि तुमच्या ध्यानांत येतें कीं, हिंगाशीयामाच्या कुशींत एक सप्तशृंगी शिखर शोभतें आहे. तुमची नजर जराशी भिरभिरते, तोंच आकाशाचें तत्त्व आपल्या वलयांत विलीन करूं पाहणाऱ्या पागोड्याचा कळस दिसतो. आणि मग नजर तें शिखर, तो कळस आणि तों समोरचा माथा, यांच्या दरम्यान घोटाळूं लागते. थोडा वेळ तरळते आणि जाणवतें कीं, हें सप्तशृंगी शिखर, हा आकाशगामी कळस आणि हा समोरचा सहस्रशृंगी माथा, यांच्यांत एक विलक्षण संगति आहे. डोंगरावरच्या वनराजीला देवळाच्या शिखरानें शोभा आली आहे. देवळाचें शिखर पत्रीनें वेढलेल्या मूर्तींसारखें भासतें आहे—आणि हें अपूर्व मीलन पाहून पागोडा स्तब्ध, स्तिमित झाला आहे. आपलें अंतःकरण प्रार्थनेनें भरून जातें, प्रार्थनामय होतें.

असें प्रार्थनामय होण्यासाठींच किओटोच्या देवळांत आणि मंदिरांत जायचें असतें. तुम्ही चिऑन–इन देवाल्यांत जातां नि असेच प्रार्थनामय होतां. तुमची मार्गदर्शिका तुम्हांला सांगत असते कीं, या देवाल्याचें प्रवेशद्वार साऱ्या जपानांत भव्य आहे. ती असेंहि सांगते कीं, या देवळांत जी घंटा आहे ना, तेवढी घंटा उभ्या देशांत दुसरी नाहीं. आणि ती तुमच्या ध्यानांत आणून देण्यासाठीं धडपडते कीं, येथल्या सोप्याच्या फळ्यांवरून चालतांना तुमच्या पदाघातानें बुलबुलाचे स्वर निर्माण होतात. पण त्या दरवाज्यानें तुमची नजर विस्फारत नाहीं. ती घंटा तुम्हांला थक्क करूं शकत नाहीं. आणि बुलबुलाचें गाणें तुम्हांला ऐकूं येतच नाहीं. तुमची नजर भारली जाते ती देवळाच्या विशाल आवारानें आणि तुमचें चित्त स्तब्ध होतें तें आवारांतल्या गर्द झाडीनें—खरें म्हणजे तिच्या विस्तारांत सामावलेल्या वातावरणानें. त्यानें तुमचें मन पावन होतें, पवित्र होतें.

असें पावन होण्यासाठीं, असें प्रार्थनामय बनण्यासाठीं कियोमिझु देवाल्यांत जा. कियोमिझु हिगाशीयामाच्या अगदीं कुशींत आहे. एखाद्या पांखरानें आपल्या पिलांना पंखाखालीं घ्यावें तसें हिगाशीयामानें कियोमिझूला घेतलें आहे. त्याच्याकडे जातांना प्रथम तुमची थोडीशी निराशाच होते. कारण तुमची वाट भर बाजारांतून जाते, बाजाराच्या गर्दींत अडमडते. नंतर ती साफ होते, पण सिमिटानें बांधून काढलेली असते. अशी वाट तुम्हांला नको असते. तिच्यावर दगड माती रेती नसते. तुमच्या पावलाखालीं दगडागोट्यांचा आवाज निघत नाहीं. तुमच्या अंगावर एखादी डहाळी झेलली जात नाहीं. एखादें पान तुमच्या डोक्यावर अलगद उतरत नाहीं. फक्त देवळामागचा डोंगर आपले बनराजींनें शृंगारलेले हात उभारून उभा असतो, आणि तोच तुमचा आधार असतो. पण एकदां तुम्ही वर पोचलां, देवळासमोरच्या लाकडी कट्टयावर उभे राहिलां, मागें वळून चांदई छपरांनीं शोभलेल्या वास्तूचें दर्शन घेतलें, त्याच्या मागें डोलणाऱ्या शेंड्यांची टीप घेतली, निसर्गानें दुतर्फा सोडलेल्या पडद्यांची शोभा न्याहाळलीत, खालच्या खोऱ्यांत पसरलेल्या मेपलपर्णांवर नजर टाकलीत, आणि समोर जरा दूर असलेल्या किओटो शहराच्या भव्य विस्तारावरून नजर फिरवलीत, कीं मघांची निराशा कोठच्या कोठें पळते, आणि मन शांत, तुष्ट, संतुष्ट होतें. स्तब्ध होतें. जरा वेळ मुळींच चाळवत नाहीं. पण मग नजर कट्टयाखालच्या लाकूडकामावर खिळते आणि माणसानें

येथें निसर्गाच्या सान्निध्यांत केवढें कसब दाखविलें आहे याचा बोध होतो. या कट्टयाला आधार देतांना जपानी कारागिरांनीं आडवे उभे खांब आणि वारें यांचा कसा अजब सांगाडा रचला आहे तें ध्यानांत येतें, आणि तो तयार करतांना त्यांनीं निसर्गावर मात करण्यापेक्षां निसर्गाशीं संधान बांधण्याची दृष्टि कशी वापरली आहे याची साक्ष पटते. निसर्गाची किमया आणि मानवाची कामगिरी यांची ही निर्मळ संगति पाहून निसर्ग आणि मानव यांच्या युतीची एक नवीनच प्रतीति येते.

निक्कोच्या तोशोगू मंदिरांत ही दृष्टि नाहीं, म्हणूनच तेथली कारागिरी अंगावर येते. तेथें निसर्गाशीं स्नेह संपादण्याची बुद्धि नाहीं तर निसर्गावर मात करण्याची, त्याला चकित करून सोडण्याची, बुद्धि आहे. परिणामीं अलंकारांची उधळपट्टी करणारें, रंगरंगोटीनें लडबडलेलें आणि ऐश्वर्याच्या दिमाखानें मस्तवाल बनलेलें एक मंदिर जन्माला आलें. येथें सौंदर्य किती निर्माण झालें हें कोणी सांगत नाहीं, सोनें किती खर्च झालें हें सांगतें. कोरीव कामाचीं लेणीं किती अवतरलीं याची कोणाला फिकीर नाहीं, लाकूड किती-खंडी लागलें याचा हिशेब सादर होतो. कलेचा कसा किती विलास झाला इकडे कोणाचें लक्षच नाहीं, लाखेनें लाकडावर कशी मात केली याचेंच कौतुक होतें. वास्तविक निक्कोच्या निसर्गापुढें तोशोगूच्या निर्मात्यांनीं थोडें विनम्र व्हायला हवें होतें. येथला निसर्ग म्हणजे जादूगार आहे. त्यानें एकाहून एक सरस अशीं आश्चर्यें प्रकट केलीं आहेत. येथें नद्यांचे आणि निर्झरांचे निरनिराळे प्रयोग सुरू आहेत. डोंगरमाथ्यांचा वेगवेगळा डौल आहे. वनश्रीचा वेगवेगळा शृंगार आहे. येथल्या देया नदीला साधें सरळ वाहायचें ठाऊकच नाहीं. ती एकदां सरोवराचें रूप घेते तर एकदां धबधब्याचें. सरोवरामागून सरोवरें आणि धबधब्यामागून धबधबे, त्यांचा आवाज घुमतो, पण लगेच सरोवराच्या संथ जलाशयांत विरून जातो–विरतो पण पुन्हां उठतो. नान्ताय् पर्वत तर, सिंहीण आपलीं पिल्लें सभोंवार खेळवीत बसते तसा आजूबाजूच्या डोंगरांचीं शिखरें खेळवीत बसला आहे–आणि त्यांची छबीदार गंमत सरोवरांच्या पाण्यांनीं आपल्या अंगावर धारण केली आहे. या सरोवरांत या डोंगरांची आणि डोंगरांवरच्या वनश्रीचीच शोभा खुलते. असें नाहीं. ठिकठिकाणीं वर आलेल्या बेटांची आणि बेटांवरच्या देखाव्यांचीहि शोभा खुलते असा हा निसर्ग येथें अनेक रूपांनीं अवतरला आहे. त्याच्या जादुगिरीपुढें मानवानें वस्तुतः लीन व्हायचें, पण तोकुगावा इएमित्सूनें मानवाच्या

अहंकाराला निमंत्रण दिलें. यांतून ऐश्वर्याचें खूप प्रदर्शन झालें. मोकाट प्रदर्शन झालें. पण कला कोठें हरवून बसली तिचा पत्ताच नाहीं.

किओटोच्या माथीं असलें वैभव कोणीं मारलें नाहीं असें नव्हे. हिदेयोशीनें आपल्या निजो वाड्यांतल्या दरबारी दिवाणखान्यांत वैभवाचें असेंच प्रदर्शन मांडलें. आजहि तें निशी होंगांजी देवाल्यांत दिसेल. पण किओटोला त्याची आवड नाहीं. त्याचा अभिमानहि नाहीं. किओटोचा अभिमान कात्सुरा बंगल्यासारख्या बंगल्यांत गोळा झाला आहे. म्हणजे किओटोनें अगदीं संन्यास घेतला आहे असें नव्हे. ऐश्वर्य, भव्यता, त्यालाहि हवी आहे; पण त्याचें असें ओंगळ प्रदर्शन त्याला मान्य नाहीं. ऐश्वर्य हवें, भव्यता हवी, पण त्याचें दर्शन अभिरुचिसंपन्न असावें. हेइआन मंदिराच्या तोरींत तुम्हांला हें सुरुचिर दर्शन होईल. एक साधी आकृति. सलग शुद्ध रेषेची. रस्त्याच्या दोन बाजूंना दोन खांब, साधे सरळ वाटोळे. त्यांना वर टोकांना दोन आडव्या वारांनीं जोडलेलें. वारें चपटीं, पण साधीं. पैकीं वरचें जोडबार. त्याचीं टोकें किंचित् वर झुकलेलीं. आणि रंग तकतकीत शेंदरी. बस्स्, एवढेंच, अधिक कारागिरी नाहीं. एकंदर आकृति भव्य, विशाल. एकेक खांब प्रचंड—वावेंत मावणार नाहीं असा. वरचीं वारेंहि भक्कम. पण सारी आकृति अशी प्रमाणशीर कीं बोजडपणाचा भास नाहीं.

तोरी म्हणजे शिंटो मंदिराचें प्रवेशद्वार. पण हें हेइआन मंदिर दिसतच नाहीं. तोरीखालून जाणारा रस्ता समोर दूरवर जातो आहे. इतर रस्त्यांप्रमाणें माणसांनीं, वाहनांनीं गजबजलेला आहे. कडेनें घरें, बंगले, आवारें आहेत. पण तोरी तुम्हांला बोलावते. तोरीखालून पलीकडे गेलांत म्हणजे मंदिराचें प्रथम दर्शन होतें. मंदिराचें म्हणजे आवाराच्या प्रवेशद्वाराचें. जवळ नाहीं, दूर. मध्यें एक प्रचंड मैदान आणि मैदानाच्या बाजूनें सुगीचे उंच उंच वृक्ष. मैदानभर रेती पसरलेली. तुम्ही चालत राहतां आणि पायाखालीं रेती चुरचुरते. अखेरीस तुम्ही त्या प्रवेशद्वारापाशीं पोचतां. प्रवेशद्वार म्हणजे मुक्तद्वार. तुम्ही आंत जातां आणि पाहतां तर मंदिराचें अंगण म्हणजे जवळजवळ मैदानच. अंगणापलीकडचें मंदिर आपले दोन हात दोन बाजूंना पसरून एक प्रकारच्या आत्मगत प्रतिष्ठेनें उभें आहे. मंदिर तसें साधेंच, पण दोन बाजूंच्या दुमजली पाख्यांवर मात्र आलंकारिक छपरांचे मुकुट आहेत. शेंदरी इमारतीवरचे हे लाल मुकुट शोभतात छान, पण

मंदिर अलीकडचें, गेल्या शतकाच्या अखेरीस बांधलेलें, नसतें तर एवढाहि हव्यास त्यानें धरला नसता.

अभिजात शिंटो मंदिर साध्या शाकारलेल्या छपराचें असतें. म्हणजे दरिद्री नव्हे. हिनोकी सालीचा शाकार भारी महाग असतो. लाकूडहि चांगलें किमती



आणि वास्तुकला समृद्ध. पुजाऱ्यांचे आणि नर्तिकांचे पोशाखहि रंगदार आणि ऐटबाज असतात. पण त्यांत श्रीमंतीचें प्रदर्शन नाहीं. दिखाऊपणा नाहीं. तोरा नाहीं. शिंटो मंदिराच्या वैभवाचा खरा पट उघडत जातो तोरीखालून जाणाऱ्या लांबलचक रस्त्यानें. एका तोरीखालून नाहीं, तर कधीं कधीं तीन, चार, पांच तोरींखालून—मैलमैल अंतरावरच्या तोरींखालून. कधींकधीं हा रस्ता जातो तो थेट समुद्रांत उतरतो. कामाकुराच्या हाचिमान मंदिराची पहिली तोरी

एकदां समुद्रांत होती. निक्कोच्या सरोवरांत एक तोरी आहे–आणि ती किती शोभते! तोशोगू मंदिराच्या मिजाशीकडे कुर्ग्यानें पाहात शोभते!


शिंटो मंदिराचें आणखी एक वैभव असतें. अलौकिक वैभव. केवळ निसर्गाच्या साधनेंतून संपादिलेलें वैभव. सुगीच्या वृक्षाचें वैभव! शिंटो हा जात्याच निसर्गाचा पूजक आहे. निसर्गाच्या चमत्कृतीचें स्तवन करण्यासाठीं तो जन्माला आला. अनेक शिंटो मंदिरांच्या रस्त्यांवर सुगीचे वृक्ष मानकऱ्याच्या मिजाशीनें उभे असतात. त्यांच्या उंचउंच विस्तारानें हे रस्ते शोभलेले असतात. त्यांच्या छायादार सावलीनें ते प्रसन्न बनलेले असतात. नाराच्या कासुगा मंदिराच्या रस्त्यावर असे वृक्ष आहेत. इसे मंदिराच्या सभोंवार त्यांचें एक डेरेदार दलच आहे. तोशोगू मंदिराचे रस्तेहि या डौलदार वृक्षांनीं डुलत आहेत. खरोखर त्यांनींच त्या मंदिराची अब्रू राखली आहे. इएमित्सूला ती दृष्टि होती म्हणून नव्हे, तर या मंदिराच्या उभारणीस हातभार लावण्याचा हुकूम झालेल्या सरदारांनीं सुगीचे वृक्ष लावण्याचा सोपा आणि स्वस्ता मार्ग शोधून काढला म्हणून!

किओटोला या असल्या वैभवाची आवड आहे, कारण त्यांत नैसर्गिकता आहे. किओटोची अभिरुचि निसर्गावर पोसलेली आहे. तिला कृत्रिम उपाधि सहन होत नाहीं. नैसर्गिकता ही त्याच्या कलास्वादाची आणि विधिसंकेतांची प्रकृति आहे. सेन-रिक्यूच्या एका शिष्यानें त्याच्या चहा–गृहाची बाग झाडून लख्ख करून ठेवली, तेव्हां या निसर्गोपासक पंडितानें बागेच्या लख्ख रस्त्यावर झाडाचीं चारदोन पानें अल्गद ठेवून दिलीं. टीकाकारांनीं टोकिओच्या इम्पीरिअल हॉटेलमध्यें फार काळोख आहे अशी तक्रार केली, तेव्हां कादंबरीकार तानीझाकी यांनीं अंधारांच्या छायांचें एक स्तोत्रच म्हटलें. पावसाच्या धारांनीं हिगाशीयामावरील वनश्रीचें सौंदर्य आच्छादून टाकलें आहे अशी मीं तक्रार केली, तेव्हां किओटोच्या एका लेखकानें, आम्हाला असलें मंदधूसर सौंदर्यच आवडतें असें स्वच्छ सांगितलें. किओटोला प्रकाशाचा लखलखाट मान्य नाहीं, छायांचा मंद विलासच आवडतो. सौंदर्याचा दिमाख पसंत नाहीं, सौदर्याची लीनता, शालीनता पसंत आहे. संस्कृत कवींनीं स्त्रीची लतेबरोबर केलेली तुलना किओटोला एकदम मान्य आहे. स्त्रीसौंदर्याची शालीनता, विनयशीलता, समर्पितता यांचा त्यानें मुद्दाम परिपोष केला आहे. किओटोला एकदां,

पांच मिनिटांपूर्वी आमच्याशी सुंदर इंग्रजींत भाषण करणारी एका प्राध्यापकाची पत्नी, एकदम दरवाजापाशीं जाऊन, आम्हांला कष्ट पडूं नयेत म्हणून, आमच्या बुटांचीं टोकें बाहेरच्या दिशेला करूं लागली तेव्हां आम्हांला कसेसेंच वाटलें, आणि आम्ही कांहीं तरी म्हणालों. तेव्हां प्राध्यापकानें विचारलें, " तुम्हांला आमच्या जपानमध्यें विशेष काय आवडलें?" क्षणभर स्तब्ध राहून मी उत्तरलों, " स्त्रियांची चारुता.," " ठीक " प्राध्यापक उत्तरले, "तुमच्या बुटांचीं टोकें फिरवून ठेवण्यास ज्या शिस्तीनें त्यांना शिकविलें तिनेंच ही चारुता निर्माण केली आहे."

ही किओटोची दृष्टि आहे आणि तिची उभारणी निसर्गावर झालेली आहे. चारुता हाच स्त्रीचा सर्वश्रेष्ठ नैसर्गिक गुण आहे. हेंच तिचें मोठें वैभव आहे. पुरुष कितीहि शिकलासवरला, सुधारला; शिक्षणाच्या, सुधारण्याच्या टाकीनें त्याच्या बुद्धीला कंगोरे पडून त्यानें स्त्रीला कितीहि शिकविलें, सुधारलें, पंडिता करून सोडलें, तरी तिचें नैसर्गिक मार्दव, लास्य यांचाच त्याला खरा मोह असतो. याच गुणांच्या जोरावर स्त्री त्याला धरून ठेवते. जपाननें हें नीट ओळखलें आहे आणि नेमक्या याच गुणांचा परिपोष त्यानें केला आहे. म्हणून तर जपानी स्त्रीचें आकर्षण इतकें जबरदस्त आहे. पण त्यांतली खरी दृष्टि नैसर्गिकतेची आहे. किओटोला ही नैसर्गिकता हवी. त्याच्या अभिजात अभिरुचीचें मूळ येथें आहे. ही अभिरुचि त्याच्या देवळांत आहे, देवळाच्या बगिच्यांत आहे, निसर्गाशीं एकरूप होऊं पाहणाऱ्या त्याच्या घरांत आहे, एकदोनच बांबूचीं रोपें कोपऱ्यांत लावलेल्या त्याच्या आवारांत आहे, आवाराच्या जाळीदार कवाडांत आहे, कामट्यांच्या कुंपणांत आहे, शुद्ध सरळ, सलग पाणरेषेंत आहे, छपराच्या वक्र पण स्वच्छ रेषेंत आहे. मुख्य म्हणजे घर आणि अंगण, देऊळ आणि बाग यांत नांदणाऱ्या वातावरणांत आहे. हें वातावरण किओटोचें वैभव आहे. हें वातावरण नारांत नाहीं. सारी नजर भरून टाकणाऱ्या तोडायजीच्या देवळांत नाहीं. होर्युजी देवळांतल्या सुंदर भव्य पागोड्यांत नाहीं, पण या देवळाच्या आवारांत डोलणाऱ्या वृक्षांत आहे. हें वातावरण कामाकुराच्या दायबुत्सूंत नाहीं, पण हाचिमान मंदिराच्या पायऱ्यांपाशीं उभ्या असलेल्या गिंको वृक्षांत आहे. हें वातावरण निक्कोच्या त्या आलंकारिक उधळपट्टींत नाहीं, पण त्याच्या तबेल्याच्या इमारतीवरील माकडांच्या (' ऐकूं नको, पाहूं नको, बोलूं नको') सहजलीला पकडणाऱ्या शिल्पांत आहे. किओटोच्या सुवर्णप्रासादाच्या (किंकाकुजीच्या) सोनेरी सळसळींतहि तें नाहीं,

पण त्याच्या समोरच्या दगडाधोंड्यांनीं आणि झाडाझुडपांनीं चितारलेल्या तळ्यांत त्याचें जें प्रतिबिंब पडतें त्यांत आहे. सांजुसांगेण्डोच्या सहस्र सहस्रभुज मूर्तींच्या रांगांत नाहीं, पण त्या रांगांच्या मागच्या दालनांत मानवांच्या विकारांचें आणि पंचमहाभूतांच्या आवेगाचें सहजसुंदर दर्शन घडविणाऱ्या शिल्पांत आहे. हें वातावरण शिम्बारा आणि जिऑन यांच्या गेशा-गर्भ जगांत आहे, कामोगावाच्या पात्रांत डोळे भरून पाहणाऱ्या जपानी उपाहारगृहांत आहे. हें वातावरण ही किओटोची नस आहे. किओटोचें मोठमोठ्या पुस्तकांतलें सालंकृत वर्णन म्हणजे कांहींच नाहीं; हें वातावरण म्हणजे सारें कांहीं आहे.



टो कि ओ

मला झालेलें जपानचें पहिलें दर्शन म्हणजे झगमगणाऱ्या रत्नांचा गालिचा, किंवा प्रकाशणाऱ्या फुलांचा गालिचा—म्हणजे खरोखर विद्युद्दीपांच्या उजळत्या केसरांनीं विणलेला गालिचा. "आतां कांहीं मिनिटांतच आपण टोकिओच्या हानेडा विमानतळावर उतरूं" असें एअर-होस्टेसनें जाहीर केलें आणि मी खिडकीबाहेर पाहिलें व माझ्या दृष्टीसमोर हा गालिचा उघडला. विमान एका बाजूला कललें कीं हा गालिचा दृष्टिआड होई, आणि दुसऱ्या बाजूला कललें म्हणजे तो पुन्हां दृष्टिपथांत येई. प्रत्येक वेळीं त्याचें तेजस्वी स्फुरण वाढलेलें असे.

अगदीं कांटेकोरपणानें बोलायचें तर मनिलाहून येणारें विमान ओकिनावाला थांबलें तेव्हांच जपानचें पहिलें दर्शन झालें. अंतराळांतून ओकिनावाचीं बेटें दिसलीं

आणि मला तीं पूजेच्या तबकासारखीं वाटलीं. किनाऱ्याशीं अखंड खेळणाऱ्या लाटांमुळें या तबकांची कडा चकाकली होती. पण ओकिनावावर उतरल्यावर या तबकांचें सौंदर्य कोठें लपलें नकळे. रेस्टोरॉंमधल्या मुलींचे गोबरे गाल आणि निमुळते डोळे यांतहि जपानच्या सौंदर्याचीं प्रसादचिन्हें दिसलीं नाहींत. त्यांच्या चेहऱ्यावर तें नाजुक हास्य नव्हतें, आणि आवाजांत तो कलदारपणा नव्हता. आणि मग मला पटलें कीं, ओकिनावाचीं हीं बेटें निसर्गानें जपानच्या भूमीवरून टिचकीनें उडविलीं तेव्हां कितीतरी गोष्टी मध्येंच सांडल्या.

अर्थात् जपानचें पहिलें दर्शन म्हणजे हा रत्नजडित गालिचा. त्यावर मधून मधून लाल, हिरव्या, निळ्या, जांभळ्या रंगांची फुलोरी नक्षी होती, आणि ती सुरंगी तेजानें झळाळत होती.

पण त्या तेजाचा लगेच शोध घेण्याइतकी माझी वृत्ति तजेल नव्हती. विमानाच्या प्रवासानें आणि विमानतळावरच्या विधीनें मी कावून-कंटाळून गेलों होतों. कसातरी इम्पीरिअल हॉटेलमध्यें आलों आणि बिछान्यावर पसरलों.

* * *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी शहर पहाण्यास निघालों तेव्हां या मायावती नगरीच्या काल रात्रीच्या माणिकमोत्यांचा कोठें आढळ होईना. उलट कोणत्याहि औद्योगिक शहरांत उदंड आढळणाऱ्या बाजारी इमारतींचेंच रोखठोक दर्शन होत होतें. त्यांत एक सामर्थ्याचा रुबाब होता. आंत चाललेल्या कार्यक्षम कारभाराचा भपकारा बाहेर येत होता. तो माझें लक्ष थोडें नमवीतहि होता. इतक्यांत एका इमारतीनें माझें लक्ष वेधून घेतलें. या इमारतींत एक आधुनिक जोश होता. मीं एकदोन पाट्या वाचल्या नि माझ्या ध्यानांत आलें कीं, ही 'निकात्सु बिल्डिंग'. लगेच या इमारतीशीं निगडित असलेल्या स्थापत्यशास्त्रीय चमत्काराची आठणव झाली. ही बारा मजली इमारत सारीच्या सारी वर बांधली आणि नंतर इंचाइंचानें चार मजले भूमींत रोवली. जपानी स्थापत्यशास्त्राचा हा विक्रम जरा जवळून पहाण्याचा मोह झाला नि मी इमारतींत शिरून जिना उतरलों – आणि माझ्या दृष्टीसमोर एक नवेंच विश्व उमललें. व्यापारी सजावटीचें विश्व. इतक्या नवलाईनें सजवलेलीं दुकानें मीं पूर्वी पाहिलीं नव्हतीं. जपानी कौशल्यानें आणि कारागिरीनें तयार केलेल्या तऱ्हतऱ्हेच्या वस्तु जपानी सौंदर्यदृष्टीनें सजवून ठेवल्या

होत्या आणि गिऱ्हाइकांची नजर बांधीत होत्या. पण माझी एक सूक्ष्म निराशा झाली. या साऱ्या पसाऱ्यावर एक पाश्चात्त्य झांक होती, आणि ती तर मला आतां दृष्टीसमोर नको होती. मला कांहीं तरी अस्सल जपानी हवें होतें. काय तें सांगतां येत नव्हतें—कांहीं तरी अनिर्वचनीय, पण अभिजात जपानी असें मला हवें होतें. पूर्ण जपानी प्रकृतीची आस मला लागली होती आणि या निकात्सु बिल्डिंगमध्यें ती भागत नव्हती.

या गोड, मुग्ध, मधुर जपानीपणाच्या शोधांत मी निघालों. माझी दृष्टि भिरभिरूं लागली. मधूनच एखादा जपानी किमोनो दिसे, कमरेंत लवून केलेला नमस्कार दिसे, ज्या हास्याचें वर्णन मी केवळ जपानी असें करूं लागलों तें दिसे, पण समाधान होत नव्हतें. कसल्या तरी आंतरिक ओढीनें मी जात होतों, नजर कांहींतरी धुंडाळीत होती. मन व्यग्र झालें होतें. कसल्यातरी अंतर्विरोधानें व्यापलें होतें. स्वतःशींच युक्तिवाद करीत होतें. त्याचा मला बोध होत नव्हता. कांहीं तरी हरपलें आहे येवढेंच जाणवत होतें. आणि मी चालत होतों. एखादा धक्का लागला किंवा मोटार कर्कशली म्हणजे भानावर येई आणि मग पुन्हां भ्रान्तींत सांपडे—

चालतां चालतां एके ठिकाणीं थबकलों आणि पाहिलें, तों समोर एक अफाट मैदान उभें आणि मैदानापलीकडे एक भुईकोट! मैदानाचा हिरवा विस्तारच डोळे फिरवीत होता. मैदानांतून आडवे उभे रस्ते गेले होते. रस्त्यांवरून मोटारी धावत होत्या. दुपारच्या उन्हांत त्या तळपत होत्या. मला त्या मोटारींची ओढ नव्हती. अशा मोटारी मनिलाला खूप पाहिल्या होत्या आणि त्याहि तळपल्या होत्या. मला ओढ होती समोरच्या भुईकोटाची! माझी नजर त्याच्यावर खिळली आणि पावलें पडूं लागलीं. मैदानामधून जातां जातां लक्षांत आलें, म्हणजे जें लक्षांत आलें होतें तें अंतःकरणाला भिडलें, कीं साडेतीनशें वर्षांपूर्वीच्या शंभर भिकार झोंपड्यांच्या 'एडो' गांवाला आज जगांतल्या नंबर एकच्या शहराची प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या इतिहासाचा साक्षीदार म्हणून उभा असलेला हा राजवाडा. यानें इतिहासाचीं अनेक वळणें पाहिलीं, अनेक आवर्तनें अनुभवलीं आणि अनेक परिवर्तनांची प्रेरणा दिली. एका अख्ख्या राष्ट्राचा बाहेरच्या जगाशीं संबंध पार तोडून पूर्ण अलिप्तता निर्माण करण्याचा अपूर्व प्रयोग येथूनच झाला. जपानी म्हणून ज्याची गणना होते, जपानी आत्मा म्हणून ज्याची ओळख पटते आणि शेसव्वाशें वर्षांच्या पाश्चात्त्य प्रेरणांच्या

प्रयोगांनंतरहि ज्याचें मूळ द्रव्य कायम राहिलें तें जपानी जीवन येथूनच बांधलें गेलें. शौर्य आणि शिस्त, सौंदर्य आणि मार्दव, संपत्ति आणि व्यवस्था, व कला आणि दैनंदिन व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयोग येथूनच झाला. पुढें हें कर्तृत्व संपलें. नवें युग निर्माण झालें. नव्या शक्तींची उपासना झाली. नव्या विद्येची आराधना झाली. नव्या राजनीतीचा अवलंब झाला. नवीं क्षितिजें दिसूं लागलीं. नवे मुलुख पादाक्रांत झाले. नवीं सूत्रें हालूं लागलीं — आणि यांतूनच कधीं नव्हे तें संकट अगदीं आकाशांतून उतरलें. तरी जो अद्याप उभा आहे, दिमाखानें तळपत आहे तो हा राजवाडा. त्याच्यावर नजर खिळली, आणि एक प्रकारच्या अबोध आकर्षणानें आणि मुग्ध ओढीनें मीं तें मैदान, तें हिरवेंचार विशाल मैदान, आपल्या अंगावर असंख्यांना कौतुकानें खेळवणारें मैदान ओलांडलें. केव्हां ओलांडलें कळलेंच नाहीं. खंदकाच्या कांठीं आलों नि जाणीव झाली. पण ती लगेच खंदकाच्या पाण्यांत बुडून गेली. हिरवें हिरवें पण स्वच्छ स्वच्छ पाणी. वाऱ्यानें उठवलेल्या तरंगांशीं खेळणारें पाणी. सभोंवारच्या विश्वाच्या प्रतिबिंबाशीं सुखसंवाद करणारें पाणी. हंसाची एक जोडी त्यांत खेळत होती. मान मुरडून, वेळवून, खेळत होती. मानेचा दिमाख दाखवीत पोहत होती. एकमेकांकडे वेगानें तरंगत जाऊन, एकमेकांना अडवून, चुकवून, पाण्यावर सरळ रेषांच्या आणि वक्र वेलांट्यांच्या आकृत्या कोरीत होती.

त्या खेळांतून भानावर आलों नि ध्यांनात आलें — अरे ! समोर विलक्षण सौंदर्य पसरलें आहे. खंदकापलीकडच्या टेकडीचें सौदर्य, त्यावर पसरलेल्या हिरव्यागार गवताचें सौंदर्य, टेकडीवर उभ्या असलेल्या चिडाच्या वृक्षांचें सौंदर्य. त्यानंतर मीं जपानी चीड खूप पाहिले. त्यांच्या पिळवटलेल्या कांडांचें शिल्प, त्यांच्या आकाशावर कोरलेल्या विलक्षण आकृति, त्यांच्या फांद्यांचे चमत्कारिक पेंच खूप पाहिले. पण चिडाच्या झाडांचें असें सौंदर्य पुन्हां पाहायला मिळालें नाहीं. त्यांनीं जमिनीशीं आणि एकमेकांशीं केलेले असे कोन, काटकोन कधीं दिसले नाहींत. अशी विक्षिप्त संगति कधीं अनुभवली नाहीं. कांहीं झाडें सरळ उभीं तर कांहीं कधीं जमिनीकडे तर कधीं एकमेकांकडे झुकलेलीं, कांहीं हात जोडलेलीं तर कांहीं हात फांकलेलीं. कांहीं शेंडे जुळवलेलीं तर कांहीं झिपऱ्या पिंजारलेलीं — पण सारीं मिळून एक विलक्षण आकर्षक पट निर्माण करणारीं. या पटावरून दृष्टि वर सरकली आणि तटावर आणि तटावरच्या

गर्द झाडीवर स्थिरावली. या झाडीमागें राजवाडा आणि राजवाड्याचे निरनिराळे भाग. ते दिसत नव्हते, म्हणूनच त्यांच्याबद्दल एक गूढ वाटूं लागलें. या राजवाड्यांत राहणारा सम्राट्–स्वर्गांतून पृथ्वीवर उतरलेला, आदिशक्तीनें मानवी रूप धारण केलेला, राष्ट्रीय अस्तित्वाचें अधिष्ठान असलेला सम्राट्– येथेंच निष्प्रभ बनला आणि येथेंच पुन्हां प्रभावी बनला. साक्षात् सूर्यदेवतेपासून सुरू झालेला आणि गेलीं दोन हजार वर्षे साकार झालेला त्याचा राजवंश अद्याप सुरू आहे. या कालांत या राजवंशाची अनेकदां ओढाताण झाली. अनेकदां सत्ताधारी सेनानींनीं त्याच्याशीं खेळ केला. अनेकदां राजवस्त्रांना हात घातला. अनेकदां ती टर्काविलीं. पण त्यांनीं राजवंशाचें विसर्जन केलें नाहीं. अनेकदां त्याची स्थिति अगदीं अनुकंपनीय झाली. एका राजाच्या मर्तिकाला पैसे नव्हते. एकाला आपल्या हस्ताक्षराचे नमुने विकून गुजराण करावी लागली. पुष्कळांच्या वाड्यांचे वांसे पोकळ झाले होते. पण हा राजवंश कधीं तुटला नाहीं. उलट १८६८ सालीं तो तेजानें उफाळला, आणि लोकांच्या उपासनेचें अधिष्ठान व जीवनाचा आधार बनला. पण पुढें तो स्वतःच निर्मिलेल्या शक्तींचा ताबेदार झाला, त्यांच्या आक्रमक धोरणाचा सूत्रधार बनला आणि राष्ट्रावर गुदरलेल्या पहिल्याच पराभवाचा धनी बनला. तरी नष्ट झाला नाहीं. संपुष्टांत आला नाहीं. तर राष्ट्रीय शक्तीचें एक नवें प्रतीक म्हणून शोभूं लागला. जनतेशीं त्याचें नवें नातें, नवे संबंध जडले. जनतेला एक नवी प्रेरणा तो देऊं लागला आणि जनतेकडून प्रेरणा घेऊंहि लागला. पूर्वी त्याचें दर्शनहि अशक्य. तें झालें तर दृष्टि जाईल इतकी धास्ती. मूर्तिविरहित शिंटो मंदिराचें दर्शन घ्यावयाचें तसें राजवाड्याचें घ्यावयाचें. पण आतां तो लोकांना दर्शन देऊं लागला आणि लोकांत मिसळूंहि लागला —

मला आठवलें, यंदां नव वर्षाच्या दिवशीं इसे मंदिराच्या दर्शनार्थ पांच लाख लोक जमले होते. सूर्यदेवतेच्या या मंदिरांत फक्त राजालाच प्रवेश आहे. इतरांनीं नुसतें दुरून दर्शन घ्यायचें. तरी पांच लाख लोक जमले. आणि त्याच्या वाढदिवशीं राजवाड्याचें दर्शन घेण्यासाठीं पाऊण लाख लोक जमले आणि दररोज असंख्य जमतात. गोव्याचें मंगेशीचें देऊळ सारस्वतांना एकत्र गुंफतें, त्याच्या अनेक पटींनीं हें मंदिर आणि हा राजवाडा, म्हणजे हा राजा, जपान्यांना गुंफतो, त्यांच्यांत एकतेची भावना निर्माण करतो. मीं सभोंवार पाहिलें. असंख्य

लोक आणि शेकडों शाळकरी मुलें या मैदानावर जमा झालीं होतीं. त्यांना नेणाऱ्या-आणणाऱ्या बसेस् पलीकडे उभ्या होत्या. कांहीं येत होत्या, कांहीं जात होत्या. रस्त्यावरून शेकडों मोटारींची ये-जा चालू होती. शेकडों लोक जात येत होते. कांहीं राजवाड्याकडे ढुंकूनहि पहात नव्हते. रोज काय पाहणार ? आणि पाहिलें तरी किती जाणवणार ? कांहींना राजा ही एक अर्थशून्य अडचण असेंहि वाटत असेल. कांहींना, हाउसिंग कार्पोरेशनचे अध्यक्ष हिसाऽकिरा कानो यांच्याप्रमाणें, हा राजवाडा येथून उठवून त्याची पांचशें एकरांची जागा जनतेसाठीं मोकळी करावी असेंहि वाटत असेल. पण इसेला जमणारे पांच लाख लोक आणि राजवाड्यासमोर जमा होणारे पाऊण लाख लोक यांचें काय ? माझ्या शेजारीं एक गृहस्थ उभा राहून खंदकाच्या पाण्याकडे पहात होता. त्याच्या नजरेंत या प्रश्नाचें उत्तर मिळतें का पाहावें, असें मनांत आलें. पण जपानी माणसाच्या चेहऱ्याइतका अबोलका चेहरा शोधून मिळणार नाहीं. म्हणून तो विचार सोडला आणि चालूं लागलों—

हा राजवाडा जनतेच्या जीवनाचें भावनिक केंद्र असो वा नसो, टोकिओच्या सौंदर्याचें तें केंद्र आहे, याबद्दल कुणाचें दुमत होईल ? जपानी वास्तुशास्त्रानें गेल्या दोन हजार वर्षांत जे अनेक चमत्कार केले आहेत, त्यांतलाच हा एक आहे. हा पाण्यानें भरलेला खंदक, हा चिडाच्या झाडांचा चढता पट, हा गर्द झाडीनें शोभणारा तट, आणि समोर पसरलेलें हें ऐसपैस मैदान – दिल्लीच्या सेक्रेटरिएटसमोरच्या राजपथाखेरीज इतकें डौलदार राजस मैदान मीं तरी दुसरें पाहिलेलें नाहीं.

* * *

राजवाड्याकडून डायेटकडे जाणें हें क्रमप्राप्तच आहे. सत्ताच मुळीं राजवाड्याकडून डायेटकडे गेली आणि सत्तेपुढें शहाणपण नाहीं हें प्रसिद्धच आहे ! म्हणून मुकाट्यानें डायेटचा रस्ता सुधारला. पण या रस्त्यानें जाण्यांत आनंद आहे. रस्ता खंदकाच्या बाजूनें जातो, आणि मनोरम वळणें घेतो. उजव्या बाजूला राजवाड्याचीं नवीं दर्शनें होतात आणि नवीं सौंदर्यें दृष्टिपथांत येतात. पण डायेटच्या विचारांत गुंगलेलें मन, राजवाड्यांतून सत्ता डायेटमध्यें कशी गेली, ती जाण्यास राजाची प्रागतिक दृष्टि कशी कारणीभूत झाली, पण त्यानें औदार्यानें दिलेल्या राज्यघटनेच्या कलमांतील संरक्षणमंत्र्याची नेमणूक लष्करी अधिकाऱ्यांच्या संमतीनें झाली पाहिजे या एका कलमानें घोटाळा कसा झाला,

त्या कलमामुळें लष्करी हुकूमशाही कशी माजली, तिचा परिणाम महायुद्धांत कसा झाला, आणि महायुद्धांतील पराभवामुळें लोकशाही येऊन डायेटला एक नवा अर्थ कसा प्राप्त झाला याचाच विचार मनांत घोळूं लागला.

पण डायेटचें दर्शन झाल्याबरोबर हा विचार कोठच्या कोठें पळाला. डायेटची इमारतच तशी आहे. प्रथम दर्शनींच तिचें रूप तुमच्या डोळ्यांत बसतें. मेंदूला जबरदस्त धक्का बसतो. टोकिओंतली सर्वांत उंच इमारत अशी तिची ख्याति आहे. पण ज्या शिखरामुळें तिला ही उंची प्राप्त झाली आहे, त्या शिखरानेंच घाण केली आहे. युरोपीअन पद्धतीनें बांधलेल्या चौकोनी रूपरेखेच्या या इमारतीवर इजिप्शीअन पिरॅमिडचें बरेंचसें अनुकरण करणारें हें शिखर नसतें तर इमारत साध्या सहज रुबाबानें शोभली असती. पण आहे त्या स्वरूपांत मात्र एक वास्तुशास्त्रीय घोडचूक म्हणून ती माझ्या लक्षांत राहिली आहे आणि तिचा विसर पडणेंहि कठिण झालें आहे. दर दोन चार महिन्यांनीं या डायेटमध्यें लोकप्रतिनिधींनीं एकमेकांचीं डोकीं फोडल्याची बातमी वर्तमानपत्रांत वाचायला मिळते आणि जपानी डायेटची ती अवजड इमारत नजरेसमोर उभी राहते. त्यापेक्षां हे प्रतिनिधि एक होऊन त्या इमारतीचेंच डोकें कां फोडीत नाहींत? पण त्या इमारतीच्या दर्शनानें त्यांच्या डोक्यांत जी सणक उठत असेल तिनें हा विधायक विचार अशक्यच होत असेल!

आकासका राजवाडा हा डायेटपासून वेगळा आहे. पण डायेटचाच भाग म्हटला पाहिजे, कारण डायेटचें ग्रंथालय तेथें आहे. पण तो पहायला जाण्याचें कारण मात्र निराळें आहे. दोन प्रख्यात पाश्चात्त्य राजवाड्यांचें एकदम अनुकरण करण्याचा त्यांत प्रयत्न आहे. त्याचें दर्शन बकिंगहॅम पॅलेससारखें आणि आंतली सजावट व्हर्साय पॅलेसच्या धर्तीवर केलेली आहे. यांतलें एक अनुकरण प्रकरण बिघडवण्यास पुरेंसें होतें. मग दोनहि एकत्र आल्यावर काय झालें असेल याची कल्पनाच करावी. जपानी लोक जात्याच अनुकारक आहेत, तेव्हां तुम्हीं अमक्याचें अनुकरण कां केलेंत हें विचारण्याची सोय नाहीं. आणि ज्या ज्या अनुकरणामध्यें त्यांनीं आपला आत्मा ओतला तेथें तेथें त्यांनीं प्रतिभेचा विलास दाखविला. मग तेथें नवा आशय, नवें सौंदर्य प्रतीत झालें. चिनी दरबारांत नृत्यगान करणाऱ्या मुलींचें अनुकरण करून त्यांनीं आपली गेशा निर्माण केली, पण जपानी गेशा हा जपानी संस्कृतीचा एक रोमांचक अलंकार ठरला. चिनी

इमारतींवरच्या छपरांचें त्यांनीं अनुकरण केलें, पण त्या छपरांच्या वक्र वळणांत आणि विस्तारांत नाजुकपणा ओतून, आणि आपल्या लाकडी चौकटीवर तें अलगद ठेवून देऊन त्यांनीं एक नवें वास्तुशिल्प निर्माण केलें. चिनी चहाला चहापानविधीची कलाटणी देऊन चहा हें त्यांनीं सौंदर्य आणि तत्त्वज्ञान यांचें सांस्कृतिक साधन बनविलें. अनुकरणानें आणलेल्या अनेक गोष्टींना जपानी प्रतिभेचा नाजुक स्पर्श करून त्यांनीं संस्कृतीच्या एकाहून एक सरस पाकळ्या उकलून दाखविल्या. पण एकोणिसाव्या शतकांत पाश्चात्त्य झगमगाटानें त्यांचे डोळे इतके दिपले, आणि पाश्चात्त्यांशीं बरोबरी करण्याच्या भरांत ते स्वतःला इतके विसरले कीं, अनुकरणाला जपानी आत्म्याचा स्पर्श करण्याचें भान त्यांना राहिलेंच नाहीं. आणि यांतूनच आकासका राजवाड्यासारख्या चिजा निर्माण झाल्या. टोकिओंत पाश्चात्त्य धर्तीच्या बाजारी इमारती खूप आहेत. पण बाजारी इमारतींत कलेची अपेक्षा कोणी करीत नाहीं. तेथें कला नसली तर दुःख नाहीं, असली तरी फारसा आनंद नाहीं. पण इसे मंदिराच्या पूजकांनीं राजवाड्याच्या बांधणींत अशी नक्कल उठवावी? कात्सुरा बंगल्याचें भावंड म्हणून त्यांनीं अशी वस्तु सादर करावी? पण कात्सुराचें स्मरण करण्याचा तो कालच नव्हता. तुम्ही मेजी चित्रशाळेंत एक फेरफटका करा. सम्राट् मेजीच्या जीवनांतील निरनिराळ्या प्रसंगांचें चित्रण करणाऱ्या चित्रांवर नजर टाका. म्हणजे पाश्चात्त्यांच्या अनुकरणांत ते किती रमून गेले होते याची कल्पना येईल. पाश्चात्त्य सेनानीच्या पोषाखांत मेजीला पाहून फारसा धक्का बसणार नाहीं, पण हा सूर्यदेवतेचा वंशज जर्मन बादशहाच्या पोषाखांत आणि त्याच्याहिपेक्षां त्याची सम्राज्ञी जर्मन महाराणीच्या पोशाखांत पाहून कसेंसेंच वाटतें.

* * *

मारुनौचीच्या व्यापारी इमारती मला आवडल्या नाहींत, पण त्यांच्या अफाट दर्शनानें जपानच्या अफाट व्यापारी व औद्योगिक प्रगतीचा साक्षात्कार झाला. आणि त्यांतल्या कांहीं अगदीं अलीकडच्या इमारती पाहून तर नवीन युद्धोत्तर वास्तुकलेनें इमारतींवरहि कला शिंपडायला सुरवात केली आहे याचा प्रत्यय आला. पण मारुनौचीला गेलें कीं एक इमारत माझें चित्त नेहमीं वेधून घेई — ती म्हणजे टोकिओ सेण्ट्रल स्टेशन. ही इमारत फारशी सुंदर आहे असें नव्हे. तिचा लाल रंग तेवढाच लक्षांत राहिला आहे. पण टोकिओ सेण्ट्रल-समोर गेलें कीं मनांत एक निराळेंच वारें उसळतें. या स्टेशनमध्यें शेकडों लोक

शिरत असतात, शेकडों लोक बाहेर येत असतात. कारण जपानी लोक सारखे प्रवास करीत असतात. भारतीय लोक पान कां खातात, अमेरिकन मुली च्युइंगगम कां चघळतात आणि फ्रेंच लोक दारू कां पितात ?—कांहीं कारण नाहीं. तसेंच जपान्यांना प्रवास करायला कांहीं कारण लागत नाहीं, किंवा कोणतेंहि कारण पुरतें. आत्याचे पाय धरले, बापाला चार दिवस झोंप आली नाहीं, मित्राचा वाढदिवस निघाला, चेरीच्या फांदीवर कळी उमलली, मेपलचें पहिलें पान पिकलें, शाळेला सुटी झाली, कुस्त्यांचा हंगाम आला, हवाईच्या बेसबॉल टीमचें आगमन झालें, कंपनीच्या शाखेचा रिपोर्ट येण्यास उशीर झाला—कोणतेंहि निमित्त मिळालें कीं जपानी माणूस लगेच कपडे चढवून स्टेशनकडे धांवतो आणि तिकिटाच्या खिडकीपुढें उभा राहतो. टोकिओ स्टेशनांत केव्हांहि जा म्हणजे जपानी लोक किती निकरानें प्रवास करतात हें दिसून येईल. जो तो फलाटावर पळत असतो. खांद्याला क्यामेरा आणि हातांत चामड्याची बॅग घेतलेले पुरुष, अंगांत किमोनो व हातांत रुमालांत गुंडाळलेलें बोचकें घेतलेल्या स्त्रिया, अंगांत स्कर्ट व हातांत पर्स व छत्री घेतलेल्या आधुनिक मुली—सारख्या धांवत असतात. कोणी गाडी पकडायला, कोणी धांवत्या गाडीबरोबर ‘ सायोनारा ’करायला, कोणी स्टेशनबाहेर लवकर जाऊन ट्रॅम अगर बस पकडण्याकरितां. या सान्या धांदलींत—धांवपळींत एकच व्यक्ति धिमीं पावलें टाकीत फलाटावर फिरत असते, गंभीर मुद्रेनें पहात असते आणि एक प्रकारची प्रतिष्ठा मिरवीत असते. तिचा तो लालट—जांभळट पोशाख, लाल सोनेरी फितीची टोपी, डोळ्यावरचा सोनेरी फ्रेमचा चष्मा—क्षणार्धांत तुमच्या ध्यानांत येईल कीं, स्वारी स्वतःवरच खूष आहे. आणि कां असूं नये! चाकावर चालणाऱ्या साम्राज्याचा तो एक सूत्रधार आहे. हजारों लोकांच्या हालचालींची जिम्मेदारी त्याच्यावर आहे. टोकिओंत येणाऱ्या, टोकिओंतून जाणाऱ्या, इतकेंच काय पण टोकिओंतच वावरणाऱ्या लोकांच्या कल्याणाची काळजी तो करीत असतो. त्याची आगगाडी नसली तर यांचें कसें चालेल ? होकायडोहून येणारें दूधदुभतें, आओमोरीहून येणारीं सफरचंदें, शिझुओकाहून येणारीं नारिंगें, किओटोहून येणारीं कापडें, बोसोहून येणारे मासे, नाहींतर त्यांना कसे मिळतील ! यांची फिकीर करीत तो स्टेशनभर फिरत असतो. जपानी जनतेप्रमाणेंच टोकिओच्या या स्टेशनमास्तरला जपानी आगगाड्यांचा खूप अभिमान आहे. तो तुम्हांला सांगेल कीं, जपानच्या गाड्यांसारख्या गाड्या तुम्हांला जगांत मिळणार नाहींत. जपानांत असतांना

मोटारनें अगर बसनें प्रवास करण्याचा विचार तुम्हीं मनांतहि आणूं नका. येथले रस्ते फार खराब आहेत. तुमची गाडी केव्हां मोडून पडेल याचा नेम नाहीं. पण आमची आगगाडी? कधीं मिनिटभर लेट झाली तर मला विचारा.

* * *

राजवाड्याप्रमाणें जपानचें आणखीहि एक केन्द्र टोकिओंत आहे—निहोम्बाशी पूल. जपानांतल्या साऱ्या रस्त्यांची सुरवात येथें होते, म्हणजे त्यांची लांबी येथून मोजली जाते. टोकिओ शहराच्या सुरवातीपासूनच त्याला ही प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. आणि हिरोशिगेनें या प्रतिष्ठेवर कलेचा साज चढविला आहे. तो पूल पाहायला जातांना या पुलाचीं हिरोशिगेनें काढलेलीं छापचित्रेंच माझ्या नजरेसमोर तरळत होतीं. त्या पुलाचें करकरीत लाकूड काम, पुलाच्या कमानीचें नक्षीदार कोरीवकाम, पुलावरून जाणाऱ्या रंगदार लोकांच्या डोक्यावरच्या रंगदार छत्र्या, कांहींच्या खांद्यावर डुलणाऱ्या—डुचमळणाऱ्या कावडी, कमरेच्या दोन बाजूंच्या दोन तरवारी मिरवीत जाणारे सामुराई, पुलाच्या कडेला कांहीं तरी शोधीत असणारीं श्वानें, नदीपलीकडच्या टुमदार झोपड्या, आणि मुख्य म्हणजे मागें दूर डोक्यावर हिमाचा लेप घालून बसलेला फुजीसान, हीं दृश्यें नजरेसमोरून सरकत होतीं. पण मी निहोम्बाशीवर आलों नि माझी निराशा झाली. जेथें इएयोशीनें प्रथम उभारला नेमका त्याच ठिकाणीं आज साडेतीनशें वर्षांनंतर हा पूल उभा आहे. साडेतीनशें वर्षांनंतर इएयोशीचा अगर हिरोशिगेचा पूल दृष्टीस पडेल अशी आशा मीं अर्थात् केली नव्हती. तेवढ्या काळांत हा पूल बारा वेळां कोसळला आणि नवा बांधला हें मला माहीत होतें. पण पुलाचें जें ध्यान मला दिसलें त्यानें माझी निराशा झाली. वास्तविक मला त्याच्याबद्दल आदर वाटायला हवा होता. १९११ सालीं बांधलेल्या या पुलावर दोन प्राणांतिक संकटें गुदरलीं—१९२३ चा भूकंप आणि गेल्या महायुद्धांतला अग्निवर्षाव. दोन्ही वेळीं तो चांगला होरपळून निघाला, पण उखडला नाहीं, होता तसा उभा राहिला. आदरानें ओणवें व्हायला येवढी गोष्ट पुरी होती. पण लंडनच्या एखाद्या माफक उमरावाच्या बंगल्याच्या प्रवेशद्वारावर असावे तसे धातूचे दिवे आपल्या सामान्य कठड्यावर धारण करून असलेल्या या फरशीवजा पुलानें माझी पार निराशा केली—

पण फार काल नाहीं. हळू हळू आदरानें तुच्छतेवर मात केली. निराशेची जागा संस्मरणानें घेतली. कांहीं म्हटलें तरी कालाचीं अनंत पावलें या

पुलावर पडलेलीं आहेत. टोकिओचा उभा अवतार पुलावरच्या दिव्यांनीं पाहिलेला आहे. हा पूल बांधला तेव्हां त्याच्या भोंवतालीं दलदल होती, जंगल होतें आणि त्या जंगलांतले रानपक्षी आणि श्वापदें या पुलावर येऊन टेकत; आज त्याच्या भोंवतीं टोकिओच्या आर्थिक कारभाराच्या कचेऱ्या आहेत आणि त्यांच्या गाड्या पुलावरून उडत आहेत. कालांतरानें या पुलावरून घोड्याच्या टापा उडवीत चाललेले सामुराई आणि पालखीच्या हिंदकळण्याबरोबर आपली संपदा आणि रूपसंपदा झुलवीत जाणाऱ्या स्त्रिया जाऊं लागल्या; आज त्यांची जागा सातासमुद्रांपलीकडून आलेल्या प्रवासी जोडप्यांनीं घेतलेली आहे. नंतर या पुलाच्या फळ्या घोड्यांच्या गाड्यांनीं आणि रिक्शॉंच्या धावांनीं थरथरल्या; आज या पुलावरून ट्रॅमा खडखडतात, लॉऱ्या धडधडतात आणि सायकली धडपडतात. आज येथून फुजी दिसत नाहीं, राजवाडा दिसत नाहीं, राजवाड्याच्या आजुबाजूची झाडीहि दिसत नाहीं; फक्त सिमिटपोलादाच्या इमारती दिसतात. त्यांच्या साऱ्या खुणा या पुलानें न्याहाळून पाहिलेल्या आहेत. १६५० सालीं जपानच्या पहिल्या डिपार्टमेंट स्टोअर्सची स्थापना त्यानें पाहिली आणि त्यानंतर त्या 'डिपोटो'-चीं झालेलीं नामांतरें आणि स्थित्यंतरेंहि नजरेखालून घातलीं. त्यापूर्वीच सुरू झालेल्या सोन्याच्या टांकसाळींतल्या नाण्यांचा आवाज त्यानें ऐकला आणि या सोन्याच्या टांकसाळीनें रुप्याच्या टांकसाळीची पलीकडे गिंझांत हकालपट्टी केली तीहि पाहिली. १८७६ सालीं मित्सुई बँकेच्या स्थापनेचा सोहळा त्यानें पाहिला आणि या बँकेचें साम्राज्य वाढलें कसें, कोलमडलें कसें आणि पुनः उभें राहिलें कसें तेंहि पाहिलें. टोकिओच्या साऱ्या व्यापारी विकासाचा आणि औद्योगिक उत्कर्षाचा तो साक्षीदार आहे, आणि या व्यापारी युगांत विकसलेल्या कलांचा तो भोक्ता आहे. पलीकडेच असलेल्या काबुकी थिएटरची उभारणी त्यानें डोळे भरून पाहिली आणि हिरोशिगे प्रभृतींच्या छापचित्रांत तो स्वतःच जाऊन बसला. या पुलाची नेक अशीं कीं, सभोंवार चाललेल्या वाढत्या पसाऱ्याची झेंप त्यानें पाहिली, अनुभवली, पण स्वतःचें नम्र रूप सोडलें नाहीं. टोकिओच्या वाढीचे अनेक आघात त्यानें सोसले, पण तो स्वतः सदोदित या शहराचा नम्र सेवकच राहिला. त्याला आदराचा मुजरा नाकारणें अशक्य होतें.

* * *

निहोम्बाशीच्या आसपासच टोकिओचीं विख्यात डिपार्टमेंट स्टोअर्स आहेत. सारीं स्टोअर्स सारखींच आहेत. सारख्याच कौशल्यानें कारभार करीत आहेत. नवनवीन युक्त्या सारख्याच हिरिरीनें वापरीत आहेत. नवनवीन उपक्रमांचा तोच तडाखा चालवीत आहेत. नवनवीन फॅशन्स पसरवीत आहेत. प्रदर्शनें भरवीत आहेत. व्याख्यानें करवीत आहेत. पुष्परचनेचे वर्ग चालवीत आहेत. चहा-पानविधीचे पाठ देत आहेत. आणि आपल्या इमारतींचा ढंग आणि सजावटीचे रंग सारखे बदलीत आहेत. तेव्हां कोणत्याहि स्टोअर्समध्यें चला, एकच अनुभव येईल. टांचणीपासून टेपरेकॉर्डरपर्यन्त हवी ती वस्तु सारख्याच दराची आणि सारख्याच वजनाची मिळेल. मी एकांत गेलों त्याचें नांव आतां आठवत नाहीं, पण रूप आठवतें. पहिला मजला म्हणजे धांदलीच्या खरेदीची जागा. पण मला खरेदी करायची नव्हती, फक्त पाहायचें होतें. तळघरांतून नवान्नाचा स्वाद आला, पण त्यांत मला गोडी नव्हती, म्हणून लिफ्टकडे वळलों, आणि लिफ्टमध्येंच गोड अनुभव आला. लिफ्ट चालवणाऱ्या मुलीचा हसतमुख चेहरा कसलेंसें गोड गाणें गुणगुणत होता. खरें म्हणजे दर मजल्यावर कोणकोणत्या मालाचीं दालनें आहेत याची यादी ती सांगत होती, पण या गद्य यादीला तिच्या तोडांत हें गोड रूप आलें. तिची ती हसरी नजर पहात आणि हें गोड गाणें ऐकत लिफ्ट-मध्येंच उभें रहावें असें वाटलें. पण झुंडीच्या झुंडी आंत शिरत होत्या आणि झुंडीच्या झुंडी बाहेर लोटत होत्या आणि अशाच एका झुंडीबरोबर मी बाहेर फेकला गेलों. सुदैवानें ज्या मजल्यावर फेकला गेलों त्यावर कलेचा उत्सव सुरू होता. चित्रें, चिनी पद्धतीचीं, पाश्चात्य पद्धतीचीं, जपानी पद्धतीचीं चित्रें; जुनीं छापचित्रें, नवीं छापचित्रें; शिल्प, शिल्पाचे सिधे नमुने, विक्षिप्त नमुने; जुने पुतळे, आधुनिक ठोकळे; कुंभपात्रें, मातीचीं, दगडाचीं, कांचेचीं; फुलदाण्या, कप, वाडगे; बाग, बागेंतल्या वनस्पतींचे नमुने, दगडांचे नमुने, झाडांचे रोपे, खुरटवलेल्या रोपांचे नमुने—एक ना अनेक प्रकार तेथें होते. थोडक्यांत म्हणजे कलाकृतींचीं जीवंत प्रदर्शनेंच तेथें सुरू होतीं. शिवाय एक प्रदर्शन या संज्ञेनें भरविलेलें प्रदर्शनहि सुरू होतें. कोरिनच्या चित्रांचें प्रदर्शन. त्याचा तो विख्यात, अलुबुखारच्या मोहराचा दुरंगी पडदा पाहिला आणि डोळे भरून आले. विख्यात कलावंताच्या विख्यात कृतीचें दर्शन झालें. त्याच्या कलेचें वैशिष्ट्य समजलें असें नव्हे, त्याच्या कलेचें मर्म कळलें असेंहि नव्हे, पण थोर कलेच्या सामर्थ्यानें आणि त्याहिपेक्षां तिच्या भोंवतीं निर्माण झालेल्या कीर्तीच्या वलयानें

हृदय हल्लें. मीं टोकिओंत इतर अनेक प्रदर्शनें पाहिलीं होतीं. कलाप्रदर्शनांचा तो हंगामच होता. पण या प्रदर्शनानें प्रदर्शन पाहिलें असें वाटलें.

इतर मजल्यांवर अनेक गोष्टी पाहिल्या. क्यामेरे, विजेचे दिवे, रेडिओ, रेकॉर्डर, दुर्बिणी, ग्रॅमोफोन्स, दिव्यांचे स्टॅण्ड, बूट, बॅगा, खुर्च्या, टेबलें, फुलदाण्या, बाहुल्या, खेळणीं, नेकटाईज् – नाना वस्तु पाहिल्या, आधाशासारख्या पाहिल्या आणि नजर गरगरूं लागली. एका वस्तूत दुसरी वस्तु शिरूं लागली, भिनूं लागली, आणि या संकरांतून अगदीं एकादी अपूर्व अनोखी वस्तु डोक्यांत निर्माण होणार, इतक्यांत डोकें काम देईनासें झालें! सुदैवानें एका नव्या दालनांत पाऊल पडलें आणि डोक्यांतला गोंधळ निवळला. हें दालन किमोनोंचे. किमोनोंचे कित्येक नमुने तेथें गोडगोंडस पुतळ्यांवर घालून ठेवले होते. स्त्रियांच्या समारंभांत आपण चुकून घुसलों कीं काय असें क्षणभर वाटलें, पण क्षणार्धात सावध झालों, आणि ते थंड निर्जीव पुतळे आणि त्यांच्यावरच्या किमोनोंची जीवंत सळसळ यांतल्या विसंगतीची जाणीव झाली. प्रत्येक किमोनोंत कांहींएक विलक्षण व्यक्तित्व, विलक्षण प्राण होता. प्रत्येक किमोनोचा रंग – नारिंगी, पोपटी, शेंदरी, आकाशी रंग – कांहीं एका विलक्षण तेजानें झळकत होता. प्रत्येकावरची, शेवंतीची, मेपलपर्णांची, चेरीच्या मोहराची, द्राक्षवेलींची, चिडाच्या फांद्यांची, बगळ्यांची, बुलबुलांची नक्षी नजर बांधीत होती. ओचीवरचीं जरतारी चित्रें सुवर्णतेजानें खुललीं होतीं. नजर धुंद होऊन गेली. त्या किमोनोंच्या सौंदर्यानें भारलेल्या नजरेला त्या निर्जीव पुतळ्या जीवंत झाल्याशा वाटल्या आणि त्यांच्या अंगावरचे किमोनो एकदम नव्यानें सळसळले, आणि मग, कां नकळे, लग्नमंडपांत जमा झालेल्या आपल्या स्त्रियांच्या लुगड्यांचे इरकली पदर माझ्या नजरेसमोर सरसर फडफडले – आणि मनांत विचार आला कीं, सौंदर्य आणि चारुता यांचा एक प्रयोग म्हणून परमेश्वरानें स्त्री निर्माण केली. आपल्या लावण्याचा प्रभाव वाढविण्यासाठी तिनें वस्त्रालंकारांचे अनेक प्रयोग केले. पुरुषानेंहि आपली अक्कल त्यांत ओतली. परंतु शेकडों वर्षांच्या प्रयोगानंतरहि भारताची प्राचीन साडी आणि जपानचा प्राचीन किमोनो यांची सर दुसऱ्या वस्त्राला आली नाहीं, हा एक चमत्कार नव्हे काय? पण मग किमोनो आणि साडी यांची तुलना सुरू झाली आणि या किमोनोंनीं विणलेलें मोहजाल विरूं लागलें. कांहीं म्हटलें तरी साडीचें सहजसौंदर्य किमोनोंत नाहीं. किमोनोइतकें वापरायला कटकटीचें वस्त्र दुसरें कोणतें नसेल.

आणि त्याची पायाभोंवतीं जी आवळ बसते तिनें तर जपानी स्त्रियांची चाल अगदीं बेढब, बेसूर करून टाकली आहे.

* * *

या विचारांच्या तंद्रींतच मी बाहेर पडलों आणि एका किमोनोधारी स्त्रीच्या मागून चालूं लागलों. ही स्त्री किती सुंदर चालत होती म्हणून सांगूं. किमोनोंच्या हालचालीशीं लय साधून ती चालत होती. मला नवल वाटलें. पण लगेच आठवलें कीं तामीळ भाषा सौम्य आणि मधुर स्वरांत बोलणारी स्त्री मला एकदां भेटली होती. कांहीं स्त्रियांत माधुर्य इतकें ओतप्रोत भरलेलें असतें कीं त्याच्यावर मात करण्यास विरूपहि असमर्थ ठरतें. आणि कांहीं स्त्रियांच्या पावलांत लय इतकी ठाय भरलेली असते कीं ती मोडण्यास किमोनोहि दुबळा ठरतो. पण एकदम या पावलांचीहि लय बिघडली. मी कां तें पाहूं लागलों—आणि ध्यानांत आलें कीं रस्त्यावरील गर्दीनें ही घाण केली. लगेच माझी नजर सभोंवार फिरली आणि शिम्बाशीकडे जाणाऱ्या या रस्त्यावर केवढी गर्दी उसळली आहे हें ध्यानांत आलें. टोकिओच्या कोणत्याहि रस्त्यावर केव्हांहि गर्दी असतेच, पण या गर्दीसारखी हीच. कोणत्याहि गोष्टीला अंकांच्या आंकड्यांत पकडणाऱ्या आंकडे-शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे कीं या रस्त्यावर दररोज पांच सहा लाख पावलें पडत असतात. या पांच सहा लाखांना दोहोंनीं गुणायचें कीं भागायचें हा प्रश्न मीं त्या आंकडेशास्त्रज्ञांवर सोपवून देऊन एक साधाच प्रश्न मनाशीं केला कीं, इतके लोक, इतकीं वाहनें येथें एकदम कां गोळा होतात? कर्कशणाऱ्या मोटारी, धडधडणाऱ्या लॉऱ्या, फर्रारणाऱ्या फटफटी, वळवळणाऱ्या सायकली, खडखडणारे गेटे, तुरतुरणाऱ्या झोऱ्या—आणि त्यांच्यावर स्वार झालेले गोबऱ्या गालांचे, थोराड हाडांच्या चेहऱ्याचे, कुळकुळीत केसांचे, बोजड पायांचे पण गोंडस हातांचे, डोळ्यांवर चष्मा आणि चेहऱ्यावर चिंता चढविलेले साडे तीन हातांचे देह, इतकी ओरड, इतके हातवारे आणि इतकी धावपळ करीत येथें कां गोळा होतात? कां गर्दी करतात? एकमेकांना धक्के कां देतात? एकमेकांच्या ओढाताणींत अगर रेटारेटींत कां सामील होतात? जगांतल्या इतर असंख्य प्रश्नांप्रमाणेंच या प्रश्नांचेंहि उत्तर स्वभाव असेंच आहे. गर्दी करणें, गर्दीत रमणें आणि गर्दीचा गुणाकार करणें, हा जपानी माणसाचा स्वभाव आहे. तो जाईल तिकडे गर्दी करतो आणि गर्दी असेल तिकडेच जातो. गर्दीचा त्याच्या देशाला शापच

आहे. गर्दीनें गजबजलेल्या त्याच्या देशाला एकांताची चैन परवडत नसते. कागदी भिंतींच्या त्याच्या घरांत कसलाच एकांत शक्य नसतो. त्याला कसलाच एकांत मिळत नाहीं. श्राव्यहि नाहीं आणि दृश्यहि नाहीं. एकांताचा अजिबात अनुभवच नसल्यामुळें एकांत हा त्याला एकांतवासाच्या शिक्षेइतका कठोर वाटतो. म्हणून तो नेहमीं गर्दी गोळा करीत असतो आणि गर्दीवर प्रेम करीत असतो. संधि सांपडेल तेव्हां गर्दी माजवितो. त्याचे सण आणि उत्सव म्हणजे सार्वजनिक उद्यानांत गर्दी माजविण्याची शहाजोग संधि. त्याचे बेसबॉल अगर सुमो कुस्त्यांचे सामने म्हणजे गर्दीला आलेलें उधाण. आणि त्याच्या धार्मिक मिरवणुकी म्हणजे तर गर्दीला चढलेली झिंगच. ॲरिस्टॉटलच्या कळप करून रहाण्याच्या प्रवृत्तीचें तो एक निखालस उदाहरण आहे. एकांताच्या अभावामुळें मनुष्य प्राणी माणुसघाणा बनतो असें बर्ट्रांड रसेलसारखे विचारवंत सांगतात, त्याला तो सक्त अपवाद आहे.

पण गर्दीलाहि एक लय असते. गर्दींतल्या गोंधळाला, ओढाताणीला, धक्का-बुक्कीला, तोंडघाशीला आणि तोंडचुकवीला एक लय असते. या लयीशीं माझी लय जमविण्याचा मी प्रयत्न करीत होतों, तों ध्यानांत आलें कीं सारीच लय एकदम बिघडते आहे. कां तें पाहूं लागलों, तों एक सुस्वरूप स्त्री – पायांत गेटा, अंगांत किमोनो आणि हातांत सामीसेन, अशी स्त्री – हातांतल्या वाद्याचा टंकार छेडीत येत आहे आणि कसल्यातरी उत्सवाचा किमोनो घातलेल्या, डोक्याला फडकें गुंडाळलेल्या आणि कपाळाला पांढरा नाम लावलेल्या मुलांचा घोळका तिच्या मागें आहे. तिला पाहून मला एकदम आपल्याकडच्या गोसावणीची आठवण झाली. पण ही इकडे कां ? आणि हा मुलांचा ताफा कां ? आणि तीं एकमेकांना आणि आजूबाजूच्या लोकांना या पत्रिका कसल्या वांटीत आहेत ? मी एक पत्रिका घेतली आणि ध्यानांत आलें कीं हीं दाइए कंपनीच्या 'उगात्सु मोनोगाटारी' बोलपटाची जाहिरात !

टोकिओंत थोडेंसें हिंडा, लगेच जपान्यांच्या जाहिरातबाजीचे तऱ्हतऱ्हेचे नमुने नजरेसमोर नाचूं लागतील. आसाकुसाच्या मंदिरांत जमलेल्या पेन-प्रतिनिधींवर हेलीकॉप्टरनें फुलांच्या पाकळ्यांऐवजीं जाहिरातपत्रिकांची वृष्टि केली होती. उसा येथील एका कारखानदारानें आपल्या मालाची Made in USA अशी जाहिरात करून अमेरिकन कस्टम्स – अधिकाऱ्यांना गोंधळांत टाकलें होतें.

आणि सुमिदा नदीवरच्या वार्षिक दारूकामांत एकदां एका कंपनीच्या नांवाचीं अक्षरें उमटलीं होतीं. जपानांतला एक विख्यात बेसबॉल संघ 'असाही' पत्रानें पुरस्कारलेला आहे आणि 'असाही' पत्राचेंच नांव तो लावतो. बहुतेक डिपार्टमेंट स्टोअर्सच्या गच्चीवर एखादा बागबगिचा नाहींतर करमणुकीचें केंद्र, उपाहारगृह अगर शिंटो मंदिर असतें. एखादा 'डिपाटो' आपला वार्षिक सेल लावतो, तेव्हां त्याच्या प्रचारकांचीं अनेक रोमटें रस्त्यावरून हिंडतात. गिंझावर रात्रीं निऑन लाईट्सची जी रंगदार स्वप्नपुरी उमलते तिचा आत्मा जाहिरातगिरीचाच आहे. जाहिरातगिरी मुळीं जपान्यांच्या रोमारोमांतच भिनलेली आहे. दुकानांत माल विकणाऱ्या मुलीच्या चेहऱ्यावरच्या हास्यांत ती जशी तरळेल तशीच तो माल वेष्टनांत गुंडाळतांना होणाऱ्या बोटांच्या नाजुक हालचालींत दिसेल. जपानी दुकानांतून आलेल्या मालावरचें वेष्टन म्हणजे एक छोटीशी कलानिर्मितिच होय. अनेक दुकानदार नुसत्या आकर्षक वेष्टनावर भागवीत नाहींत. ते सोबत एक लहानशी भेटहि देतात. उपाहारगृहांनीं, कॉफीगृहांनीं आणि पेयगृहांनीं या भेटीला एक मजेदार रूप दिलें आहे. तीं गिऱ्हाइकांना सुंदर कलात्मक लेबलाची काड्यांची पेटी नजर करतात. बहुतेक वेळां दुकानांतली पोरगी प्रथम त्या पेटींतल्या काडीनें तुमची सिग्रेट पेटवते आणि मग ती तुमच्या स्वाधीन करते. जपान्यांच्या कलादृष्टीचे अनेक नाजुक नमुने या लेबलांवर दिसतील. उपाहारगृह एखाद्या माशाची छोटीशी आकृति लेबलावर रेखील, तर कॉफीगृह कपबशीचा भास निर्माण करणारी एखादी स्वैर रेखाकृति चित्रील. आणि पेयगृह एखादा काव्यचरण चित्रमय लिपींत शृंगारून तुमच्या काव्यात्म वृत्तीस स्पर्श करील. या लेबलांवर पुष्कळदां जपानच्या निसर्गावरचें अगर ऐतिहासिक कलाकृतीवरचें प्रेम व्यक्त झालेलें असतें. चेरीचा मोहर, मेपलचीं आरक्त पानें, होकुसाय अगर हिरोशिगे यांचें एखादें छापचित्र, नाहींतर कोरिनची एखादी कलाकृति या लेबलावर अवतरते. पुष्कळशा लेबलांवर नाजुक रेखा आणि वेधक रंग यांचें भावगीत आढळेल, पण एखादें एखादा गद्य नकाशाच सादर करील किंवा आपल्या दुकानाचें नांव रेखील. पण जपानची लिपी जात्याच चित्रमय असल्यानें यांतूनहि कलेचा निर्झर वाहील.

* * *

शिम्बाशीला चालत जाण्याचा माझा बेत होता. पण गिंझांतल्या गर्दीपुढें माझा निभाव लागेना, आणि मीं शिम्बाशीचा नाद सोडून टॅक्सीनें काण्डाला जायचा बेत केला. एक टॅक्सी उभी केली आणि ड्रायव्हरला विचारलें, 'इंग्लिश ?' तो मुंडी हालवून म्हणाला 'हाय' (होय). लगेच मी टॅक्सींत बसलों नि ऐटींत म्हणालों, 'Let us go to Ueno Park via Kanda.' (आपण कण्डाच्या मार्गानें उएनो पार्कला जाऊंया.) तो कांहीं बोलला नाहीं. मी विचारलें, Do you understand ? – We go to Ueno via Kanda. त्यावर त्यानें तोंडाचें बोळकें करून पुटपुटल्यागत अत्यंत निर्बुद्ध स्वरांत माझ्या वाक्याचा पुनरुच्चार केला – We go to Ueno via Kanda. माझें बोलणें त्याला समजलें असें यावरून समजण्यास हरकत नव्हती, पण ज्या गबाळ स्वरांत त्यानें ही उजळणी केली त्यानें मी हादरलों. मीं पुनः म्हटलें Understand ? — We go first to Kanda and then to Ueno Park. त्यानें पुन्हां उजळणी केली, First to Kanda then to Ueno Park. आतां माझी खात्री पटली, याला इंग्रजीचा गंध नाहीं. बहुतेक माझा व इंग्रजीचा आदर करण्यासाठीं तो मी उच्चारीत असलेल्या शब्दांचा पुनरुच्चार करतो आहे. कदाचित् तेवढ्यांत थोडें इंग्रजी शिकण्याचा त्याचा इरादा असेल. पण त्याची ही इंग्रजीविषयींची आस्था मला महाग पडणार होती. पण मी करणार काय ? त्याला समजावणार कसें ? आणि त्याला त्याची पर्वा तरी कोठें होती ? त्यानें चक्क टॅक्सी उलटी फिरवली आणि भरधाव सोडली. त्याच्या त्या उलटी फिरवण्याच्या बेछूट क्रियेनें माझ्या पोटांत थोडीशी धडकीच भरली. काण्डा उलट दिशेला आहे हें मला माहित नव्हतें. त्याच्या आविर्भावावरून मला तें तिकडेनसावेंच असें वाटलें. पण मी कांहीं बोलूं शकत नव्हतों. एका आततायी माणसाच्या तावडींत सांपडलों होतों. पण त्याला कोणाच्याच जिवाची पर्वा दिसली नाहीं. माझ्या नाहीं, रस्त्यावरच्या माणसांच्या नाहीं. तीं बिचारीं त्याच्या टॅक्सीच्या नुसत्या दर्शनानें सैरावैरा धावूं लागत. आतां माझ्या ध्यानांत आलें कीं टोकिओच्या टॅक्सीवाल्यांना 'कामीकाझे ड्रायव्हर्स' कां म्हणतात ! 'कामीकाझे' म्हणजे देवाघरचा वारा. १२८१ मध्यें कुबलाईखानानें जपानवर स्वारी करण्यासाठीं एक प्रचंड आरमार पाठविलें त्याचा वादळानें फडशा पाडला. तेव्हां जपान्यांनीं या वादळाला कामीकाझे म्हटलें. तेव्हांपासून अरिष्टांतून संरक्षण करणाऱ्या कोणत्याहि शक्तीला कामीकाझे ही संज्ञा प्राप्त झाली. गेल्या महायुद्धांत जपानवरचें प्राणांतिक संकट टाळण्यासाठीं

अनेक वैमानिक आत्माहुतीच्या दलांत दाखल झाले. त्यांचा कामीकाझे असा गौरव झाला. टोकिओचे टॅक्सी-ड्रायव्हर स्वतःच्या प्राणांबद्दल असेच बेफिकीर असतात म्हणून त्यांनाहि कामीकाझे म्हणतात. दुर्दैवानें ते इतरांच्या प्राणांबद्दलहि तितकेच बेफिकीर असतात. कामीकाझे या उदात्त संज्ञेचें असें विपरीतांत संक्रमण होतांना अर्थाला जितके तेढे पडले तितके तेढे माझा टॅक्सी-ड्राव्हर टॅक्सीच्या वेगाला आणि वळणांना देत होता, आणि याच्या परिणामाचा विचार करण्याची माझी हिंमत पार खचली.

* * *

पण आपल्याला तो कोठें नेत आहे हा प्रश्न होताच. कांहीं बोध होतो का पाहूं लागलों. पण ऐसपैस पसरलेल्या टोकिओच्या इतर रस्त्यांसारखाच हा रस्ता होता. तोच नूर, तीची तऱ्हा. रस्त्यांच्या कडेनें अखंड उभ्या असलेल्या लाकडी पेटाऱ्यासारख्या भकास घरांची रांग. रस्ता कोठें जातो, कसा जातो कांहीं कळेना. एकसारखा भिकार भणंग दृश्यांचे पडदे खोलीत होता. या फुसक्या, विटक्या, एक-सुरी, व्यक्तित्वशून्य घरांच्या कधीं न संपणाऱ्या रांगा पाहून वाटलें, युद्धांत बेचिराख झालेलें शहर जपान्यांनीं दोनतीन वर्षांत उभें केलें यांत नवल तें काय? असले कडबे ठेवायचे गोठे उभारायला अक्कल ती किती हवी आणि वेळ तो कितीसा लागणार? पण लगेच शिंजुकू येथें पाहिलेलें दृश्य आठवलें. तेथें भूगर्भ गाड्यांचा रस्ता बांधण्याचें काम चाललें होतें. पण खालीं काम चालू म्हणून वरचा रस्ता बंद नव्हता. वर चक्क लाकडी फळ्यांचा रस्ता टाकलेला होता. कांहीं म्हटलें तरी जपानी हे हाडाचे बांधकार आहेत. शिवाय ते अशी फुसकी कामचलाऊ घरें बांधतात यांत एक खोल दृष्टि असेल. हें जग विनाशी आहे, क्षणभंगुर आहे अशी बुद्धाची शिकवण आहे. बुद्धापेक्षांहि जपानच्या अस्थिर भूमीनें हा धडा अधिक चांगला बिंबवला असेल. आग आणि भूकंप यांचा स्वैर संचार सुरू असलेल्या भूमीवर अशीं हंगामी घरें बांधणेंच योग्य. घर-बांधणीचे आणि शहर-आंखणीचे नवनवे प्रयोग वारंवार करण्यास यामुळें चांगला अवसर मिळतो. याच दृष्टीनें १९२३ च्या भयंकर भूकंपाचें कादंबरीकार तानी-झाकींनीं मनःपूर्वक स्वागत केलें होतें. शिवाय आजचा काळ बॉंबहल्ल्यांचा. या काळांत अशी भटक्यांच्या तंबूसारखी, आज गुंडाळलीं उद्यां उभारलीं, आज मोडलीं उद्यां उठवलीं, अशीं घरेंच चांगलीं!

माझ्या विचाराच्या अशा आडव्या उभ्या उड्या पडत आहेत, तोंच चाकांवर ब्रेकचें जबरदस्त घर्षण होऊन टॅक्सी उभी राहिली. आणि एग्दम

ध्यानांत आलें, अरे आपण अद्याप शाबूत आहोंत. टॅक्सीहि शाबूत आहे. आणि कोणीच दगावलेलें नाहीं. मला ड्रायव्हरबद्दल कींव आली. तो तरी काय करणार बिचारा! गिऱ्हाइकांना घेऊन धावण्यापेक्षां गिऱ्हाइकांच्या मागें धावण्यांतच त्याचा अधिक वेळ जातो. चौवीस चौवीस तास चाकावर हात ठेवून राहतो तरी चतकोर भाकरीची हमी नाहीं! खरेंच हा टॅक्सी-ड्रायव्हरचा धंदा पत्करणें म्हणजे जिवाचीच जोखीम. मग त्याला कामीकाझे न म्हणायचें तर काय?

एका पुस्तकांनीं रिचलेल्या दुकानासमोर टॅक्सी उभी होती.—त्यानें मला बरोबर काण्डांत आणलें होतें. आतां त्याच्याबद्दल वाटणाऱ्या अनुकंपेंत आदराची सूक्ष्म छटा उमटली. मी काण्डांत आलों होतों याबद्दल शंका येण्याचें कारण नव्हतें. माझ्या डाव्या उजव्या बाजूला पुस्तकांचींच दुकानें होतीं आणि आंतलीं पुस्तकें जगाला शहाणें करून सोडण्याच्या आविर्भावानें रस्त्यावर आलीं होतीं. जिकडे तिकडे जुन्या पुस्तकांच्या रांगा लागलेल्या होत्या आणि दुकानदार त्यांच्यावरून आपली प्रेमळ नजर आणि कुरवाळणारे हात फिरवीत होते. मला एकदम पॅरिसच्या सेन नदीकांठच्या पुस्तकांच्या रांगांची आठवण झाली आणि अशी आठवण होण्यांत काण्डाचा अपमान होत आहे याचीहि जाणीव झाली. खरोखर पुस्तकांच्या या घाऊक बाजारापुढें सेन नदीच्या कांठचीं तीं आपली मोजकी दौलत आवरून बसलेलीं दुकानें म्हणजे 'किस झाडकी पत्ती'! पॅरिसच्या इमारती पाहण्यास आणि चैन उपभोगण्यास आलेल्या उडत्या प्रवाशांचें क्षणभर चित्त धरूं पहाणाऱ्या त्या दुकानांची या उभ्या जगाला साक्षर नव्हे तर विद्वान् करून सोडण्याचा चंग बांधलेल्या बाजारापुढें काय पत्राज! येथें ज्ञानगंगाच वाहात होती आणि त्याच्या प्रवाहांत हवें तितका वेळ डुंबायला या, असें जाहीर निमंत्रण होतें. त्याचा फायदा अनेक वाचक दुकानांत आणि फूटपाथवर उभे राहून घेत होते. कोंकणांत झाडाखालचें फळ उचलणें ही जशी चोरी नव्हे, त्याचप्रमाणें जपानांत पुस्तकांच्या दुकानांत उभें राहून फुकट वाचणें हें पाप नव्हे. आणि शेकडों वाचक पायावर भिस्त टाकून पुस्तकेंच्या पुस्तकें आणि मासिकेंच्या मासिकें फस्त करीत असतात. आणि तरी पुस्तकें हजारोंनीं खपतात. कारण जपान हें वाचकांचें राष्ट्र आहे. प्रत्येकानें आपल्या जीवनाचें वाचनालय करून सोडलें आहे.

* * *

उएनो पार्कचा विचार सोडून सुमिदा नदीवरून शिम्बाशीला जावें असें मनांत आलें आणि मी टॅक्सी करून आसाकुसाच्या धक्क्यावर गेलों. लॉंच सुटायला थोडा वेळ होता. पाण्याकडे पाहात बसावें म्हणून एका बांकावर टेकलों. नदीचें वाहतें पाणी पाहात बसायला मला फार आवडतें. पाण्याचा तो अखंड, अव्याहत प्रवाह पाहून मला विश्वाच्या सातत्याचा प्रत्यय येतो आणि विश्वाच्या अंताबद्दल शास्त्रज्ञांनीं वर्तविलेल्या भविष्यांची कींव वाटते. पण माझें नदीपलीकडच्या एका इमारतीकडे लक्ष गेलें आणि माझ्या मनाच्या कुशींत दबून बसलेल्या चिरंजीवित्वाचे पंख एकदम फडफडले! समोरची ती इमारत म्हणजे १९२३ च्या भूकंपांतील एका दारुण शोककथेचें हृदयद्रावक स्मारक. नदीच्या या बाजूला भडकलेल्या ज्वाळांपासून जीव बचावण्यासाठीं हजारों लोकांनीं त्या तीरावर आश्रय घेतला, पण आगीच्या ज्वाळांनीं एखाद्या सर्पराक्षसाप्रमाणें नदीच्या पाण्यावरून पलीकडे उड्या घेतल्या आणि या निराधार लोकांचा स्वाहाकार केला! माझ्या डोळ्यांपुढें त्या भयानक भूकंपाचीं वर्णनें नाचूं लागलीं. भूमीनें गिळलेल्या आपल्या बालकास वांचविण्याठीं एका स्त्रीनें तिच्या जबड्यांत उडी घेतली, पण भूमीनें लगेच जबडा मिटला आणि त्या स्त्रीचे केस तेवढेच भुताप्रमाणें भुरभुरत बाहेर राहिले! सुदैवानें लॉंच सुटण्याची शिटी बाजली आणि मी माझ्या नजरेसमोरचें तें दुःस्वप्न बाजूला सारूं शकलों. आणि लवकरच माझें लक्ष नदीवरून खालींवर जाणाऱ्या बोटी, होड्या, पडाव, तरी, तराफे यांत गुंतून गेलें. सुमिदा ही टोकिओची अन्ननलिका आहे, आणि रोज हजारों टन माल तिच्या पाण्यावरून जात असतो. अर्थात् या नदीवर वर्दळ आहे, हालचाल आहे, जीवंतपणा आहे; पण त्यांत एक चमत्कारिक संथपणा आहे. सुमिदावरून जातांना मला बँकॉकच्या चाओ फ्या नदीचें स्मरण होतें. चाओ फ्या ही सुमिदाप्रमाणेंच बँकॉकची अन्ननलिका आहे, पण तिचें दर्शन अधिक स्वैर, अधिक उच्छृंखळ, अधिक मस्त आहे. रौद्रसुद्धां म्हटलें तरी चालेल. चाओ फ्यावरून जातांना आपली विश्वांतील एका प्रचंड शक्तीशीं गांठ पडलेली आहे याची सारखी जाणीव होत राहते. तशी सुमिदावर होत नाहीं. सुमिदा लहान आहे. सौम्य आहे. आणि मुख्य म्हणजे नागर आहे. तिचे दोनहि कांठ व्यवस्थित बांधून काढलेले आहेत. शिवाय अंतराअंतरानें पूल आहेत. पॅरिसच्या सेन नदी–

प्रमाणें दर पुलागणिक बदलणारें आणि दर पुलागणिक लक्ष वेधणारें सौंदर्य त्यांच्यांत नाहीं, पण सुमिदाच्या रूपाला नागर सभ्यतेचा 'टच' देण्यास त्यांचा फार उपयोग होतो. शिवाय हे पूल सुमिदाच्या दोन कांठांवरचीं टोकिओचीं दोन जगें एकत्र बांधीत असतात. टोकिओचें औद्योगिक जग सुमिदाच्या डाव्या कांठावर आहे तर व्यापारी आणि नागरी जग उजव्या कांठावर आहे. या दोन जगांचीं चिन्हें त्यांच्या त्यांच्या कांठावर आढळतात. डावीकडे कारखान्यांच्या कचेऱ्या, गुदामें आणि यान्या आहेत, आणि उजवीकडे व्यापारी कचेऱ्या, उपाहारगृहें आणि गेशागृहें आहेत. रिओगोकु पुलापाशीं आमची लॉंच आली तेव्हां पुलाखालून दोन कबुतरें फडफडत उडालीं. या पुलाखालीं कबुतरांची वस्ती आहे आणि आसपास गेशागृहें आहेत – आणि अर्थात् उपाहारगृहें आहेत. बरोबरच आहे. हा पूल हें टोकिओचें एक मोठें सांस्कृतिक स्थान आहे. दरवर्षी जुलै महिन्यांत या पुलावर सुमिदा नदीवरील वाहतुकीचा वार्षिकोत्सव होतो आणि पुलावरचें आकाश सुरनळ्यांनीं आणि दारूकामाच्या फुलांनीं आणि नक्षत्रांनीं उजळून जातें. पण पुलाच्या आसपास रोजच रात्रीं रोषणाई असते. गेशागृहांच्या आणि उपाहारगृहांच्या सज्जांत कंदील उजळतात आणि त्यांच्या प्रतिबिंबांनीं नदीच्या पाण्यांत स्वप्नें उमलतात. आतां दिवसां मात्र या सज्जावर आंतलीं कापडें हवा खाण्यासाठीं आलीं होतीं आणि उघडीं घरें अंतरंग उघडून दाखवीत होतीं. आतां या घरांत सारा गद्य कारभारच होता. पण रात्रीं येथें काव्याचे रोमांचक मळे फुलतात. आणि त्या फुलविणाऱ्या व्यक्ति समोरच्या औद्योगिक जगांतून येतात. आम्ही आतां या दोन जगांच्या मधून जात होतों. एक चिमण्या आणि यान्या यांचें जग आणि एक फुलें आणि विलोवृक्ष यांचें जग. एक पैशाचें आणि एक करमणुकीचें. एक नव्या जपानचें आणि एक जुन्या जपानचें.

प्रत्येक वेळीं आमची लॉंच पुलाखालून गेली कीं वाटे, हे पूल खरोखरी नव्या आणि जुन्या जपानला जोडत आहेत, नव्याला जुन्याची रंगत आणि जुन्याला नव्याचा आधार देत आहेत. इतक्यांत, उजवीकडच्या एका इमारतीवर युनोचा बावटा दिसला आणि माझ्या डोळ्यांसमोरचीं, या करमणुकीच्या जगांतलीं उद्योगपतींच्या आगमनाचीं, साकेपनाचीं, नृत्यसंगीताच्या सेवनाचीं आणि यांच्या दरम्यान चेष्टाविनोदाचीं आणि गंभीर करारमदारांचीं दृश्यें विरलीं. जरा वेळानें मी हामा रिक्यु बागेंत उतरलों आणि शिम्बाशीला आलों.

टोकिओबद्दल लिहितांना या उलढाली शहराच्या करमणूक-केंद्रांबद्दल लिहिलें नाहीं तर तो अपमान त्याला मुळींच सहन होणार नाहीं. करमणूक, स्वैर करमणूक ही जपानी जीवनाची निकराची गरज आहे. राजा, पिता, गुरु, मालक, माता, बंधु, भगिनी, पूर्वज इत्यादींविषयींच्या अनंत कर्तव्यांनीं आणि निर्बंधांनीं जखडलेल्या, पीडलेल्या, त्रस्त झालेल्या, आणि आपला त्रास शब्दांनीं अगर हावभावांनींहि व्यक्त करण्यास स्वतंत्र नसलेल्या जिवाला, क्षणभर कां होईना, या पाशांचा विसर पाडण्यासाठीं, त्यांच्या जाणिवेंतून सुटण्यासाठीं, करमणुकीची गरजच असते–आणि ही करमणूक साधी, मिळमिळीत, पचपचीत असून चालणार नाहीं. ती चांगली कडक, मनावरचे कांच तटातट तोडणारी, करकचून आवळलेल्या जीवाला स्वैर सोडणारी, विकारांचा ठाण बांधलेला घोडा क्षणांत उधळून देणारी असली पाहिजे. अर्थात् जपान्यांची करमणूक ही शिष्ट, विनम्र, ओठांच्या कडा किंचित् विलग करून हसणारी, सभ्यतेच्या इस्त्रीस जपणारी, दैनंदिन जीवनाच्या कांठकांठानें जाणारी, बंधनांच्या रिंगणांत स्वतःभोंवतींच फिरणारी, नसते. ती मुक्त असते, स्वैर असते, सारे संकेत पार झुगारून देणारी असते. सांसारिक कर्तव्यांपलीकडच्या उनाड प्रांतांत बेहोष उड्या घेणारी असते. आणि सुज्ञ समाजाची त्याला फारशी आडकाठीहि नसते. तुमच्या मूळ कर्तव्यांचा भंग न करतां जें काय करायचें तें खुशाल करा, कोणी तुम्हांला जाब विचारणार नाहीं. खुशाल वेश्यागमन करा, फक्त बायकोला टाकूं नका. खुशाल दारू प्या, पण शुद्धीवर आल्यावर तुमची जागा तुम्हाला घ्यायची आहे हें विसरूं नका. खुशाल जुगार खेळा, पण रोजच्या संसाराची तरतूद करायची टाळूं नका–असा हा मामला असतो. म्हणून दारूपान, वेश्यागमन वगैरे प्रकार अगदींच राहवत नाहीं म्हणून संयमानें, मर्यादेनें करावयाचे प्रकार नव्हत. दारू झिंगण्यासाठीं असते. स्त्री झोपण्यासाठीं असते आणि जुगार झुकण्यासाठीं असतो. सुमो, बेसबॉलसारखे खेळहि धुंद होण्यासाठीं असतात. बाटली तोंडाला लावल्याबरोबर जपानी माणूस झिंगतो, कारण तो झिंगायला उत्सुकच असतो. वेश्येबरोबरच्या संबंधांत तो झटाझट पावलें टाकतो, कारण लैंगिक क्रियेभोंवतीं रोमांचक शृंगाराचें धुकें जमवणें त्याला पसंत नाहीं. असतील तेवढे पैसे तो पणाला लावतो, कारण जुगाराचा पेला घटाघटा रिकामा करणें एवढेंच त्याला समजतें. काबुकी अगर नोह थिएटरांत तो पसंतीच्या नुसत्या टाळ्या मारीत नाहीं, आरोळ्या ठोकतो. सुमो कुस्त्यांचे सामने पाहात असतांना तो नुसत्या आरोळ्या

ठोकीत नाहीं तर थया थया नाचतो. खरें म्हणजे जपानी पुरुष बेहोष बनण्यासाठीं निमित्तच शोधीत असतो. त्याची ही बेहोषी कुस्तीच्या आखाड्यांत, नाटकाच्या



थिएटरांत, पाचिंकोच्या अड्ड्यांत, अगर रस्त्यावरच्या मिरवणुकींत किंवा निदर्शनांत, कोठेंहि केव्हांहि दिसेल.

युद्धोत्तर कालांत तर या बेहोषीनेंच नशापाणी केलें. युद्धाची होरपळ, पराभवाचा फटका, अमेरिकन सैनिकांनीं पाडलेला पैशाचा पाऊस, शिस्तीचा उडालेला बोजवारा आणि करमणुकीच्या उंडारलेल्या कल्पना — यांमुळें रात्रीचें घराबाहेरचें पाऊल नुसतेंच वांकडें पडलें नाहीं, तर साफ उनाडलें. अर्थात् गेशाची गणिका झाली, किमोनोचा स्ट्रिप्टीज् झाला, साकेची रम बनली, बीअरचा पेला भरून देणारा हात गिन्झाइकाच्या गळ्याभोंवतीं पडूं लागला

आणि योशिवारांतली वारयोषिता चक्क रस्त्यावर आली. विशेष म्हणजे जुगाराचा पाचिंको झाला. पाचिंको हें युद्धोत्तर बेहोषीचें समर्पक प्रतीक आहे.

पाचिंको हा उभ्या पटावर कळ दाबून गोटी उडवण्याचा खेळ आहे. ही गोटी पटावरच्या भोंकांत गेली तर तिची दामदुप्पट होते, न गेली तर सरळ पटाच्या मालकाच्या खिशांत जाते. तुमच्यापाशीं कांहीं गोट्या जमल्या तर चॉकलेट, बिस्किटें, स्नो, शेव्हिंग क्रीम असल्या वस्तु मोबदल्यांत मिळतात; न जमल्या तर रिकाम्या खिशांत 'बेटर लक् नेक्स्ट टाइम' हा मंत्र भरून घरीं जातां येतें. जुगारीच्या खेळांतली वेडी आशा या खेळाच्या पुरी मानगुटीला बसली आहे. खरें म्हणजे खेळणाराच्या. पाचिंकोच्या अड्ड्यांत शिरलेल्या माणसाला दुसरें कसलें भान नसतें. त्याचा हात पाचिंकोच्या कळीला चिकटलेला असतो, नजर पाचिंकोच्या गोटीबरोबर उडत असते, आणि शुद्ध पटावरच्या त्या बिळांत दडून बसते. आजूबाजूच्या घडामोडींची त्याला दाद-खबर नसते. एकदां एका अड्ड्यांत, पाचिंकोला भर आलेला असतांना, एक इसम हृदयक्रिया थांबून मरून पडला; बहुधा उनाड गोट्यांचा फसवा कारभार त्याला असह्य झाला—पण तिकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. टोकिओच्या एका चौकांत एक महोत्सवी नाटक रंगलें असतांना कित्येक तरुण समोरच्या पाचिंकोच्या अड्ड्यांत रमले होते. त्याचप्रमाणें योशिवारांतल्या मुली आपलें मोहजाळ पसरण्याची शिकस्त करीत असतांना त्यांच्याकडे चक्क दुर्लक्ष करून अनेक तरुण शेजारच्या पाचिंको-अड्ड्यांत गर्दी करीत असतात. पाचिंको हा युद्धोत्तर जपानचा एक चलता धंदा बनला आहे. कोणत्याहि रस्त्यांत जा, पाचिंकोच्या गोट्यांचा खडखडाट कानांत शिरणारच, आणि कांहीं रस्त्यांत तर पाचिंको-खेरीज दुसरें कांहीं दिसत नाहीं, ऐकूं येत नाहीं. पाचिंकोविरुद्ध संभावित तक्रारी खूप आहेत. पण श्रीमंतांना जशी गेशा, मध्यमवर्गीयाला पेयगृहांतली मुलगी तशी गरिबाला पाचिंकोची गोटी. तिच्याबरोबर त्याचा जीव उडणार, त्याला इलाज नाहीं.

जपानांत कोणत्याहि गोष्टीवर कालाचे संस्कार झाले, कीं तिच्या विधिसंकेतांचा संभार निर्माण होतो. सुमो कुस्ती हें याचें उत्कृष्ट उदाहरण आहे. सुमो कुस्त्यांचे सामने म्हणजे विधिसंकेतांचा एक लांबलचक पटच. कुस्तीच्या आखाड्यांत शिरल्याबरोबर मधोमध रिंगणावर टांगलेलें, इसे मंदिराच्या छपराची आठवण करून देणारें छपर, आपण आतां विधिसंकेतांच्या जगांत शिरलों आहोंत याची

तत्काळ जाणीव करून देतें. या छपराचा आणि त्यांना लावलेल्या पताकांचा तादृश उपयोग कांहीं नाहीं. पण हें छपर म्हणजे या कुस्त्यांच्या प्रतिष्ठेचें शिखर आहे, आणि सारा सामनाभर तें या प्रतिष्ठेची उदात्त जाणीव तुम्हाला करून देत असतें.

कुस्त्या सुरू होण्यापूर्वी विधीचें केवढें अवडंबर! प्रथम सारे कुस्तीगीर मोठ्या समारंभानें आपलें ढेरपोट हाल्वीत येणार, तितक्याच समारंभानें प्रेक्षकांना आणि एकमेकांना अभिवादन करणार, आणि परत जाणार. मग तिघे वस्ताद येणार. त्यांच्या कमरेला असलेलें गवताचें पण सोनेरी–रुपेरी जरीनें नक्षिलेलें एक वस्त्र यांच्या पोटाखालीं रुळत असणार. त्यांपैकीं एकाच्या कमरेला एक सफेद दोरखंड असणार आणि त्याला स्वच्छ कागदाचे कपटे चिकटलेले असणार. दुसऱ्यांच्या हातांत तलवार असणार. हेहि येऊन प्रेक्षकांना मोठ्या समारंभानें अभिवादन करणार.



त्यानंतर कुस्त्या ! पण त्यादेखील विधींनीं वेढलेल्या, मढलेल्या. कुस्तीगीर रंगणांत आल्याबरोबर त्याच्या हातावर लाकडी पळ्यानें पाणी घालण्यांत येणार. त्यानें तो चूळ भरून टाकणार. मग एका कोपऱ्याला उभें राहून आपले हत्तीसारखे पाय एकदां एका बाजूला व एकदां दुसऱ्या बाजूला उचलून जमिनीवर थाडदिशीं आपटणार, मग कोपऱ्यांतल्या मिठाच्या राशींतलें मूठभर मीठ घेऊन तें रंगणांत उडवणार, मग दोघे एकमेकांसमोर हात गुडघे टेकून बेडकासारखे बसणार आणि एकमेकांकडे खाऊं कीं गिळूं अशा नजरेनें टवकारणार, नंतर उठणार, पुन्हां चूळ भरणार, पुन्हां मीठ उडविणार, पुन्हां बेडकासारखे बसून एकमेकांना स्वाहाकार करण्याचा आविर्भाव आणणार – असें किती वेळ चालणार त्याला सुमार नाहीं. असें बराच वेळ चालल्यावर आणि प्रेक्षकांनीं तें अनिमिष नजरेनें पाहिल्यावर ती नजर चळते आहे इतक्यांत हे लठ्ठंभारती एकमेकांना भिडणार – आणि भिड भिड म्हणताहेत तोंवर एकाला चित करून दुसरा विजयी मुद्रेनें अभिवादन करणार आणि पराभूताचें अभिवादन स्वीकारणार !

पण एवढेंच नाहीं. या साऱ्या विधियुक्त लढतीवर इतर विधींचा केवढा तरी सरंजाम गोळा झालेला आहे आणि सरंजामाचे मानकरीहि गोळा झालेले आहेत. चार निर्णयकार आहेत, एक बुलाऱ्या आहे, निरीक्षक आहे, मीठझाड्या आहे, त्याचे काळ्या, तपकिरी रंगाचे खास पोशाख आहेत, बुलाऱ्याची ' अवस बाढा हो '– सारखी ओरडण्याची खास पद्धत आहे, निरीक्षकानें मधून मधून चमत्कारिक आवाज काढावयाचे आहेत – इतकें सारें आणि कितीतरी अधिक आहे. त्यांत प्रेक्षकांच्या उड्यांना आणि आरोळ्यांना फार मोठें स्थान आहे.

कोणत्याहि आचार-प्रचारयुक्त विधीला जी एक श्रेष्ठता, जें एक सौंदर्य, जी एक आवश्यकता प्राप्त होते ती याहि विधीला प्राप्त झालेली आहे. त्या शेवटच्या क्षणीं जेव्हां ते राक्षस एकमेकांना भिडतात, त्या क्षणाला गति, सामर्थ्य, चैतन्य प्राप्त करून देण्याचें कार्य प्राथमिक विधि करीत असतात. ते त्या अंतिम क्षणाचेच अग्रदूत असतात, आणि त्यांच्या लय आणि गतीमुळेंच तो सारा लांबलचक विधि आकर्षक वाटतो. नव्हे, तो नसला तर त्या कुस्तींत कांही राम उरणार नाहीं – एखाद्या लठ्ठ बाईच्या पाय घसरून पडण्यासारखीच ती मग वाटेल !

आज माझा जपानच्या मुक्कामांतला शेवटचा दिवस. इतक्या दिवसांत खूप पाहिलें, खूप अनुभवलें. पण दोन गोष्टी पाहायच्या राहिल्या होत्या. एक टोकिओचें निशी होंगांजी देवालय आणि दुसरें कोराकु–एन उद्यान. देवालयाबद्दल मला अधिक उत्साह होता, कारण भारतांतील बौद्ध वास्तुशिल्पाच्या धर्तीवर तें बांधलेलें आहे. जपाननें वास्तुशिल्पाबाबत कोणाची उसनवारी करावी हें मला चमत्कारिक वाटतें, पण बुद्धमंदिर भारतीय पद्धतीवर बांधणें यांत एक औचित्य आहे. तरीपण असली उसनवारी साधारणपणें धोका देत असल्यामुळें मी निराश होण्याची तयारी ठेवूनच गेलों. थोडीशी निराशा झालीच, कारण मी पूर्ण भारतीय अगर भारतीय आणि जपानी अशा मिश्र वास्तुशिल्पाची अपेक्षा केली होती आणि मला आढळलें तें भारतीय वास्तुशिल्पांत युरोपिअन मिश्रण. दर्शनी भागावरच्या रेनासाँ पद्धतीच्या स्तम्भांना माझा इतका विरोध नाहीं, कारण त्यांच्यावरचें कोरीव काम भारतीय आहे, पण मुंबईत गुदामांच्या भिंतीवर आढळतात तशा आडव्या खापा पाहून मला संताप आला. पण देवालयाचें एकंदर दर्शन भारतीय आहे आणि त्यांत एक डौल आहे. प्रवेशद्वाराचे स्तम्भ, प्रवेशद्वाराची कमान, मधल्या सभामंडपावरचा मजला, त्याच्या गच्चीचा कठडा, त्याचें शिखर यांचें शिल्प अस्सल भारतीय आहे आणि त्यांच्यावरची गो–पद्मादि-प्रतीकें भारतीय आहेत. मंदिराच्या डावी उजवीकडच्या टोकावरचे स्तूप साऱ्या वास्तूला एक अभिजात पौर्वात्य शोभा प्राप्त करून देतात. एकंदरींत सबंध देवालयाच्या बांधणींत व्यक्त झालेली भारतीय संस्कारदृष्टि आनंददायक वाटली. जपानच्या सलग, शुद्ध रेषेच्या लाकडी वास्तुशिल्पाचे संस्कार या मंदिरावर दिसले असते, तर मला अधिक आनंद झाला असता. पण भारतीय कोरीव शिल्पाच्या दगडी इमारतींत जपानी आत्मा ओतणें जवळपास अशक्य आहे. तरी मोयोयामा युगांतलें आलंकारिक वैभव निर्माण करणाऱ्या जपानी वास्तुशास्त्रज्ञांनीं या इमारतीला थोडेंसें जपानी पाणी दिलेंच आहे. आंतल्या सभागृहांतला रम्मा खास जपानी आहे. मात्र या सभागृहांत एक गोष्ट विलक्षण खटकली. उपासकांसाठीं खुर्च्यांची व्यवस्था केली आहे. यांत भारतीय काय अगर जपानी काय, दोनहि परंपरांचा साफ उपमर्द आहे.

•

तिसऱ्या प्रहरीं कोराकु–एन बागेंत गेलों. आणि वास्तुशास्त्राच्या दृष्टीनें सकाळच्या देवालयापेक्षां ही बाग मला अधिक आवडली. या बागेंतहि दोन पद्धतींचा

मिलाफ आहे, पण त्याचा आत्मा जपानी आहे. सरदार मित्सुकुनी यानें ही बाग सतराव्या शतकांत बांधली. त्यावेळीं त्याच्यापाशीं चूशुन–शुई नांवाचा एक चिनी पंडित राहात होता. त्यानें त्या बागेंत लक्ष घातलें आणि चिनी कल्पनांचा वर्षाव केला. या कल्पनांचे संस्कार बागेंतल्या पाऊलवाटांवर, टेकड्यांवर आणि पुलांवर झाले आहेत. या बागेंतल्या पूर्णचंद्र पुलाची कल्पना जपानला चूशुन–शुईनेंच दिली.

पण या बागेची आठवण मला राहिली आहे ती निराळ्याच गोष्टीमुळें. या बागेंतल्या वातावरणांत बाराव्या शतकांतील भिक्षु कवि सेग्यो याच्या स्मृति दरवळत आहेत. त्याचें येथें एक स्मारक होतें. १९२३ च्या धरणीकंपानें तें नष्ट झालें, पण त्याची कविता कोरलेली एक शिळा शिल्लक आहे. धरणीकंपानें वाङ्मयीन अमरत्वाला केलेलें हें अभिवादनच होय. पण त्याहिपेक्षां सेग्योच्या स्मृतीशीं निगडित असलेला एक अनुभव माझ्या अधिक लक्षांत राहिला आहे. बागेंत हिंडतांना माझी वृत्ति जरा विकल होती. चार दोन तासांतच मी जपान सोडणार होतों. त्याचें मला वाईट वाटत होतें. मी जड पावलांनीं हिंडत होतों. वृक्षवेलींकडे विषण्ण दृष्टीनें पाहात होतों. कित्येकदां मी एखाद्या दृश्याकडे निर्बोध दृष्टीनें पाहात राही, आणि मग कशानें तरी भानावर येई. असाच एकदां एका तळ्याकडे पाहात होतों, तों तळ्यापासच्या दलदलींतून एक पक्षी उडाला आणि आदल्या दिवशींच वाचलेली सेग्योची कविता आठवली :

कोकोरो नाकि
मि नि मौ आवारे वा
शिरा रेकेरि
शिगि तात्सु सावा नो
आकि नो युगारे

तळ्यापासच्या भागांतून उडालेला पक्षी पाहून सेग्योसारख्या विकारांवर विजय मिळविलेल्या साधुपुरुषाचेंहि अंतःकरण खिन्न होऊन गेलें, आणि मी तर जपानच्या प्रेमांत सांपडलों होतों. जपाननें माझे विकार शमवले नव्हते, चेतवले होते. तो पक्षी म्हणजे माझ्या अतृप्त इच्छांचें पांखरूंच टोकिओच्या या सौंदर्यस्थळाभोंवतीं घिरट्या घालीत आहे असें मला वाटलें.

कोराकु-एन बागेंतून परत आलों, सामान आवरून टॅक्सी बोलावली आणि हॅनेडा विमानतळाकडे निघालों. रस्त्याच्या कडेनें दुतर्फा टोकिओचीं तींच भिकार, भकास, लाकडी पेटाऱ्यांसारखीं घरें उभीं होतीं. त्यांचा मला उबग आला होता, पण आतां तींच आंचवणार म्हणून दुःख होत होतें. अद्यापपर्यन्त त्यांच्याकडे कोरड्या दृष्टीनें पाहणाऱ्या माझ्या नजरेंत आतां ओलावा शिरला होता. आजवर या घरांच्या स्वरूपांत तत्त्वज्ञान शोधून मी माझें समाधान करीत होतों. आतां माझ्या विचारांत भावना शिरली होती.

जपान सोडतांना जीव जडावला. अंतःकरण हललें. जपानांत माझ्या जीवनांतल्या अनेक गोड अनुभवांची पुनरावृत्ति झाली होती. अनेक स्वप्नें साकार झालीं. नवीं स्वप्नें उमललीं होतीं. अंतःकरणाच्या कक्षा वाढल्या होत्या. कोणत्याहि देशानें असा अनुभव दिला नव्हता. जपानचा निसर्ग पाहिला आणि लहानपणीं अनुभवलेल्या कोंकणच्या निसर्गाला नवे अंकुर फुटले. जपानच्या खोऱ्यांतून समुद्रकांठचें दर्शन घेतलें आणि किनाऱ्यावर फेंसाळणाऱ्या लाटांत रत्नागिरीच्या किल्ल्यावर फेंसाळणाऱ्या लाटांचें दर्शन झालें. नाराच्या होर्युजी मंदिराच्या प्राकारांत पाऊल टाकलें नि गोव्याच्या मंगेशीच्या प्राकारांतलें वातावरण जीवंत झालें. लहानपणीं देवळांतल्या दीपस्तंभांत जी राजस भव्यता जाणवली होती ती नारा-निक्कोचे पागोडे पाहून पूर्णत्वाप्रत पोंचली. जपानच्या स्त्रियांत सौंदर्य आणि चारुता यांचें जें मीलन दिसलें त्यानें स्त्रीत्वाचा एक नवाच साक्षात्कार झाला. जपानी लोकांच्या वर्तनांतील शालीन संस्कारशीलतेनें संस्कृतीच्या कांहीं नव्याच छटा उमटल्या आणि, जपानी माणसाच्या मनांत काय चाललें आहे याचा बिलकूल पत्ता लागत नाहीं याची मधुनमधून होणारी अस्वस्थ जाणीव त्यांनीं पार विसरवून टाकली. जपानांतल्या जीवनांत रंग आणि रेषा यांनीं धारण केलेलीं निरनिराळीं स्वप्नमय रूपें पाहिलीं तेव्हां तर कलासृष्टींतल्या परीकथाच आपल्यापुढें आकारास आल्या कीं काय असें वाटलें. एक अनुभव सारखा सारखा डोळ्यांपुढें आकारत होता. आम्ही ओइसोच्या किनाऱ्यावर विहारासाठीं गेलों होतों. माझ्यापुढें पॅसिफिक समुद्राचा निळा विशाल विस्तार पसरला होता. मधून मधून त्यावर जहाजें सफेत शुभ्र शिडें पसरून डौलानें उभीं होतीं. हां हां म्हणतां माझ्या हृदयाचें पांखरूं पंख पसरून एका जहाजाच्या डोलकाठीवर जाऊन बसलें—आणि मला कसल्या तरी अज्ञात अज्ञात प्रदेशाचीं सुरम्य दर्शनें

झालीं. तो अनुभव आतां पुनःपुन्हां जागा होत होता. या अनुभवांत नुसता स्वप्नाळूपणा आहे, त्यांतली वास्तवता कदाचित् कठोरच असेल असें माझी बुद्धि मुला सारखी बजावीत होती, पण त्याचा उपयोग होत नव्हता. तो पॅसिफिकचा समुद्र, त्यावर डोलणारीं तीं शिडें, ती डोलकाठी–तो सुरम्य अनुभव पुनःपुन्हां माझ्या साऱ्या संज्ञा व्यापून टाकीत होता.


* * *

हॅनेडा विमानतळाचें दर्शन झालें आणि मी भानावर आलों. विमानतळाच्या आवारांत शिरतांना उजवीकडे एक लाल शेंदरी तोरी माझ्या नजरेस पडली आणि मला नवल वाटलें. तोरी दिसते पण मंदिर कोठें आहे? आणि ही तोरी अशी विमानतळाच्या आवारांत कशी? या प्रश्नांचीं लगेच उत्तरें शोधायला वेळ नव्हता. वैमानिक प्रवासाचे सारे विधि अगोदर पार पाडायला हवे होते. ते सारे आटपले आणि विमान सुटण्याची वाट पहात बसलों तेव्हां एका गृहस्थापाशीं चौकशी केली. त्यानें एक चकित करणारी गोष्टच सांगितली. अनामोरी मंदिराची ही तोरी. १९४५ सालीं या विमानतळाची दुरुस्ती करीत असतांना अमेरिकन इंजीनीअर्सना दक्षिणेकडे हें छोटेंसें शिंटो मंदिर आढळलें. त्यांनीं तें तेथून उखडायचें ठरविलें. पण उखडण्याची पहिली पहार बसली आणि विमानतळावर लहान मोठे अपघात होऊं लागले. वैमानिक धर्मभोळे असतातच. त्यांना वाटलें, अनामोरीचा कोप झाला. त्यांनीं तें मंदिर तसेंच ठेवलें. पुढें या विमानतळाचा विस्तार झाला, तेव्हां हें मंदिर हालविणें भागच होतें, पण जपान्यांनीं त्या मंदिराची प्रतिस्थापना इमारतीच्या माथ्यावर–वरच्या गच्चीवर–केली. तोरी मात्र होती तेथेंच पूर्वीप्रमाणें या मंदिराच्या प्रवेशद्वाराचें प्रतीक म्हणून झळकत राहिली.


विमानतळ म्हणजे आजच्या आधुनिकतेचे साक्षीदार. टोकिओंत या विमानतळाच्या डोक्यावर एक शिण्टो मंदिर जाऊन बसावें ही विसंगति मोठी विचित्र होती. पण तिचें फारसें आश्चर्य मला वाटलें नाहीं. गेले कांहीं आठवडे मी जपानांतल्या विसंगतीचाच अनुभव घेतों. या विसंगतीमुळें मी

वारंवार स्तिमित झालों होतों. माझ्या डोळ्यावरची स्वप्नमय माया तिनें अनेकदां बिघडविली होती. जपानी लोक सौंदर्याचे इतके भोक्ते, पण कुरूप विद्रूप शहरें वसवण्यांत त्यांचा हातखंडा आहे. एखादें किओटोसारखें शहर त्याला अपवाद असेल, पण त्याच्याहि सौंदर्यावर आघात होऊं लागले आहेत. जपान्यांत कलासक्त वृत्ति इतकी भिनलेली, साधा एक शब्द लिहितांना ते एखादी कलाकृति निर्माण करून जातील, पण या कलालोलुप लोकांचा पैशाचा लोभ पाहून घ्यावा. लोक व्यक्तिशः इतके स्वच्छ, त्यांनीं न्हाण्याचा धर्म बनविला आहे. पण सार्वजनिक ठिकाणांचे उकिरडे बनविणें हा त्यांच्या हातचा मळ. घर ते इतकें स्वच्छ नितळ ठेवतील, पण त्यांच्या आगगाड्यांच्या डब्यांतली घाण आणि कचेरींतला पसारा विश्वास बसणार नाहीं असा. निर्वाणमय शांतीची उपासना करणाऱ्या झेनधर्मांचे ते उपासक, पण चार जपानी एकत्र जमले म्हणजे अफाट गलका माजवतात. लोक इतके सभ्य आणि विनयशील, व्यक्तिशः इतके दयाळु, पण सार्वजनिक ठिकाणीं क्रूर धक्काबुक्की करण्यास ते सदैव तयार. फुलांचा त्यांना इतका सोस, चार दिवस मोहराचें मायाजाळ पसरणाऱ्या चेरीचा कुरूप उपद्रव ते वर्षाचे तीनशें-साठ दिवस आनंदानें सहन करतील, पण सार्वजनिक उद्यानांत याच चेरीच्या झाडाखालीं घाणीचे ढीग रचण्यास त्यांना खंत वाटत नाहीं. फुलांचें वेड त्यांच्या जीवनांत इतकें पसरलेलें असतांना सुद्धां त्यांच्या बागांत फुलझाडांना महत्त्व नाहीं. जपान्यांच्या विसंगतीची कमाल त्यांच्या आगीच्या आकर्षणांत आहे. वस्तुतः आग आणि विस्तव यांची त्यांना इतकी धास्ती! आगीचा राक्षस त्यांचीं घरेंदारें, शहरें स्वाहा करायला टपून बसलेला असतो, आणि तरी ते सतत विस्तवाशीं खेळ खेळत असतात. त्यांच्या घरांतल्या विस्तवाच्या शेगड्या म्हणजे अग्निभुतेंच—केव्हां खाक करतील खात्री नाहीं. आणि घराबाहेर रोज दीपोत्सव. दररोज बाजारांत रोषणाई सुरू असते. अगदीं कंदिलांच्या रांगांनीं नि तोरणांनीं दुकानें फुललेलीं असतात. इतकेंच काय पण रस्त्यावरचा पोलीस सुद्धा हातांत कागदाचा तेवता कंदिल घेऊन रहदारीचें नियंत्रण करीत असतो. जपानी लोक म्हणजे सूर्यदेवतेचे वंशज. विश्वाच्या प्रारंभकालींच रुसून बसलेल्या या देवतेच्या स्वभावांतली कळ अद्याप कायम असावी. आपल्या मिस्किलपणाचे प्रयोग ती जपान्यांच्या दीपभक्तींतून करीत असते असें दिसतें!

आमचें विमान आकाशांत चढलें नि माझ्या नजरेसमोर तो रत्नजडित गालिचा पसरला. प्रथम मीं तो पाहिला तेव्हां त्याच्या जादूनें माझ्या नजरेवर मोहिनी पडली होती. आतां त्या जादूचीं कांहीं रहस्यें परिचयाचीं झालीं होतीं. तरी ती मोहिनी कायम होती ... तो गालिचा तसाच झगमगत होता, त्याच्यावरचीं फुलें तशींच प्रकाशत होतीं — फक्त त्यांची जाणीव अधिक खोल होती, गाभ्यापर्यंत पोंचत होती, तेथल्या वेदनेचा कांटा हालवीत होती.



चेरीचा मोहर



चेरीचा जगप्रसिद्ध मोहर पाहायला मिळणारा म्हणून मी खूष होऊन गेलों होतों. त्याचप्रमाणें निसर्गसुंदर जपानच्या वसंतऋतूचें दर्शन घडणार म्हणूनहि आनंदून गेलों होतों. पण या वेळीं टोकिओच्या दर्शनानें माझी निराशाच

झाली.* टोकिओ म्हणजे धूळ, ओरड आणि गर्दी यांचें संत्रस्त मिश्रण हा अनुभव नेहमींचाच, पण गिंझाच्या दुतर्फा विलो वृक्षांनीं माझा नजरेला अनेकदां वेध लावलेला होता. इम्पीरिअल पॅलेसच्या पटांगणासमोरच्या रस्त्याकांठच्या सुबक आकाराच्या वृक्षांनीं माझी दृष्टि अनेकदां गुंगविली होती. पण या वेळीं या झाडांचे उघडेओके सांगाडे झाले होते. त्यांपैकीं कांहींचीं अंगें वसंताच्या स्पर्शानें शहारलीं होतीं, पण त्यांतून कोवळे लुसलुशीत धुमारे अद्याप फुटायचे होते. राजवाड्याभोंवतालच्या खंदकापलीकडील टेकड्यावरील चिडाचीं झाडें अर्थात् हिरवीं होतीं, पण त्यांच्याहि झुबक्यांचा रंग विटलेला होता. वसंताच्या हवेंतली गोड शिरशिरी तेवढीच सुखकारक होती. पण माझ्या आशा हिरव्या होत्या, गुलाबी होत्या.

जपान टाईम्समध्यें वाचलें कीं यंदा हिवाळा लांबल्यामुळें चेरीचा मोसम मागस आहे. चेरीचा मोहर पाहण्याची इच्छा अनावर होती, पण चेरीच्या झाडाचें मुकट ध्यान पाहण्याची माझी मुळींच तयारी नव्हती. म्हणून मी हॉटेलच्या खोलींतच वाट पाहात स्वस्थ राहिलों. आसपासच्या रस्त्यांवर प्लॅस्टिकच्या कृत्रिम चेरी–मोहराची आरास होती, पण या आंबटशोकी शोभेची मला शिसारी आली.

तोंच एक दिवस एक मित्र आला नि म्हणाला, तिकडे चेरीच्या मोहराची माया पसरली आहे आणि इकडे तूं आढ्याकडे डोळे लावून काय बसला आहेस ! लगेच जाऊन फूजीच्या अगर हाकोनेच्या सफरीच्या बसेस्‌ची चवकशी केली, तों कळलें कीं साऱ्या बसेस् गच्च भरल्या आहेत, एकहि जागा मोकळी नाहीं. अगदीं निराश झालों. वाटलें, मोठ्या योगायोगानें वसंतांत जपानला आलों, आणि चेरीचा मोहर न पाहण्याचा कर्मदरिद्रीपणा पत्करून परत जावें लागणार ! इतक्यांत आठवलें कीं टोकिओच्या उएनो पार्कमध्यें चेरीची मोठी लागवड आहे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उएनो पार्ककडे निघालों तों जपानांत स्थाईक झालेला एक अमेरिकन मित्र भेटला. तो म्हणाला, चेरीच्या दृष्टीनें उभ्या

---

* पुस्तकाचा इतर भाग लिहून झाल्यानंतर, १९६१ च्या एप्रिलांत, केलेल्या सफरींतील एक अनुभव.

जपानांत सर्वोत्कृष्ट ठरणारें ठिकाण या टोकिओंतच आहे हें तुला ठाऊक आहे काय ?—चल, मी तुला तिकडेच नेतों.

* * *

त्यानें मला यासुकुनी मंदिराला नेलें. आणि खरोखरच मंदिरांच्या समोर चेरीच्या फुललेल्या फांद्यांचा अप्रतिम मंडप दृष्टीस पडला. आम्ही त्या मंडपांत शिरलों. वर गुलाबी छटांच्या शुभ्रसफेत फुलांचें छत, पायाशीं पांढऱ्या स्वच्छ पाकळ्यांचा खच आणि मध्यें आमच्या अंगावर चेरीच्या लहरत्या पाकळ्यांचा हिमाच्या भुरभुरत्या वर्षावासारखा वर्षाव ! क्षणभर परीकथांच्या विश्वांत आल्या-सारखेंच वाटलें.

पण क्षणभरच ! कारण लगेच मन विचार करूं लागलें. हें दृश्य खरोखरच सुंदर आहे. फुलांच्या नैसर्गिक मंडपाचा, मंडपाच्या लहरत्या तरल वाता-वरणाचा अनुभव अपूर्व आहे. पण खरोखरच हें दृश्य इतकें असामान्य आहे काय ? आपल्याकडचीं गुलमोहराचीं झाडें अशीं मोहरानें अक्षरशः भरून जात नाहींत काय ? जकरंदाच्या झाडाचें वसंतांत असें संपूर्ण रूपांतर होत नाहीं काय ? अर्थात् गुलमोहराच्या ज्वालामय पुष्पसंभाराचें वातावरण निराळें. जकरंदाच्या निळ्या मायेचें वस्त्र वेगळें. पण चेरीच्या झाडाभोंवतीं जपान्यांनीं आनंदाचें, उत्साहाचें, नृत्यगीताचें जें एक वातावरण निर्माण करून ठेवलें आहे तसें गुलमोहराभोंवती वा पारिजातकाभोंवतीं निर्माण करण्याची आवश्यकता आम्हाला वाटली आहे काय ?

आपल्या वाङ्मयांत वसंतोत्सवाचीं भरघोस वर्णनें आपण वाचलेलीं आहेत. आपल्या प्राचीन जीवनांतल्या निसर्गप्रीतीची साक्ष त्यांतून मिळते. पण ही निसर्गभक्ति जीवनांतून नष्ट होऊन ग्रंथांतरीं जाऊन बसलीं आहे. आणि उलट जपान्यांनीं निसर्गाचें हें वातावरण जीवनांत ओतलें आहे, आणि राष्ट्रीय आत्म्याला स्पर्श करण्याचें सामर्थ्य त्यांनीं त्याला प्राप्त करून दिलें आहे.

आज रविवार. आज या वातावरणाला विलक्षण रुळसळ प्राप्त व्हायला हवी. पण तिचा प्रत्यय या मंदिरांत येत नव्हता. अर्थात् येथेंहि गर्दी होती. स्त्रीपुरुषमुलें यांची रीघ लागली होती. तीं येत होतीं, मंडपांत शिरत होतीं, फुलांच्या दर्शनानें फुलत होतीं, पाकळ्यांच्या स्पर्शानें शहारत होतीं, आनंदाच्या आस्वादानें लहरत होतीं. पण त्यांत एक मार्दव होतें, एक संयम होता, संभावितपणा होता. एक प्रकारचा अलिप्तपणाहि होता. कसली तरी उणीव भासत होती.

चेरीच्या मोहराभोंवतालीं जपाननें तयार केलेलें वातावरण अनुभवण्यासाठीं आम्हांला उएनो पार्कमध्यें जावें लागलें.

*   *   *

उएनो पार्कमध्यें एक शिण्टो मंदिर आहे आणि मंदिराच्या आवारांत चेरीच्या झाडांची एक प्राचीन लागवड आहे. या आवारांत केव्हांहि फेरफटका केला तरी कसल्या तरी आगळ्या वातावरणाचा अनुभव येतो. चेरीच्या हंगामांत तर या वातावरणाला पिसें लागतें. पार्कमध्यें सर्वत्र उभारलेल्या पताकांनीं आणि उत्सवांकित कंदिलांनीं याची पूर्वसूचना मिळाली. आज तर सुटीचा दिवस! आज याला उधाणच आलें होतें. जिकडे तिकडे गर्दी, गडबड, धांदल–आणि चेरीच्या झाडांच्या तळाशीं तर गर्दीचा अक्षरशः खच! पण तिचेहि आकार–प्रकार! गर्दीत निरनिराळे गट. निरनिराळे फड! प्रत्येकाच्या पताका निराळ्या, निशाण्या निराळ्या, ऐट निराळी, करमणूक निराळी! एका फडांत तीन किमोनो–कन्या सामीसेनच्या तालावर खानदानी नृत्य करीत होत्या. दुसऱ्या फडांत व्हायलीनचे स्वर निघत होते. तिसऱ्यांत मँडोलिनच्या स्वरांना मुलामुलींच्या गाण्याची साथ मिळत होती. चवथ्यांत नशापाण्यानें बेहोष झालेल्या एका गलेलठ्ठ प्राण्याचें अर्धनग्न नृत्य. (आणि त्याच्याकडे इतर फडांचें संपूर्ण दुर्लक्ष्य!) पांचव्यांत नुसत्या हंशाटाळ्या! सहाव्यांत व्हिस्कीच्या बाटल्यांचे बार! सातव्यांत त्यांच्याशीं बिअरची स्पर्धा! आठव्यांत मेजवानीची बैठक. नवव्यांत फोटोची करामत आणि दहाव्या, अकराव्या, बाराव्या फडांत या साऱ्या व पत्त्यासारख्या इतर अनेक गोष्टींची भेसळ–मिसळ! साऱ्यांच्या डोक्यावर चेरीच्या डहाळ्यांचें छत्र होतें. चेरीच्या पाकळ्यांचा त्यांच्या अंगावर स्वैर वर्षाव होत होता. पण त्याची त्यांना जाणीव नव्हती. तिकडे त्यांचें लक्षच नव्हतें. चेरीचा मोहर हें नुसतें निमित्त होतें. बेदरकार उत्साहांत स्वतःला आणि स्वतःसकट इतरांना झोंकून देणें हें उद्दिष्ट होतें. या बेदरकारपणामुळेंच जेथें बोट शिरकवायला जागा नव्हती तेथें सबंध शरीर घुसत होतें, जेथें स्वर ऐकूं येण्याची शक्यता नव्हती तेथें गाण्याची मैफल झडत होती, आणि जेथें पाऊल सरकवायला जागा नव्हती तेथें नृत्यांचीं पावलें पडत होतीं. हें कसें होत होतें, काय होत होतें याची कोणाला पर्वा नव्हती, फारशी जाणीवहि नव्हती. तुफानलेल्या समुद्राला किनाऱ्यावरून ओढून आणलेल्या किंवा किनाऱ्यावर लोटून दिलेल्या, आपल्या बेफाम पाण्यावर

धडपडणाऱ्या किंवा प्रक्षुब्ध पाण्यांत गडप झालेल्या नौकांबद्दल सारखीच कदर असते तशीच या बेदरकारीला या तपशीलाबाबत होती.

पण पलीकडे, मंदिराच्या प्राकारांत, एक निराळेंच वातावरण नांदत होतें. तेथ नृत्यमंदिरांत चेरीच्या नृत्याचें अभिजात पाऊल पडत होतें आणि चेरीच्या गीताचे अभिजात सूर घुमत होते. या पावलांत एक संयम होता आणि या स्वरांत एक संस्कारशीलता होती. ही नृत्याचीं पावलें टाकणाऱ्या मुलींच्या मुद्रेवर होती त्याचप्रमाणें त्यांच्या रंगदार किमोनोवरच्या नक्षींत होती. येथें जपानच्या अभिजात संस्कृतीचा आत्मा नांदत होता. त्यांत एक तन्मयता होती, समर्पणशीलता होती.

पण बाहेरच्या बेदरकारीचा या आंतल्या संस्कारशीलतेशीं कांहीं संबंध नव्हता – निदान दिसत नव्हता. जपानी जीवनाचीं हीं दोन रूपें होतीं. तीं परस्परविरुद्ध होतीं. परस्पराशीं फटकून वागत होतीं. जपानी जीवनांत अनेकांना आज एक फट पडलेली दिसते, त्याला भेग गेलेली दिसते. त्याचेंच हें प्रमाण म्हणावें का? पण उलट या आंतल्या आणि बाहेरच्या दृश्यांत एक आंतरिक नातें नाहीं काय? चेरीच्या अभिमानानेंच हीं दृश्यें प्रेरित झालेलीं नाहींत काय?

* * *

मला खरोखर आश्चर्य वाटतें. असें आहे काय या चेरीच्या झाडांत? हे कळ्यांचे, मोहराचे, पाकळ्यांच्या वर्षावाचे दहा पंधरा दिवस सोडले तर इतर वेळीं या झाडाचें रूप अभद्रच दिसतें. वसंत ऋतूंत त्याच्या फांद्या कळ्यांनीं शहारतात, त्याच्या डहाळ्या फुलांनीं शोभतात आणि सारें आसमन्त या अपूर्व शोभेनें खुलून जातें. पण एकदां या पाकळ्या गळल्या (आणि त्या किती झपाझप गळतात!) आणि पाकळ्यानंतर आलेल्या पालवीची कोवळी माया निबरली म्हणजे हें झाड म्हणजे शुद्ध उपद्रव. त्याला ना शोभा, ना फल; त्याचा ना उपयोग, ना आकार. मग जपान्यांनीं त्याचें माहात्म्य इतकें कां माजवलें आहे?

पण याचें निश्चित उत्तर मजपाशीं नाहीं. (जपानच्या कोणत्याच समस्येचें नाहीं. जपानबद्दल इतकें लिहून सुद्धां जपानी अंतरंगाचें कितपत दर्शन आपल्याला झालें आहे याची मला स्वतःलाच शंका आहे.) पण कांहीं कल्पना करूं शकतों. निसर्गाचा कोणताहि चमत्कार देवतास्वरूप मानण्याची शिकवण शिण्टो धर्मानें जपान्यांना फार कालापासून शिकवलेली आहे – आणि

चेरीचें एकंदर रूप-ध्यान लक्षांत घेतलें म्हणजे चेरीचा मोहर हा एक चमत्कार मानणें भागच आहे. निसर्गचमत्काराच्या पूजनाभोंवतीं सौंदर्याचे विधिविशेष निर्माण करणें हा जपानी संस्कृतीचा जन्मजात विशेष, आणि येथें तर निसर्गाच्या एका सौंदर्यमय चमत्काराची सौंदर्यानें पूजन करण्याची संधि! मग चेरीच्या मोहरानें जपानी सौंदर्यभक्तीला आणि कलात्मकतेला मुक्त अवसर मिळाला तर नवल काय? आधुनिक कालांत या साऱ्याला प्रसिद्धीच्या तंत्राची अजोड जोड मिळाली, आणि तिच्या जोरावर जपान्यांनीं चेरीच्या मोहराला जागतिक माहात्म्य प्राप्त करून दिलें. आतां जगाची अशी ठाम समजूत झालेली आहे कीं चेरीसारखी शोभा नाहीं आणि इतरत्र चेरी नाहीं.

पण हीं दोनहि विधानें खरीं नाहींत. चेरीचें अस्तित्व जपानप्रमाणेंच कोरीआंत आहे–किंबहुना, चेरीची आयात जपानमध्यें कोरीआंतूनच झालेली असण्याचा संभव आहे. आणि चेरीच्या मोहरापेक्षां इतर कांहीं मोहर अधिक सुंदर आहेत–निदान कमी सुंदर नाहींत. (कदाचित् मी चेरीचा मोहर टोकिओच्या बंदिस्त जगांत पाहिला, आणि किओटोमधील मारुयामा पार्कसारख्या मुक्त पार्श्वभूमीवर पाहिला नाहीं, हें माझ्या त्रुटित आस्वादाचें कारण असेल. पण चेरीच्या प्रमाणेंच जरदाळूच्या मोहराचें कौतुक खुद्द जपानी करतात–आणि ओगाटा कोरिनसारख्या कलावंताला आलूबोखारच्या मोहरानें विलक्षण मोहिनी घातली होती!)

तें कांहीं असलें तरी जपान्यांनीं चेरीच्या मोहराला जागतिक माहात्म्य प्राप्त करून दिलें आहे. याचें साधें कारण म्हणजे चेरीच्या पूजनांत आणि प्रसाधनांत जपाननें आपलें सारें अंतरंग ओतलें आहे. आपली सारी निसर्गभक्ति येथें पणाला लावली आहे. आपल्या उभ्या कलात्मकतेचा त्याच्यावर वर्षाव केला आहे. चेरीच्या उत्सवांत स्वतःला संपूर्णपणें विसरून जाण्याची असाधारण विद्या हस्तगत केली आहे. याचाच साक्षात्कार मला उएनो पार्कात झाला. मंदिराच्या प्राकारांत झाला, आणि प्राकाराबाहेरहि झाला.

ही अंतरंगाची आस्था, हा अंतरंगाचा उत्साह, ही अंतरंगाची समर्पणता, हेंच चेरीच्या महोत्सवाचें रहस्य आहे–आणि तें त्या मोहरापेक्षांहि अधिक अर्थपूर्ण आहे.